## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(जिल्हा वाचनालय)

केकाचें नांव —

संपादक —

केक क्रमांक — सन —

अंक —

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

ग्रं. क्र. ... ता. ...

ना.ग्रा. ८८/२१

ग्रंथ संग्रहालय

ता...........

# कन्याशिक्षक.

वर्ष ११ वें. मार्च ते जून १९२५ अंक १ ते ४

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें, यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी ट. हां. सह १॥ रुपया.

या अंकाची किंमत १२ आणे.

७ ऑगस्ट सन १९२५ १९२५.

( कन्याशिक्षक मंडळानें चालविलेलें
मासिक पुस्तक. )

# कन्याशिक्षक.

वर्ष ११ वें.

( मार्च १९२५ ते फेब्रुआरी १९२६. )

( हें पुस्तक पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर बी. ए. लेडी सुपरिन्टेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें. )

१९२६

किंमत १॥ रुपाया.

# वर्ष ११ वें.

## अनुक्रमणिका


| | पानें. | लेखक. |
|---|---|---|
| १ भाषा | | |
| वाक्यरचना | १—२२ | रा. म. का. कारखानीस. |
| व्याकरण | ८५—८८ | ” ” |
| २ शिशुवर्गाकरितां धडे. | | |
| कामाला लाग | २३ | ” ” |
| चला आपण गमतीनें खेळूं | २४—२५ | ” ” |
| अशी मौज मीं केली | २५—२६ | ” ” |
| बाबांचा बाजार | ११९-१२० | ” ” |
| हिरवा गार पोपट | १२१-१२२ | ” ” |
| गाजराची भाजी | २०६-२०८ | ” ” |
| गाढवाचें गाणें | २०८-२१० | ” ” |
| आकारांत इकारांत धडे | २५४-२५९ | ” ” |
| राग घालविला | २५९-२६० | ” ” |
| ३ मुलांकरितां कविता. | | |
| कोण कसें चालतें | ७३—७६ | ” ” |
| मला काय वाटतें | ७७—७९ | ” ” |
| टाळ्या व चुटक्या | ११५ | ” ” |
| चेंडू | ११६ | ” ” |
| दहा अंकांचें गाणें | ७२ | ” ” |
| कोण काय बोलतो | ११६-११७ | ” ” |
| हरवलेली बाहुली | ११७-११९ | ” ” |
| प्रभात | १२३-१२४ | ” ” |
| भूपाळी | २२३ | ” ” |
| ईश्वराची दया | २२४ | ” ” |

| | | |
|---|---|---|
| मनुताईंची खोड मोडली | २६०—२६१ | रा. म. का. कारखानीस. |
| आम्ही कसें चालतों | २६१—२६२ | ,, ,, |
| आगगाडी | २६२—२६३ | ,, ,, |
| ४ मुलांकरितां गोष्टी | | ,, ,, |
| लहान मुलगा व त्याची शेळी | २७—२८ | रा. कारखानीस. |
| मनी मांजरीची गोष्ट | ८०—८४ | विविध वृत्त. |
| तीन बहिणी | १२३–१२४ | रा. कारखानीस. |
| टिह्लू | १३५–१३९ | रा. मोकाशी. |
| कांसवाचें शौर्य | १४८–१५२ | ,, ,, |
| आळशी सुरवंट | २१७—२२० | ,, ,, |
| सोन्याची हंसी | २३८—२४२ | ,, ,, |
| ५ चरित्रें | | |
| राजा विक्रम | ९३—९६ | रा. म. का. कारखानिस |
| प. वा. डॉक्टर भांडारकर | १०३–११४ | ,, ,, |
| दिव्य राजकन्या | २२८–२३५ | रा. गो. ब. मोकाशी. |
| नवे व्हॉइसराय | २९४–२९७ | रा. रा. भा. ठोसर. |
| राजा उदयन | २६३–२७४ | रा. कारखानीस. |
| ६ भूगोल व स्थलवर्णन | | |
| फिनिक्स पार्क किंडरगार्टन | २९—३२ | मिस्. आर. नवलकर. |
| सीलोन | ३३— ३७ | रा. रा. भा. ठोसर. |
| किर्लोस्कर व ओगलेवाडी | ४६—५६ | ताराबाई पाथरे. |
| मायारिंजन | ५७—६९ | मिस् नवलकर. |
| स्वित्सर्लंडांतील देखावे | १३९–१४७ | ,, ,, |
| सेंट अंड्रुस स्कूल | २२८–२३५ | ,, ,, |
| न्यूझीलंडांतील मेऑरी लोक. | २२०–२२३ | रा. रा. भा. ठोसर. |
| ७ इतिहास | | |
| पूर्व—आफ्रिका | ४१—४६ | रा. ठोसर. |
| इजिप्त व सोडन | १२५–१२९ | ,, ,, |
| ऱ्होडोशिआ | २४६–२४९ | ,, ,, |

| | | |
|---|---|---|
| इतिहास कसा शिकवावा | १६९–१९७ | रा. कारखानीस. |
| महाराष्ट्रांवरील आपत्ति | २७७–२८४ | ,, ,, |
| ८ सृष्टिनिरीक्षण | | |
| कीटकांचा विशिष्ट वर्ग | १४८–१५२ | प्रो. वा. ग. देशपांडे |
| कीटकांची शरीररचना | १५२–१५५ | ,, ,, |
| तारे व ग्रह (इंग्रजी मासिकावरून) | २२५–२२९ | रा. मोकाशी |
| मुळें व त्यांचे प्रकार | २४२–२४५ | ,, ,, |
| ९ शिक्षण | | |
| स्त्रीशिक्षण | ८९––९१ | ज्ञानप्रकाश |
| चलच्चित्रपटाचे साहाय्यानें शिक्षण | १६९–१७० | रा. कारखानीस. |
| शिक्षणपद्धतींतील फरक | १९८–२०३ | रा. कारखानिस. |
| १० भूगोल | | |
| ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वे | ७०––७२ | रा. कारखानीस. |
| भूगोलाचा अभ्यासक्रम | २११–२१६ | रा. स. वि. वैसास |
| जूपान (टांचण) | २५०–२५३ | कु. काशीबाई पुराणिक. |
| ११ कविता | | |
| बालजिज्ञासा | १७१–१७१ | रा. वि. ज. कामत. |
| १२ किरकोळ | | |
| पेट्रोलिअम् | १६०–४६५ | रा. ठोसर. |
| सूर्य हाच उत्तम वैद्य | १६६ | रा. कारखानीस. |
| प्रचंड विमानें | १६८ | ,, ,, |
| कोको | २८८–२९३ | रा. ठोसर. |
| १३ वर्तमानसार | १७२–१७३ | रा. ठोसर. |
| ,, | ३०१–३०५ | ,, ,, |
| १४ पुस्तकपरीक्षा | ९७––९८ | रा. कारखानीस. |
| ,, | १६७–१६८ | ,, ,, |
| ,, | २९७–३०० | ,, ,, |
| परीक्षांचे निकाल | १७४–१७६ | |
| सरकारी जाहिराती | | |

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा। जरि परोपकृतीच मनोहरा।
जरि असे चतुरत्व, तरी तुला। शिकविण्यासम छंद नसे भला॥

वर्ष ११ वें ] मार्च ते जून. १९२५ [ अंक १ ते ४

## वाक्यरचना.

### इयत्ता ४ थी.

गोष्ट या साधनाचा या इयत्तेंत कमी उपयोग करावा. शिक्षकानें एकादी ल्हानशी गोष्ट तोंडीं सांगावी किंवा पुस्तकांतून वाचून दाखवावी, नंतर ती मुलांनीं लिहावी, हा क्रम मागील इयत्तांतून चालत होता, त्याची आवश्यकता आतां या इयत्तेंत मुळींच नाहीं. या इयत्तेंत मुलांनीं आपल्या वाचनाच्या पुस्तकांतील धडे वाचावे किंवा गोष्टीरूप इतिहासांतील एकादें चरित्र किंवा एकाद्या महत्त्वाच्या प्रसंगाचें वर्णन वाचावें व तें थोडक्यात लिहावें. एकादा भाग वाचून त्याचा सारांश थोडक्यांत आणणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. तिचा उपयोग पुढील आयुष्यांत फार होतो, म्हणूनच मुलांना या इयत्तेपासून सारांश काढण्याची संवय लावावी. एकादा धडा वाचला किंवा एकादें चरित्र वाचलें व तेंच जर मुलांना लिहिण्यास सांगितलें, तर मुलें त्यां

घड्यांत किंवा चरित्रांत महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आहेत याचा मुळींच विचार न करितां केवळ स्मरणशक्तीवर भिस्त ठेवून बुकांतील वाक्यें जशींच्या तशींच लिहिण्यास सुरुवात करितात. याचा परिणाम असा होतो कीं, त्यांचें लिहिणें वेळांत कधींच संपत नाहीं व तीं भराभर कांहींतरी खरडीत बसतात. शिक्षकानें आदल्या दिवशीं झालेल्या धड्याचा किंवा चरित्राचा सारांश जर मुलांना लिहावयास सांगितला असेल, तर प्रथम मुलांना थोडेसे प्रश्न विचारून त्या धड्यांत अगर चरित्रांत महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आहेत इकडे मुलांचें लक्ष लावावें. कोणतें पाल्हाळिक वर्णन गाळतां येईल, कोणत्या गोष्टी थोडक्यांत वर्णन करितां येतील हें सर्व मुलांकडून काढून घ्यावें. वाटल्यास महत्त्वाचे मुद्दे फळ्यावर लिहावे, मग मुलांना आपली वाक्यरचना करण्यास सांगावें. नवीन धडा, नवीन चरित्र किंवा इतिहासाचा नवीन भाग असल्यास तो लक्षपूर्वक मुलांना वाचण्यास सांगावा; नंतर पूर्वीप्रमाणें प्रश्न विचारून महत्त्वाच्या मुद्द्यांकडे मुलांचें लक्ष वळवावें व ते फळ्यावर लिहावे. मग मुलांना वाक्यरचना करण्यास सांगावें. आपण दोन उदाहरणें घेऊन ही गोष्ट स्पष्ट करूं. आपण चौथ्या पुस्तकांतील ‘ मजसाठीं कोणी राबत नाहीं ’ हा धडा घेऊं. मुलांनीं हा धडा ८–१० मिनिटें मनांत वाचल्यावर शिक्षकानें ‘ म्हातारी कां थकली होती ? –’ ‘ तिला वाईट कां वाटलें ? ’–‘तिचें समाधान कोणीं केलें ? ’ ‘ तें कसें केलें ? ’ वगैरे प्रश्न विचारून गोष्टींतील महत्त्वाचे मुद्दे काढून घ्यावे व वाटल्यास ते फळ्यावर लिहावे.

१ म्हातारी कामानें दमून जाते.

२ आपल्याकरितां कोणी श्रम करीत नाहीं, म्हणून तिला वाईट वाटतें.

३ शेजारी तिची समजूत करितो.

४ तिच्याकरितां पुष्कळ माणसांस झटावें लागतें हें दाखवितो.

यानंतर मुलांना पुढें दिल्याप्रमाणें ही गोष्ट थोडक्यांत लिहितां येईल.

एक म्हातारी मोलकरीण एके दिवशीं संध्याकाळीं दमून घरीं आली. आपण लोकांकरिता श्रम करितों, पण आपल्याकरितां कोणी करीत नाहीं असें तिला वाटलें व ती कष्टी झाली. इतक्यांत तिचा शेजारी तेथें आला. त्याला तिनें आपलें म्हणणें सांगितलें. तो म्हणाला, 'बाई, तुजकरितांही पुष्कळ माणसें झटत आहेत. तुला मीठ लागतें तें कोंकणांत तयार करितात. तें तयार झाल्यावर तेथून नावाडी लोक तें मुंबईस आणतात. तेथून गाडीवाले तें एथें आणतात, मग तें तुला मिळतें. तुला लागणारें लुगडें तयार करण्यास कितीतरी माणसें लागतात. शेतकरी कापूस पिकवितो, यंत्रानें त्याच्या सरक्या काढतात, मग त्याचें सूत काढतात. त्या सुताला रंगारी लोक रंग देतात. मग कोष्टी लोक तें विणून लुगडें तयार करितात. अशाच रीतीनें तुला लागणारें धान्य, मिरची, तेल, गूळ वगैरे जिन्नस तयार करण्याकरितां कितीतरी लोकांना झटावें लागतें.' शेजाऱ्याचें हें बोलणें ऐकून म्हातारीचें समाधान झालें.

आपण आणखी एक उदाहरण घेऊं. रा. बोरवणकर यांच्या गोष्टीरूप इतिहासांतील 'गड आला पण सिंह गेला' या गोष्टीचा सारांश मुलांना लिहावयाचा आहे अशी आपण कल्पना करूं. ही गोष्ट लिहिण्यापूर्वीं शिक्षकानें प्रश्न विचारून गोष्टींतील मुख्य मुद्यांकडे मुलांचें लक्ष लावावें व ते मुद्दे पुढें दिल्याप्रमाणें फळ्यावर लिहावे. मग थोडक्यांत ती गोष्ट मुलांना लिहिण्यास सांगावी.

१६७० सालीं सिंहगड किल्ला मोगलांच्या ताब्यांत होता.

शिवाजी तो किल्ला घेण्यास तानाजीस सांगतो.

किल्ल्याचा बंदोबस्त फार चांगला होता.

तानाजी घोरपडी लावून वर चढतो.

उदेभानूची व तानाजीची लढाई; तानाजीचा मृत्यु.

मराठे पळावयाचा विचार करितात.

सूर्याजी येतो; पुन्हा लढाई होते; मराठे किल्ला घेतात.

हे मुद्दे लिहिल्यावर मुलांना पुढें दिल्याप्रमाणें ही गोष्ट थोडक्यांत सहज लिहितां येईल.

## गड आला पण सिंह गेला.

इ. स. १६७० सालीं सिंहगड किल्ला मोगलांच्या ताब्यांत होता. हा किल्ला फार बळकट होता व पुण्याचे फार जवळ होता. हा किल्ला आपण परत घ्यावा अशी शिवाजीला फार इच्छा झाली. त्यानें हा किल्ला मोंगलांपासून परत घेण्याचें काम आपला मित्र तानाजी यास सांगितलें. किल्ल्यावर मोगलांचा सरदार उदेभानू होता. तो फार शूर होता. त्याजजवळ एक हजार शूर रजपूत होते. तानाजी एके रात्रीं सैन्य घेऊन तेथें आला. तो व अर्धें सैन्य तटाला घोरपडी लावून वर चढलें व अर्धें सैन्य कल्याण दरवाजानें वर गेलें. रजपुतांची व मराठ्यांची लढाई झाली. त्या लढाईंत तानाजी उदेभानूशीं लढतांना ठार झाला. तेव्हां मराठे पळण्याच्या बेतांत आले. इतक्यांत तानाजीचा भाऊ सूर्याजी अर्धें सैन्य घेऊन दरवाजावाटे किल्ल्यांत आला. तेव्हां मराठे पुन्हा मोठ्या शौर्यानें लढले. उदेभानू मारला गेला. रजपुतांचा पराभव झाला. किल्ला शिवाजीकडे आला. पण तानाजीसारखा सिंह लढाईंत सांपडला.

२. संभाषणात्मक धड्याला गोष्टीचें रूप देणें किंवा एकादी गोष्ट असल्यास ती संभाषणाच्या रूपानें देणें हे वाक्यरचनेचे दोन प्रकार आहेत. यांपैकीं पहिला प्रकार सोपा असतो, पण दुसरा प्रकार मात्र कठीण आहे. गोष्ट अतिशय लहान व सोपी असेल व तींत भाषणें असतील, तरच त्या गोष्टीला संभाषणाचें रूप मुलांना देतां येतें. शिक्षकानें अशा गोष्टींची निवड करितांना फार काळजी घेतली पाहिजे.

संभाषणात्मक धड्याचा सारांश सरळ व थोडक्यांत लिहिणें हा प्रकार मुलांकडून नेहमीं करून घ्यावा. प्रथमतः मुलाना धडा लक्षपूर्वक वाचण्यास सांगावें. नंतर प्रश्न विचारून त्यांतील महत्त्वाच्या गोष्टींकडे मुलांचें लक्ष लावावें व धड्यांतील मुख्य मुद्दे त्यांजकडून काढून घ्यावे. मग त्यांना तो धडा लिहिण्यास सांगावें.

आपण चवथ्या पुस्तकांतलि ‘ अन्नाची जरूरी व त्याचे प्रकार ’ हा धडा घेऊं. हा धडा गणू व त्याचा बाप यांच्या संभाषणाच्या रूपानें दिला आहे. हा धडा जर संभाषणात्मकरूपानें न देतां सरळ थोडक्यांत लिहावयास सांगावयाचा असेल, तर प्रथमतः या धड्यांत सांगितलेल्या महत्त्वाच्या गोष्टी मुलांकडून काढून घेतल्या पाहिजेत. नंतर त्यांना महत्त्वाचे मुद्दे विचारून ते शिक्षकानें फळ्यावर लिहून ठेविले पाहिजेत. या धड्यांतील महत्त्वाचे मुद्दे पुढें दिले आहेत.

१ अन्नाचे योगानें मनुष्यांचें अंगांत शक्ति उत्पन्न होते.

२ मग त्याला अनेक प्रकारचे उद्योग करितां येतात.

३ अन्नानें अंगांत उष्णता उत्पन्न होते व झीज भरून येते.

४ अन्नानें शरिराचीं हाडें बळकट होतात, मांस उत्पन्न होतें, उष्णता व शक्ति मिळते.

९ अन्नाचे निरानिराळे प्रकार व त्यांचा उपयोग.

हे मुद्दे मुलांकडून काढून घेतल्यावर पुढें दिल्याप्रमाणें कांहीं ओळी त्यांना सहज लिहितां येतील.

दिवा जळण्याला तेल लागतें, इंजिन चालण्याला कोळसा लागतो, त्याचप्रमाणें मनुष्याला शक्ति येण्याला व त्याचे हातून त्याचीं कामं होण्याला अन्न लागतें. अन्नावांचून मनुष्याचें शरीर चालणार नाहीं. आपल्या अंगांत जी उष्णता असते ती अन्नामुळेंच उत्पन्न होते. काम केल्यामुळें शरिराची जी झीज होते ती अन्नानें भरून येते. अन्नामुळें आपल्या शरिराची वाढ होते. अन्नाचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांचे निरनिराळे उपयोग होतात. कांहीं अन्नानें आपलें मांस तयार होतें. कांहीं अन्नानें हाडांना बळकटी येते. कांहीं अन्नानें शरिरांत उष्णता उत्पन्न होते. एवढ्याकरितां तिन्ही प्रकारचें अन्न मनुष्यानें खाल्लें पाहिजे. डाळी, धान्यें यांनीं मांस उत्पन्न होतें. गूळ, तूप, तेल, पिठूळ पदार्थ यांनीं उष्णता उत्पन्न होते. फळें, भाज्या, मीठ यांनीं हाडें बळकट होतात. म्हणून जेवणांत तिन्ही प्रकारचे पदार्थ असावे. दूध हें लहान मुलांचें अतिशय उत्तम अन्न होय.

३. गोष्ट अर्धी सांगून ती मुलांना पुरी करावयास सांगणें, गोष्टींतील पहिलें व शेवटचें वाक्य देऊन व मधले कांहीं महत्त्वाचे शब्द सांगून ती मुलांनीं पूर्ण करणें हे प्रकार याही इयत्तेंत घ्यावे. याशिवाय आणखी एक शब्दरचनेचा मजेदार प्रकार या इयत्तेंत घेतां येईल. तो म्हटला म्हणजे एकच महत्त्वाचें वाक्य देऊन त्यावरून संपूर्ण गोष्ट तयार करून घेणें हा होय. ह्या प्रकाराची स्पष्ट कल्पना होण्याकरितां प्रस्तुत लेखकानें कांहीं दिवसांमागें चवथ्या इयत्तेंत घेतलेल्या अशा प्रकारच्या पाठाचें वर्णन पुढें दिलें आहे.

पाठाच्या प्रारंभीं ' आज मी तुम्हांला एक वाक्य देणार आहें व त्याजवरून तुम्ही मला एक सुंदर गोष्ट बनवून सांगा ' असें शिक्षकानें मुलींना सांगितलें व नंतर पुढील वाक्य फळ्यावर लिहिलें.

' ताई, पाहुण्याशीं कसें वागावें हें आज तूं आपल्या भावांना चांगलें शिकविलें.'

शिक्षकानें हें वाक्य योग्य शब्दांवर जोर देऊन सावकाश वाचून दाखविलें. मुलींना विचार करण्यास तीन चार मिनिटें दिलीं. ' आतां ही गोष्ट कोणास सांगतां येते काय ' असें विचारतांच दोन मुली उभ्या राहिल्या व त्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें गोष्ट सांगितली.

एका गांवांत एक मनुष्य राहात होता. त्याला एक मुलगी व दोन मुलगे होते. एके दिवशीं त्या मनुष्याचे घरीं पाहुणा आला. त्या पाहुण्याची त्या दोन मुलांनीं बिलकूल चवकशी केली नाहीं. पण त्या मुलीनें पाहुण्यास बसण्यास सांगितलें व घरांतून बापास बोलावून आणिलें. मग बाप त्या मुलीला म्हणाला, 'ताई, आज तूं आपल्या भावांना पाहुण्याशीं कसें वागावें हें चांगलें शिकविलेंस.'

जवळ जवळ हाच मजकूर दोन्ही मुलींनीं सांगितला. ' ही गोष्ट तुम्हाला आवडली काय ? ' असें वर्गातील इतर मुलींना विचारतांच त्यांनीं ' नाहीं ' असें उत्तर दिलें. एक धीट मुलगी उभी राहून म्हणाली ' ही मुळीं गोष्टच नाहीं, कारण हिच्यांत कांहीं गंमत नाहीं.' ' या दोन मुलींनीं गोष्ट सांगितली आहे, तिच्यांत आपण सर्वजण भर घालून एक सुंदर गोष्ट बनवूं या. तुम्ही प्रत्येकजण ही गोष्ट मजेदार करण्यास मदत करा, ' असें शिक्षकानें मुलींना सांगितलें. 'आतां गोष्टीला आपण सुरुवात करूं या. गोष्टीला सुरुवात कशी बरें करावी?' असें शिक्षकानें विचारतांच ' कोणत्या गांवांत ही गोष्ट झाली,

कोणाच्या घरीं झाली हें आपण ठरवूं ' असें मुलींनीं सांगितलें. त्याप्रमाणें पुणें, मुंबई, सोलापूर, सातारा वगैरे अनेक शहरांचीं नांवें निरनिराळ्या मुलींनीं सुचविलीं, पण अखेरीस मुंबई हेंच नांव सर्व मुलींना पसंत पडलें. गोष्टींतील गृहस्थांचें नांव आनंदराव होतें, तो फार श्रीमंत होता, त्याचा एक मोठा बंगला होता वगैरे कल्पना मुलींनीं स्वयंस्फूर्तीनें भराभर सुचविल्या. नंतर मुलांच्या नांवांचा प्रश्न उद्भवला. प्रभाकर, श्रीधर, दिनकर, रामा, वगैरे अनेक नांवें निरनिराळ्या मुलींनीं सुचविलीं, पण प्रभाकर व दिनकर हींच नांवें सर्व मुलींना पसंत पडलीं. भावांचीं नांवें ठरल्यावर बहिणीचें नांव काय ठेवावें याचा विचार सुरू झाला. एका मुलीनें सांगितलें कीं, ती मुलगी फार चागली होती म्हणून तिला नांवही फार चांगलें दिलें पाहिजे. गोदावरी, गंगू, यमू, कमल, विमल, तारा वगैरे नावांचा वर्षांत नुसता पाऊस पडला. नांव पसंत करण्याचें काम फार कठीण झालें. अखेर विमल हेंच नांव बऱ्याच मुलींना पसंत पडलें, तेव्हां तेंच नांव मुलीला देण्याचें ठरलें. इतक्यांत एका मुलीनें विचारलें कीं, 'भाऊ वडील होते कीं बहीण वडील होती ?' या प्रश्नाला दुसऱ्या एका मुलीनें तावडतोब उत्तर दिलें कीं, 'बहीण लहान असली पाहिजे. वडील बहिणीनें धाकट्या भावांना शिकविण्यांत मुळींच गंमत नाहीं. लहान बहिणीनें वडील भावांना शिकविण्यांतच गंमत असते. ' नंतर एथपर्यंत झालेली गोष्ट रचण्यास प्रारंभ झाला. एका मागून एक अशा क्रमानें वाक्य किंवा दोन वाक्यें एकेका मुलीनें सांगितलीं. पुन्हा एकाच मुलीकडून गोष्टीचा हा झालेला भाग शिक्षकानें सांगून घेतला तो पुढें दिला आहे.

" मुंबई शहरांत आनंदराव नांवाचे एक श्रीमंत गृहस्थ राहत असत. त्यांचा बंगला फार मोठा होता व त्याचे पुढें एक सुंदर बाग होता. त्यांना दोन मुलगे व एक मुलगी होती. वडील मुलाचें नांव प्रभाकर

व धाकट्याचें नाव दिनकर असें होतें. मुलीचें नांव विमल होतें. ती दोघा भावांपेक्षां लहान होती. तिला सर्वजण ' ताई ' असें म्हणत असत. ''........मुलांचा स्वभाव कसा होता हें आतां आपणास पाहिलें पाहिजे असें शिक्षकानें सुचविलें. 'ते दोघेही भाऊ चांगले नव्हते, बहीण मात्र फार चांगल्या स्वभावाची होती, ' असें बऱ्याच मुलींनीं सांगितलें. पण नुसतें चांगलें व वाईट म्हटल्यानें मुलांचा स्वभाव स्पष्ट कळत नाहीं, म्हणून आपणांला त्यांच्या स्वभावाविषयीं आणखी कांहीं तरी सांगितलें पाहिज, असें शिक्षकानें म्हटल्यावर मुलांनीं विचार करून ' ते दोघे भाऊ फार गर्विष्ठ असत. पण ताई तशी नव्हती. ती सर्वांशीं ममतेनें वागे ' असें उत्तर दिलें. आतां आपण गोष्टीची सुरुवात केली, मुलांचा स्वभावही सांगितला; आतां पुढें कोणती हकीकत सांगावी असें शिक्षकानें विचारतांच मुलींनीं ' आतां पाहुण्याची हकीकत सांगितली पाहिजे,' म्हणून उत्तर दिलें. ज्या दिवशीं तो पाहुणा आला होता त्या दिवशीं तीं तिन्हीं मुलें एकाच ठिकाणीं खेळत होतीं, यावरून त्या दिवशीं सुटी असली पाहिजे हें मुलींनीं ठरविलें. 'एके दिवशीं मुलाना सुटी होती म्हणून सकाळीं तीं तिन्ही मुलें आनंदानें दिवाणखान्यांत खेळत होतीं. इतक्यांत एक पाहुणा आला. ' हीं किंवा अशाच अर्थाचीं वाक्यें मुलींनीं भराभर सांगितलीं. तो पाहुणा कसा होता याजबद्दल मोठा मनोरंजक वादविवाद झाला. आलेला पाहुणा अगदीं गरीब होता, त्याचा पोशाक मळलेला होता, वगैरे कल्पना मुलींनीं पुढें मांडल्या. एका मुलीनें सांगितलें कीं तो भटजी होता, त्याच्या अंगांत बंडी होती. व डोक्याला तांबडें पागोटें होतें. दुसऱ्या एका मुलीनें सांगितलें कीं, तो शेतकरी होता, त्याच्या डोकीला मळकट पांढरें पागोटें होतें, अंगांत बंडी होती व खाकेंत घोंगडी होती. मुलींना भ जीपेक्षां शेतकऱ्याची कल्पना फार आवडली. आनंदराव श्रीमंत होता, तेव्हा त्याचे पुष्कळ

बाग खेड्यांत होते; त्यांपैकीं एका बागेचा हा माळी होता व तो आपल्या मालकास भेटावयास आला होता असें मुलींनीं ठरविलें.

हा मनुष्य आलेला पाहून मुलांनीं काय केलें असेल असा प्रश्न विचार-तांच पुढील कल्पना मुलींनीं भराभर सांगितल्या. त्या मनुष्याला पाहून प्रभाकर व दिनकर हसूं लागले. त्याला या बसा असें ते मुळींच बोलले नाहींत. उलटे त्या माणसाकडे पाहून जास्त हसूं लागले. विमलला हें आवडलें नाही. ती त्या माणसाजवळ गेली व त्याला तिनें सत्रंजीवर बस-ण्यास सांगितलें. त्यानें 'मला आनंदरावाला भेटावयाचें आहे' असें सांगतांच मी बाबांना घेऊन येतें, तुम्ही एथें बसा असें ती म्हणाली. या सर्व गोष्टी मुलींनीं भराभर सांगितल्या. माळी व शेतकरी लोक फार मेहनत करितात म्हणून बागेच्या व शेताच्या मालकाला पैसा मिळतो, ही कल्पना प्रश्न विचारून मुलींच्याकडून शिक्षकानें काढून घेतल्यानंतर पुढील गोष्ट शिक्ष-काचे मदतीशिवाय त्यांनीं सांगितली. 'आनंदराव घरांतून बाहेर आल्यावर त्या माळ्याला पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं त्याला घरची हकी-कत विचारली, 'पाटील आतां दोन दिवस एथें राहा मग घरीं जा' असें त्यांनीं त्याला सांगितलें. मग गड्याला बोलावून त्याला पाहुण्याच्या आंघोळीची व्यवस्था करण्यास सांगितलें.' वगैरे कल्पना मुलींनीं भराभर सांगितल्या. 'हा माळी आनंदरावाला भेटण्याकरितां आला होता, तेव्हां तो रिकामाच आला असेल काय ?' असा प्रश्न विचारतांच 'छे! छे! त्यांनीं मुलांकरितां उत्तम फळें आणिलीं असतील' असें उत्तर मुलींनीं दिलें. या प्रश्नानें त्यांना पुढल्या कल्पना सुचल्या व पुढें दिल्याप्रमाणें राहिलेली गोष्ट त्यांनीं पुरी केली. 'त्या माळ्यानें फड-क्यातं बांधलेली एक टोपली काढली. त्या टोपलींत पिकलेले सुरेख आंबे व केळीं होतीं. 'हा खाऊ मीं मुलांकरितां आणिला आहे. तो त्यांना द्या' असें तो आनंदरावास म्हणाला. मग तो माळी आंघोळीस

गेला. माळी गेल्यावर आंबे खाण्याकरितां प्रभाकर व दिनकर बापा-जवळ आले. आनंदरावानें चाकूनें आंबे कापले व आपण आणि विमल मिळून ते खाऊं लागले. प्रभाकर व दिनकर यांजकडे पाहून ते म्हणाले, 'जीं मुलें पाहुण्याला हसतात व त्याच्याशीं नीट वागत नाहींत त्यांनीं पाहुण्यानें आणलेला खाऊही खाऊं नये.' तें ऐकून या दोन मुलांना फार वाईट वाटलें. बाप विमलला म्हणाला 'ताई, पाहुण्याशीं कसें वागावें हें आज तूं आपल्या भावांना चांगलें शिकविलेंस !'

नंतर झालेली सर्व गोष्ट शिक्षकानें मुलींकडून सांगून घेतली. वाक्यांचे शुद्धतेकडे व शब्दांच्या योजनेकडे यावेळीं जास्त लक्ष दिलें. चुका दुरुस्त करण्याचें काम मुलीच करीत होत्या. अगदीं अवश्य तेव्हांच शिक्षक मदत करीत असे. या गोष्टीला एक सुरेखसें नांव दिलें पाहिजे, असें शिक्षकानें सांगतांच पुढें दिलेलीं नांवें मुलींनीं सुचविलीं.

१ शहाणी मुलगी. २ शहाणी विमल. ३ माळी पाहुणा. ४ गावढ्ठ भाऊ. ५ भली खोड मोडली. ६ गर्वाचें घर खालीं. ७ भली फजीती झाली. ८ खाऊ न मिळालेले मुलगे.

मुलींनीं सर्व गोष्ट दुसरे दिवशीं घरून आपआपल्या वहींत लिहून आणली.

ज्या वाक्यावरून गोष्ट रचावयाची तें वाक्य ठरवितांना फार काळजी घेतली पाहिजे. गोष्टींतील महत्त्वाच्या व मुख्य कल्पना त्या वाक्याचे योगानें मुलांना सुचल्या पाहिजेत. या वाक्यांत ज्यांची गोष्टींत जरूरी नाहीं असे शब्द असूं नयेत. ज्या वाक्यावरून एक लहानशी गोष्ट रचतां येईल अशीं कांहीं वाक्यें पुढें दिलीं आहेत.

१ शेवटीं त्या मुलाच्या प्रयत्नाला फळ मिळालें.

२ आपल्या सुशील मित्राशीं आपण निष्कारण वाईट वागलों हें गोविंदास आता कळून आलें.

३ लोकांस फसविल्यानें धंदा चालत नाहीं, प्रामाणिकपणानें धंद्यांत यश येतें हें दोन मुलांच्या उदाहरणांवरून कळतें.

४ पूर्वीच्या इयत्तांप्रमाणें जिच्यामध्यें एकादी मनोरंजक गोष्ट दिली आहे अशी कविता वाक्यरचनेकरितां घ्यावी. ही कविता मागील इयत्तांत घ्यावयाच्या कवितांपेक्षां कठीण असावी व मोठी असावी. कविता सोपी असल्यास मुलांना ती मनांत वाचण्यांत सांगावी, नंतर तिच्यांतील गोष्ट मुलांना लिहिण्यास सांगावी. कविता कठीण असल्यास शिक्षकानें ती अभिनयपूर्वक व योग्य शब्दांवर जोर देऊन आणि योग्य ते भाग पाडून वाचावी व एकादा दुसरा सूचक प्रश्न मधून मधून विचारावा. शिक्षकाच्या या वाचनाचे योगानें कवितेंतील गोष्ट मुलांना समजण्यास मदत होते. या इयत्तेंत वाक्यरचनेकरितां कविता कशी असावी हें दाखविण्याकरितां पुढें एक कविता उदाहरणार्थ घेतली आहे.

## बकुळीच्या माळा.

### श्लोक.

अस्ताला रवि चालला हळुहळू तो शांत होयोनियां
आटोपोनि नभीं प्रवास अपुला विश्रांतिला घ्यावया
झाडें मेघ गिरी लताहि सरिता त्या खिन्न होती मनीं
जो दे जीवन तो सखा त्यजुनियां जातो असें पाहुनी १

पक्षी हिंडुनि सर्वहि दिनभरी आतां गृहा चालले
भेटायास पिलांस उत्सुक मनीं अत्यंत ते जाहले
उद्योगी व्यवसाय सर्व दिनिचा आटोपुनी आपुला
आनंदें निघती गृहासि अपुल्या घ्यायास विश्रांतिला १

मीही कष्ट करोनियां दिनभरी होतों बहू भागलों
टाकोनी अपुरेंच काम अपुलें तेव्हां गृहा चाललों
होतों चालत मंद मंद अपुलीं टाकीत मी पावलें
एकाकीं स्मरलें मला कुसुमनें जें काय सांगीतलें ३

उद्योगास्तव मी सकाळिंच निघें जेव्हां गृहांतूनियां
तों बाळी मम धाकुली कुसुम ती ये तेथ धांवोनियां
खालीं वांकुनियां वरी उचलुनी मीं तीजला घेतली
कंठीं घालुनियां मिठी मधु वचें मातें तदा बोलली ४

" आणा खाउ मला खलोखल तुम्ही आणा मला बाहुली "
" संध्याकालिं तुम्ही नकाचि विसरूं बाबा अणा चांगली "
गालाचे वर गाल ठेवुनि तदा मी बोललों " सोनुले
बाळे आणिन बाहुली सुबक गे पेढे तसे चांगले " ५

मातें हें स्मरतांचि मी निघतसें घ्याया तिची बाहुली
बाला एक तदा उभी चिमुकली मार्गांत देखीयली
नेत्रांतूनि निघोनि अश्रुजल तें गालावरी चाललें
स्फुंदोनी रडतां तिचे नयन ते आरक्तही जाहले ६

नेत्रांतूनि निघोनि अश्रुजल तें गालावरी वाहतें
हातानें पुसलें जरी कितिकदां तें ना तरी थांबतें
कौशल्यें कुसुमें नवीं बकुळिचीं आणोनियां गुंफिलीं
मालांनीं भरली लहान परडी हातीं असे घेतली ७

बाला ती बघुनी विलोकुनि तिच्या अश्रूंस मी थांबलों
झालें काय तुला अशी रडसि कां ऐसें तिला बोललों
झाली रात्र पहा मुलें सकलही जाती गृहीं खेळती
तूं मार्गीं मज एकलीच दिसशी कां जाहली ही स्थिति ? ८

आईबाप तुझे कुठें मम मुली कां एकटीला तुला
माला या विकण्यास धाडिति इथें जाशी न कां तूं घरा
नाहीं काय तुला वहीण अथवा भाऊ तसा थोरला
डोळ्याचीं असवें पुशी निजकरें बोले तदा ती मला ९

'बाबा सोडुनियां अम्हांस वरतीं गेलेत देवाघरीं
आणायास तयांस बोलवुनियां आई हि गेली वरी
दोघेही परतोनि येति न कसे कां देव त्यां ठेवितो ?
दादाला पुसतां असें रडतसे कांहीं न तो बोलतो १०

तापानें पडला घरीं विवळतो दादा न शक्ती तया
खाया अन्न नसे घरांत अगदीं पैसा न तें घ्यावया
मी माला करुनी दुपारिं विकितें कांहीं मिळे जें मला
त्याचें घेउनि धान्य मी परततें दादाकडे सांजला ११

माला या विकण्यास आज किति मी चोहोंकडे हिंडलें
नाहीं कोणिही एक ती विकत घे सर्वां जरी प्रार्थिलें
पैशाला विकतें तरी न कुणि घे तेव्हां रडूं कोसळे
घालूं मी शिजवोनि काय करुनी दादास तें ना कळे' १२

पाण्यानें भरले तिचे नयन ते स्फुंदोनियां बोलली
'माला या रचण्यास मीं बकुळिचीं ताजीं फुलें आणलीं
तुम्हां आवडतील या विकत घ्या घ्या जें तुम्ही द्याल तें
घ्या या सर्व तुम्ही खरोखर नका नाहीं असें बोलुं तें' १३

माझ्याही नयनांतुनी न कळतां अश्रु गळूं लागले
मी मागें वळुनी हळू पुसुनियां त्यांना करें टाकिलें
'माला या सगळ्याच गे विकत मी तूझ्या मुली घेउनी
देतों जें तुज पाहिजे सकल तें मी या दुकानांतुनी १४

जें कांहीं तिज लागलें सकलही देवोनियां तीजला
झाली रात्र म्हणोनिया गृहिं तिच्या त्या पोंचवीलें तिला
गांवाच्या अगदीं कडेस पडकें होतें तिचें झोंपडें
दारीं सुंदर वृक्ष तो बकुळिचा छाया तयाची पडे १५

बाहेरी घन अंधकार पडला होता दिवा आंत तो
ज्याचा मंद असा प्रकाश करितो वाऱ्यासवें नाच तो
'दादा तूं निजलास काय बघ मीं आहे तुला आणिलें
हें घे दूध झणीं पिऊनि तुजला वाटेल दादा बरें ?' १६

बाळेचे वच ऐकुनी मधुर ते भाऊ तिचा तो उठे
झाली रात्र किती तरी अझुनि तूं होतीस ताई कुठें ?
गेलों मी बघण्या तुला हळुहळू येवोनि घेरी पडे
झालों सावध तूं तरी न दिसली दृष्टीस माझ्यापुढें १७

माझ्या ये जवळी बसे क्षणभरी पाहीन गे तूजला '
देई दुग्ध तयास वृत्त सगळें सांगीत ती त्याजला
बोले तो मजला 'दया करुनियां आम्हां गरीबांवरी
आलां हे उपकार फार अपुले फेडूं कसे हे तरी १८

माळी आम्हि असूं फुलें विकितसूं होते मळे चांगले
भाऊबंद मिळोनि भांडति तदा सारें धुळीला मिळे
त्या दुःखें मग जात तात जननी दोघेही स्वर्गास ते
तापानें पडलों सहाय न कुणी दुर्भाग्य तें पीडितें ' १८

कष्टी होउं नको मुला रडुं नको तूं धैर्य चित्तीं धरीं
देवें प्रेमळ ही गुणी सुभगिनी आहे तुला दीधली
संरक्षील अनाथ पालक तुम्हां तो वत्सल श्रीहरी
दुःखें आणिक संकटें सकलही नाशील तो सत्वरीं १९

ताई गुंफुनि रोज गोड सुमनें माला करीं तूं घरीं
माझ्या दे कमलेस मूल्य तुजला देईन कांहीं तरी
देऊं औषध थोडक्याच दिवशीं होईल दादा बरा
दीनांचा कनवाळु पालक सदा प्रार्थूं तया ईश्वरा १०

ही कविता वाक्यरचनेकरितां या प्राक्टिसिंग स्कूलच्या ४ थ्या इयत्तेस घेतली होती. मुलींच्या वाक्यरचनेचा एक नमुना खालीं दिला आहे.

## बकुळीच्या माळा.

रंगराव नांवाचे एक गृहस्थ होते. ते सकाळीं कामाला जात. संध्याकाळीं घरीं परत येत. एकदां ते संध्याकाळीं घरीं निघाले. त्यांना कमळा नांवाची लहान दोन वर्षांची मुलगी होती. तिनें सकाळीं त्यांना घरीं येतांना पेढे व बाहुली आणण्यास सांगितलें होतें. ती आणण्यास ते निघाले. वाटेंत एक मुलगी रडतांना त्यांनीं पाहिली. ती फार गरिबाची मुलगी होती. तिच्या हातांत परडी होती. त्या परडींत बकुळीच्या माळा होत्या. रंगरावांनीं तूं कां रडतेस म्हणून तिला विचारिलें, ती म्हणाली 'माझे बाबा देवाकडे गेले व आई त्यांना पहावयास गेली. दादा आजारी आहे. मी माळा विकून पैसे मिळवितें. मग त्याचें धान्य घेऊन दादाला भाकरी करितें. आज माझ्या माळा कोणीं घेतल्या नाहींत. आतां दादा काय खाईल म्हणून मला रडूं येतें. रंगरावांनीं तिच्या माळा विकत घेतल्या. तिला दूध व धान्य विकत घेऊन दिलें व तिला पोंचवावयास ते तिच्या झोंपडींत गेले. तिचा भाऊ तिची वाट पहात होता. त्याला तिनें तें दूध दिलें. भावानें आपली हकीकत रंगरावाला सांगितली. ते श्रीमंत होते पण गरीब झाले. रंगराव रोज त्या मुलीच्या माळा विकत घेत. तो मुलगा कांहीं दिवसांनीं त्यांच्या औषधानें बरा झाला. मग तीं बहीण—भावंडें आनंदांत राहिलीं.

# अनुक्रमणिका.

| विषय. | पानें. |
| --- | --- |
| वाक्यरचना. | १–२२ |
| शिशु वर्गांकरितां धडे. | |
| कामाला लाग. | २३ |
| चला आपण गमतीनें खेळूं. | २४–२५ |
| अशी मौज मीं केली. | २५–२६ |
| मुलांकरितां गोष्टी. | |
| लहान मुलगा व त्याची शेळी. | २७–२८ |
| मनी मांजरीची गोष्ट. | ८०–८४ |
| फिनिक्स पार्क किंडरगार्टन. | २९–३२ |
| सिलोन. | ३३–३७ |
| सुधांचें पाव्हिट. | ३७–४१ |
| पूर्व आफ्रिका. | ४१–४६ |
| किर्लोस्कर–ओगलेवाडी व कऱ्हाड एथील सफर. | ४६–५६ |
| मायरिंजन (स्वित्सर्लंड.) | ५७–६९ |
| ग्रेट इंडियन पेनिनशुलर रेल्वे. | ७०–७२ |
| दहा अंकांचें गाणें. | ७२ |
| मुलांकरितां कविता. | |
| कोण कसें चालतें. | ७३–७६ |
| मला काय वाटतें. | ७७–७९ |
| व्याकरण. | ८५–८८ |
| स्त्रीशिक्षण. | ८९–९१ |
| राजा विक्रम. | ९३–९६ |
| पुस्तकपरीक्षण. | ९७–९८ |
| सरकारी जाहिराती. | ९९–१०१ |

चित्रें:— १ विश्रांतिस्थान. २ शाळा.

कवितेंतील वर्णनपर भाग व द्विरुक्ति गाळण्याची शिक्षकानें काळजी घ्यावी.

५. पूर्वीच्या इयत्तांप्रमाणेंच या इयत्तेंतही भूगोल विषयाकरितां केलेल्या सहली, गांवाच्या आसपास किंवा गांवांत असणारीं प्रख्यात स्थळें, गांवांतील उद्योगधंदे, बाजार, नदीचा घाट, डोंगर, शाळा, पोस्ट ऑफिस, गांवचा बाजार इत्यादिकांचें वर्णन मुलांना करितां आलें पाहिजे. ज्या गांवांत किंवा शहरांत मुलें राहात असतील त्याचें वर्णन त्यांना करितां आलें पाहिजे. गांवासंबंधीं वाक्यरचना करितांना कोणत्या गोष्टींचा विचार केला पाहिजे यासंबंधीं प्रश्न विचारून शिक्षकानें साधारण कल्पना मुलांजवळून काढून घ्यावी;नंतर त्यांना लिहिण्यास सांगावें.

६. आरोग्यविज्ञान या विषयाचाही शिक्षकाला या इयत्तेंत वाक्य-रचनेच्या कामीं उपयोग करून घेतां येईल. अन्न व त्याचे उपयोग, व्यायामाची आवश्यकता, शरीर स्वच्छ कसें ठेवावें, वगैरे गोष्टीं-संबंधानें मुलांना सोप्या भाषेंत सुसंबद्धपणें १०।१५ ओळी लिहितां आल्या पाहिजेत.

७. सृष्टिनिरीक्षण हा विषय वाक्यरचनेला भारी उपयोगी आहे हें आपण पाहिलेंच आहे. सृष्टिनिरीक्षणाकरितां केलेल्या सहलींचें वर्णन करण्यास मुलांना फार आनंद वाटतो. या इयत्तेंत सृष्टिनिरीक्षणाचा बराच अभ्यास करावा लागतो. निरीक्षण केलेली वनस्पति, किडा, पक्षी, यांच्यासंबंधानें १५ ओळी मुद्देसूद लिहिण्यास या इयत्तेंत मुलांना अव-घड वाटणार नाहीं. फळें, फलें, झाडाचे भाग व त्यांचीं कार्यें इत्यादि सामान्य गोष्टींविषयींही मुलांना लिहितां येईल.

८. चित्रवाचनाचाही उपयोग पूर्वीच्या इयत्तांप्रमाणें याही इयत्तेंत करावा. वाक्यरचनेकरितां निवडलेलें चित्र अगदीं साधें नसावें. सृष्टिसौंदर्याचे

देखावे, कारखाने किंवा उद्योगधंदे यांचीं चित्रें, ऐतिहासिक किंवा पौराणिक प्रसंग दाखविणारीं चित्रें यांचा उपयोग करावा. या चित्रांत अमक दिसतें, त्यांच्यामागें अमुक दिसतें अशीं विस्कळीत वाक्यें मुलांनीं देऊं नयेत. वाक्यरचना सुसंबद्ध असावी. उदाहरणार्थ, राजा रविवर्म्याचें रामराज्याभिषेकाचें चित्र घेऊं. या चित्रासंबंधानें पुढें दिल्याप्रमाणें जर वाक्यें मुलांनीं लिहिलीं, तर ती वाक्यरचना चांगली नव्हे.

या चित्रांत राम सिंहासनावर बसलेला दिसतो.
त्याच्या शेजारीं सीता दिसते.
दोन ऋषि दोन्ही बाजूंला उभे राहिलेले दिसतात.

वगैरे वगैरे.

या चित्रासंबंधीं या इयत्तेतील मुलांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें वाक्यरचना करावी.

रामराज्याभिषेक.

रावणाला मारून राम सीतेसह अयोध्येस आले. बरोबर बिभीषण, मारुती, सुग्रीव वगैरे मंडळी आली होती. मग कांहीं दिवसांनीं मोठ्या थाटानें रामाला अभिषेक झाला.

अभिषेक एका मोठ्या दिवाणखान्यांत झाला. मध्यभागीं एक सिंहासन मांडलें. त्याजवर राम व सीता हीं बसलीं. त्यांच्या डोक्यावर छत्र धरलें. वसिष्ठ व दुसरे ऋषि रामाचे व सीतेचें अंगावर तीर्थाचें पाणी ओतूं लागले. राजे एका बाजूस बसले होते व त्यांच्या स्त्रिया दुसऱ्या बाजूला बसल्या होत्या. स्त्रियांनीं सीतेला देण्याकरितां वाणें आणिलीं होतीं व मंगल आरती ही आणली होती, वगैरे वगैरे.

हा सर्व देखावा राजा रविवर्मा यानें आपल्या चित्रांत दाखविला आहे.

पत्रलेखनाकडे या इयत्तेंत पूर्वीच्या इयत्तांपेक्षां जास्त लक्ष द्यावें. पत्राची सुरुवात कशी करावी व शेवट कसा करावा, हें मुलांना पूर्वीच्या इयत्तेंत माहीत झालेलेंच असतें. तीर्थरूप राजमान्य राजश्री बाबा, मुक्काम नाशिक, सेवेसी, बालकें बापूचा त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष, वगैरे लांबलचक मायने शिक्षकानें मुलांना शिकवूं नयेत. थोडक्यांत मजकूर लिहिण्याची सध्यांची प्रवृत्ति लक्षांत घ्यावी. ती. र . बाबांस बालकें बापूचा कृ. सा. न. एवढे शब्द पुरे होतील. पत्रांतील मजकूर विस्कळित न होईल याबद्दल शिक्षकानें काळजी घ्यावी.

पत्रांचे दोन नमुने पुढें दिले आहेत.

पुणें ४८७ सदाशिव पेठ.
२४ एप्रिल १९२९.

ती. रा. रा. बाबास बालकें बापूचा शि. सा. न. वि. वि. आपलें पत्र पावलें. आमच्या शाळेला या शनिवारपासून सुटी होणार आहे. मी रविवारीं सकाळचे गाडीनें निघेन व तेथें संध्याकाळीं येईन. तेव्हां काका बरोबर येणार आहेत. तेथें ते ८।९ दिवस राहाणार आहेत. काकाचा मधूही आमच्या बरोबर येणार आहे.

काल आमच्या शाळेचा बक्षीससमारंभ झाला. समारंभाला पुष्कळ मंडळी जमली होती. पहिल्यानें मुलांचीं गाणीं, भाषणें व खेळ झाले. स्वागताचें पद मीं व आणखी दोघेजण मिळून म्हटलें. मजकडे एक भाषणही होतें. माझें भाषणही चांगलें झालें. मला वार्षिक परीक्षेंत गणितांत पहिला आल्याबद्दल बक्षीस मिळालें आहे.

चि. ताईला व गोपूला आशीर्वाद. मला दोघांची फार आठवण होते. ताईला मीं चांगली बाहुली घेतली आहे.

ती. सौ. आईस सा. नमस्कार सांगावा. क. ही वि.

आपला,

**बापू.**

श्री.

शनिवार, जुन्नर कल्याण पेठ,
२२ मार्च १९२५.

ती. सौ. प्रिय आईस कमलाचा साष्टांग नमस्कार वि. वि. आम्ही सर्व मंडळी तेथून मोटारीनें निघालों. वाटेनें आम्हांला बिलकूल त्रास झाला नाही. अकरा वाजतां जुन्नरला पोहोंचलों. घरीं मावशी वाट पाहातच होती. ताईच्या लग्नाची गडबड उडाली होती. पाहुणे पुष्कळ आले होते. अंगणांत मोठा माडव घातला होता. तीन चार दिवस लग्नाचे गडबडींत होतों. लग्नांत भाडंणें झालीं नाहींत. मनूताईच्या सासरची मंडळी फार चांगली आहे. नवराहि फार चांगला आहे. काल ती मंडळी मनूताईला घेऊन आपल्या गांवीं गेली. मनूताइ गेली तेव्हां मावशीला फार वाईट वाटलें.

मी आणखी ४ दिवस एथें राहणार आहें. उद्यां आम्हा शिवनेरी किल्ला पाहाण्यास जाणार आहों. परवा लेण्याद्रीचा गणपती पाहाणार आहों. जुन्नर गांव लहान आहे व जिकडे तिकडे मोडकीं घरें आहेत.

ती. रा. बाबास सा. नमस्कार, चि. वसंतला माझी आठवण येत असेल. क. ही. वि.

तुझी कमल.

पुष्कळ वेळां असें होतें कीं, मुलांना मित्राला, भावाला, आईला, बापाला पत्रें लिहितां येतात, पण घरीं एकादी चिठ्ठी वाण्याला लिहिण्याची पाळी आली कीं ती कशी लिहावी हें त्यांना कळत नाहीं.

तरी अशा प्रकारची चिठ्ठी कशी लिहावी हेंही शिक्षकानें मुलांना शिकवावें.

शुद्ध वाक्य वाढवून त्याचें मिश्र वाक्य किंवा संयुक्त वाक्य बनविणें किंवा उलट पक्षीं मिश्र वाक्याचें किंवा संयुक्त वाक्याचें शुद्ध वाक्य बनविणें इत्यादि वाक्यरचनेचे प्रकार खालच्या इयत्तांकरितां उपयोगी नाहींत.

वाक्यरचनेकरितां उपयोगी असलेल्या पुस्तकांची यादी.

( अ ) मासिकें

आनंद मासिक— वार्षिक वर्गणी २ रु. संपादक रा. वासुदेव गोविंद आपटे सदाशिव पेठ, पुणें.

बालोद्यान मासिक— वार्षिक वर्गणी २ रु. सदाशिव पेठ, पुणें.

सुमन मासिक— संपादक रा. वासुदेव कृष्ण भावे, अलीबाग. वार्षिक वर्गणी २ रु.

कन्याशिक्षक. ट्रेनिंग कॉलेज फार वुइमेन, पुणें. वार्षिक वर्गणी १॥ रु.

( ब ) कविता

आनंदाचा फुलबाग— आनंद कार्यालय. ६ आणे.

मुलांकरितां कविता—रा. म. का. कारखानीस ८ आणे. किताबखाना बुधवार पेठ, पुणें.

बालगीत— रा. ना. गं. लिमये. ८ आणे.

नवीन बालगीत—रा. ना. ग. लिमये. ४ आणे

## ( क ) गोष्टी.

१ इसाबनीति ।। - चित्रशाळा, पुणें.

२ पंचतंत्रांतील गोष्टी—१ रु. रा. अंबेकरकृत चित्रशाळा.

३—४ इसाबनीति भाग १ व २, प्रत्येकीं ४ आणे. किताबखाना, पुणें.

५ नऊ रत्नें. २ आणे ,,

६—७—८ सुबोध गोष्टी. प्रत्येकीं २ आणे ,,

९ थोरांच्या आख्यायिका. १।। आणा ,,

१० सायंकाळची करमणूक. ६ आणे. किताबखाना, पुणें.

११।१२।१३. मुलांकरितां बोधपर गोष्टी. प्रत्येका ५ आणे. नारो अप्पाजी गोडबोले बुधवार पुणें.

१४—१५ मुलांचें मनोरंजन भाग १ व २. प्रत्येकीं २, आणे. ,,

१६ चिमुकली इसाबनीति—२ आणे. ए. पी. बापट बुधवार पुणें.

१७ बालबोध गोष्टी. ३ आणे ,,

१८ बालरंजनमाला. ५ आणे ,,

## ( ड ) चित्रपाठ.

१९—२१ भाग १ ते ३ प्रत्येकीं ४ आणे.

२० रा. भडकमकरकृत ३८६ सदाशिव, पुणें.

२३
ता.........
सार्वजनिक वाचनालय

# शिशुवर्गाकरितां धडे.

## कामाला लाग.

सकाळ झाली.
आई उठली व कामाला लागली.
ताई उठली व कामाला लागली.
दादा उठला व धडे करूं लागला.
बाबा उठले व फुलें तोडूं लागले.
पण मधू उठला नाहीं
व कामाला लागला नाहीं.
मधूचे खिडकींत चिमणी आली.
चिमणी बोलली, 'चिव, चिव, चिव,
मधू सकाळ झाली
ऊठ व कामाला लाग.'
मधूचे अंगणांत कावळा आला.
कावळा बोलला, 'काव, काव, काव,
मधू सकाळ झाली
ऊठ व कामाला लाग.'
मधूचे अंगणांत झाडावर कोकीळ आला.
कोकीळ बोलला, 'कुहू, कुहू, कुहू,
मधू सकाळ झाली
ऊठ व कामाला लाग.'

मग मधू उठला
व कामाला लागला.

## चला आपण गमतीनें खेळूं.

मधू सकाळींच फिरावयास निघाला.
वाटेंत मधूला शेतकरी भेटला.
मधू बोलला, 'तूं कोठें जात आहेस ?'
शेतकरी बोलला, 'मी शेत नांगरावयास जात आहें.
तूं येतोस का मजबरोबर ?'
मधू बोलला, 'मी नाहीं येत तुजबरोबर.'
पुढे मधूला हलवाई भेटला.
मधू बोलला, 'तूं कोठें जात आहेस ?'
हलवाई बोलला, 'मी पेढे विकावयास जात आहें.
तूं येतोस का मजबरोबर ?'
मधू बोलला, 'मी नाहीं येत तुजबरोबर.'
पुढे मधूला बैल भेटला.
मधू बोलला, 'तूं कोठें जात आहेस ?'
बैल बोलला, 'मी मोट ओढावयाला जात आहें.
तूं येतोस का मजबरोबर ?'
मधू बोलला 'मी नाहीं येत तुजबरोबर'
पुढे मधूला घोडा भेटला.
मधू बोलला, 'तूं कोठें जात आहेस ?'
घोडा बोलला, 'मी सामान आणावयास जात आहें.

तूं येतोस कां मजबरोबर ?'

मधू बोलला, 'मी नाहीं येत तुजबरोबर.'

पुढें मधूला वासरूं भेटलें.

मधू बोलला, 'तूं कोठें जात आहेस ?'

वासरूं बोललें, 'कुरणांत खेळावयाला जात आहें.

तूं येतोस कां मजबरोबर ?'

मधू बोलला, 'हो हो, मी येतों तुजबरोबर.

चल आपण दोघेही नदीचे कांठीं गमतीनें खेळूं.'

## अशी मौज मीं केली.

एका उंदराला एक पैसा सांपडला.

तो पैसा घेऊन उंदरानें चारा विकत घेतला.

तो चारा घेऊन तो उंदीर गाईकडे गेला.

तो गाईला बोलला, 'गाई, गाई, चारा

घे व मला दूध दे.'

गाईनें उंदराला दूध दिलें.

तें दूध घेऊन तो उंदीर हलवायाकडे गेला.

तो हलवायाला बोलला, 'हलवाई हलवाई,

दूध घे व मला पेढे दे.'

हलवायानें उंदराला पेढे दिले.

ते पेढे घेऊन तो उंदीर सुताराकडे गेला.

तो सुताराला बोलला, 'सुतारा, सुतारा पेढे घे

व मला चौरंग दे.'

सुतारानें उंदराला चौरंग दिला.
तो चौरंग घेऊन तो उंदीर सोनाराकडे गेला.
तो सोनाराला बोलला, 'सोनारा, सोनारा,
चौरंग घे व मला अंगठी दे.'
सोनारानें उंदराला अंगठी दिली.
ती अंगठी घेऊन तो उंदीर राजाकडे गेला.
तो राजाला बोलला, 'राजा, राजा अंगठी
घे व मला शेत दे.
राजानें उंदराला शेत दिलें.
उंदीर शेतांत गेला व बोलला,
'पैसा देऊन चारा घेतला.
चारा देऊन दूध घेतलें.
दूध देऊन चौरंग घेतला.
चौरंग देऊन अंगठी घेतली.
अंगठी देऊन शेत घेतलें.
अशी मौज मीं केली.'

---

# मुलांकरितां गोष्टी.

## लहान मुलगा व त्याची शेळी.

एक लहान मुलगा होता. त्याचें नांव धोंडू. तो आपली शेळी रोज रानांत चारावयास नेत असे. ती शेळी उंच व लठ्ठ असे. एक दिवस शेळी, रानाच्या आंत खूप लांब गेली व तेथील हिरवेंगार गवत खाऊं लागली. फार वेळ झाला तरी शेळी तेथून निघेना. धोंडू म्हणाला, 'शेळी शेळी घरीं चल.' शेळी म्हणाली, 'मीं नाहीं घरीं येत. मी एथेंच राहतें.' धोंडू लहान होता. शेळी उंच व लठ्ठ होती. धोंडूला शेळी ऐकेना. धोंडू रानांतून बाहेर आला व रडूं लागला.

तिकडून एक ससा आला. तो धोंडूला म्हणाला, 'धोडू, तूं कां रडतोस? तुला काय झालें?' धोंडू म्हणाला, 'माझी शेळी रानांत चरत आहे, ती घरीं येत नाहीं म्हणून मी रडतों.' ससा म्हणाला, 'धोंडू रडूं नकोस, मी तुझ्या शेळीला घेऊन येतों.' मग ससा रानांत शिरला. त्यानें धोंडूची शेळी चरतांना पाहिली. ससा म्हणाला, 'शेळी शेळी, घरीं चल. धोंडू रडत आहे.' शेळी म्हणाली, 'रडूं दे त्याला. मी नाहीं घरीं येत. मी एथेंच राहतें.' ससा रानाच्या बाहेर आला. तो धोंडूशेजारीं बसला व रडूं लागला.

तिकडून एक उंदीर आला. तो सशाला म्हणाला, 'सशा सशा, तूं कां रडतोस?' ससा म्हणाला, 'शेळी रानांत चरत आहे. ती घरीं येत नाहीं म्हणून धोंडू रडतो. धोंडू रडतो म्हणून मी रडतों.' उंदीर म्हणाला, 'रडूं नको. मी शेळीला घेऊन येतों.' मग उंदीर रानांत शिरला. त्यानें धोंडूची शेळी चरतांना पाहिली. उंदीर म्हणाला, 'शेळी शेळी, घरीं चल, धोंडू रडत आहे. ससाही रडत आहे.' शेळी म्हणाली, 'रडूं

दे त्यांना. मी नाहीं घरीं येत. मी एथेंच राहतें. ' उंदीर रानाच्या बाहेर आला. तो सशाच्या शेजारीं बसला व रडूं लागला.

तिकडून एक कोल्हा आला. तो उंदराला म्हणाला, ' तूं कां रडत आहेस ? ' उंदीर म्हणाला, ' शेळी रानांत चरत आहे. ती घरीं येत नाहीं म्हणून धोंडू रडतो. धोंडू रडतो म्हणून ससा रडतो. ससा रडतो म्हणून मी रडतों.' कोल्हा म्हणाला, 'तुम्ही रडूं नका. मी धोंडूच्या शेळीला घेऊन येतों. ' मग कोल्हा रानांत शिरला. त्यानें धोंडूची शेळी चरतांना पाहिली. कोल्हा म्हणाला, ' शेळी शेळी घरीं चल; धोंडू रडत आहे. ससा रडत आहे. उंदीरही रडत आहे. ' शेळी म्हणाली ' रडूं दे त्यांना; मी नाहीं येत. मी एथेंच चरतें ' कोल्हा रानाच्या बाहेर आला, तो उंदराशेजारीं बसून रडूं लागला.

तिकडून एक गांधिलमाशी आली. ती कोल्ह्याला म्हणाली, 'कोल्होबा कोल्होबा तूं कां रडतोस ?' कोल्हा म्हणाला 'शेळी रानांत चरत आहे, ती घरीं येत नाहीं म्हणून धोंडू रडतो. धोंडू रडतो म्हणून ससा रडतो.' ससा रडतो म्हणून उंदीर रडतो. उंदीर रडतो म्हणून मी रडतो. गांधिलमाशी म्हणाली, 'रडूं नको, मी शेळीला घेऊन येतें.' कोल्हा म्हणाला, 'मी एवढा मोठा असून माझ्यानें शेळी येत नाहीं, ती तुझ्यानें कशी येईल?' गांधिलमाशी हसली व ती रानांत शिरली. तिनें धोंडूची शेळी चरतांना पाहिली व गुंग करीत ती तिच्या मागें लागली. मग शेळी भ्याली व घराकडे पळूं लागली. तिला पाहून धोंडू तिच्या मागोमाग घरीं गेला, ससा व कोल्हा रानांत निघून गेले.

# फिनिक्सपार्क किंडरगार्टन. ( ग्लासगो )

ग्लासगो शहरच्या पश्चिम भागांतील एका मोठ्या मुलींच्या शाळेच्या हेडमिस्ट्रेसनें लहान मुलांकरितां हें 'किंडर गार्टन स्कूल' दहा वर्षांपूर्वी स्थापन केलें. आपल्या शाळेंतील मुलींनीं लहानपणापासून समाजाची सेवा करण्यास शिकावें, व शहरच्या गरीब वस्तींतील लहान मुलांचें आरोग्य जेणेंकरून वाढेल व त्यांच्या सुखांत जेणेंकरून हरतऱ्हेची भर पडेल, अशी त्यांनीं आपल्या आयुष्यांत खटपट करावी, असा हेत मनांत धरून ही किंडरगार्टन शाळा सुरू झाली. एका अरुंद व कोंदट गल्लींतील एका खोलींत या कामास प्रथम सुरुवात झाली. आरंभीं मुलें अगदीं थोडीं होतीं. प्रथम जागेची व्यवस्था तात्पुरतीच केलेली होती. शाळेची इमारत स्वतःचे मालकीची असावी या हेतूनें, पुढें कमिटीनें ज्यांना या कामाविषयीं आस्था वाटत असे अशा मित्रमंडळींकडून वर्गणीच्या रूपानें ५०० पौंड गोळा केले, व इमारतीकरितां व्यवस्थेशीर जागा कोठें मिळेल याविषयीं तपास चालविला. या कामांत 'टाऊन काउन्सिलच्या' सभासदांची सहानुभति संपादन केली. हें 'टाऊन काउन्सिल' म्हणजे आपल्या इकडील म्युनिसिपल काउन्सिल होय. शेवटीं उत्तम जागा म्हणून कमिटीचा जिच्यावर आरंभापासून डोळा होता, ती जागा शहरच्या अधिकाऱ्यांकडून वर्षाला अवघें १ पौंड भाडें देण्याचें ठरवून मिळविली. त्या जागेवर असलेलीं पडकीं व घाणेरडीं घरें जमीनदोस्त केलीं. व थोड्याच दिवसांत किंडरगार्टन संस्थेनें लाकडी व कॉंक्रीटची एक सुंदर व टुमदार इमारत उठविली.

सुरवातीला पांच वर्षांच्या आंतील १२ मुलें होतीं. ही संख्या हल्लीं ३१ पर्यंत आली आहे. आपल्या मुलांचा या शाळेंत केव्हां प्रवेश होईल म्हणून पालक नेहमीं अगदीं आतुर असतात, परंतु शाळेंतील जागा जास्तींत जास्त ३१ मुलांना पुरेल इतकीच आहे. आरंभीं किंडरगार्टन शाळेच्या खर्चाला कांहीं मूळच्या शाळेकडून व कांहीं बाहेरच्या वर्गणीदारांकडून मदत मिळत असे. (शिवाय प्रत्येक मुलानें एका दिवसाकरितां ५ पेन्स फी द्यावयाची असे.) परंतु कांहीं वर्षांपूर्वी शहरांतील आरोग्य खात्याच्या विनंतीवरून

ही शाळा त्या खात्याच्या हवाली केली व हल्लीं तिची सर्व व्यवस्था व खर्च नागरिक आपल्या मतांनीं ठरवितात.

या आश्रमांत मुलांचा प्रवेश खालीं दिलेल्या अटींवर होतो.–

१ जेव्हां मुलांच्या आयांना कामाकरितां बाहेर जावें लागतें.

२ जव्हां एकाच कुटुंबांत पुष्कळ लहान मुलें असतात, व त्यांच्या आईला सर्वांना घेऊन बाहेर जाणें किंवा सर्वांकडे लक्ष देणें शक्य नसतें.

३ जेव्हां घर अगदीं लहान, कोंदट व गलिच्छ असतें.

४ जेव्हां मूल अगदीं कृश झालें आहे व त्याचे ठिकाणीं क्षयाचीं चिन्हें दिसत आहेत.

५ जेव्हां एकादी बाई शाळेंतील इतर मुलांची स्थिति प्रत्यक्ष पाहाते व ज्या गोष्टी आपणास घरीं करणें शक्य नाहीं, त्या गोष्टींत आपल्या मुलांचा येथें फार फायदा होईल असें तिला वाटून ती जेव्हां त्याकारितां अर्ज करते.

घरीं असतांना मुलांच्या चेहेऱ्यावर जो दुर्मुखलेपणा दिसत असे, तो जाऊन त्या ठिकाणीं चमकणारा तरतरीतपणा, त्यांचें आरोग्य, शाळेंतील सुंदर चालीरीती वगैरे पाहून मुलांच्या आईच्या मनावर चांगला परिणाम होतो.

जेणेंकरून मुलांच्या मनाला सुख वाटेल व तीं तरतरीत राहातील अशा प्रकारची शक्य तितकी सुंदर परिस्थिति निर्माण करण्याचा चालकांचा हेतु असतो, उदाहरणार्थ, चांगलें अन्न, ताजी भरपूर हवा व घरच्याप्रमाणें सुखासमाधानाची स्थिति ( शाळेंत मुलांना जेवण व चहा हीं मिळतात ).

शाळेंतील सामान मुलांना साजेल असेंच आहे. तसेंच शाळा स्वच्छ व व्यवस्थेशीर ठेवण्याचे कामीं मुलांनीं स्वतां मदत करावी, म्हणून त्यांना पुष्कळ संधि देण्यांत येते व अशा रीतीनें इतरांना मदत करण्याचें व स्वतां स्वावलंबी राहाण्याचें शिक्षण त्यांना शक्य तितकें दिलें जातें. आठवड्याच्या वेळापत्रकांत पुढें दिलेले विषय येतातः—

1



2



प्रातःस्तोत्र व प्रार्थना, कवाईत, संभाषण, खेळ, थोडथोड्या मुलांनीं एकत्र बसून हस्तव्यवसाय करणें, मातीचे नमुने, चित्रकला, वाळूचीं घरें करणें, कागदाच्या आकृति करणें, वाचन, मुलांनीं स्वतः पसंत केलेलें काम, रंगाचें काम, संख्या, मॅाँटेसोरी पद्धतीचे व्यवसाय, विश्रांति, गोष्टी, चित्रावरून संभाषण, बागेंतील काम वगैरे.

जेवणाकरितां टेबलें मांडणें, व जेवणानंतर भांडीं व टेबलावरील कापड स्वच्छ धुवून ठेवणें वगैरे कामें करण्याकरितां प्रत्येक आठवड्यास पाळीपाळीनें मुलें निवडलीं जातात. मुलांचें वय २॥ ते ५ वर्षांपर्यंत असतें. पांच वर्षांचे पढें मुलें प्राथमिक शाळेंत जातात.

वर सांगितल्याप्रमाणें किंडरगार्टन कमिटीनें ही शाळा आरोग्य खात्याच्या हवालीं केल्यावर मुलांच्या कल्याणाकरितां दुसऱ्या एका गोष्टीकडे कमिटीनें आपलें लक्ष वळविलें. आजारांतून उठलेल्या पांच वर्षांच्या आंतील मुलांची बराच काळपर्यंत चांगली शुश्रूषा व्हावी, यासाठीं एक संस्था काढण्याचा कमिटीनें विचार केला व त्याप्रमाणें शहरापासून दूरच्या भागांत एक बंगला विकत घेऊन सर्व व्यवस्था केली. तेथें १२ मुलांचें एक लहानसें कुटुंबच असून त्या सर्वांच्या प्रकृति एक वर्षांत पूर्ववत् उत्तम सुधारल्या आहेत. या ठिकाणीं कोणत्या मुलानें किती दिवस राहावयाचें हें त्याच्या स्थितीवरून ठरविलें जातें. किंडरगार्टन शाळेंतील मुलें मधून मधून प्रकृति सुधारण्याकरितां येथें येऊन राहातात व सर्व मुलें उन्हाळ्याची १५ दिवस सुटी दरवर्षी येथेंच घालवितात.

(वर किंडर गार्टन स्कूलची माहिती थोडक्यांत दिली आहे. तिच्या बरोबर आम्ही स्वतां ती संस्था पाहून आम्हांस काय वाटलें, हें वाचकांच्या माहितीकरितां देत आहों. मिस् अँडरसन नांवाच्या एक बाई या शाळेची सर्व व्यवस्था पाहातात. त्यांच्या येथेंच आम्ही उतरलों होतों. मुलांवरील प्रेम व या कामाची आवड या दोन गुणांमुळें त्या कांहींएक पगार न घेतां काम करितात. गरीब व आजारी मुलांकरितां त्या स्वतां व त्यांची बहीण—या डॉक्टर आहेत—नेहमीं झटत असतात. ज्यांना पोटाला मिळण्याची पंचाईत किंवा जे आजारी अथवा ज्यांना जगांत आपलें असें

म्हणावयाला कोणी नाहीं, अशा कितीतरी लोकांना यांनीं मदत करून त्यांना संकटांतून मुक्त केलें आहे, याची खरोखर कोणाला कल्पना येणार नाहीं.

आम्ही एके दिवशीं सकाळीं ८ ते १२ वाजे पावेतों या शाळेंत होतों. त्या अवधींत मुलांचीं गाणीं, कवाईत, निरनिराळ्या प्रकारचे खेळ वगैरे पुष्कळ गोष्टी आम्हीं पाहिल्या. दुपारीं जेवणाचे वळीं मुलांनीं स्वतां टेबलें मांडिलीं, व अन्न वाढलें. ज्या मुलांची त्या दिवशीं वाढण्याची पाळी होती, अशीं तीं ४।५ वर्षांच्या वयाचीं चिमुकलीं मुलें हातांत अन्नाचीं पात्रें घेऊन खोलीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सर्वांना वाढीत असतांना किंवा दुधाचा एक थेंबही जमिनीवर न सांडता सर्वांना दुधाचे पेले देत असतांना आम्हांला खरोखर अत्यंत आश्चर्य वाटलें. प्रत्येक गोष्टींत सभ्यता व व्यवस्थितपणा दिसून आला. हातांतून भाकरी ओढणें, गर्दीनें जेवावयाला सुरुवात करणें, जेवतांना किंवा पाणी पितांना तोंड वाजवणें अथवा टेबलावर दूध सांडणें यापैकीं कोणतीही गोष्ट दिसून आली नाहीं, शाळेंतील भिंतीवर चित्रें लावून त्या चांगल्या शृंगारल्या होत्या. ताटें, पेले, कप वगैरे साधे चिनी मातीचेच होते, परंतु दिसण्यांत वाईट नव्हते. होतां होईल तों प्रत्येक मुलाचा पेला किंवा कप स्वतंत्र असतो व त्यावर रंगीत एक निराळें फूल काढलेलें असतें.

ही शाळा पाहून परत जातांना एकाद्या तिऱ्हाईत माणसाला साहजिक वाटतें कीं, ही शाळा नसून एक लहानसें कुटुंबच आहे. त्यांतील मुलांवर मिस् अँडरसन प्रत्यक्ष मातेप्रमाणें प्रेम करणाऱ्या आहेत. उलट मुलांनाही त्यांच्या सहवासांतच राहाणें विशेष आवडतें. शाळा सोडून मुलें जेव्हां घरीं जातात, तेव्हां त्यांचें शरीर व मन यांचे मध्यें पूर्वीपेक्षां कितीतरी सुधारणा झालेली दिसून येते. मुलें प्रथम ज्या-वेळीं शाळेंत येतात त्यावेळीं पिंगट, कृश व दुर्मुखलेलीं असतात. तींच शाळा सोडून घरीं जातांना गुटगुटीत, निकोप प्रकृतीचीं व आनंदी अशीं दिसतात. शेवटीं या शाळेप्रमाणें आपल्याही देशांत गरिबांकरितां शाळा असाव्या हा विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं.

आर. नवलकर )

# सिलोन.

सिलोन ऊर्फ सिंहलद्वीप हें बेट हिंदू लोकांच्या फार प्राचीन परिचयाचें आहे. यासच पूर्वी लंका म्हणत असत. या बेटासंबंधानें निरनिराळया देशांच्या वाङ्मयांत कांहींना कांहीं कारणांनीं उल्लेख आले आहेत असें म्हणतात. उष्ण कटिबंधांत विषुववृत्ताजवळ असल्यानें येथें जवळ जवळ वर्षांतून ६ महिने पावसाळा असतो. उष्ण हवा, भरपूर पाऊस व सुपीक जमीन यामुळें येथील भाग वनस्पतींनीं नेहमीं आच्छादलेले असतात, व पाहावें तिकडे हिरवेंगार दिसतें. त्यामुळें यास युरोपियन ग्रंथांतून ' हिंदी महासागरांतील पाचेचें बेट ' अशी संज्ञा मिळाली आहे. या बेटाकडे येणाऱ्या पुष्कळ प्रवाशांनीं तर यास या अफाट सागरांतील ' मौक्तिक ' च बनविलें आहे.

या बेटाचें क्षेत्रफळ सुमारें २५३३२ चौ. मैल म्हणजे सुमारें म्हैसूर संस्थानच्या क्षेत्रफळापेक्षां किंचित् कमी भरेल, किंवा इंग्लंडच्या क्षेत्रफळाच्या निम्यानें हें क्षेत्रफळ येईल. या भागांत ३६ लक्ष लोकसंख्या असून त्यापैकीं ¾ पश्चिमेकडील भागांत आहे. या भागांत वस्तीचें प्रमाण दर चौ. मैलास १४४ हें पडेल. हिंदुस्तान व सिलोन यांमध्यें मानारचें आखात असून या भागांतच पूर्वी रामायणकालीं रामानें सेतु बांधिला असावा असा तर्क आहे. या बेटाच्या दक्षिणेकडे पर्वत आहेत व त्यांची पेट्रोटाला गाला ( ८२९६ फूट ) व आडामचें ( ७३५२ फूट ) हीं दोन अत्युच्च शिखरें आहेत. या बेटांतील अतिशय मोठी नदी महाविला-गंगा. ही ७००० फुटांवर उगम पावून १५० मैल वाहात जाऊन त्रिंकोमालीजवळ समुद्रास मिळते. या नदीशिवाय इतर नद्याही फार लहान आहेत. या बेटांत उष्णतामान जास्तींत जास्त ९५ अंशांवर चढत नाहीं. पण सरासरी उष्णतामान ८१ अंश असतें. डिसेंबर व जानेवारी ह्या महिन्यांत हवा थंड असते. पण मार्च, एप्रील व मे या तीन महिन्यांत येथें फार तलखी होते. या बेटांतील 'नुवारा' एलाया नांवाचें थंड हवेचें ठिकाण ६२००फूट उंच आहे व येथें सरासरी ५८ अंश उष्णतामान असतें. येथील सुपीक जमीन

व उत्तम हवा यामुळें तेथील लोकांचा शेती हा मुख्य धंदा आहे. येथील पिकांपैकीं नारळ, तांदूळ, चहा, रबर, दालचिनी व कोको हे मुख्य जिन्नस आहेत. यांपैकीं सर्वांत जास्त ह्मणजे जवळ जवळ १० लक्ष एकर जमीन नारळींनीं व्यापिली आहे. व त्यानंतर बाकीच्या पिकांनीं अनुक्रमें ८, ४, २, लक्ष व ४५ व ४२ हजार एकर जमीन गुंताविली आहे. या बेटाचा ⅕ भाग पिकासाठीं उपयोगांत येतो. या बेटांतील अरण्यें फार मोठीं असून त्यांत हत्तींचे कळपचे कळप खुशाल इतस्ततः स्वच्छंदानें फिरत असतात. त्या-शिवाय गवा, सांबर, अस्वल, वगैरे इतरही बरेच रानटी प्राणी आहेत.

या बेटांत प्लुंबॅगो अगर ज्यास ग्रॅफाइट् म्हणतात तो पदार्थ विपुल सांपडतो. याचाच शिसपेन्सिली बनाविण्याचे कामीं फार उपयोग करतात. सोनें फार थोडें सांपडतें; पण पांच, लाल, चंद्रकांत माणि हे खाणींत बरेच सांपडतात.

या बेटांतून बाहेरदेशीं मुख्यत्वेंकरून चहा, रबर, खोबरें व त्याचें तेल, शिसपेन्सिलीचा दगड, कोको, काथ्या, दालचिनी, सुपारी व नारळ हे फार मोठ्या प्रमाणावर रवाना होतात. जगांतील चहापैकीं या बेटां-तून ⅓ चहा बाहेरदेशीं रवाना होतो.

या बेटांत कोलंबो हें मुख्य व अतिशय प्रसिद्ध बंदर आहे. याची लोक-संख्या २१२००० आहे. या शिवाय जाफना (२१०००), गाल (४००००) व कँडी (३००००) हीं तीन मोठीं शहरें आहेत. कोलंबो हें ऑस्ट्रेलिया, चीन वगैरे पूर्वेकडील देशांकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मह-त्वाचें बंदर असून राजधानीचें शहर बनलें आहे. या बंदरांत बांधिलेल्या धक्क्यांच्या योगानें वादळांपासून या बंदरांतील जहाजांचें रक्षण होतें. हे धक्के बांधण्याच्या पूर्वीं गाल या दक्षिणेकडील बंदराला फार महत्व असे. कोलंबो हें एक मध्यवर्ती ठिकाण आहे, व त्यामुळें पूर्वेकडील देशांना जातांना तें एक वाटेवरील ‘ विश्रामस्थान ’ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोलंबो हें बंदर लंडनहून ६५०० मैल, केपटाऊन् (आफ्रिका) पासून ४८०० मैल, पश्चिम ऑस्ट्रेलियापासून ३३०० मैल व सिंगापूर व कलकत्ता यांपासून १४०० मैल दूर आहे.

इ. स. पूर्वी ५४३ या वर्षी ' विजय ' या हिंदी वीरानें प्रथमतः या बेटावर स्वारी करून तें जिंकून घेतलें. त्याच्याबरोबर येथें आलेले लोक आज ' सिंहली ' या नांवानें ओळखिले जातात. यांची वस्ती एकंदर वस्तीच्या निम्मी आहे. हे लोक सिलोनमध्यें आले त्या वेळीं या प्रांतांत त्यांना ' वेट्टु ' जातीचे मूळचे लोक आढळले. या स्वारीमुळें त्यांनीं गिरि-कंदरांचा आश्रय केला व त्याच भागांतून त्यांची अद्याप वस्ती आहे. हिंदु-स्तानांतील भिल्ल, कोळी, गोंड, तोडा वगैरे लोकांप्रमाणें ते सिलोनमधील मूळचे लोक होत. यांची जरी विशेष स्पृहणीय संस्कृति नाहीं, तरी हे इतर लोकांपासून अलग राहिले आहेत व त्यामुळें त्यांची जात तशीच निराळी कायम राहिली आहे.

सिंहली लोक दक्षिण हिंदुस्तानांतील तेलगू अगर मद्रासी लोकांप्रमाणें लांब व सडक केस राखतात, व गांठ मारून त्यावर कासवाच्या पाठीचा बनविलेला मोठा कंगवा खोवून ठेवितात. अंगांत पांढरा पायघोळ अंगरखा घालतात. सिंहली लोकांच्या खालोखाल तामील लोकांचा भरणा आहे. दक्षिण हिंदुस्तानांतील हे मूळचे द्रवीड वंशाचे लोक हिंदुस्तानांतील मूळच्या ठिकाणापेक्षां जास्त सोईस्कर ठिकाणीं मोठाल्या मळ्यांत कामकरी म्हणून या बेटांत आले व त्यांची येथें जवळ जवळ ¼ वस्ती आहे. व ती पूर्व व उत्तर भागांत पसरली आहे. वर्णानें सिंहली लोकांहून हे जास्त काळे आहेत. यांच्या डोक्यावर घेरा व शेंडी यांशिवाय कांहीं नसतें. लग्न झालें असल्यास या केसाची डोकीवर व झालें नसल्यास ते कानावर गांठ मारितात.

याशिवाय या भागांत मूर लोकांची वस्ती आहे. हे मुसलमान जातीचे असून किनाऱ्यावरील व अन्तर्भागांतील सर्व व्यापार यांच्या हातीं आहे. युरोपियन लोक यांना ' टांबी ' या नांवानें व सिंहली लोक ' काक ' ( कावळे ) या नांवानें ओळखतात. हे डोकीवर केस मुळींच राखीत नाहींत व डोक्याला घट्ट बसणारी अशी पातळ पांढरी टोपी घालतात.

या लोकांशिवाय येथें डच, मलायी व युरोपियन लोक आहेत; पण ते फारच थोड्या प्रमाणांत आहेत.

येथें ' विजय ' राजानें राज्य स्थापल्यानंतर त्याच्या मागून त्याच्या वंशांतील पुष्कळ राजे व राण्या गादीवर आल्या. त्यांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे हिंदुस्थानांतून होणाऱ्या तामीळ लोकांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करणें. या वंशांत पुष्कळ पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांनीं पुष्कळ नामांकित इमारती बांधिल्या व मोठीं शहरें वसविलीं. यांपैकीं पोलो नासवा व अनुराधापूर हीं या बेटांतील शहरें आज जरी मोडकळीस आलीं आहेत, तरी प्राचीन वैभवाची साक्ष देतात ' पौडुकामय ' या राजाची अनुराधापूर ही राजधानी होती. (४३७ इ. स. पूर्वीं ) व ही सतत १२०० वर्षेंपर्यंत राजधानी राहिली. बुद्धाला ज्या बोधिवृक्षाखालीं निर्वाणप्राप्ति झाली, तो वृक्ष या शहरांत लोक अद्याप दाखवितात. हा २२०० वर्षांचा जुनाट वृक्ष आज आहे. ज्याबद्दल कागदोपत्रीं परंपरेनें भरपूर पुरावा मिळतो असा हा जगांत एकच वृक्ष दाखवितां येईल. या ठिकाणीं दरसाल देशोदेशींचे बुद्ध यात्रेकरू येऊन त्याचीं गळून पडलेलीं पानें अत्यंत मूल्यवान् समजून घेऊन जातात व धार्मिक बुद्धीनें काळजीपूर्वक जतन करून ठेवितात.

या बेटांत पोर्तुगीज लोकांनीं १५०५ सालीं प्रथमतः प्रवेश केला व वसाहती स्थापन केल्या. पुढील शतकांत डच लोकांनीं त्यांच्या दक्षिण व पश्चिम किनाऱ्यावरील वसाहती हस्तगत करून त्यांस १६५५ सालीं या भागांतून कायमचें घालवून दिलें. या भागांत पोर्तुगीज व डच या लोकांना तेथील किनाऱ्याजवळ सांपडणारे मोती व अन्तर्भागांतील हत्ती व दालचिनी या जिनसांपासून चांगलीच पैदास होत होती. तेथील लोकांकडून लागवडी करून अमेरिकेंतील गुलामांच्या व्यापारप्रमाणें त्यांना फार फायदा झाला. इ. स. १७९७ सालीं इंग्लिशांनीं डच लोकांपासून सिलोन बेट जिंकून घेतलें व तें मद्रास इलाख्यांत सामील केलें. १८०१ सालापासून ती हिंदुस्थानापासून स्वतंत्र वसाहत बनविण्यांत आली. कँडीच्या राजानें बरीच अव्यवस्था माजविल्यामुळें ब्रिटिशसरकारास त्या कारभारांत लक्ष घालावें लागलें व त्यांनीं त्या राजाच्या हातांतून कारभार काढून घेतला. हल्लीं सिलोन ही ' राजशासित वसाहत ' आहे. तेथें मुख्य अधिकारी गव्हर्नर असून त्यास ७ असामींचें कार्यकारी मंडळ व २१ प्रतिनिधींचें कायदेमंडळ दिलेलें आहे. हिंदीमहासागरांतील लखदीव बेट

राज्यव्यवस्थेसाठीं सिलोन बेटास जोडिलें आहे. या बेटांत एक सुलतान राजा आहे; पण त्यास सिलोनच्या गव्हर्नराच्या सल्ल्याप्रमाणें वागावें लागतें.

सारांश, हिंदुस्तानाला अत्यंत जवळ असें सिलोन हें बेट व हिंदुस्तान यांचा कॅनडा व न्यू फाऊंड लंड या भागांप्रमाणें एकमेकांशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. दोन्ही एकमेकांपासून अगदीं अलग झाले आहेत.

---

# सुयांचें पाकीट.

आपण एखाद्या दुकानांत जाऊन सुयांचें पाकीट विकत घेतलें तर तें आपणांस अजमासें तीन आण्यांस मिळतें. त्या पाकिटांत एक डझन सुया एका काळ्या कागदात व्यवस्थित रीतीनें ठेवलेल्या असतात. त्या सुया किती चिमुकल्या, सुंदर व बारीक असतात ! त्या पाकिटावर सोन्याची नक्षी केलेली असते. वास्तविक पाहिलें तर वरच्या नक्षीच्या कागदाची किंमतच तीन आणे होईल ! तर मग आंत असलेल्या इतक्या सुंदर सुया आपणांस तीन आण्यांस कशा मिळतात ? एक मनुष्य सर्व वर्षभर खपला तरी इतक्या सुंदर सुया तो तयार करूं शकणार नाहीं. यावरून पैशाला एक इतक्या स्वस्त रीतीनें सुया आपणांस कशा मिळतात, हें मोठें आश्चर्य आहे. परंतु हे दिवस यंत्र-कलेचे असल्यामुळें यंत्राच्या साहाय्यानें अल्प काळांत हजारों सुया तयार होतात व त्यामुळें त्या अगदीं स्वस्त दरानें द्यावयास परवडतात. आतां या सुया कशा तयार होतात हें आपण पाहूं.

सुया पोलादाच्या करितात. पोलाद लोखंडापासून तयार होतें व लोखंड खाणीमध्यें अशुद्ध स्थितींत सापडतें. खाणींत जे लोखंडाचें दगड

सांपडतात, त्यात क्षार, माती व इतर द्रव्यें मिश्र झालेलीं असतात. तेव्हां तीं बाजूस करून अगोदर शुद्ध लोखंड मिळवावें लागतें. लोखंड शुद्ध करण्याकरिता चुनखडी व दगडी कोळसा या दोन वस्तूंची जरूरी आहे. तेव्हां लोखंड, चुनखडी व कोळसा या तीन द्रव्यांच्या खाणी ज्या प्रदेशांत आहेत, तेथेंच आपणास लोखंड मिळणार व त्या लोखंडापासून परंपरेनें सुया होणार हें उघड आहे. म्हणूनच इंग्लंडमध्यें यॉर्कशायरच्या ईशान्येस आपणांस लोखंडाचे व त्यापासून इतर जिन्नस तयार करण्याचे कारखाने दृष्टीस पडतात.

खाणींत अशुद्ध लोखंड सांपडतें हें मागें आलेंच आहे. तें शुद्ध करण्याकरितां मोठमोठ्या उंच भट्ट्या असतात. या भट्टींत अशुद्ध लोखंड, चुनखडी व कोक ( अर्धवट जळलेला दगडी कोळसा ) हीं सारख्या प्रमाणांत घेऊन भट्टीच्या वरच्या तोंडानें भट्टी भरेपर्यंत आंत ओततात. कोक या द्रव्याच्या योगानें अशुद्ध लोखंड वितळूं लागतें व चुनखडीच्या योगानें इतर मिश्र द्रव्यांपासून शुद्ध लोखंड निराळें होतें. एकेका रांगेंत ४।५ भट्ट्या असतात, व अशा कित्येक रांगा असतात. रात्रींच्या वेळीं या भट्ट्या पेटलेल्या असतांना त्याच्या ज्वाला वरच्या बाजूनें सारख्या बाहेर पडतात व तो देखावा कांहीं विलक्षणच दिसतो.

भट्टींत लोखंड वितळून त्याचा रस झाला म्हणजे मिश्र द्रव्याचा रस शुद्ध लोखंडाच्या रसापासून अलग होऊन तो भट्टीच्या पृष्ठ भागापाशीं येतो व शुद्ध लोखंडाचा रस खालीं राहातो. नंतर भट्टीच्या वरच्या बाजूला एक भोक पाडून तो मिश्र द्रव्यांचा रस काढून घेतात. इतकें झाल्यावर भट्टीच्या तळाजवळ भोक पाडतात, म्हणजे लोखंडाचा जळजळीत लाल रस तोटींमधून पाणी यावें त्याप्रमाणें बाहेर येतो. त्याचा एकादा लहान थेंब जर अंगावर उडाला तर जखम होईल, म्हणून मोठ्या सावधगिरीनें दोन लांब सांडसांमध्यें बादली भोकाखालीं धरून दोन मजूर त्या

भोकाच्या दोन बाजूंला उभे असतात व रसानें बादली भरली म्हणजे दुसरी बादली त्या भोकाखालीं लावतात व ती पहिली बादली तशीच सांडसांनीं धरून मुशींत नेऊन ओततात. त्या मुशी निरनिराळ्या आकाराच्या केलेल्या असून त्यांच्या तळाशीं वाळू असते. त्यांत रस ओतल्यावर कांहीं वेळानें तो थंड होऊन त्याचें लोखंड बनतें. हेंच शुद्ध लोखंड होय. आपणांस लोखंडाचें पोलाद बनवावयाचें असल्यास लोखंडाचा रस बादलींतून तसाच दुसऱ्या भट्टींत नेऊन ओततात, व त्यांत दुसरीं कांहीं द्रव्यें मिसळतात व नंतर पुन्हा ते सर्व एकत्र वितळवितात व तो रस मुशींत ओतून थंड केला म्हणजे त्याचें पोलाद बनतें. अशा रीतीनें पोलादाच्या शेंकडों कांबी तयार करतात.

आतां पोलादाची एक कांब घेऊन तिच्या सुया कशा करतात तें पाहूं. प्रथम ही पोलादाची कांब एका यंत्रात घालून सुईच्या जाडीइतकी लांब तार काढतात, व त्या तारेचीं वेटोळीं करितात, म्हणजे ती तार एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं सहज नेतां येते. आतांपर्यंत सांगितलेलें सर्व काम एका कारखान्यात होतें. तारेपासून सुया दुसऱ्या कारखान्यांत तयार होतात. प्रथम तार यंत्रांत घालून तिचे—दोन सुयांची जेवढी लांबी होईल एवढा एक—असे हजारों तुकडे करतात. नंतर ते तुकडे तापवून व लोखंडाच्या शिळावर लाटून सरळ करतात. प्रत्येक तुकडा दोन सुयांच्या लांबीइतका असतो हें मागें सांगितलेंच आहे. आतां हे तुकडे एका यंत्रांत घालून त्यांचीं टोंकें निमूळतीं व अणकुचीदार करतात. हें काम पूर्वीं माणसें हातानीं करीत असत, त्यामुळें सुया महाग मिळत असत. परंतु आतां एक यंत्र शेंकडों माणसांचें काम करीत असल्यामुळें सुया आपणास स्वस्त मिळतात. आतां यापुढलें काम म्हटलें म्हणजे नाकें तयार करणें, एकेका

तुकड्याचे दोन तुकडे करणें व ते तुकडे पॉलिश करणें ( चकचकीत व गुळगुळीत करणें ) म्हणजे सुया तयार झाल्या.

वर सांगितल्याप्रमाणें टोंकें अणकुचीदार केल्यानंतर ते तुकडे एका यंत्रांत घालतात. तेथें प्रत्येक तुकड्यावर मधोमध दोन खाचण्या पडतात. आपण सुई घेऊन पाहिली तर तिचें भोक खाचणीमध्यें आहे असें दिसून येईल. या खाचण्या तयार झाल्या म्हणजे हे तुकडे दुसऱ्या एका यंत्रात दाबून त्या खाचण्यांमध्यें भोकें पाडलीं जातात. हें काम मुलें व मुलीही करूं शकतात. याप्रमाणें भोकें पाडल्यावर प्रत्येक तुकड्याचे दोन खाचण्याच्या मधोमध दोन दोन तुकडे करतात. या रीतीनें एका तुकड्याचे दोन तुकडे म्हणजे दोन सुया झाल्या. यानंतर सुयांचीं डोकीं वाटोळीं व गुळगुळीत करितात. या वर सांगितलेल्या सर्व गोष्टी निरनिराळ्या यंत्रातून कराव्या लागतात. परंतु कित्येक कारखान्यातून खाचण्या पाडण्यापासून तों शेवटपर्यंतचें सर्व काम एकाच यंत्रांतून होतें. अद्याप या सुया कठीण केल्या पाहिजेत व शेवटीं पॉलिश केलें म्हणजे सर्व काम संपलें. कठीण करण्याकरितां त्या भट्टींत घालून चांगल्या लाल होईपर्यंत तापवितात, व बाहेर काढून तेलपाण्यांत बुडवितात. पुन्हा कोरड्या करून तापवितात व तेलपाण्यांत बुडवितात म्हणजे त्या कठीण होतात.

शेवटीं पॉलिश करण्याकरितां एका पिशवींत वाळू, तेल, साबण व त्या सुया घालून ती पिशवी खूप जोरानें हलवितात व जमिनीवर रुळाप्रमाणें फिरवितात. नंतर त्या सुया बाहेर काढल्या म्हणजे चकचकीत, गुळगुळीत व सुंदर दिसतात.

यानंतर सुया सुंदर पाकिटांत भरून विक्रीकरितां तयार होतात. हल्लीं सर्व जगभर इंग्लंडच्या सुया उत्कृष्ट समजल्या जातात, त्याच्या

खालोखाल जर्मनी व अमेरिका येथील सुया असतात. हल्लींच्या दिवसांत उत्तर ध्रुवाकडील एस्किमो लोकसुद्धां पूर्वींच्या आपल्या हाडापासून तयार केलेल्या सुया टाकून देऊन पोलादाच्या सुयांनीं शिवूं लागले आहेत. मात्र त्यांच्या सुया मोठ्या भोकाच्या व बोजड असतात. शिवणाच्या यंत्रांतील सुयाही वर सांगितल्याप्रमाणेंच तयार करतात; परंतु त्यांचीं भोकें मात्र अणकुचीदार टोंकाकडे असतात.

याप्रमाणें स्वस्त मिळणारी व दिसण्यांत क्षुल्लक दिसणारी सुई ही अनेक लोकांच्या श्रमाचें फळ आहे हें दिसून येईल.

---

# पूर्व आफ्रिका.

पूर्वआफ्रिका या भागांत मुसलमान लोक केव्हां येऊन राहूं लागले याचा विश्वसनीय दाखला मिळत नाहीं. पण इ. स. १००० च्या सुमारास या भागाशीं मुसलमानांचा व्यापार जोरानें चालत होता व मॅगोडेशू, मोंबासा, किलवा, मिलिंद हीं शहरें चांगलीं भरभराटींत होतीं असें आढळतें. या भागांत प्रसिद्ध प्रवासी इब्नबतूता हा फिरून गेला. त्यानेंही आपल्या प्रवासवर्णनांत या शहरांच्या भरभराटीसंबंधानें लिहून ठेविलें आहे. १६ व्या शतकांत पोर्तुगीज लोकांचें पूर्वेकडील भागांत वर्चस्व स्थापन झाल्यावर त्यांनीं आफ्रिका, अरबस्तानचा व हिंदुस्तानचा किनारा व्यापून टाकला. त्यावेळीं मुसलमान लोकांची सत्ता कमी झाली पण १६ व्या शतकाचे अखेरीस यांच्या सत्तेला ओहोटी लागल्यावर पुनः या भागांत मुसलमानी अंमल प्रस्थापित झाला. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यालगत अरबस्तानचा किनारा येतो. या किनाऱ्यावर राज्य करणाऱ्या निरनिराळ्या मुसलमानी घराण्यांत मस्कत येथील घराणें फार बलिष्ठ होतें. बरेच दिवस या घराण्यांतील राजांचें इराणच्या शहाबरोबर युद्ध चालल्यामुळें त्यांना बाहेर

लक्ष देण्यास सांपडलें नाहीं, पण या भांडणांतून सुटल्यावर त्यांनीं झांजीबार बेटांत आपली गादी स्थापिली. या बेटांत हल्लींसुद्धां लवंगा फार पिकतात व मुख्य जमिनीच्या भागापासून हें बेट तुटक असल्यानें आरमारी सत्ता असणाऱ्या देशाला येथें सुरक्षितता जास्त मिळण्याचा संभव असतो. आरब लोक हे पूर्वींपासून दर्यावर्दीपणाबद्दल फार प्रसिद्ध आहेत. या बेटांत राहून त्यांनीं पूर्वकिनारा आपल्या हस्तगत केला.

या मस्कतच्या घराण्यापैकीं झांजीबार येथील सय्यद सैद नांवाचा राजा १८५६ सालीं मरण पावल्यावर त्याच्या गादीसंबंधानें तंटे लागले. तेव्हां या भागाशीं व्यापारी बाबतींत संबंध येत असल्यानें हिंदुस्तानचा त्यावेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यानें मध्यस्थी करून तो तंटा मिटविला. यामुळें येथील दरबारांत इंग्लिशांचें वर्चस्व बसलें.

१८२४ सालीं या भागांत येऊन कांहीं इंग्लिश लोकांनीं पूर्व किनाऱ्याचा कांहीं प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला होता. पण ही गोष्ट त्या वेळच्या वसाहतींच्या धोरणाविरुद्ध असल्यानें सरकारनें त्यांची कानउघाडणी केली.

१८३४ सालापासून गुलामगिरी नाहींशी करण्याबद्दलचे प्रयत्न इंग्लिशांनीं जारीनें सुरू केले व त्या बाबतींत त्यांनीं सर्व युरोपियन राष्ट्रांची मदत मिळविली. पूर्व आफ्रिका व पश्चिम आफ्रिका या भागांतून गुलामांची फार निर्यात होत असे. त्यामुळें मुख्य ठिकाणींच शक्य तितका आळा घालणें जरूर आहे असें ठरवून येथील मुसलमान राजांकडून इंग्लिशांनीं गुलामगिरी बंद करण्याबद्दल आश्वासनें घेतलीं. पण गुलामाच्या व्यापारानें लक्ष्मीची प्राप्ति होत असल्यानें या बाबतींत बराच चोरटा व्यापार चालू राही. व हें उघडकीस येई तेव्हां इंग्लिशांकडून इकडील सुलतानांना बराच त्रास सोसावा लागे.

तेव्हां या बाबतींत इंग्लिशापासून आपणांस होणारा त्रास कमी व्हावा म्हणून झांजीबारच्या सुलतानानें १८७७ सालीं इंग्लिशांचा अधिकारी मॅकेना याच्याशीं व्यापाराच्या सोयीसाठीं पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्याचा स्वतःच्या ताब्यांत असलेला भाग घेण्यासाठीं विनंति केली. त्यावेळींच

इंग्लिश लोकांनीं हा भाग घेण्याचें ठरविलें असतें व तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतला असता तर त्यांना पोर्तुगीज पूर्वआफ्रिकेच्या उत्तरेपासून ते थेट सोमाली लँडपर्यंतचा सर्व प्रदेश एकदम मिळाला असता. पण वसाहतींची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्याचें त्यावेळच्या सरकारच्या मनांत नसल्यानें या बाबतींत मुग्धत्वाचें धोरण स्वीकारण्यांत आलें व सोन्यासारखी आलेली संधी यावेळीं इंग्लिशांनीं हातची घालविली.

१८८० ते १८८४ पर्यंत दक्षिण आफ्रिकेंत बोअर लोकांशीं युद्ध सुरू होतें व त्याचवेळीं इजिप्तमध्येंही बंड मोडण्यांत इंग्लिश सैन्य गुंतलें होतें. त्यामुळें इतर युरोपियन राष्ट्रांनीं ही संधी साधून आफ्रिकेंत आपलें साम्राज्य स्थापण्याचा बेत सिद्धीस नेला. यांत जर्मनीनें आपला बराच कावा साधिला. पश्चिम किनाऱ्यावर कॅमेरून व पश्चिम आफ्रिका हे भाग घेऊन त्यांच्या आरमारानें पूर्व किनारा गांठला व झांजीबारच्या सुलतानाकडून पोर्तुगीज मुलुखाच्या उत्तरेचा कांहीं किनारा व्यापारासाठीं मोकळा करून घेतला. बोअर लोकांशीं इंग्लिशांचें युद्ध संपून ते स्वतंत्र आहेत असें इंग्लिशांनीं कबूल केल्यावर या लोकांना आपल्या हाताशीं धरून आपणांस आफ्रिकेंत बराच विस्तार करितां येईल व ट्रान्सवाल व ऑरेंजफ्रीस्टेटपर्यंतचा भाग आपल्याला सहज घशांत उतरवितां येईल असा जर्मनीनें आपल्या मनांत कयास बांधिला असावा. पण स्वतः होऊन नव्हे तरी दुसऱ्यांनीं राज्यविस्तार करावयास लावल्यानें इंग्लंडचा हल्लींचा विस्तार झाला असें म्हणतात तें या ठिकाणीं चांगलेंच प्रत्ययास येतें. जर्मनीनें प्रांतामागून प्रांत घशांत टाकण्यास सुरुवात केलेली पाहाण्याबरोबर इंग्लंडला स्फुरण चढलें व लागलीच त्यांच्याही हालचाली सुरू झाल्या.

१८८७ सालीं मॅकेना यानें झांजीबारच्या सुलतानाची भेट घेऊन मोंबासा, मिलिंद वगैरे बंदरें असणारा किनारा त्याच्याकडून व्यापारासाठीं मोकळा करून घेतला.

किनाऱ्यापासून आंत व्हिक्टोरिया नियांझा या सरोवरापर्यंत व पलीकडे टॅंगानिका सरोवरापर्यंतचा भाग स्पेक या प्रवाशानें १८६२ सालीं शोधून काढिला होता. तसेंच व्हिक्टोरिया नियांझा ते आंत युगांडा प्रांताचा भाग

शोधून काढण्याचें श्रेय त्याच सालीं ( १८६२ ) ग्रँट या प्रवाशानें मिळविलें होतें.

या भागांत शोध करणाऱ्या प्रवाशांची खालीं थोडक्यांत माहिती दिली आहे.

| प्रवाशाचें नांव | सन | शोधिलेला भाग. |
|---|---|---|
| स्पेक व बर्टन | १८६२ | टँगानिका सरोवर |
| स्पेक | १८६२ | व्हिक्टोरिया नियांझा सरोवर |
| ग्रँट | १८६२ | युगांडाप्रांत व नाइलचा उगम |
| स्टॅनले | १८७५ | नाइल नदीचा उगम. |
| बेकर | १८६४ | आल्बर्ट नियांझा सरोवर |

त्यामुळें व्यापार करण्याची परवानगी घेऊन पार्लमेंटच्या संमतीनें १८८८ सालीं पूर्व आफ्रिकेशीं व्यापार करणारी कंपनी स्थापण्यांत आली व थेट अन्तर्भागापर्यंत दळणवळण सुरू झालें.

दरम्यान १८८४ सालानंतर जर्मनीनेंही टँगानिका सरोवर गांठलें असून त्यांचा युगांडा प्रांताकडे मोर्चा वळला होता.

या प्रांतांचा शोध लागल्यावर ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं ख्रिस्ती मिशनरी लोकही येथें येऊं लागले होते. धर्मप्रसाराच्या बाबतींत त्यांचे मुसलमानाशीं खटके उडत होते व युगांडा प्रांतांत या बाबतींत बिशप हॅनिंगटन यास ठार मारण्यांत आलें होतें.

या सालानंतर लवकरच जर्मन लोक ह्या प्रांतांत येऊं लागले व तेथील लोकांवर त्यांनीं करडा अमल सुरू केला. पण त्यामुळें तेथील लोक बिथरले. मूठभर जर्मन लोकांना त्यांनीं आपल्या प्रांतांतून पाय काढावयास भाग पाडलें. दरम्यान इंग्लिश कंपनी व जर्मन यांच्यामध्यें परस्परांच्या सरहद्दी-संबंधानें तंटा उपस्थित झाला होता तो १८९० सालीं मिटला व युगांडा प्रांत इंग्लिश कंपनीच्या ताब्यांत राहिला.

१८९२ सालीं सौडन प्रांतांत बंड होऊन त्या बंडाचा युगांडा प्रांतांतही फैलाव झाला. तेव्हां कंपनीला त्या बंडाचा मोड करणें भाग पडलें. त्या बाबतींत कंपनीला फार खर्च येऊन ती अगदीं टेकीस आली. तेव्हां त्या कंपनीनें किनाऱ्यापासूनचा सर्व पूर्वआफ्रिकेचा प्रांत आपल्या ताब्यांत घेण्याची विनंती केली. तेव्हां पार्लमेंट सरकारनें व्यापारी चढाओढ व १८८५ सालीं झालेला मिशनऱ्याचा खून या दोन कारणांस्तव तो प्रदेश आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरवून त्याप्रमाणें गोष्टी अमलांत आणल्या. प्रथमतः बंड मोडण्यास पाहिजे होतें त्याकरितां व व्यापाराच्या सोयीसाठीं त्यांना मोंबासापासून अन्तर्भागांत रेल्वे रस्ता बांधणें फार जरूर होतें व पैशाच्या अभावीं ही गोष्ट कंपनीच्या हातून झाली नव्हती. म्हणून ताबडतोब रेल्वे बांधण्याचें काम सुरू झालें व सैन्याकडून बंडाचा मोड करण्यांत आला.

कंपनीकडून पार्लमेंट सरकारकडे मोंबासा ते व्हिक्टोरिया नियांझा हा प्रांत व युगांडा प्रांत हे दोन भाग आले. हे दोन भाग १९०५ सालापर्यंत सरकारच्या परराष्ट्रीय खात्याच्या मंत्र्याच्या ताब्यांत होते. त्यानंतर हल्लीं ते वसाहत मंत्र्याकडे सोपविण्यांत आले आहेत.

हल्लीं पूर्व आफ्रिकेंत इंग्लिशांच्या ताब्यांत केनिया व किनाऱ्यालगतची त्यांची संरक्षित वसाहत, झांजीबार बेट, युगांडा प्रांत व महायुद्धानंतर जर्मन पूर्व आफ्रिकेपैकीं ' मँडेटनें ' मिळालेला टँगानिका प्रांत हे चार भाग येतात.

या चार भागांपैकीं झांजीबार बेटांत सुलतान असून हाय कमिशनर व रेसिडेंट यांचे मार्फत तेथील व्यवस्था चालविली जाते. सुलतानास दरसाल १७००० पौंड ( २, ५५, ००० रुपये ) पेनशन् देतात. त्याच्या हातांत खरी सत्ता फारच थोडी आहे. पण त्याच्या अस्तित्वाची खूण म्हणून बंदरांत त्याचें निशाण मात्र फडकत असतें. बाकीच्या तीन प्रांतांवर प्रत्येकीं गव्हर्नरची नेमणूक असून त्यांस मदतीस मंडळें दिलेलीं असतात.

युद्धानंतर पूर्वीच्या या भागांतील प्रदेशाच्या तिप्पट मोठा एवढा पूर्व आफ्रिकेंतील जर्मन प्रदेश इंग्लिशांच्या ताब्यांत आला आहे.

मूमध्य समुद्रापासून व्हिक्टोरिया नियांझापर्यंतचा भाग इंग्लिशांच्या ताब्यांत आहे व खालीं दक्षिण टोंकापासून ते टाँगानिका सरोवरापर्यंत त्यांच्याकडे होता. या दोन प्रदेशांमधील भाग जर्मनीच्या ताब्यांत असल्यानें इंग्लिशांना आपली साखळी तुटकी असल्याचें मोठें वैषम्य वाटत होतें, पण हा दुवा घातल्यानें आतां केप ते कैरोपर्यंत सरळ ५००० मैलांचा आगगाडीचा रस्ता बनून दळणवळण अत्यंत सुलभ झालें आहे. एकंदर हल्लीं इंग्लिशांच्या ताब्यांत पूर्व आफ्रिकेंतील ४ वसाहती मिळून पावणे पांच लक्ष चौरस मैल ( ४, ७८, १४० चौ. मै. ) क्षेत्रफळ असणारा प्रदेश असून उत्पन्नाच्या बाजूनेंही तो चांगला संपन्न आहे.

---

# किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी व कऱ्हाड येथील सफर.

ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन या संस्थेंतील ३ ऱ्या वर्षाला कोणतें तरी एकादें प्रेक्षणीय स्थळ पाहावयास संस्थेच्या खर्चानें नेतात. काय कारण असेल तें असो. मधलीं दोन वर्षें वरील नियमांत खंड पडला व आतां या वर्षी आमच्या सुदैवानें हा सुयोग येणार हें आम्हांला कळतांच मग काय विचारतां ! आमच्या आनंदास पारावारच राहिला नाहीं, त्या भरांत आम्ही आमच्या लेडी सुपरिंटेंडंट मिस् न्यूलंड यांना ' आम्हांस कोठेंतरी न्या ' म्हणून त्यांच्या मागें एकसारखें टुमणें लावून किती त्रास दिला तो आमचा आम्हांलाच माहीत ! असो; एकदांचें भाटघरचें धरण, भोरसंस्थान, किर्लोस्करवाडी व ओगलेवाडी दाखविण्याचें नक्की ठरलें. किर्लोस्करवाडीला जाण्याची तारीख २२।३।२५ होती, परंतु मधेंच आमच्या कॉलेजचे ' इन्स्पेक्शन ' आल्यामुळें ती तारीख पुढें गेली व आमच्या आनंदाचा विरस झाला. आम्हांला अतिशय वाईट वाटलें. सहामाही परीक्षा अगदीं जवळ आल्यामुळें आतां आमचें जाणें शक्य नाहीं असें वाटूं लागलें. अभ्यासाकडे मन लागेना. पुस्तक हातांत घेतलें तर किर्लोस्करवाडी त्यांत दिसूं लागे; अशी स्थिति झाली होती !

अशा नीरस स्थितींत असतांच एक दिवस ३ रें वर्ष सहज मिस् न्यूलंडच्या बंग-ल्यावर गेलें असतां, 'तुम्हांला २८।३।२५ ला नक्की जावयाचें' असें त्यांनीं सांगितलें; या आकास्मिक बातमीनें आम्हांला अतिशय आनंद झाला व आमचा उल्हास पाहून मिस् न्यूलंड यांनाही समाधान वाटलें. लगेंच आमच्याबरोबर कोण कोण शिक्षक पाठवावयाचे, काय काय वस्तु बरोबर घ्यावयाच्या तें सर्व सांगून, मिस् न्यूलंडनीं आम्हांला जाण्याची तयारी करण्यास परवानगी दिली. नंतर मोठ्या आनंदानें आम्ही आमच्या बोर्डिंगमध्यें आलों.

२७ तारीख तयारी करण्यांत केव्हांच निघून गेली. भूक, तहान याची जाणीव-सुद्धां आम्हांला त्या दिवशीं झाली नाहीं. एकदांची २८ तारीख उजाडली. आमचा उत्साह वाढूं लागला, तरी त्यांत कांहींतरी चुकल्याचुकल्यासारखें उदास असें वाटूं लागलें. त्याचें कारण याच संधीस आमची एक वर्गभगिनी अतिशय आजारी पडली. आधींच आम्ही १२ मुली, त्यांतही एक कमी यामुळें फार खेद वाटला. असो.

ता. २८।३।२४ रोजीं रात्रीं ११॥ च्या गाडीनें आह्मी निघालों. आह्मी स्टेशनवर जाण्यापूर्वींच आमचे शिक्षक आले होते व त्यांनीं आमच्याकरितां डबा वगैरे ठरवून सर्व व्यवस्था केली होती. आम्ही सर्व डब्यांत जाऊन बसतांच तो भरून गेला. आम्ही बसल्यावर गाडी बराच वेळ स्टेशनमध्यें थांबली होती. आम्ही आग-गाडींतून कधीं प्रवास केला नव्हता असें नाहीं. परंतु या वेळीं गाडींत पाय ठेवतांच जो आनंद झाला तो सांगतांच येत नाहीं. आम्ही वर्गभगिनी बहुतेक बरोबरीच्या असल्यामुळें कोणत्याही गोष्टींत सर्वांचें एकमत होण्याला वेळ लागत नसे. त्यामुळें ही सफर सुखकर झाली. डब्यांत फक्त आमचीच मंडळी होती. स्टेशनवर बसून फारच कंटाळा आला; गाडी कधीं चालू होणार याची वाट पाहूं लागलों, तोच थोड्या वेळानें गाडी चालू झाली.

गाडी चालूं लागली, व एक एक स्टेशन मागें पडूं लागलें. या स्टेशनांचीं नांवें आमच्या कानांस चमत्कारिक भासूं लागलीं. आमच्या कांहीं वर्गभगिनी नेहमीं जी. आय. पी. रेल्वेनें जाणाऱ्या होत्या. फक्त तीनच मुली सदर्नमराठारेल्वेनें जाणाऱ्या होत्या. मराठींत एक म्हण आहे कीं, ' एका हातानें टाळी वाजत नाहीं. ' या म्हणीप्रमाणेंच दोन पक्ष असल्याशिवाय कोणताही वाद चालत नाहीं. तशीच स्थिति आमची झाली होती. सदर्न मराठा रेल्वेनें जाणाऱ्या व जी. आय. पी. नें जाणाऱ्या मुलींमध्यें वाद सुरू झाला. दोन्हीं पक्षांनीं म्हणावें कीं, आमची रेल्वे चांगली, परंतु खरोखर कोणती रेल्वे चांगली हें प्रवास करणारांना कांहीं कळल्याशि-वाय राहात नाहीं.

या वादांत किती स्टेशनें गेलीं तें समजलें सुद्धां नाहीं. मधून मधून आमचे शिक्षकही या वादाला प्रोत्साहन देत होते. अशा रीतीनें बरीच रात्र आम्हीं वाद करण्यांत घालविली. परंतु हा खरोखरच वाद होता काय? छे; तर तो एक विनोद होता. त्याला खऱ्या वादाचें स्वरूप कसें तें आलेंच नाहीं. आमचा तो विनोद पाहून आमच्या शिक्षक मिस् सॅम्सन यांना फारच आनंद होत होता. यावेळीं आम्ही शिक्षक व विद्यार्थिनी हें नातें अजीबात विसरून गेलों. कारण आम्ही या सफरीच्या वेळीं फारच मनमोकळेपणानें वागलों आणि म्हणूनच ही सफर आम्हाला आनंददायक झाली. नंतर कांहीं मुली झोपल्या, कांहीं जाग्याच होत्या. मधून मधून शिक्षक नक्षत्रांची माहिती देत होते आणि अखेरीला वादाचें प्रकरण कमी होत होत अगदीं बंद पडलें. इतक्यांत किर्लोस्कर वाडीचें स्टेशन आलें. रात्रीं साडेतीन, चार वाजण्याची वेळ असल्यामुळें स्टेशन पहावयास मिळालें नाहीं.

आम्हांला नेण्याकरितां श्रीयुत लक्ष्मणराव किर्लोस्करांकडून एक मनुष्य आला होता. त्यानें एका गाडींत सर्व सामान भरलें. आम्ही गाडीच्या मागून पायींच चालत गेलों. कारण गाडींत बसून जाण्यासारखा तो रस्ता नव्हता. आम्हांला उतरण्याकरतां स्वतंत्र बंगला होता. त्या बंगल्यामध्यें सर्व सोयी होत्या. चार साडेचार वाजतां या बंगल्यावर पोहोंचलों. गाडींत जागरण झाल्यामुळें झोपावयाला केव्हां मिळेल याची आम्ही वाट पाहात होतों. बंगल्यावर गेल्यावर प्रथम आम्ही निद्रादेवीच्या आधीन झालों. हा बंगला अगदीं मोकळ्या जागेंत असल्यामुळें वारा मनसोक्त वाहून दुसऱ्याला सुख देण्याचा प्रयत्न करीत होता. दुसऱ्या दिवशीं म्हणजे एकोणतीस तारखेला सकाळीं अगदीं बऱ्याच उशिरानें उठलों. बाहेर येऊन पाहातों तों सूर्यनारायण हळूहळू उदयाचलावर येत होता. सूर्योदयाची शोभा पाहात आम्ही तेथेंच दहा, बारा मिनिटें उभ्या राहिलों. अहाहा! काय तें त्यावेळचें त्याचें तेज! भगवान् सहस्ररश्मीच्या बाल किरणांनीं दिशा तेजोमय दिसत होत्या. सर्व दिशांनीं एकाच रंगाचा शालू परिधान केला होता.सूर्योदय होतांना पुष्कळ वेळां पाहिला असेल; परंतु अशी चित्ताकर्षक शोभा कधींच पाहावयास मिळाली नाहीं. कारण या ठिकाणीं उघडें मैदान असल्यामुळें चोहोंकडील देखावा स्पष्ट दिसत होता. बंगल्याच्या जवळच मुलांची शाळा आहे. आणि शाळेला लागूनच सिनेमाचें थिएटर आहे. शाळेंत याच सकाळच्या प्रहरीं नमस्कार व प्रार्थनापाठ चालले होते. थिएटरमध्यें कामगार मंडळी आपल्या करमणुकीखातर कधीं सिनेमाचे खेळ करतात.

आमच्या बरोबर स्वयंपाकीण बाई होत्या, त्यामुळें आम्हांला कांहीं करावें लागणार नव्हतें; परंतु या सफरींमध्यें त्या बाईला चुलीची आराधना बिलकूल करावी लागली नाहीं. आमच्या जेवणाची, चहापाण्याची वगैरे सर्व व्यवस्था किर्लोस्क-

यांच्या येथें झाली. आमच्यांत कांहीं निःसीम चहाभक्त मुली होत्या. चहाला थोडा उशीर झाल्यामुळें त्यांची सर्व शक्ति नाहींशी झाली. थोड्या वेळानें चहा घेऊन दोन मनुष्य आले. चहा आटोपून कारखाना पाहावयास जावयाचें असें ठरलें. त्याप्रमाणें आठ साडेआठ वाजतां कारखाना पाहाण्यास निघालों.

किर्लोस्करवाडी पाहावयाच्या पूर्वी आम्हांला असें वाटलें कीं, ही वाडी म्हणजे कशी असणार, बाहेरून मोठा तट असेल, त्याच्या आंत कसलीं तरी झाडें असतील, किंवा अगदीं थोडींशीं घरें असतील, अशी कांहीं तरी कल्पना होती. ती कल्पना थोड्या वेळानें पार नाहींशी झाली. कारखाना पाहाण्यास आम्ही निघालों यावेळीं कारखान्याची माहिती सांगण्याकरितां बरोबर एक मनुष्य दिला होता. कारखान्याकडे गेल्यावर पाहातों तो काय! जिकडे तिकडे प्रत्येक मनुष्य आपआपल्या कामांत गर्क झाला होता.

प्रथम आम्हीं छाप उठविण्याचें यंत्र पाहिलें. छाप उठवितांना यंत्र किती जोरानें दाबावें लागतें तें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय सांगतां येणार नाहीं. कांहीं यंत्रें हें काम माणसाच्या साहाय्याशिवाय करतात. दुसऱ्या ठिकाणीं कठडे, नांगर कसे तयार करतात, व ते एका प्रकारच्या मातींत घालून कसे ठेवतात हें दाखविलें. पुढें गेल्यावर लाकडें सफाईदार करण्याचीं यंत्रें पाहिलीं. या लाकडाच्या कारखान्याजवळच लोखंडाचा रस करण्याची मोठी भट्टी आहे. रस कसा तयार होतो हें पाहाण्याची आमची फार इच्छा होती. परंतु आम्ही गेलों त्यावेळीं भट्टी साफ करण्याचें काम चाललें होतें, त्यामुळे आमची इच्छा तृप्त झाली नाहीं याच्या पुढें गेल्यावर मात्र जिकडे तिकडे पट्टेच पट्टे आपलें काम विजेच्या सहाय्यानें झपाट्यानें करीत असलेले दिसत होते. या ठिकाणीं आल्यावर मात्र फार जपून जावें लागलें. जर का त्या पट्ट्यांना धक्का लागला कीं मग झालेंच कल्याण! असो.

या यंत्राच्या जवळ आल्यावर आमच्या दोन तुकड्या करण्यांत आल्या. एका शिक्षकाच्याबरोबर कांहीं मुली व दुसऱ्या शिक्षकाच्याबरोबर कांहीं मुली याप्रमाणें वांटणी केली. नंतर आम्ही राहिलेला भाग पाहाण्यास निघालों. या कारखान्यांत एका बाजूला वाफ उत्पन्न करण्याचें मोठें व मुख्य यंत्र आहे. त्या मुख्य यंत्रापासून बाकीचीं यंत्रें भराभर आपलें काम मनापासून करीत होतीं. जिकडे तिकडे पट्टेच पट्टे हालत होते. या यंत्रापासून कांहीं ठिकाणीं खिळे तयार होत होते, तर कांहीं ठिकाणीं गिरमिटासारख्या लोखंडाच्या वस्तु तयार होत होत्या. हीं सर्व कामें यंत्रांनींच होत होतीं. प्रत्येक यंत्राला चलन देण्याकरितां त्याच्याजवळ एक एक मनुष्य उभा होता. या कारखान्यांत श्री. लक्ष्मणरावांचे मधले चिरंजीव व पुतणे स्वतां काम करीत होते, तें पाहून आम्हांला फार आश्चर्य वाटलें.

नंतर येथून आम्ही दुसऱ्या भागाकडे गेलों. या ठिकाणीं भिंतींत मोठमोठे फळे बसवून, त्यावर मजूर लोकांची रोजची हजेरी मांडण्याची व्यवस्था ठेविलेली होती. ही व्यवस्था फारच उत्तम होती. नंतर येथून आम्ही रंगाच्या कामाकडे गेलों. येथें पुष्कळ प्रकारचे रंग होते. या रंगाचा उपयोग नांगरांना व निरनिराळया कठड्यांना रंग देण्याकडे केला जातो. येथून आम्ही पुढें गेलों. तेथें किती तरी नांगर रंग देऊन ठेवलेले होते. त्याप्रमाणें कडबा आपोआप कापला जाणारीं यंत्रेंही पुष्कळच होतीं. इतके नांगर एकदम कशाला तयार केले असें विचारतांच बरोबरच्या मनुष्यानें सांगितलें कीं, दुसऱ्या गांवाहून नांगरांची मागणी एकदम व पुष्कळ होते ह्मणून हे असे तयार करून ठेवावे लागतात. या कारखान्यांत रंगाच्या कामाकडे मजूर स्त्रियाही होत्या. आरंभापासून सांगितलेला येवढा भाग पाहीपर्यंत दहा वाजले तरी अजून पुष्कळ भाग पहावयाचा होता. उन्हाळयाचे दिवस असल्यामुळें तहान फारच लागली होती. परंतु तेथें पिण्यासारखें पाणी नव्हतें. उन्हाळा तर अतिशय भासत होता. इतके शरिराचे हाल होत होते तरी सर्व कारखाना पाहाण्याची इच्छा जबर होती. येथून आम्ही पुढ गेलों तेव्हां तेथें ठेवलेलें प्रचंड यंत्र आम्हीं पाहिलें. या यंत्राशेजारीं दुसरें एक यंत्र होतें. तें यंत्र कांहीं मंडळी सुरू करीत होती. मोठें यंत्र जें पाहिलें, त्या यंत्राची किंमत ८० हजार रु. होती. तें नुकतेंच अमेरिकेहून आणलें होतें. एका यंत्राची किंमत जर ८० हजार रुपये तर तेथें असलेल्या लहान मोठ्या यंत्रांची किंमत कशी होईल याचं जर त्रैराशिक मांडलें आणि येणारें उत्तर पाहिलें तर तोंडांत बोटें घालण्याची पाळी येईल; असो.

कारखाना पाहून होईपर्यंत मुली फारच थकून गेल्या. एकीला सुद्धां पाय उचलण्याची शक्ति नव्हती. तरी पुढें नवीन भाग पाहावयाचा आहे या उत्सुकतेनें भराभर पाय उचलीत होतों. हा कारखाना पहात असतां अकस्मात् मालकांच्या ऑफिसजवळ आलों. त्यावेळीं मालक ऑफिसमध्यें होते. आम्हीं आलों आहों असें कळतांच ते बाहेर आले आणि आम्ही कारखाना पाहाण्यास गेल्याबद्दल त्यांनीं आनंद प्रदर्शित केला. जेवणाखाण्याची चौकशी करून ते पुन्हा आपल्या कामाला गेले. रा. लक्ष्मणराव यांचा तो साधा पोशाक, निरभिमान प्रेमळ वृत्ति पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें व त्याजविषयीं आदर व पूज्यबुद्धि मनांत उत्पन्न झाली. आम्हांला असें वाटलें, श्रीयुत लक्ष्मणराव यांच्यासारखे बुद्धिमान्, कर्तृत्ववान् व प्रेमळ आणखी कांहीं कारखानदार लाभले तर, या देशाच्या उद्योगधंद्याची भरभराट होण्यास वेळ लागणार नाहीं. मग हिंदुस्थानचा कच्चा माल हिंदुस्थानांतच राहील व हिंदवासियांना केवळ पोटासाठीं परदेशांत जाण्याची पाळी येणार नाहीं. असो.

नंतर आम्ही त्यांचा छापखाना पाहण्यास गेलों. किर्लोस्करखबर हें मासिक ऐकून तरी सर्वांना माहीत आहेच. तें मासिक याच छापखान्यांत कानडी व मराठी अशा दोन भाषेंत निघतें. या ठिकाणीं आमच्या मुलींची दुसरी तुकडी आली. नंतर आम्ही घरीं जाण्यास निघालों. तहानेनें सर्वांचा जीव फारच व्याकूळ झाला होता तिच्यापुढें जेवणाची आवश्यकता भासत नव्हती. ज्या बंगल्यांत आम्ही उतरलों होतों, तिकडे जात असतांना वाटेवरच मालकांचें घर लागतें. तेथें पाणी पिण्यास गेलों. प्यावयाला गार पाणी मिळतांच सर्वांना फार आनंद झाला. मालकीणबाईंनीं घरीं गेल्याबरोबर आमचें प्रेमळपणानें स्वागत केलें. त्यांनीं नवीन बांधलेलें घर दाखविलें. त्यांच्या घराच्या आजूबाजूस मजूर लोकांची रहाण्याची उत्तम सोय केली आहे. जिकडे तिकडे स्वच्छता दिसत होती. हा लोखंडाचा कारखाना म्हणजे एक लहान पण नवीन पद्धतीचें टुमदार गांव वसला आहे असें म्हणण्यास कोणतीही हरकत नाहीं.

कारखाना पाहून आम्ही अकराच्या सुमारास घरीं आलों. स्नान करण्याची व्यवस्था मालकांच्या घरींच होती. तेथें मुली स्नान करून आल्या. स्नान करण्याची खोली स्वतंत्र असून, आंत तीन चार नळ होते. त्या नळांना पाणीही भरपूर होतें. स्नान करून आल्यावर जेवणाचें आमंत्रण आलें. ज्या घरीं आम्ही जेवावयास गेलों तें घर मुद्दाम कारखाना पाहावयास येणाऱ्या मंडळीसाठीं बांधलेलें आहे, असें तेथें लिहून ठेविलेल्या माहितीवरून दिसतें. जेवण फारच उत्तम झालें होतें. वाढणाऱ्या आचाऱ्यांची फारच गडबड झालेली दिसत होती. जेवण झाल्यावर तेथें असलेल्या लहान मुलांबरोबर थोडा वेळ घालविला. नंतर बिऱ्हाडीं आलों. सामान सुमान बांधलें आणि तीन वाजतांची कऱ्हाडला जाणारी गाडी गांठण्याचा विचार केला जातांना पुन्हा मालकांच्या घरीं गेलों. त्यावेळीं मालकीणबाई घरीं नव्हत्या. त्या कोठें गेल्या असें विचारतांच त्या छापखान्यांत गेल्या आहेत असें कळलें. यावेळीं ह्या छापखान्यांत कशाकरितां गेल्या असतील असा जों विचार करीत आहों तों आम्ही छापखान्याजवळ येऊन पोहोंचलों. हा छापखाना सकाळीं पाहिला होता, परंतु त्यावेळीं एक खोली बंद होती. तीच खोली यावेळीं उघडी होती. या खोलींत मालकीणबाई होत्या आणि शिवाय दोन स्त्रिया काम करीत होत्या. त्यांपैकीं एक इंग्लिश व दुसरी मराठी काम करणारी होती. कांहीं स्त्रिया त्या दिवशीं कामावर आल्या नव्हत्या तीन वाजतांना त्या स्त्रियांना आपल्या कामावर यावें लागतें. त्यांच्यावर देखरेख करण्याकरितां स्वतः मालकीणबाई येत असतात असें त्यांच्या सांगण्यावरून कळलें. जगप्रसिद्ध असा जो लोखंडाचा कारखाना त्याच्या मालकीणबाई स्वतः अशीं कामें करतात हें ऐकून

सहज आश्चर्य वाटण्यासारखें आहे. परंतु एक म्हणच आहे कीं, ' उद्योगाचे घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरी ' या म्हणीप्रमाणें किर्लोस्करांच्या घरची शिस्त आहे. प्रत्येक मनुष्य आपआपले उद्योगांत दंग आणि यामुळेंच आज त्यांची कीर्ति या भरत-भूमीमध्यें प्रत्येक ठिकाणीं पसरली आहे. असो.

आम्ही मालकीणबाईंचा निरोप घेऊन स्टेशनवर यावयाला निघालों. येतांना पुन्हा त्या सकाळच्या मुलाला पाहण्यास गेलों आणि त्याचा निरोप घेऊन तीन साडेतीन वाजतां स्टेशनवर येऊन पोहोंचलों. त्या दिवशीं गाडी थोडया उशीरानेंच आली. किर्लोस्करस्टेशनवर गाडी फार वेळ थांबत नाहीं म्हणून आम्ही डब्यावर चढलों. यावेळीं ऊन फारच लागत होतें डबा बहुतेक मोकळा असल्यामुळें आम्हांला फार आनंद झाला होता. चार साडेचारच्या दरम्यान कऱ्हाड स्टेशन आलें. याच स्टेशनवर आम्हांला उतरावयाचें होतें. येथे सुद्धां काच कारखान्याचे मालक ओगले यांच्याकडून आम्हांला नेण्याकरितां मनुष्य आला होता. सर्व सामान एका गाडींत भरून आम्हीं पायींच घरीं गेलों. तारीख २९–३–२५ रोजीं कऱ्हाड गांवीं आमचा प्रवेश झाला. स्टेशनावरून घरीं आलों, ती वेळ संध्याकाळची होती. सूर्य नारायणानें आपलें तीव्र किरण कमी करून, कोमल किरण पाडण्यास सुरवात केली होती. अशा वेळीं आम्हीं बिऱ्हाडीं येऊन पोहोंचलों येथें सुद्धां आमची सर्व व्यवस्था उत्तम ठेवली होती. आम्ही गेल्याबरोबर मालक श्रीयुत ओगले स्वतः पुढें आले. त्यांनीं आम्ही आल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. थोडया वेळानें चहा घेण्याला त्यांच्याच घरीं गेलों. त्यांच्या घरची सर्व मंडळी प्रेमळ असल्यामुळें आमची व त्यांची लौकर ओळख झाली. रात्रींची जेवणाची व्यवस्था मालकांच्या येथेंच होती त्यामुळें आम्हांला कसलीच पंचाईत पडली नाहीं. आम्ही जें साहित्य नेलें होतें तें जसेंच्या तसें परत आणलें. चहा झाल्यावर सूर्यास्ताच्या वेळीं थोडा वेळ बाहेर फिरावयास गेलों व सूर्यास्ताची शोभा पाहून घरीं आलों. थोडा वेळ सर्वांनीं विश्रांति घेतली. इतक्यांत जेवणाचें आमंत्रण आलें. जेवण फारच चांगलें झालें होतें. पाणी पिण्याकरतां जीं भांडीं ठेविलीं होतीं तीं कांचेचींच होतीं. तांब्याचा आकार हुबेहूब सांगलीच्या तांब्यासारखा आहे. तीं भांडीं पाहून बहुतेक मुलींनीं आपण अशी एक जोडी घेणार असा निश्चय केला. रात्रीं दहा अकराच्या सुमारास निद्रादेवीनें आमच्यावर पूर्ण अंमल गाजविला. असो.

ता. ३०।३।२५ रोजीं सकाळीं सहावाजतां आम्ही उठलों. त्यावेळीं कारखान्यां-तील मजूर लोक एकत्र जमून रामदास स्वामींचे श्लोक म्हणत होते. प्रत्येक दिवशीं

कामाला आरंभ करण्याच्या अगोदर हे श्लोक म्हणतात व मग कामाला लागतात. चहापाणी झाल्यावर काचकारखाना पाहावयाचें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें कारखाना पाहाण्यास निघालों. या कारखान्याची माहिती सांगण्याकरितां स्वतः मालक आमच्याबरोबर फिरत होते.

प्रथम आम्हीं चिमण्या तयार करण्याच्या भागाकडे गेलों. तो तेथला सगळा लालभडक व भीति उत्पन्न करणारा देखावा पाहून, प्रत्येक मुलीच्या अंगावर शहारे आले. जिकडे तिकडे पायाखालीं काचा पसरल्या होत्या. पायांत कांहीं घातल्याशिवाय जाण्याची सोय नव्हती. काचेचा रस तयार करण्याच्या मोठमोठ्या भट्ट्या होत्या. त्यांमध्यें काचेचा लालभडक रस दिसत होता. चिमण्या तयार करणारे मजूर तो रस लोखंडाच्या पोकळ नळीवर आपल्याला पाहिजे तेवढा घेत. प्रत्येक वेळीं ते कांहीं मोजून घेत नसत. परंतु सवयीच्या योगानें त्यांना तें प्रमाण साध्य झालें होतें. नळीवर रस घेऊन ती दोनतीन वेळां वांकडी तिकडी केली कीं तो रस लांबट आकाराचा होई. मग तो लांबट आकार चिमणीच्या साच्यांत घालीत आणि धरून तोंडानें त्या नळींतून फुंकीत. रस फुंकतांना या मजुराच्या गालाकडे पाहून फार मौज वाटली. अशा रीतीनें चिमण्या तयार करण्याचें काम भराभर चाललें होतें. याच्या पुढच्या भागांत निरनिराळ्या रंगाच्या नकशीदार बशा तयार करण्याचें काम चाललें होतें. काचचा रस मऊ असतांना किती लवतो हें दाखविण्यासाठीं मुद्दाम एक बशी तयार केली. ती मऊ असतांनाच वाकवली. त्यावेळीं तिचा करंडीसारखा आकार झाला. यावरून काचेच्या निरनिराळ्या वस्तु कशा तयार होतात हें समजलें.

पुढें गेल्यावर पुष्कळ मजूर स्त्रिया पाहाण्यांत आल्या. चिमण्या, ग्लोब, हंड्या वगैरे वस्तु आपण जशा घरीं वापरतों तशा तयार होण्यापूर्वी त्या खडबडीत असतात. तो खडबडीतपणा काढण्याच्या कामावर मजूर स्त्रिया लावतात. पुढच्या भागांत गेलों, त्या ठिकाणीं शोभेकरितां जमिनींत बसविण्याच्या लहान, चौकोनी लाद्या तयार होत होत्या. माती गाळण्याचें काम यंत्राच्या साहाय्यानें होत होतें. गाळलेली माती हाताला प्रति रेशीमच भासत होती. त्या मातीवर यंत्राच्या योगानें दाब बसतांच तो चौकोन पांढरा शुभ्र दिसतो. हें काम पाहून पुढें गेलों. तेथें फुलपात्रें, चिमण्या, ग्लोब, वगैरे गुळगुळीत करण्याचें काम चाललें होतें. जवळच लोखंडी पत्र्यावर घर नंबर, सुस्वागतं, पेठांचीं नांवें वगैरे लिहून पाट्या तयार करण्याचें काम चाललें होतें. ज्याप्रमाणें बिस्किटस् भाजण्याच्या भट्ट्या असतात त्या

प्रमाणेंच ह्या मट्या होत्या. पत्र्यावरील छाप मट्टींत भाजल्याच्या योगानें त्याच्यावर पाऊस पडला तरी उडून जात नाहीं. येथून थोडया अंतरावर विहीर आहे. या विहिरींतील पाणी पंपाच्या योगानें वर आणलें आहे. तें पाणी सांठविण्यासाठीं जवळच दोन मोठ्या टाक्या आहेत. याच टाक्यांतील पाण्याचा उपयोग कारखान्यांत केला जातो. विहिरीजवळच कारखान्याचा एक भाग आहे. त्यांत विकण्याकरितां काचेच्या सर्व वस्तु ठेवल्या होत्या. आमच्यापैकीं बहुतेक मुलींना त्यांतील एखादी तरी वस्तु घ्यावीच असा मोह उत्पन्न झाला, लगेच एक यादी करून काय काय वस्तु पाहिजेत त्या सांगितल्या. त्याप्रमाणें त्यांनीं सर्व वस्तु व्यवस्थित बांधून दिल्या. आम्हीं इतका वेळ जो कारखाना पाहिला, तेवढी जागा काम करण्याला पुरत नाहीं म्हणून याच्या जवळच दुसरी एक मोठी इमारत बांधली आहे. त्या इमारतींत काम करण्याला अजून आरंभ झाला नाहीं. एका ठिकाणीं चिमण्यावर 'ओगले' असें नांव घालण्याचें काम यंत्राच्याच साह्यानें चाललें होतें. हीं कामें फारच जलद होत होतीं.

हा अवाढव्य कारखाना पाहून फार आश्चर्य वाटलें. जिकडे तिकडे काचेच्याच वस्तु दिसत होत्या. हंडया, झुंबरें, फ्लावर पॉट्स, तांब्ये, फुलपात्रें, चिमण्या वगैरे बहुतेक सर्व वस्तु येथें तयार होतात. बांगडया, कपबशा मात्र अद्याप तयार होत नाहींत. परंतु त्या एक दोन वर्षांत तयार करण्याचा विचार आहे असें मालकांनीं सांगितलें. श्री. ओगले यांनीं प्रभाकर नांवाचा जर्मन डिझ्ज्ञच्या तोडीचा कंदील तयार करण्याचा प्रचंड उद्योग आरंभला आहे. कंदिलाचें पेटंट त्यांना मिळालें असून त्याकरितां लागणारी यंत्रसामुग्रीही आणली आहे. येत्या दिवाळीपासून कंदील तयार होण्यास सुरुवात होईल. आपल्या देशांत माल तयार होऊं लागला म्हणजे परदेशी मालाची आयात कमी होईल. हा सर्व कारखाना पाहीपर्यंत नऊ वाजले. याच्यानंतर कऱ्हाड गांव पाहाण्यास टांग्यांतून निघालों. तिकडील टांगेवाले बहुतेक मुसलमान आहेत. कऱ्हाड गांवांत जावयाचें म्हटल्याबरोबर संत सखुबाईची आठवण झाली. जिच्या पुण्याईमुळें भगवान् श्रीकृष्ण स्त्रीवेष धारण करून ज्या गांवीं राहिले होते तो पवित्र गांव आम्हांला पाहावयास मिळणार म्हणून फारच आनंद झाला.

प्रथम आम्ही गांवांत गेल्यावर स्नान करण्याचा विचार केला. कृष्णा व कोयना यांचा प्रीतिसंगम गांवाच्या अगदीं जवळच झाला आहे. या संगमावर स्नान करून जावयाचें असा सर्वांचा विचार ठरला. त्याप्रमाणें फराळाचें साहित्य घेऊन आम्ही नदीवर गेलों. समोरासमोरून कृष्णा व कोयना या दोन नद्या येऊन त्यांचा संगम झाला आहे. संगम झाल्यानंतर यांचें पाणी तिसऱ्याच दिशेनें वाहात जातें.

या संगमाची शोभा अवर्णनीय दिसते. नदीवर कोणी धुणीं धून आहेत, कोणी पोहत आहेत, कोणी स्नान करीत आहेत, असें दिसलें. एकंदरींत गांवच्या लोकांना या नदीचा फार उपयोग होतो, असें तेथील एकंदर देखाव्यावरून दिसतें. आम्हीं सर्वांनीं येथें स्नान केलें. कपडे धुऊन वाळविण्याची चांगली सोय आहे, त्यामुळें थोड्याच वेळांत आमचे कपडे सुकले. नंतर येथेच कृष्णा तटाशीं फराळ केला. तोंपर्यंत अकरा वाजून गेले. सूर्यनारायण जास्त संतप्त होत चालला होता. त्याचा संतप्तपणा सहन करण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं नसल्यामुळें तेथून पाय काढण्याचा आम्हीं विचार केला.

नदीवरून आल्यावर प्रथम आगपेट्यांचा कारखाना पाहाण्यास आम्ही गेलों. आगपेटीचा एकूण एक भाग निरनिराळा कसा तयार होतो तो पाहिला आणि त्यासंबंधीं सर्व माहिती मिळाली. हें सर्व काम यंत्राच्या योगें आपोआप केलें जातें. सगळ्यांत पाहाण्यासारखें काम म्हणजे ज्यावेळीं फास्फरसांत काड्यांचीं टोकें बुडविलीं जातात, त्यावेळीं तो काड्यांच्या टोंकांना बेताचाच लागतो हें होय. येथून पुढें दुसऱ्या मार्गांत गेलों त्या ठिकाणीं तयार केलेल्या पेट्यांमध्यें काड्या भरण्याचें काम चालू होतें. आगपेट्या तयार करण्याचें जें लाकूड आहे, त्या लाकडाचें यंत्राच्या योगानें पातळ कागदाप्रमाणें तुकडे केले जातात. ते तुकडे लांबून पाहिल्यावर प्रति कागदच आहेत असा भास होतो. आगपेट्यांचा कारखाना पाहून झाल्यावर लुगडीं तयार करण्याचा कारखाना पाहावयास गेलों. गांवांतून जातांना मनोरे पाहिले. परंतु ते कांहीं प्रत्यक्ष पाहातां आले नाहींत. कारण या मनोऱ्याच्या डोक्यावर सूर्य नारायणाच्या संतापाचा अतिरेक झाला होता आणि त्यामुळें आम्हांला बिऱ्हाडीं जावयास कधीं मिळेल असें झालें होतें. हे मनोरे पाहाण्यासारखे आहेत असें लांबून पाहिल्यावर सुद्धां समजतें. या गांवांतून जात असतांना स्वच्छतेचा पुष्कळच अभाव भासला.

बारा वाजण्याच्या सुमाराला लुगडीं तयार करण्याच्या कारखान्यांत आलों. येथें सूत गुंडाळण्यापासून तों लुगडीं तयार करीपर्यंत सर्व काम होतें. येथें जीं लुगडीं होतात, तीं बहुतेक सुती असतात असें दिसलें. माग चालवितांना यंत्राचा कसकसा संबंध असतो तें पाहिलें व त्याच्यासंबंधीं सर्व माहिती मालकांनीं सांगितली. टांगे येईपर्यंत येथें आम्हीं थोडा वेळ बसलों. मालकांनीं चहाचा पुष्कळच आग्रह केला, परंतु घरीं जाण्याला उशीर होईल म्हणून त्या भानगडींत आम्ही पडलों नाहीं. येथें टांगे आल्यावर आम्हीं बिऱ्हाडीं निघून आलों. आल्याबरोबर जेवण तयार होतेंच. सर्व मंडळी जेवावयास गेली. जेवणखाण आटोपल्यावर थोडा वेळ मालकांच्या घरीं बसलों. श्रीयुत ओगले हे तळेगांव येथें काचकारखान्यांत

अगदीं सामान्यप्रतीचे कामगार होते. तेथें काम शिकून मग ओगलेवाडी येथें त्यांनीं स्वतंत्र कारखाना काढला. अनेक अडचणींना तोंड देऊन व प्रतिकूल स्थितीला न जुमानतां त्यांनीं आपल्या उद्योगशीलतेनें, सुस्वभावानें व बुद्धिमत्तेनें हा कारखाना ८।९ वर्षांत नांवारूपास आणला. या कारखान्यांत ३०० माणसें काम करीत आहेत व दिवाळीपासून आणखी २०० माणसें जास्त लागतील. या कारखान्यांत मालक व कामगार हा भेद दिसत नाहीं. अस्पृश्य, मराठे, ब्राह्मण सर्व भेदाभेद न बाळगतां एकत्र प्रेमानें काम करीत असतात. मालकांचा व कामगारांचा प्रेमळ संबंध पाहून हा कारखाना नसून एक कुटुंबच आहे असें वाटतें. स्टेशनवर जाण्याची वेळ झाली म्हणून सामानाची आवराआवर करून आम्ही स्टेशनवर आलों. स्टेशनवर बराच वेळ थांबावें लागलें. गाडी आल्यानंतर आम्ही स्त्रियांच्या डब्यांत बसलों. गाडी चालू झाली. यावेळीं दिवस असल्यामुळें सर्व स्टेशनें पाहावयास मिळालीं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे बहुतेक स्टेशनवर पाण्याची असावी तशी सोय नाहीं. कऱ्हाडला जातेवेळीं पुण्याहून थोड्या अंतरावर वणवा पेटलेला पाहिला होता. परंतु पुण्याला येतांना एक वणवा पाहिला तो फारच भयंकर होता. सर्व स्टेशनें येतां येतां आमचें पुणें स्टेशन आलें. तारीख ३०-३-२५ रोजीं रात्रीं अकरा वाजतां पुणें स्टेशनवर आम्हीं पाय ठेवला. कॉलेजमध्यें जाईपर्यंत साडेअकरा झाले. रात्रीच्या जागरणामुळें दुसरे दिवशीं ८ वाजतां वर्गाला गेलों. यावेळीं मिस् नवलकर ह्या लेडी सुपरिंटेंडेंटच होत्या. आम्ही मिस् न्यूलंडच्या कारकीर्दींत गेलों व मिस् नवलकरांच्या कारकीर्दींत आलों. याप्रमाणें आमची ही छोटीशी सफर फार आनंददायक व सुखकर झाली.

प्रवासामुळें पुष्कळ फायदे होतात, असें भूगोल शिकतांना पुष्कळ वेळां ऐकलें होतें. परंतु जेव्हां खरोखरच प्रवास झाला त्यावेळीं प्रवासामुळें किती फायदा होतो हें कळून आलें. प्रयत्नानें सर्व कांहीं साध्य होतें असें या पाहिलेल्या कारखान्यांवरून दिसून आलें. ज्यांनीं आपल्या सतत परिश्रमानें महाराष्ट्राला भूषण आणलें आहे, त्यांची कीर्ति या भरतभूमींत नेहमीं गाजत राहील. किर्लोस्करांचा कारखाना व ओगल्यांचा कारखाना हे महाराष्ट्राचें कर्तृत्व व उद्योगशीलता वाढविण्यास खास कारणीभूत होतील असें वाटतें. तरी ज्यांना ज्यांना म्हणून ऐपत असेल, त्यांनीं हे दोन्ही कारखाने प्रत्यक्ष पाहावयास जावें.

समाप्त.

*मायरिंजन, स्वित्सर्लंड.

ता. २२-८-१९२४.

प्रिय मुलींनों,

या पृथ्वीच्या पाठीवरील अद्भुत व रम्य देखावे पाहून कोणाच्या मनांत आनंद उत्पन्न होणार नाहीं? पर्वताचीं उंच उंच शिखरें, भयंकर व खोल दऱ्या, उंच कड्यांवरून उड्या घेणारे धबधबे, दाट अरण्यें, चित्रविचित्र रंगाचीं फुलें वगैरे सृष्टिसौंदर्य पाहिलें म्हणजे डोळ्यांचें सार्थक झाल्यासारखें वाटतें, व मनाला अत्यंत आनंद होतो. अशा प्रकारच्या सृष्टिसौंदर्यानें नटलेल्या देशांपैकींच स्वित्सर्लंड हा एक देश आहे व या अत्यंत आश्चर्यकारक देशामध्यें हल्लीं मीं प्रवास करीत आहें.

मुलींनों, तुम्ही सर्वजण या वेळीं जर मजबरोबर असतां तर किती मौज झाली असती असें वरचेवर मनांत येतें. जसजशीं जास्त जास्त रमणीय स्थळें मी पाहात आहें, तसतसें त्यांच्या सौंदर्याचें वर्णन करणें किंवा त्यांच्या रम्यत्वाची तुम्हांला पूर्ण कल्पना आणून देणें अशक्य आहे असें वाटतें. या देशांत पर्वत, टेकड्या, गुहा, खिंडी, दऱ्या, ओढे, नद्या, लहान मोठे धबधबे, हिमनद्या व बर्फाच्या गुहा, लहान मोठीं सरोवरें, गहन अरण्यें, चित्रविचित्र फुलें, नेच्या व शेवाळ या वनस्पति यांची जिकडे तिकडे अगदीं गर्दी उडून गेलेली दिसते. कधीं कधीं पर्वत हिरव्या गवतानें व देवदार वृक्षांच्या अरण्यांनीं आच्छादलेले असतात, तर कधींकधीं ते अगदीं उघडे दिसतात व त्यांवरील खडकाचे तुटलेले भयंकर कडे हजारों फूट खोल खालीं गेलेले असतात.

* हें पत्र येऊन वर्ष झालें, परंतु आजपर्यंत तें छापावयाचें तसेंच राहून गेलें. तथापि त्यांतील वर्णन सर्वकालीं लागूं पडण्यासारखें असल्यामुळें आजही तं ताजेंच आहे.

८

आम्ही प्रथम इटालीच्या उत्तर भागांत गेलों. तेथें कोमो व लुगॅनो या सरोवरांच्या भोंवतीं असलेले पर्वत पाहिले, परंतु ते स्वित्सर्लंडमधील पर्वतांच्या मानानें बिचारे गरीब दिसतात. स्वित्सर्लंडमधील पर्वत त्या मानानें अफाट व गंभीर दिसले. स्वित्सर्लंडची हवा अत्यंत थंड आहे. त्यामानानें इटालीची हवा बरीच उष्ण आहे. आम्ही इटालींतन स्वित्सर्लंडमध्यें गेल्याबरोबर दोन्ही देशांतील सृष्टिसौंदर्य, लोक व त्यांचीं घरें यांमध्यें कितीतरी फरक दिसला, व तो पाहून आम्हांला मोठें कौतुक वाटलें. इटालींत कोमो व लुगॅनो या सरोवरांच्या कांठांवर बांधलेलीं घरें किंवा टेकड्यांच्या अंगांना बांधलेले बंगले पाहिले म्हणजे पुण्यास बंडगार्डनच्या रस्त्यावर श्रीमंत पारशी लोकांच्या बंगल्यांची किंवा मुंबईस खंबाला टेकडीवर समुद्राकडे तोंड करून असलेल्या बंगल्यांची आठवण होते. ह्या बंगल्यांना गच्या, शेंकडों खिडक्या व संगमरवरी दगडाचे दिवाणखाने असतात. या गोष्टी पाहिल्या ह्मणजे हवामानाला अनुरूप अशी घरांची रचना केलेली आहे ही गोष्ट पाहाणाराच्या तेव्हांच लक्षांत येते. तेथें जेवढी मिळेल तेवढी हवा पाहिजे असते. उष्ण कटिबंधांतील बहुतेक वनस्पति तेथें उत्पन्न होतात. हिंदुस्तानांत वाढणारीं झाडें व तेथील निरनिराळ्या रंगांचीं फुलें इटालींत कितीतरी पाहावयास सांपडतात. विशेषतः मकेचीं शेतें पाहून आपण हिंदुस्तानांतच आहों असें आम्हांस वाटलें. दाणे चांगले वाळून पक्क झाले म्हणजे इटालींतील लोक मकेची कापणी करितात व नंतर धान्य दळून त्या पिठाची भाकर करून खातात. कोमो सरोवराच्या कांठावर असलेला कार्लोटा नांवाचा महाल पाहण्यास आम्ही गेलों. महायुद्धापूर्वी हा महाल एका जर्मन राजाच्या मालकीचा होता; परंतु युद्धानंतर इटालियन सरकारनें तो जप्त केला, व हल्लीं तो त्या सरकारच्या मालकीचा आहे. या ठिकाणीं अत्यंत सुंदर असा एक बाग आहे. या

बागेंत सरकशीच्या तंबूंतील बाकांप्रमाणें चौफेर तळापासून एकावर एक असे भाग चढवीत बागेची रचना केली आहे, व त्या भागांत निरनिराळीं झाडें लाविलीं आहेत. तळापासून वर चढत जावें तसतसें आफ्रिका, हिंदुस्तान, ऑस्ट्रेलिया व युरोप वगैरे भूभागांतील ह्मणजे जवळ जवळ सर्व पृथ्वीवरील उद्भिज्जसृष्टि दृग्गोचर होते. उदाहरणार्थ केळींचीं, खजुराचीं व नारळाचीं झाडें, ऑस्ट्रेलियांतील नेचाचीं झाडें, युक्यालिप्टस, निरनिराळ्या प्रकारचे निवडुंग व वायपात, बांबूचीं बेटें, सर्व प्रकारचे देवदार वगैरे. यांपैकीं कित्येक झाडें अत्यंत उंच गेलेलीं आहेत.

इटाली व स्वित्सर्लंड या देशांतील लोकांच्या शरिराची ठेवण व त्यांचा वर्ण हीं परस्परांहून भिन्न आहेत. इटालींतील लोक स्वित्सर्लंडांतील लोकांपेक्षां काळसर आहेत. कित्येक तर हिंदुस्तानांतील लोकांइतके काळसर दिसतात. स्त्रिया डोकीला टोपी वगैरे न घालतां बाहेर जातात, व रंगी बेरंगी पोशाक वापरतात. त्यांचे केस भुऱ्या रंगाचे असून केशकलाप मोठा असतो व त्याची रचनाही फारच नीटनेटकी असते. मजूर डोक्यावरून ओझीं नेत नाहींत. ते एका लांबट हाऱ्यांत ओझें घालून तो हारा पाठीस बांधतात. पुरुषही भडक रंगाचे व पट्ट्या पट्ट्याचे शर्टस, तांबड्या रंगाचे 'नेकटाय,' तांबड्या अगर नारिंगी रंगाचे कमरबंद वगैरे चित्रविचित्र पोशाक वापरतात. त्यांच्या टोप्या रंगीबेरंगी असतात. भोंवतालच्या परिस्थितीला साजेल असा त्यांचा पोषाक असतो. स्वित्सर्लंडांतील लोक या लोकांपेक्षां अत्यंत भिन्न आहेत. ते ठेंगू व काटक असून त्यांचा पोशाक जाड व ऊबदार असतो. त्यांचे 'बूट' सुद्धां जाड कातडयाचे असतात. तेथील स्त्रिया रंगीत लोकरीचे पायमोजे, जाड कापडाचे आखूड झगे व लोकरीचीं पट्ट्या पट्ट्याचीं सुंदर कुडतीं वापरतात. इटालींतील स्त्रियांप्रमाणें त्याही डोकीला कांहीं न घालतां बाहेर जातात, परंतु पाऊस पडत असल्यास डोक्याभोंवतीं

लोकरीचे रुमाल बांधतात, अथवा लहान, मऊ व डोक्यांत बसतील अशा टोप्या ( फेल्ट हॅट्स् ) घालतात. स्वित्सर्लंड हा गाईंचा देश आहे असें ह्मटलें तरी चालेल. येथें प्रत्येक घरीं तळमजल्याला गाईचा गोठा असतो. इंग्लंडमधील कांहीं गाई जशा मोठ्या असतात तशा त्या मोठ्या नसतात, परंतु त्या दाट दूध देतात. त्यांच्या गळ्यांत एका विशिष्ट आकाराच्या लोखंडी घंटा बांधलेल्या असतात व त्यांचा नाद मोठा मधुर असतो. स्वित्सर्लंडांतील घरांना ‘ शाले ’ असें म्हणतात. तीं बहुतेक लाकडाचीं बांधलेलीं असतात, व त्या लाकडावर सुंदर नक्षी कोरलेली असते. आम्ही नुकतेंच एक सुंदर ‘ शाले ’ पाहिलें तें तीन मजली होतें. त्यांपैकीं तळमजल्याच्या अर्ध्या भागांत गाईचा गोठा होता, व दुसऱ्या अर्ध्या भागांत सरपण व्यवस्थित रीतीनें रचून ठेवलें होतें. वरील दोन मजले पूर्णपणें लाकडाचे बांधलेले होते. लाकडाच्या भिंती, लाकडाचे दरवाजे, लाकडाच्या खिडक्या, लाकडाचीं अथवा कांचेचीं तावदानें वगैरे सर्व कांहीं लाकडाचें ! कांहीं शालेच्या भिंती लाकडाचे सपाट व वर्तुलाकृति लहान लहान तुकडे एकावर एक पक्के बसवून तयार केलेल्या असतात. बाहेरून या भिंतीकडे पाहिलें असतां त्यांतील ते लाकडाचे तुकडे माशाच्या खवल्याप्रमाणें मोठे चित्ताकर्षक दिसतात, परंतु असल्या या विशिष्ट भिंतीमुळें पावसाळ्यांत आंतील माणसांना पावसापासून कांहीं उपसर्ग होतो कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. बहुतकरून घराच्या आंतील बाजूस सर्व भिंतींना पातळ फळ्यांची तक्तपोशी केलेली असते. कारण उन्हाळ्यांत देखील बर्फाच्छादित डोंगराकडून वाहणारे वारे अंगांत हींव भरेल इतके थंडगार असतात. म्हणून या भिंतींतून हा थंड वारा आंत न येईल अशी त्या लोकांना कांहीं तरी व्यवस्था केलीच पाहिजे. प्रत्येक मजल्याला चौफेर लाकडाचा लहान सज्जा असतो, व तळमजल्याच्या मानानें

दुसरा मजला लहान व दुसऱ्या मजल्याच्या मानानें तिसरा मजला लहान अशी घराची रचना असते. मी येतांना बरोबर या घराचा एक नमुना घेऊन येईन, व त्यावरून तुम्हांला या विलक्षण घराची योग्य कल्पना होईल. असलीं घरें या देशांत सर्वत्र टेकड्याच्या बाजूंना बांधलेलीं दिसतात व प्रत्येक घरापुढें एक लहानसा फुलझाडांचा बगीचा असतो. या देशांत पर्वतप्रदेशांतून उड्या घेणारे ओढे व धबधबे पुष्कळ असल्यामुळें विजेचा पुरवठा अल्प किंमतींत होतो, व त्यामुळें प्रत्येक घरीं विजेचे दिवे असतात. लुगॅनो येथें सरोवराच्या कांठावर दररोज रात्रीं विजेच्या दिव्यांचा लखलखाट असतो, व तो पाहून तेथें नेहमीं बाराही महिने दिवाळीच आहे असें वाटतें. एका शहरांत आम्ही ज्या हॉटेलमध्यें दोन दिवस उतरलों होतों, त्याच्या समोरच धबधबे होते. दररोज रात्रीं त्या ठिकाणीं हिरवा, पिवळा, लाल, किरमिजी वगैरे रंगाच्या विजेच्या दिव्यांचा प्रकाश धबधब्यावर पाडीत असत, तेव्हां तो देखावा अत्यंत चित्रविचित्र व सुंदर दिसत असे.

मुलींनो, फुरका व ग्रिमसेल या पहाडांतून मोटारनें प्रवास करीत असतां मीं जीं रम्य, नयनमनोहर व चित्ताकर्षक स्थळें पाहिलीं त्या सर्वांचें बरोबर शब्दचित्र रेखाटतांना भाषा अपुरी पडते व लेखणी थांबते! त्या देखाव्यांचीं चित्रें मी येतांना घेऊन येणार आहें, व कांहीं चित्रें तुह्मांकडे पाठविलीं आहेत, त्यांवरून या वर्णनाची तुम्हांला थोडी कल्पना येईल. आम्ही एके दिवशीं सकाळीं अंडरमाथ नांवाच्या एका लहानशा खेड्याहून, टपाल नेणाऱ्या एका सरकारी मोटारींत बसून निघालों. साधारणपणें प्रत्येक मोटारींत एकेका बाकावर चार चार प्रमाणें ४० माणसें बसतात. बसण्याची जागा आरामशीर होती. आम्ही निघतांना शक्य तितके ऊबदार कपडे अंगावर घातले होते, कारण त्यावेळीं उष्णतामापकयंत्रांतील पारा ४० अंशावर होता, व उघड्या

मोटरींतून डोंगरावरून प्रवास करणें तर फारच थंडीचें असतें. आम्हीं ' फुरका पास 'च्या तळापासून निघालों. हलके हलके चढाला सुरुवात झाली, व आमची मोटार वळसे घ्यावयास लागली. रस्ते किती सुंदर व व्यवस्थित ठेवलेले होते ! प्रत्येक वळसा घेतांना जास्त जास्त चढ लागे. तळापासून हा रस्ता नागमोडी आकाराचा दिसतो. वळणाचे कोपरे फार पुढें आल्यामुळें व मोटार लांब असल्यामुळें वळसा घेतांना ड्रायव्हरला आपलें कौशल्यच दाखवावें लागे ! गाडी हाकीत असतांना कोणीही ड्रायव्हरशीं बोलावयाचें नाहीं, अशा अर्थाची नोटीस प्रत्येक मोटारमध्यें लावलेली असते. आम्ही जसजसे वर चढूं लागलों, तसतसा भोंवतालचा देखावा जास्त जास्त अफाट व गंभीर दिसूं लागला. सुदैवानें त्यावेळीं ऊन चांगलें खडखडीत पडल्यामुळें आम्हांला चांगली ऊब आली होती. इतक्या उंच प्रदेशावर सुद्धां सूर्य किती प्रखर तापतो हें पाहून आश्चर्य वाटतें. परंतु एकाद्या मेघानें सूर्य आच्छादल्याबरोबर हवेंत एकदम बदल होतो व चागली थंडी वाजूं लागते. दोन तासांत आम्ही ' ग्लेटश ' नांवाच्या एका लहान शहराला येऊन पोहोंचलों. तेथें ' रोन ग्लॅसिअर ' ( हिमनदी ) आहे. जर्मन भाषेंत हिमनदीला ' ग्लेटश ' असें म्हणतात. हिमनदीचीं चित्रें मीं तुम्हांला पाठविलीं आहेत, त्यांमध्यें शेंकडों निरनिराळ्या आकारांचे बर्फाचे खडक जवळ जवळ व एकावर एक असलेले पाहावयास सांपडतील. हे बर्फाचे दगड हिरव्या, जांभळ्या, पांढऱ्या व कांहीं ठिकाणीं मळकट करड्या रंगाचे असतात. ही हिमनदी म्हणजे पर्वताच्या बाजूला असलेलें एक बर्फाचें शेतच आहे असें वाटतें. कधींकधीं ही हिमनदी खालीं सरकते, व ती सरकल्यामुळें घर्षणानें बर्फाच्या खालीं असलेल्या खडकावर मोठमोठे ओरखडे किंवा चर पडतात. खडकांच्या कड्यांवर पडलेले असे चर नेहमीं, विशेषतः एकादी हिमनदी पर्वताच्या खिंडींतून वाहात

असते तेथें, पुष्कळ दृष्टीस पडतात. रोन ग्लॅसिअरच्या तळाशीं एक ओढा असून तो खालीं दरींत वाहात जातो. सूर्याच्या तापानें हिमनदींतील बर्फ वितळून त्यापासून हा ओढा उत्पन्न झाला आहे. वर सांगितलेल्या हिमनदींतील एक प्रचंड बर्फाचें टेकाड पोखरून स्वित्सर्लंडांतील लोकांनीं एक बोगदा तयार केला आहे. आम्ही त्या बोगद्यांतून चालत चालत टेकडीच्या दुसऱ्या बाजूस आलों. बोगदा जणू काय हिरव्या व निळ्या बर्फाचा बनला आहे असें वाटतें, व पारदर्शक बर्फांतून सूर्यप्रकाश बोगद्याचे आंतील बाजूस पडतो. मधून मधून बर्फाचे पांढरे तुकडे स्फटिकाप्रमाणें चमकतात. त्या बर्फाच्या बोगद्यांतून चालत असतांना जो चित्तवेधक व रम्य देखावा दिसला तो मी जन्मांत केंव्हांही विसरणार नाहीं असें वाटतें. तसेंच चित्रविचित्र अशा शेंकडों आकारांच्या बर्फाचे खडक एकांत एक अडकलेले व जिकडे तिकडे त्यांची गर्दीच गर्दी होऊन गेलेली दिसली, तो देखावाही विसरणें शक्य नाहीं. वर सांगितलेली हिमनदी ही 'फुरका पास' च्या माथ्यावर आहे. आम्ही तेथून खालीं दरींत आलों, व तेथें फराळ केल्यावर 'ग्रिमसेल पास' वर जाण्याकरितां दुसऱ्या मोटारींत बसलों.

या पहाडांतील रस्ता फुरका पहाडा प्रमाणेंच नागमोडी आहे; परंतु हा पहाड तितक्या उभ्या चढणीचा नाहीं. दुर्दैवानें गारांचा पाऊस पडण्यास आरंभ झाला, व आमच्या तोंडावर गारांचा असा कांहीं मारा झाला कीं जणूं काय गालावर लहान चाबकाचे तडाखेच बसत आहेत असें वाटलें. मोटारीच्या पुढें असलेली कांचेची फळी पावसानें अंधूक झाल्यामुळें ड्रायव्हरला मोटार फार सावकाश व जपून चालवावी लागली. मोटारीचें छत वर करण्याकरितां आम्ही क्षणभर थांबलों, व पुन्हा मोटार चालू झाली. आतां पावसाचा वर्षाव जोराचा सुरू झाला. त्यामुळें भोंवतालचा देखावा फारसा दिसला नाहीं. एका

तासानें आम्ही 'हँडबेक' नांवाच्या धबधब्याजवळ आलों, व आमची मोटार थांबली. मोटार थांबतांच आम्ही पावसांतच धबधब्याकडे पळत गेलों व पर्वताच्या कड्यावरून गर गर गर फिरत अत्यंत तीव्र वेगानें खालीं येणारा तो पाण्याचा प्रचंड लोंढा पाहून आम्ही अगदीं चकित झालों. कानटाळ्या बसतील एवढी भयंकर त्याची गर्जना होती. धबधब्याचे तळाशीं पाणी घुसळून घुसळून सर्व फेस माजला होता. सायंकाळीं सहा वाजतां आम्ही मायरिंजन गांवीं गेलों. तेथें गेल्यावर आम्ही ताबडतोब गरम पाण्यानें स्नान केलें, व अंगावरील ओले कपडे बदलून चांगले ऊबदार कपडे घातले, तेव्हां आम्हांस समाधान वाटलें. आम्ही उतरलों होतों तें हॉटेल अशा कांहीं सुंदर ठिकाणीं होतें कीं तेथें खिडकींत बसलें असतां समोर धबधबा व पर्वतांचीं बर्फाच्छादित शिखरें चांगलीं दिसत. मायरिंजन हें लहान व अत्यंत सुंदर शहर आहे. या शहरांत जास्त काळ राहावयास सापडलें असतें, तर बरें झालें असतें असें वाटलें. आमच्या हॉटेलाचें नांव 'सॅव्हेज' (रानटी मनुष्य) असें होतें, व त्याची खूण म्हणून 'रेड इंडियनचें' एक डोकें तेथें लावलें होतें. हॉटेलचें नांव व त्याची खूण हीं अशीं विचित्र असण्याचें कारण काय म्हणून आम्हीं हॉटेलच्या मालकास विचारिलें, परंतु 'माझ्या आजोबांनीं हें नांव ठेवलें आहे, व तें तसेंच चालत आलें आहे.' या पलीकडे त्यानें जास्त कांहीं सांगितलें नाहीं. या ठिकाणीं आम्हीं दोन अद्भुत देखावे पाहिले. एक 'आर' नांवाची खिंड व दुसरा 'रायशन बाक' हा धबधबा. 'आर' नदी ही एका पर्वताच्या खडकाळ खिंडींतून वाहात जाते. त्या ठिकाणीं नदीचें पात्र ६०० फूट खोलीवर आहे, व तिचा प्रवाह सरळ नसून कधीं खडकांतून, तर कधीं खडकाच्या बाहेरून असा नागमोडी व वळणावळणानें गेलेला दिसतो. स्वित्सर्लंडांतील लोक सृष्टिसौंदर्याचे व

सृष्टींतील उदात्त व गंभीर देखाव्याचे मोठे भोक्ते आहेत. सबब ही नदी वळणावळणांनीं कसकशी व कोठें वाहात जाते, हें पाहाण्याची त्यांना साहजिक इच्छा झाली. परंतु नदीच्या दोन्ही बाजूंना तुटलेले भयंकर कडे असल्यामुळें कांठावर उभे राहून नदीचा देखावा पाहाणें शक्य नाहीं. करितां स्वित्सर्लंडांतील लोकांनीं कड्याला लागून साधारणपणें मध्यावर ह्मणजे कड्याच्या टोंकापासून ५०० फूट खालीं व तळा-पासून २०० फूट वर असा एक अरुंद लाकडी सज्जा बांधला आहे. या सज्जाला चांगला आधार देण्याकरितां त्याच्या खालीं लोखंडाच्या जाड कांबी घातल्या असून त्या कांबी काळ्या खडकांत पक्क्या बसविलेल्या आहेत. त्यामुळें या गॅलरीला कोणत्याही तऱ्हेचा धोका नाहीं. कित्येक ठिकाणीं नदी खडकांतून वाहात जाते. अशा ठिकाणीं बोगदे खणलेले आहेत, व त्या बोगद्यांत विजेचे दिवे लावलेले आहेत. सज्जा ४००० फूट लांब आहे. आम्ही सज्जावरून चालत गेलों, व तेथून खालचा प्रवाह पाहिला. पाणी जागोजाग उड्या घेत धावत होतें. तितक्या उंचींवरून तो देखावा पाहात असतांना आपण अस्मानांतून पाताळांत डोकावीत आहों कीं काय असा क्षणभर भास झाला. कांहीं ठिकाणीं सज्जा नदीच्या पात्रावर आडवा दोन खडकांमध्यें बांधला आहे, व पुढें तो दुसऱ्या कड्याच्या अंगाला बांधला आहे. हा अद्भुत सज्जा बांधण्याच्या कामांत शिल्पकारानें आपल्या आंगचें अपूर्व कौशल्य दाखविलें आहे. या सज्जावरून चालत चालत आम्ही दुसऱ्या टोंकाला उघड्या जागेंत व चांगलें ऊन पडलें आहे, अशा ठिकाणीं आलों, त्या वेळीं मनाला उल्हास वाटला. तेथें एक लहान व सुंदर बगीचा होता. त्या बगिच्यांत ‘ सिकॅमोर ’ नांवाच्या विस्तीर्ण वृक्षाच्या छायेंत स्वित्सर्लंडमधील एक आंधळा शेतकरी बसलेला होता, व त्याचे शेजारीं वाजविण्याचें एक लांब शिंग

पडलेलें होतें. आम्हीं त्याला तें शिंग वाजविण्यास सांगितलें, व त्यानेंही तें वाजवून त्यांतून कर्णमधुर व करुणरसयुक्त असे सूर काढून दाखविले. तें शिंग पांच फूट लांब होतें, व वाजवीत असतांना जमिनीवर टेकावयाचें त्याचें दुसरें टोंक आकडीसारखें वळलेलें होतें. ह्या आंधळ्या शेतकऱ्याचा एक लहान मुलगा त्याचे जवळ होता, व बापाला कोणीं कांहीं पैसे दिल्यास तो मुलगा ते गोळा करीत असे.

दुपारीं आम्ही 'फ्युनिक्युलर' आगगाडीनें 'रायशन बाक' धबधबा पाहाण्यास गेलों. या आगगाड्या विजेच्या शक्तीनें चालतात व स्वित्सर्लंडांतील लोक पहाडांतील प्रवास या आगगाड्यांनींच विशेष करतात. इतर गाड्या पर्वतप्रदेशांतून वर जात असतांना जागोजाग वळणें घेत घेत वर माथ्यावर जातात, तशा या विजेनें चालणाऱ्या गाड्या जात नाहींत. त्यांचा मार्ग पर्वताच्या पायथ्यापासून सरळ लंब रेषेंत असतो. आगगाडीचे डबे एका रांगेंत व लंब रेषेंत एका मागून एक सर सर धावत डोंगर चढत असतांना त्यांजकडे जर दुरून पाहिलें, तर सुरवंट एका रांगेंत भिंतीवर चढत आहेत असें वाटतें. अशा रीतीनें वर चढतांना गाडीचे डबे रुळांना चिकटून कसे राहातात, व ते रुळावरून घसरून बाजूला कसे पडत नाहींत हें कांहीं समजत नाहीं. अर्थात् या गाड्या इतर गाड्यांप्रमाणें लांब नसतात. त्या अगदीं आखूड असून त्यांना फक्त दोनच डबे असतात. असो. 'रायशन बाक' धबधबा 'हँडबेक' धबधब्याहून अगदीं भिन्न आहे. या धबधब्याचें पाणी फार उंचीवरून खालीं पडतें, व त्यामुळें पाण्याचे तुषारही खूप उंच उडतात. आम्ही या तुषारापासून २०० फूट उंचीवर उभे होतों, तरी पण आपण भिजूं नये याकरितां आम्हांला अंगांत 'ओव्हर कोट' घालावा लागला व डोकीला लोकरीचा रुमाल गुंडाळावा लागला. या वेळीं जल—तुषारांवर सूर्याचें ऊन पडल्यामुळें इंद्रधनुष्यांतील सर्व रंग

दिसत होते, व त्यामुळें पाण्याचे थेंब हे हिरे, माणकें, पाच, इंद्रनील वगैरे रत्नांसारखे चमकत होते. खरोखर त्या रम्य देखाव्याचें किंवा तज्जनित मनोवृत्तीचें काय वर्णन करावें ! दुसरे दिवशीं तें नितान्त रमणीय स्थळ सोडून जातांना आम्हांला खरोखर वाईट वाटलें; परंतु त्याहीपेक्षा सुंदर अशीं स्थळें अद्याप पाहावयाचीं होतीं, म्हणून त्या आशेनें आम्ही पुढें निघालों. परंतु दुर्दैवानें हवेंत बदल झाला, व आकाशांत मेघ जमूं लागले व थोड्या वेळांत झिमझिम पाऊस पडण्यासही आरंभ झाला. ब्रिथेंझ सरोवरांतून जाण्याकरितां आम्ही आगगाडींतून उतरून जेव्हां बोटींत बसलों, तेव्हां आतां लवकरच पूर्वीप्रमाणें आकाश निरभ्र होईल अशी आमची कल्पना होती; परंतु पुढें ती चुकीची ठरली. आकाश निरभ्र असतांना तें जितकें नीलवर्ण दिसतें तितकें नीलवर्ण या ब्रिथेंझ सरोवराचें पाणी दिसतें. अशा त्या प्रशांत जलाशयाकडे पाहात असतांना आकाश कोणतें व पाणी कोणतें असा मनाला किंचित् भ्रम उत्पन्न होतो. परंतु अशा त्या रम्य सरोवरांतून सफर करीत असतांनाच दुर्दैवानें जोराचा पाऊस पडण्यास सुरुवात झाली. थंडी तर इतकी कांहीं सुटली कीं अंगांत हुडहुडीच भरली ! बोटींतून उतरून जेव्हां आम्ही आगगाडींत येऊन बसलों, तेव्हां अंगांत ऊब आली, व बरें वाटलें. गाडी चालू झाल्यावर आम्हांला रस्त्यांत कितीतरी बोगदे लागले. पुढें हलके हलके गाडी पहाडांतून वर चढूं लागली. आम्ही जसजसे वर जाऊं लागलों तसतशी हवा जास्त जास्त विरल व थंड भासूं लागली. भोंवतालचा पर्वतप्रदेश अफाट व जागजागीं उंच सखल असा दिसूं लागला; इतस्ततः शेंकडों लहान मोठे धबधबे भीषण गर्जना करीत खालच्या कड्यावर उड्या घेत होते. कित्येक ठिकाणीं देवदार वृक्षांच्या घनदाट अरण्यांनीं पर्वत आच्छादून टाकले होते; कित्येक ठिकाणीं पर्वत अगदीं उघडे असून त्यांचे सुळके खूप

उंच गेलेले दिसत होते, व पर्वतांचीं बर्फाच्छादित शिखरें आमच्या अगदीं जवळ जवळ येत आहेत असें दिसलें.

असा तो अपूर्व, गंभीर, शांत व रमणीय देखावा पाहातां पाहातांच आमची गाडी 'वेंगन' स्टेशनावर येऊन थडकली. या वेळचा थंडीचा कडाका कांहीं अगदीं विलक्षणच होता! त्यांतून आम्ही ज्या खोलींत उतरलों होतों, ती खोली हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर होती. मग काय विचारतां! आम्ही एकाद्या बर्फाच्या गुहेंतच आहों‌त असें वाटलें. शरीर थंडीनें बधिर होण्याची वेळ आली! आमच्या खोलीच्या मानानें खालच्या मजल्यांतील खोल्या ऊबदार होत्या. कारण त्या खोल्यांच्या सर्व खिडक्या पक्क्या लावून घेतलेल्या होत्या. आम्ही जेवावयाला बसलों होतों तो 'हॉल' चांगला प्रशस्त होता, व तेथें ८० माणसांना बसतां येईल इतक्या खुर्च्या व टेबलें व्यवस्थित रीतीनें मांडलीं होतीं. त्या हॉलमध्यें अतिशय उकडत होतें. जेवत असतांना भोंवतालच्या बंद केलेल्या खिडक्यांच्या काचेच्या तावदानांवर जमलेले द्रवबिंदु स्पष्ट दिसत होते. अशा रीतीनें खिडक्या लावून जेवत बसणें आरोग्यदृष्ट्या बरें नव्हतें; परंतु तेथल्या त्या कडक थंडीपुढें आमचा नाइलाज होता. उलट त्या हॉलमध्यें असतांना अंगात चांगली ऊब आली व बरें वाटलें. स्वित्सर्लंडांतील हॉटेलासंबंधी लक्षांत ठेवण्यासारखी एक विशेष गोष्ट म्हटली म्हणजे, तेथील बिछाने केव्हांही ऊबदार व आल्हादकारक असे असतात ही होय. उशा अतिशय मऊ असतात. अंगावर घ्यावयाचें पांघरूण म्हटलें म्हणजे एक ब्लँकेट व त्याला आंतून जोडलेली एक चादर इतकेंच असतें. परंतु त्यावर सुमारें एक फूट जाडीची पराची दुलई असते. ती दुलई एकाद्या चिमुकल्या टेकडीप्रमाणेंच दिसते. ही दुलई अंगावर घेतल्यावर तिच्या ओझ्याखालीं आपण दडपून तर जाणार नाहीं ना, अशीही शंका ती अंगावर घेतांना मनुष्याला येते.

परंतु अंगावर घेतल्यावर ती पराकाष्ठेची हलकी व विलक्षण ऊबदार आहे असें दिसून येतें व बाहेर थंडीचा कडाका पडलेला असतो, तरी मनुष्य त्या दुलईमुळें सुखानें झोप घेतें.

मुलींनो ' वेंगन ' एथें दिसणाऱ्या अद्भुत देखाव्याचें वर्णन मी आपल्या पुढील पत्रांत करीन. कदाचित् पुढील पत्रांत लिहावयाचें विसरून जाईन म्हणून आतांच एक गोष्ट मुद्दाम सांगून ठेवतें. ती गोष्ट म्हटली ह्मणजे आल्प्स् पर्वतांत दिसणारीं फुलें हीं होय. हीं फुलें बहुतकरून निळ्या व जांभळ्या रंगांचीं असतात. पिवळ्या किंवा गुलाबी रंगांचीं फुलें अगदींच थोडीं दिसतात. फुलांचा तो नीलवर्ण पाहून गगनचुंबित अशा आल्प्स् पर्वतावरील हीं फुलें आकाशाच्या समीप असल्यामुळें, यांनीं त्याचा नीलवर्ण उसना घेतला आहे कीं काय अशी कल्पना मनांत येते.

मुलींनो, वर्णनाच्या भरांत पत्र बरेंच लांबलें, सबब आतां पुरें करतें. वर वर्णन केलेले रम्य देखावे पाहात असतांना मन तल्लीन होऊन किती आनंद होतो, याची पूर्ण कल्पना ते देखावे पाहिल्यावांचून होणार नाहीं. या देशात स्वाभाविक सृष्टिसौंदर्यच पुष्कळ आहे, व त्यांत मनुष्यानें आपल्या बुद्धीनें आणखी भर घातली आहे. ठिकठिकाणचे रम्य व चित्रविचित्र देखावे पाहात असतांना काहीं काळ आपण स्वताला विसरून जातों असें म्हटल्यास यत्किंचितही अतिशयोक्ति होणार नाहीं.

**आर. नवलकर.**

———

# ग्रेट इंडियन पेनिनशुलर रेल्वे.

तारीख १ जुलैपासून जी. आय. पी. रेल्वे सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली आहे. जी. आय. पी. रेल्वे ही हिंदुस्तानमधील पहिली व अत्यंत महत्त्वाची रेल्वे लाईन आहे. मुंबईपासून ठाण्यापर्यंत सुमारें २४ मैलांची रेल्वे लाईन बांधण्याची कल्पना सन १८४३ सालीं इंग्लंडांत पुढें आली, पण सन १८५० सालापर्यंत तिला मूर्तस्वरूप आलें नाहीं. या सालीं जमिनीची पाहाणी पुरी होऊन लाईन बांधण्याची सर्व तयारी झाली व कामाला सुरुवात झाली. तारीख १८ फेब्रुवारी सन १८५२ रोजीं एंजिननें मुंबई तें ठाणेंपर्यंतचा पहिला प्रवास केला. त्या वेळीं लॉर्ड फॉक्लंड हे मुंबईचे गव्हर्नर होते. त्यांचेंच नांव या एंजिनला दिलें होतें. लाइनीवरून एंजिन जातांना पाहाण्याकरितां लाइनीच्या दोन्ही बाजूंला हजारों लोकांची गर्दी जमली होती. लोखंडाच्या रुळावरून एंजिनची प्रचंड स्वारी जोरानें धावतांना पाहून लोकांना अत्यंत आश्चर्य वाटलें व त्यांनीं टाळयांच्या गजरांत त्याचें स्वागत केलें. तारीख १६ एप्रिल सन १८५३ रोजीं वाफेनें चालणारी पहिली आगगाडी मुंबई-पासून ठाण्यास निघाली.

ठाण्यापासून कल्याणपर्यंत लाईन बांधण्याच्या कामाला आधींच सुरुवात झाली होती. हें काम फार कठीण होतें. ठिकठिकाणीं खाड्यांना पूल बांधावे लागले व ठाण्याजवळील डोंगरात एक बोगदाही कोरावा लागला. कल्याणपर्यंत रेल्वे बांधल्यानंतर तिचे नाशिककडे जाणारा व पुण्याकडे जाणारा असे दोन फाटे बांधण्यास सुरुवात झाली. बोरघाटाचें काम आधीं संपलें व सन १८६३ सालीं बोरघाटांतून पुण्यास गाड्या जाऊं लागल्या. सन १८६४ सालीं थळ घाटांतून गाड्या नाशिकला जाऊं

लागल्या. मुंबई ते रायचरची लाईन इ. स. १८६७ सालीं पुरी झाली. पुढें मुंबई ते जबलपूरची लाईन सन १८७० सालीं पुरी झाली आणि त्याच्या पुढच्याच वर्षीं भुसावळ ते नागपूर रस्ता पुरा होऊन गाड्या जाण्यास सुरुवात झाली.

प्रारंभीं रेल्वेची लाईन सिंगल (एकेरी) होती; पण पुढें मालाची नेआण वाढल्यामुळें व उतारूंची संख्या वाढल्यामुळें कंपनीनें मुंबई ते कल्याणपर्यंतचा आपला रस्ता दुहेरी केला. यामुळें पुष्कळ गाड्या जाण्याची सवड झाली व मालाची व माणसांची खोटी होईनाशी झाली. मुंबई ते कल्याण या भागांत हा दुहेरी रस्ताही पुरेनासा झाला. तेव्हां या ३४ मैलांच्या भागांत कंपनीनें आपला रस्ता चोहेरी केला. यानंतर या रेल्वेनें महत्त्वाची केलेली सुधारणा म्हणजे मुंबई ते कल्याण या भागांत जाणाऱ्या गाड्या विजेनें चालविण्याची सोय ही होय.

जी. आय. पी. रेल्वे कंपनी ही इंग्लंडमध्यें सन १८५० सालीं स्थानप झाली. तिचें भांडवल दोन कोट पौंडांचें होतें. कंपनीचा आणि हिंदुस्तानसरकारचा करार असा ठरला होता कीं, ठराविक मुदतीपर्यंत रेल्वे कंपनीच्या ताब्यांत राहावी व त्यानंतर जेव्हां सरकारला वाटेल तेव्हां कंपनीची रेल्वे विकत घेण्याचा हक्क सरकारला असावा. या करारप्रमाणें इ. स. १९०० सालीं सरकारनें ही रेल्वे कंपनीजवळून तीन कोटी अठ्ठेचाळीस लक्ष पौंडांस विकत घेतली, पण ती चालविण्याचें काम आणखी २५ वर्ष कंपनीकडे ठेविलें. यानंतर कंपनी सरकारची नोकर म्हणून व्यवस्था पाहूं लागली. ही २५ वर्षांची मुदत तारीख ३० जून रोजीं संपली व तारीख १ जुलैपासून रेल्वेची व्यवस्था सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली. या वर्षाचे आरंभीं ईस्ट इंडिया रेल्वेही सरकारनें विकत घेतली व तिची व्यवस्था आपल्या हातीं घेतली. अशा रीतीनें निरनिराळ्या रेल्वे

कंपनींच्या कराराच्या मुदती संपल्यानंतर सरकार त्या रेल्वे विकत घेईल व त्यांची व्यवस्थाही आपल्या हातीं घेईल. रेल्वेचा वार्षिक खर्च वजा जातां राहिलेला कोटयवधि रुपयांचा नफा सरकारचे तिजोरींत येईल व सरकारचें उत्पन्न वाढेल.

---

## दहा अंकांचें गाणें.

( लाबाइला-जाईचें फूल माझ्या महादेवाला या चालीवर )

१ लें मूलः—एक दोन
याच्या पुढचे म्हणेल कोण ?

२ रें मूलः—तीन चार.
देवाला शोभे हार

३ रें मूलः—पांच सहा
फुलें फुलत हीं कशीं अहा !

४ थें मूलः—सात आठ
हौद भरत हा कांठोकांठ.

५ वें मूलः—नऊ दहा
तारा चमकति किती पहा.

# मुलांकरितां कविता.

## कोण कसें चालतें ?

पहिली टोळीः—

( पद-चाल साधी. )

डोकीवरतीं एक्या हातीं धरोनियां हारा
झप झप झप झप झप झप माळिणि जाती बाजारा
चालत नसती जणूं धांवती धावत गाताती
कशा माळिणी झप झप झप झप बाजारा: जाती.

दुसरी टोळीः—

( चाल कटावाची )

उशीर झाला पंत निघाले कचेरिला हे जाण्याला
लगबग लगबग लगबग जाती उशीर त्यांना बहु झाला
डोकीवरतीं छत्री धरुनी पाकिट घेउनि बगलेंत
लगबग लगबग लगबग जाती पंत पहा हे कचेरींत

तिसरी टोळीः—

( पद-चाललें भजन किंवा भक्तिग वेणी या चालीवर )

फिराया जाती
ही मित्रमंडळी गंमती
हासत हासत बोलत बोलत
काठी अपुली गरगर फिरवित

मंद मंद ती हळु हळु चालत.
फिराया जाती
ही मित्रमंडळी गमती.

**चवथी टोळीः—**

(पद—धिन्ना धिन्ना धिन्नकना किंवा आज भेटली ताई ही
या चालीवर)

बालमंडळी ही सगळी
खेळामध्यें बघ रमली
फेर धरोनी मौजेनें
मोदें गाती तें गाणें
भंवतीं भंवतीं
गरगर फिरती
नच ते दमतीं
खेळ खेळती ते सगळे
रमविति चित्ताला अपुले

**पांचवी टोळीः—**

(पद-श्रीमंत पतीची राणी, या चालीवर)

ढकलीत गाडि गमतीची
हा थबकत थबकत येई.
भोंवतीं गरगरा पाही
मालाची 'गाणीं' गाई.
हा चिवडेवाला येई
किति थबकत नाहीं घाई.

(चाल बदलून) 'सोलापूरी चिवडा माझा
घातला मसाला ताजा
खाणार खरा तो राजा'
(चाल पूर्वीची) हें गीत गोड हा गाई
हा थबकत थबकत येई.

सहावी टोळीः—

( चाल--कटावाची )

पांच वाजले शाळा सुटली कोलाहल तो बहु झाला
विद्यार्थ्यांचा मेळा सारा सुटुनी बाहेरी आला
गळ्यांत घालुनि हात चालले मौजेनें हे बघ मेळे
चित्त रंगलें गोष्टीमध्यें जाती हळु हळु हे सगळे

सर्व मुलेंः—

बाळमंडळी ही सगळी
खेळामध्यें बघ रमली
फेर धरूनि मौजेनें
मोदें गाती ती गाणें
भंवतीं भंवतीं
गरगर फिरती
नच ते दमती
खेळ खेळती ते सगळे
रमविति चित्ताला अपुले

## प्रार्थना

( पद-बल ज्याचें त्यास तें—या चालीवर )

नमुं तुजला ईश्वरा
वत्सल बहु तूं प्रेमळ जननी
प्रेम सदा तव बालजनीं
नच सीमा त्याजला ॥ १ ॥

॥ नमुं तुजला ॥ ध्रु० ॥

संकटभय नच मानसिं गमतें
धांवत ये जननी हरि तें
धरि दयीं शिशुजना ॥ २ ॥

॥ नमुं तुजला ॥ ध्रु० ॥

उद्यमरत कर बालजनाला
देइ सदा सुविचार मना
तुज करुणा प्रभुवरा ॥ ३ ॥

॥ नमुं तुजला ईश्वरा ॥ ध्रु० ॥

# मला काय वाटतें ?

चाल–फटक्याची

(बिकट वाट वहिवाट–नसावी–या चालीवर)

१ लें मूल.

मला वाटतें पक्षी होउनि उंच उंच मीं वर जावें
आकाशामधिं उंच उडोनी गोड गोड मीं बहु गावें
बागामधल्या उंच तरूंच्या शिखरावरतीं बैसोनी
मधुर फळें तीं यथेच्छ खावीं भीती सारी सोडोनी
खेळ खेळुनी गाणीं गाउनि बागडुनि वनिं बहु मोदें
प्रिय मित्रांच्या संगतींत ते घालावे दिन आनंदें

इतर मुलें:—

(चाल बदलून)

धरुनी तुजला नेतील
कोंडुनि तुजला ठेवतिल
पिंजऱ्यांत तें सुख कैचें
दिवस सदा ते दुःखाचे

(पहिली चाल)

नको नको बा आकाशामधिं उंच उंच तें वर उडणें
मधुर फळें तीं यथेच्छ खाणें वनामधीं तें बागडणें

दुसरें मूल:—

हरण होउनी मला वाटतें दाट तरूंच्या वनांतुनी
सदा फिरावें प्रियमित्रांसह हिरवळ कुरणाचे मधुनी

गवत कोंवळें खावें प्यावें मधुर झऱ्याचें तें पाणी
सुखें निजावें त चे खालीं शय्या पानांची करुनी
सकाळ होतां पुन्हा उठावें प्रियमित्रांचे सह जावें
वनीं उपवनीं खेळ खेळुनी मनास भारी रिझवावें

इतर मुलें:—

( चाल बदलून )

शिकार करण्या तुझी वनीं
येतिल कुत्रे घेवोनी
जीव घेउनी पळशील
थकुनी भारी जाशील

( चाल पहिली )

नको नको तें प्रियमित्रांसह यथेच्छ रानींतुनि
कुरणांतिल तें गवत नको तें मधुर झऱ्याचें पाणि पिणें

तिसरें मूल:—

मला वाटतें फूल होउनी लतेवरी मीं उमलावें
हासत हासत आनंदानें वायूसंगें खेळावें
सुगंध पसरुनि मधुर आपुला जगास साऱ्या सुखवावें
मजे मजेचे रंग दावुनी सौंदर्यानें हसवावें
मधुर मधू तो मधमाशांना देण्यासाठीं जमवावें
गुङ्गुङ् गुङ्गुङ् गुङ्गुङ् गुङ्गुङ् गाणें त्यांचें ऐकुनियां मन रिझवावें

इतर मुलें:—

( चाल बदलून )

तोडुनि तुजला नेतील
गळुनि पाकळ्या पडतील

मराठी ... शाखा ता.......... मासिक शाखा

फेंकुनि तुज मग देतील
कोणि न तुजला पुसतील

( चाल पहिली )

नको नको तें फूल होउनी लतेवरी बहु बागडणें
वायुसंगें नाच नको तो मधमाशांचें तें गाणें

चवथें मूलः—

मुलासारखें सौख्य फुलाला हरणाला नच पक्ष्याला
नको नको तें जिणें फुलाचें पक्ष्याचें तें अपणाला
मित्रमंडळी जमुनी सारी आनंदानें खेळूं या
गाणीं गाउनि गोड गोडशीं मनास अपुल्या रिझवूं या

इतर मुलेंः—

( चाल बदलून )

आज्ञेमध्यें वागुनियां
जननी जनका सुखवूं या
धडे आपुले करोनियां
तोष गुरूला देऊं या

( पहिली चाल )

अपणांवरती प्रेम पित्याचें मातेचें तें बहुत असे
देवदयेची सदा दृष्टि ती उणें बालकां कांहीं नसे.

# मनी मांजरीची गोष्ट.

( लहान मुलांकरितां )

फार जुन्या काळची गोष्ट. त्यावेळीं देवानें हें जग नुकतेंच निर्माण केलें होतें. झाडें झुडपें, पक्षी, पशु निर्माण करून झाल्यावर देवानें मनुष्यांचें पहिलें जोडपें निर्माण केलें. त्यांतल्या पुरुषाचें नांव बुध असें असून स्त्रीचें नांव इला असें होते. हें जोडपें पर्वतांतल्या एका गुहेंत मोठ्या सुखासमाधानानें राही. बुध निबिड जंगलांत शिकार मारून आणी व इला ती शिजवून दोघेंजणही खात असत. त्यांना दुसऱ्या कोणाचीही सोबत नव्हती. त्यांच्याच गुहेपासून थोड्या अंतरावर एका दुसऱ्या गुहेंत एक घोडा, कुत्रा आणि मनी मांजरी एकत्र रहात असत. हीं तिघेंजणही बुधाचा द्वेष करीत. या तिघांचा स्वभाव मात्र भिन्नभिन्न होता. घोडा स्वभावानें दिलदार व मोकळ्या मनाचा होता. मोत्या स्वभावानें तापट असला तरी त्याचा राग केवळ वरवरच असे. एकदां भों भों करील तेवढेंच काय तें; मनांत कांहीं नाहीं. मनीची मात्र तशी गोष्ट नव्हती. ती स्वभावानें बरीचशी आंतल्या गांठीची, स्वतंत्र वृत्तीची व कोणाचें बरें न पाहवणारी अशी होती. ती नेहमीं एकटीच फिरत असे. तिला कोणाचेंही ताबेदार म्हणून रहाणें आवडत नसे.

एके दिवशीं बुधानें हरण मारून आणला. त्याचें कातडें काढून तें त्यानें बसावयास घेतलें आणि इला आंत स्वयंपाकास लागली. तिनें विस्तव पेटवला. तेव्हां तो जाळ अंधारांत दुरून घोड्याच्या, मोत्याच्या आणि मनीच्या नजरेस पडला. तेव्हां घोडा म्हणाला, " आज बुधानें कसला प्रकाश केला आहे ? आम्हांला कांहीं इजा करण्याचा तर त्याचा विचार नाहीं ना ?" मोत्या वस्ताद होता. बुधाच्या गुहेंत शिजणाऱ्या हरिणाच्या मांसाचा त्याला वास येत होता. तो म्हणाला, " वास तर फार चांगला येत आहे. मी काय तें पहावयास जातोंच. मने येतेस तूं ?"

" छे रे बुवा, तो आमचा शत्रु. मी नाहीं, त्याच्याकडे जाणार. मला स्वातंत्र्याची फार आवड आहे. जिथें माझा पुढा तिकडे मुलूख थोडा. "

" बरं जा तर, माझें ऐकत नाहींस ना ? आजपासून तुझ्याशीं गडी फ."

" बरं जा. मी कुठें तुझी पर्वा करत्यें ! "

पण मोत्या गेल्यावर मनी आपल्याशींच विचार करूं लागली. आपलें काय, जिकडे आपला पुढा तिकडे मुलुख थोडा. आपणाला तरी गुहेपर्यंत जाण्यास काय हरकत आहे ? गुहेंत गेलें नाहीं म्हणजे झालें. मोत्या तरी काय करतो तें दडून पाहातां येईल. असें म्हणून ती गुहेकडे निघाली आणि एका झाडाआड दडून राहिली.

मोत्या गुहेकडे गेला तेव्हां इला बाहेर उभी होती. तिचे मोकळे काळे-भोर केस टांचेपर्यंत रुळत होते. मोत्याला पाहातांच ती हसून म्हणाली, " काय मोत्याबा, आज कोणीकडे आपली स्वारी ? "

" आज तुमच्याकडे काय शिजत आहे तें सांगा. त्या वासानें मी इकडे आलों. "

इला हसली. घरांत जाऊन तिनें एक शिजलेला मांसाचा तुकडा आणून मोत्यापुढें टाकला. मोत्यानें तो अधाशासारखा गिळून टाकला.

" आणखी एकादा असला तर द्या ना मला ? "

इतक्यांत बुध आंत जेवीत होता. तो बाहेर आला. तो म्हणाला, " मोत्याबा, तूं आमच्याकडे नोकरीला राहाशील, माझ्याबरोबर शिकारीला येशील आणि रात्रीचा गुहेवर पहारा करशील तर तुला वाटेल तितके हाड-काचे तुकडे व मांस खाण्यास मिळेल. "

" हां, मी राहातों आपल्या नोकरीस," मोत्या तावडतोब कबूल झाला. पण मनीला मात्र फार राग आला. ती मनांत म्हणाली, " हा मूर्खा, शत्रूचा बंदिवान् झालास ना ? " असें म्हणून ती परतली.

दुसऱ्या दिवशीं इलेनें नदीकांठीं उगवलेलें हरळीचें सुंदर रान कापून आणून, तें उन्हांत सुकवून, त्याचे भारे बांधून दारांत ठेवले.

घोड्याला सुंदर वास येऊं लागला. तो मनीला म्हणाला, "काय गे मने, आपला मोत्या कुठें गेला आणि आज बुधाच्या घरांतून काय हा सुंदर वास येत आहे ! मला वाटतें मोत्या तिकडेच असेल. मी जातों तिकडे. येत्येस तूं माझ्याबरोबर ?"

पण मनीनें मोत्याला जें उत्तर दिलें तेंच घोड्याला दिलें. ती म्हणाली, " नाहीं मी यायची. मला काय जरूर ? "

घोडा गुहेकडे जाण्यास निघाला. मनीसुद्धां तो काय करतो, काय बोलतो तें पाहाण्यासाठीं पाठोपाठ निघाली.

घोडा गुहेकडे आला तेव्हां इला बाहेर उभी होती. घोड्याला पाहातांच हंसून ती म्हणाली, " काय अश्वसेन, आज कोणीकडे आपली स्वारी ! "

" आमचा मोत्या तुझ्याकडे आहे काय ? "

" खोटें बोलतां अश्वसेन, तुम्ही मोत्याच्या शोधासाठीं आलां कीं या हरळीच्या भाऱ्यासाठीं आलां ? खरें सांगा. "

चतुर इलेनें हा प्रश्न विचारला; कारण अश्वसेनाची दृष्टि यापूर्वींच त्या मधुर वासानें दारांतल्या कोंवळ्या गवताच्या भाऱ्याकडे लागून राहिली होती. तो हंसून म्हणाला, " खरंच ! तें मला खावयास द्या "

हें पाहा अश्वसेन, तुम्ही जर आपली मान लववाल आणि मी देत्यें ती वस्तु तोंडांत घालाल, तर मी तुम्हांला असलें गवत देईन.

" हं कबूल " घोडा त्या गोष्टीला कबूल झाला, पण मनीला त्याच्या मूर्खपणाबद्दल फार वाईट वाटलें. ती मनांत म्हणाली, " हा मूर्खा, एवढ्याशा गवतासाठीं तूं लगाम घालून घेतलास ? " असें म्हणून ती परतली.

त्या दिवशीं सोबतीस कोणी नसल्यामुळें मनी एका गाईकडे राहावयास गेली. पण काय आश्चर्य ! दुसऱ्या दिवशीं गाय सुद्धां चुकून गुहेच्या बाजूस गेली आणि गवताच्या आशेनें तिनें गळ्यांत दावें बांधून घेतलें. मनीला मोठें आश्चर्यच वाटलें. या सर्वांची स्वातंत्र्यप्रीति नष्ट होण्याचें कारण काय तें तिला कळेना. अशा रीतीनें बरेच दिवस ती एकटीच होती. पण तिला सुद्धां अखेर कंटाळा आला आणि ती सहज एके दिवशीं सुधाच्या गुहेकडे गेली. तिकडे पहात्यें, तो इला गाईचें दूध काढीत होती. गुहेंत विस्तव पेटलेला होता व चुलीवरील गरम दुधाचा वास येत होता. मनीच्या तोंडाला पाणी सुटलें. ती इलेला म्हणाली, "माझ्या मैत्रीण गाईबाईला सोडतां का जरा ? "

इलेला मनीच्या तोऱ्याची माहिती मोत्याकडून कळली होती. ती ठसक्यानें ह्मणाली, " काय मनूबाई, कुठें गेला तुमचा तोरा ? कशाला आलां आमच्याकडे आतां ? तुम्हांला स्वतंत्रपणें वागण्याची आवड आहे ना ? आतां आम्हांला कोणाची गरज नाहीं. मोत्या आहे, घोडा आहे, गाय आहे. आतां कोणाची आम्हांला जरूर नाहीं. नाहीं का हो गाईबाई ? "

उत्तरादाखल गाईनें " हम्मा " एवढेच शब्द काढून आपली कबुली दिली.

मनीला फार वाईट वाटलें. तिला रागही पण आला. पण करते काय बिचारी ? आंतून गरम दुधाचा वास सुटत असल्यामुळें तिच्याही तोंडाला पाणी सुटत होतें. निराशेनें ती शेवटीं म्हणाली, " मग आपण मला गुहेंत नाहींना घेणार ? चुलीजवळ बसावयास नाहीं ना देणार ? गरम गरम दूध पिण्यास नाहीं ना मिळणार ? "

" मनूबाई, तूर्त तुमची आम्हांला जरूरी नाहीं. मग वाटलेंच तर तुम्हांला घेऊं. —"

बिचारी मनी निराश होऊन गेली ती दूर कोठें अरण्यांत गेली. बुधाला आणि इलेला आपली गरज कशास लागणार असेंच तिला वाटत होतें. पण एक वर्ष लोटल्यावर एके दिवशीं वटवाघूळ तिच्याकडे आलें.

" फड्ड फड्ड फड्ड. मनूबाई आज एक मोठी बातमी आणली आहे. "

" कसली ? "

" त्या गुहेंत पूर्वी बुध आणि इलाच राहात होती, पण आतां त्या ठिकाणीं एक तिसरें माणसाचें पिल्लूं आलें आहे. तें किती गोजिरवाणें आहे म्हणून सांगूं! आणि दिसतें जसें काय गुलाबाचें फूल-पण भारी रडकें आहे."

" कां रडतें तें ? "

" त्याला बरोबर खेळावयाला कोणी नाहीं. त्याला किनई हातांत गरम गरम मऊ मऊ असें कांहीं तरी पाहिजे. "

मनीनें तें ऐकल्याबरोबर ती मनांत ह्मणाली, "आतां माझी वेळ आली."

ती तावडतोब गुहेकडे जाण्यास निघाली. पाहातेय तों इला घरांत स्वयंपाक करीत होती व बाहेर मूल रडत होतें. आईनें त्याला उगी राहाण्यासाठीं

सुंदर सुंदर गोटे खेळावयास दिले होते, तरी पण तें उगी राहात नव्हतें. अखेर मनीनें आपला पंजा त्याच्या हातांत दिला तेव्हां तो मऊ मऊ पंजा-कारण मनीनें नखें आंत ओढलीं होतीं-हाताला लागतांच तें मूल हसूं लागलें. आतां मूल रडत होतें तें एकाएकीं हसूं कां लागलें हें पाहाण्यासाठीं इला बाहेर आली. पाहाते तों मनूबाई आपल्या मुलाला खेळवीत आहेत. तेव्हां तिला फार आनंद झाला. तिनें मनूबाईला आपल्या घरांत बोलाविलें, चांगलें आटीव दूध पिण्यास दिलें, दुपारच्या वेळीं व रात्रीं चुलीवर अगर पाठीमागें उबाऱ्याची जागा निजावयास दिली; अशा रीतीनें इलेनें मनूबाईला आपल्याकडे ठेविलें. पण मनूबाई मानी ! ती म्हणाली, "इलाबाई, तुम्ही जरी आतां माझी तब्बेत राखतां आहां, तरी पण पूर्वीं केलेला अपमान मी विसरणार नाहीं. मी छोट्या छबू-बरोबर खेळेन, लोळून लोळून धुळीनें त्याचें अंग मळलें म्हणजे चाटून साफ करीन, तुम्हांला त्रास देणाऱ्या उंदरांचा नाश करीन, पण इतकें झालें तरी इतरांप्रमाणें तुमची बांधलेली राहाणार नाहीं. मी पूर्वींप्रमाणें स्वतंत्रच आहें. जिकडे माझा पुढा तिकडे मुलूख थोडा."

इलेला यावेळीं तिच्या बोलण्याचा राग आला नाहीं. कौतुकच वाटलें. इमानी मोत्या मात्र रागावला.

"पुरे पुरे मनूताई, तुमची स्वातंत्र्यप्रीति. ज्याचें दूध खाणार त्याच्याशीं इमान राखणार नाहीं ?"

त्या दिवसापासून मोत्याचें आणि मनीचें वांकडें पडलें आहे. एकाच घरांत दोन्ही असलीं, तरी एकमेकांवर गुरगुरत असतात. मनूबाईचा स्वभाव आहे तसाच आहे, तिला अद्याप स्वतंत्रपणें वाटेल तिकडे फिरावयास पाहिजे. दिवाणखान्यांतल्या मऊ मऊ कोचावर, स्वैंपाकघरांतील चुलीवर, कोठें एखाद्या झाडाच्या बुंध्याखालीं पाचोळ्यांत, तर कोठें कौलावर वळच-णीच्या जागेंत मनूबाई मनास वाटेल तिकडे पडलेल्या असतात. त्यांचा स्वभावही पूर्वींप्रमाणेंच वक्र आहे. एकाद्या दोन दोन पायांच्या माणसाप्रमाणें त्या देखील महत्त्वाच्या कामांत आडव्या येतात. पण बालमित्रांनो, तुम्हांला

जर कधीं मनूबाई आडवी आली, तर तिला मारूं मात्र नका, अगर तिचें दूध चुकवूं नका.

विविधवृत्त.

[ सर रुडियार्ड किपलिंग यांनीं मुलांकरितां पशुपक्ष्यांसंबंधीं 'Gust of stories' या पुस्तकांत फार सुंदर गोष्टी लिहिल्या आहेत. वरील गोष्ट 'The cat that walked by himself' या गोष्टीचें रूपांतर आहे. लेखकानें मूळचें स्वारस्य जाऊं न देण्याची चांगली खबरदारी घेतली आहे. वरील गोष्ट मुंबईच्या विविधवृत्त नामक साप्ताहिक वृत्तपत्रांतून घेतली आहे– ]

—संपादक.

---

# व्याकरण.

'मुलें जें ज्ञान आपल्या स्वतांच्या प्रयत्नानें मिळवितात तेंच ज्ञान कायमचें टिकतें व त्याचाच उपयोग मुलांना होतो. एकादा नियम शिक्षकानें मुलांना समजावून दिला व त्यांना तो उपयोगांत आणण्याची संधि दिली नाहीं किंवा त्यांना तो उपयोगांत आणतां आला नाहीं, तर शिक्षकाचे श्रम व मुलांचा वेळ फुकट गेला असें होतें. मुलांना स्वतां कृति करण्यांत आनंद वाटतो व स्वप्रयत्नानें ज्ञान मिळविण्याची त्यांना हौस असते, या गोष्टी प्राथमिक शाळेच्या शिक्षकास निरंतर दृष्टीसमोर ठेवाव्या लागतात. 'लहान शाळांतून जेथें शिक्षकाला दोन दोन वर्ग सांभाळावे लागतात तेथें एक वर्ग शिकवीत असतांना दुसऱ्या वर्गाला कसें कामांत गुंतवावें हा त्याच्यापुढें नेहमीं प्रश्न असतो. मुलांना जो भाग आपण शिकवीत असतों त्याच भागासंबंधीं सोपे व मनोरंजक प्रश्न सोडविण्यास दिले, तर मुलांना ते सोडविण्यांत आनंद वाटेल व मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची त्यांना चांगली संधि मिळेल. अशा प्रकारचे प्रश्न शिक्षकानें विचार करून आधींच काढून ठेविलेले असावे. आयत्यावेळीं कांहीं तरी काढलेल्या प्रश्नांचा अर्थातच चांगलासा उपयोग होत नाहीं. हे प्रश्न कसे असावे हें आपण एक उदाहरण घेऊन पाहूं. एका

खेडेगांवांतील शाळेंत एकाच शिक्षकाला दुसरी व चौथी या दोन इयत्तांचे वर्ग शिकवावे लागतात अशी आपण कल्पना करूं. एका तासाला दुसऱ्या इयत्तेचें गणित व चवथ्या इयत्तेचें व्याकरण आहे असें आपण समजूं या तासांत दोन्ही वर्गांचा वेळ फुकट न घालवितां शिक्षकाला मुलांना कसें गुंतवितां येईल हें आपण पाहूं. प्रथमतः दुसऱ्या इयत्तेला दोन तीन उदाहरणें सोडविण्यास देतां येतील. हीं उदाहरणें झालेल्या भागापैकीं असावीं. मुलें हीं उदाहरणें सोडवीत असतांना शिक्षकाला आपलें लक्ष पूर्णपणें चवथ्या इयत्तेकडे देतां येईल. शिक्षकाला या इयत्तेला विशेषणाचा पाठ द्यावयाचा आहे असें आपण समजूं. शहाणा मुलगा, काळा कागद, तांबडें फूल, चपळ खार वगैरे बरींच उदाहरणें घेऊन या उदाहरणांतील मुलगा, कागद, फूल, खार वगैरे शब्द नामें आहेत, पण शहाणा, काळा, तांबडें, चपळ हीं कांहीं नामें नाहींत; कारण तीं कोणत्याही पदार्थांचीं नांवें नाहींत, ही गोष्ट शिक्षकाला प्रश्नद्वारां मुलांकडून काढून घेतां येईल. शहाणा, काळा, तांबडें, चपळ हे शब्द मुलगा, कागद, फूल, खार या नामांविषयीं जास्त माहिती देतात, ही गोष्टही शिक्षकाला मुलांकडून काढून घेतां येईल. नंतर 'कांहीं शब्द नामाबद्दल जास्त माहिती देतात, या शब्दांस जास्त माहिती देणारे शब्द किंवा विशेषण म्हणतात, हें शिक्षकानें मुलांस सांगावें व त्यांजकडून विशेषणाचीं बरींचशीं उदाहरणें काढून घ्यावीं. हा सर्व भाग होईपर्यंत दुसऱ्या इयत्तेचीं उदाहरणें होतील व शिक्षकाला या इयत्तेकडे लक्ष देण्याची पाळी येईल. चवथ्या इयत्तेला यानंतर मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची संधी दिली पाहिजे, म्हणजे मुलांनाही उत्तम व योग्य असा व्यवसाय मिळेल व शिक्षकाला आपलें लक्ष दुसऱ्या वर्गाकडे देतां येईल व त्या इयत्तेचा अभ्यासही चांगला होईल. विशेषणासंबंधानें निरनिराळ्या प्रकारचे प्रश्न ४ थ्या इयत्तेस सोडविण्यास देतां येतील. हे प्रश्न सोडवितांना झालेल्या भागाची उजळणीही व्हावी ही गोष्ट शिक्षकानें लक्षांत ठेविली पाहिजे. हे प्रश्न शिक्षकानें फळ्यावर लिहावे. मुलांनीं प्रश्न सोडविल्यानंतर ते थोड्या वेळांत शिक्षकानें तपासून दिले पाहिजेत. मुलांच्या चुका दाखवून त्या दुरुस्त करून घेतल्या पाहिजेत. मुलांचीं

उत्तरें काळजीपूर्वक तपासण्याच्या कामांत जर शिक्षकांनें आळस केला, तर या प्रश्न सोडविण्याच्या व्यवसायाचा कांहीं उपयोग होणार नाहीं. अशा प्रकारचे कांहीं प्रश्न पुढें दिले आहेत.

### प्रश्न १ ला

रामा गोड आंबा खातो, द्वाड मुलगी शाळेस जात नाहीं. या वाक्यांत गोड व द्वाड हे शब्द रामा व मुलगी या नामांविषयीं जास्त माहिती देतात, म्हणून या शब्दांस विशेषण म्हणतात. पुढील वाक्यांत जेथें फुली दिली आहे तेथील विशेषण गाळिलें आहे, तें विशेषण घालून तुम्ही वाक्यें पुरीं करा.

यमूनें × × गाणें गाइलें.
रामानें × × शाल विकत घेतली.
× × मुलगा नेमानें शाळेस जात नाहीं.
× × मुलगा कोणासही आवडत नाहीं.
× × पाण्यानें अंग भाजतें.
× × आंब्यानें खोकला येतो.
× × औषध मुलांना आवडत नाहीं.
× × मुलगा सर्वांना आवडतो.
× × लेखणीनें लिहितां येत नाहीं

वगैरे वगैरे.

### प्रश्न २ रा.

शहाणा मुलगा, द्वाड मुलगी यांत शहाणा व द्वाड हे शब्द मुलगा व व मुलगी या नामांबद्दल जास्त माहिती देतात, म्हणून त्यांस विशेषण म्हणतात.

एकाच नामाबद्दल पुष्कळ विशेषणें किंवा माहिती देणारे शब्द आपणांला सांगतां येतील. जसें—आंबा या नामाबद्दल गोड, आंबट, कच्चा, पिकला, पिवळा, हिरवा, शेंदरी वगैरे विशेषणें देतां येतील. पुढील नामांचीं जितकीं विशेषणें तुम्हांला देतां येतील तितकीं द्या.

| नाम | विशेषणें |
|---|---|
| रस्ता | |
| घोडा | |
| फूल | |
| नदी | |
| शाई | |
| चहा | |
| पान | |
| केस | |
| कागद | |

## प्रश्न ३-रा.

हिरवा पेरू, सुंदर फूल यांत हिरवा व सुंदर हे शब्द पेरू व फूल या नामांविषयीं जास्त माहिती देतात म्हणून त्यास विशेषण म्हणतात. पुढील गोष्टींत नामाच्या मागील विशेषणें गाळिलीं आहेत तीं तुम्ही भरा.

गंगू सकाळींच उठली. त्यावेळीं पक्षी झाडावर × × गाणें गात होते. फुलांचा × × वास सुटला होता. × × वारा वाहात होता. सूर्याचीं × × किरणें झाडाच्या × × शेंड्यांवर पडलीं होतीं. तें पाहून गंगूला × × आनंद झाला. मग तिनें ×× पाण्यानें तोंड धुतलें. आईनें तिला गाईचें ×× दूध दिलें. ती आपली × × परडी घेऊन बागेंत गेली. तिनें × × × फुलें तोडलीं व परडींत भरलीं. त्या फुलांचा तिनें × × हार गुंफला. तिजवळ दत्तात्रयाची एक × × तजबीर होती. तिला तिनें तो × × × हार घातला.

अशा प्रकारें नाम, सर्वनाम, क्रियापद वगैरेसंबंधीं शिक्षकाला प्रश्न काढतां येतील. झालेल्या विषयाची उजळणी व्हावी व त्याची स्पष्ट कल्पना मुलांना यावी, म्हणून प्रश्नाचे प्रारंभीं नाम, सर्वनाम वगैरे जो भाग आपण घेत आहों त्याची सोपी व्याख्या व उदाहरणेंही द्यावीं.

---

# स्त्री-शिक्षण.

( 'भारतीय महिला विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या पदवीदानसभारंभाचे वेळीं वाचण्याकरितां, सर महादेव चौबळ यांचे विनंतीवरून इंग्लंडमधील माजी शिक्षणमंत्री मि. फिशर यांनीं एक निबंध पाठविला होता, त्यांतील कांहीं भाग 'ज्ञानप्रकाश' वरून खालीं घेतला आहे.'—सं. क. शि. )

## भेदबुद्धि असतां कामा नये.

पृथ्वीवर मनुष्याची वस्ती होऊन सहस्त्रावधि वर्षें लोटलीं. पण समाजशास्त्र हें अद्याप तरुणच आहे. मानवी जीवित सुखकर व्हावें, इतकेंच नव्हे तर निरनिराळे मानव वंश, निरनिराळे वर्ण, निरनिराळे बहुजनसमाज यांचें आयुष्य साधारण बऱ्या स्थितींत जावें अशी स्थिति घडवून आणण्याचे कामीं अद्याप आपणास पुष्कळ शिकावयाचें आहे. मानवजातीच्या अर्ध्या भागास गाढ अज्ञानांत ठेवून दुसऱ्या भागाची प्रगति करणें आपणास शक्य आहे असें समजण्याची चूक आपण केव्हांहि होऊं देतां कामा नये. शिक्षण हें खरोखरच मूल्यवान व उपयुक्त आहे, तर तें सर्वांनाच उपलब्ध करून दिलें पाहिजे हें उघड आहे. पुरुष आणि स्त्री ह्या दोघांना आत्मे आहेत व मेंदूची देणगी आहे, तर त्यांचें पोषण करणारें शिक्षण पतींना द्यावें आणि पत्नींना देऊं नये किंवा भावांच्यावर त्याची खैरात करावी आणि भगिनींना त्याचा संसर्गहि घडूं देऊं नये असें प्रतिपादन करणें केव्हांही सयुक्तिक होणार नाहीं. आत्मोन्नति करण्याचे मार्ग सर्वांना सारखेच मोकळे असले पाहिजेत ही गोष्ट अगदीं सहज समजून येण्यासारखी आहे. असें असूनही मानवी इतिहासांत अर्ध्या मनुष्यजातीस शिक्षणापासून अलिप्त ठेवण्याची चूक अनेक शतकें कायम रहावी हें खरोखरच आश्चर्य होय. कित्येक वेळां अगदीं साध्या गोष्टींकडेहि सर्वांचें दुर्लक्ष कसें होतें याचें हें एक ठळक उदाहरण आहे.

## शिक्षणाचें भिन्न स्वरूप.

पश्चिमेकडील अत्यंत प्रगल्भ मननशील म्हणून जीं राष्ट्रें प्रसिद्ध आहेत त्या राष्ट्रांतही अगदीं परवांपर्यंत स्त्रियांच्या शिक्षणाची हयगय झालेली दिसून

येते. खुद्द इंग्लंडमध्येंही सन १८५० पर्यंत ही स्थिति होती. तेथें स्त्रियांना पुरुषांच्या युनिव्हर्सिटींतून वगळण्यांत येत असे आणि त्यांच्याकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढण्याची कल्पना कोणाच्याही डोक्यांत आली नव्हती. त्या वेळचे स्त्रीशिक्षक अगदीं सामान्य प्रतीचे असत आणि स्त्रियांना मिळणारें शिक्षणही बाताबेताचेंच असे. पण आतां ही सर्व स्थिति बदलून गेलेली आहे. हल्लीं शिक्षणाच्या यच्चयावत् शाखांत मुलींच्या व तरुण स्त्रियांच्या शिक्षणाची इंग्लंडमध्यें उत्कृष्ट तरतूद झाली असल्याचें दिसून येतें. पुरुष आणि स्त्रिया ह्या दोघांनाही एकाच प्रकारचें शिक्षण द्यावें किंवा त्यांचें शिक्षण निरनिराळ्या प्रकारचें असावें ह्याबद्दल मतभेद आहे; पण ह्या दोनही शिक्षणांत कांहीं थोडा फरक असणें जरूर आहे असें माझें मत आहे. तुमच्या युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत स्त्रियांकरितां गृहपरिचर्या शास्त्रासारखे विषय ठेवलेले आहेत ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे.

## शिक्षणाचें खरें कार्य.

आयुष्याबद्दल मनांत वीट आणणें हा शिक्षणाचा हेतु नाहीं. मानवी जातींतील थोर व उदार अंतःकरणाच्या व्यक्तींनीं जें ज्ञान व ज्या मनोवृत्ति निदर्शित करून ठेवल्या आहेत त्यांचे आपण वारस आहों अशी आपली भावना झाली पाहिजे. सर्वसामान्य मनुष्यजातीची जी स्थिति आहे तिच्याबद्दल असमाधान ठेवण्याची किंवा आपल्या बांधवांबद्दल तिरस्कारबुद्धि बाळगण्याची किंवा कला व भौतिकशास्त्रें ह्यांच्या वैभवाचें महत्त्व कमी लेखण्याची आपल्या अंगीं प्रवृत्ति होईल, तर शिक्षणाचा आपल्याला व्हावा तसा फायदा झाला नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. उन्नत गोष्टीबद्दल कौतुक वाटणें ही जी तरुणपणची मुख्य भावना आहे आणि जिच्या योगानें मनुष्याच्या हातून मोठमोठीं कृत्यें होतात, ती भावना ज्या शिक्षणामुळें नष्ट किंवा दुर्बल होते तें खरेंखुरें शिक्षण नव्हे, असेंच आपण समजलें पाहिजे. आयुष्यांत आपणापुढें कित्येक निराशा वाढून ठेवलेल्या असतात व आपणांस कित्येक दुःखें भोगावीं लागतात. पण गतकालीन थोर पुरुषांशीं परिचय संपादन करण्याची, वाङ्मयाच्या आनंदाचा उपभोग घेण्याची व संघटित विचारांचा आस्वाद घेण्याची संधि आपणांस तरुणपणांतच मिळते. आयुष्यक्रमांत येणाऱ्या उच्चनीच स्थितींत आपणांस साहाय्यभूत होणारा ज्ञानसंग्रह

करण्याची हीच वेळ होय. ही संधि आज कित्येक वर्ष पुरुषांना अव्याहत मिळत आहे. ती आज ह्या संस्थेच्या पुरस्कर्त्यांच्या दूरदर्शित्वामुळें हिंदी स्त्रियांना मिळण्याची तरतूद झाली आहे. तिचा तुमच्याकडून उत्तरोत्तर अधिक फायदा घेण्यांत येऊन संस्कृतीचा व प्रगल्भतेचा घरोघर प्रसार होवो व हिंदुस्थानांतील आयुष्यक्रमाचा एकंदर दर्जा उन्नत होवो, अशीच या युनिव्हर्सिटीच्या हितचिंतकांनीं अंतकरणपूर्वक इच्छा बाळगली पाहिजे.

## सत्पात्र शिक्षकांचें महत्त्व.

चांगले शिक्षक तयार करणें हा ह्या विद्यापीठाचा एक हेतु आहे. उपजत अंगस्वभावानेंच चांगले शिक्षक होतात, असें सांगण्यांत येतें; पण अशांची जननसंख्या फारच थोडी आहे, त्यायोगानें बहुजनसमाजाची मागणी पुरी पडणें अर्थातच अशक्य आहे. शिक्षकाच्या धंद्यास उपजत अंगस्वभाव लागतोच; सहनशीलता, सहानुभूति, उत्कृष्ट वाणी, विचाराचा व्यवस्थितपणा हे गुण शिक्षकाच्या अंगीं अवश्य असावे लागतात; ते मनुष्याच्या अंगीं उपजत असले तर चांगलेच; पण ते योग्य शिक्षणानें संपादन करतां येण्यासारखेहि आहेत. कित्येक पुरुष व स्त्रिया चांगल्या सज्ञान व सत्पात्र असतात. पण चांगले बोलतां न आल्यामुळें त्यांना आपल्या विद्यार्थ्यांच्यावर छाप बसवितां येत नाहीं. मीं कित्येक इंग्रज व हिंदी गृहस्थांना उजळणी म्हटल्याप्रमाणें आपलें व्याख्यान भराभर देतांना ऐकलें आहे, पण ह्यामुळें त्यांच्या व्याख्यानाचा कोणासही फायदा होत नाहीं, असें आढळून येतें. त्यांची बोलण्याची त्वरा श्रोत्यांना झेपेनाशी होते. श्रोत्यांच्या मनावर आपले विचार बिंबतील अशा प्रकारें सावकाश व परिणामकारक रीतीनें बोलणें ही एक कला आहे. ती अश्रांत व्यासंगानें व परिशीलनानेंच साध्य होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शिक्षण ही वक्तृत्वाची एक शाखा आहे. तिचें परिशीलन मोठ्या बारकाईनें व मार्मिकपणानें केलें पाहिजे.

या गोष्टींना मी विशेष महत्त्व देतों याचें कारण उघड आहे. स्त्रीशिक्षण यशस्वी होणें ही गोष्ट इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतही शाळेंत स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांच्या गुणांवरच अवलंबून राहाणार. शिक्षक चांगले असतील तर शिक्षण चांगलें होईल, परंतु शिक्षकांना जर परवा नसेल तर शिक्षणही अर्थात् त्याच किंमतीचें होणार! शिक्षणसंस्थांकरितां पाण्यासारखा पैसा

खर्च केला, उत्कृष्ट संघटना केली तरी, अखेर ह्या सर्व सामुग्रीचें योग्य चीज करणें हें सर्वस्वीं शिक्षकांवरच अवलंबून असतें. युनिव्हर्सिटीच्या यशाची ही गुरुकिल्लीच होय. तरुण विद्यार्थ्यांना विद्यादान देण्याच्या कामास ज्यांनीं आपणास वाहून घेतलें आहे त्यांनीं पद्धतशीरपणा व बारीकसारीक गोष्टींचीही उपेक्षा न करण्याचा गुण आपल्या अंगीं आणला पाहिजे. असे शिक्षक निर्माण करणें आपल्या प्रमुख हेतूंपैकीं एक हेतु आहे असेंच विद्यापीठांनीं समजलें पाहिजे.

## शिक्षण व राजकारण.

विद्यापीठावर राजकारणाचा पगडा असणें श्रेयस्कर आहे काय? या प्रश्नाचें उत्तर निश्चितपणें नकारात्मकच देणें जरूर आहे. राजकारणाच्या रोजच्या धुमश्चक्रीपासून विद्यापीठ अलिप्त राखणें अत्यंत आवश्यक आहे; तरी पण सामाजिक व राष्ट्रीय दृष्टचा सर्वांमध्यें मिलाफ असावा असें विद्यापीठाचें धोरण असलें पाहिजे. मनुष्यामनुष्यामध्यें हितसंबंधाच्या योगानें विभाग पडतात. पण न्यायबुद्धीनें सर्व मनुष्यजात निगडित झाली पाहिजे हेंच तत्व युनिव्हर्सिटीनें आपल्या दृष्टीपुढें ठेवणें अत्यंत अवश्य आहे.

# राजा विक्रम.

विक्रम राजाचें नांव आबालवृद्धाचे तोंडीं आज शेंकडों वर्षें या देशाचे सर्व भागांत ऐकूं येत आहे. त्याच्या संबंधाच्या अनेक कथा पुष्कळ पुस्तकांतून दिलेल्या आहेत. हा विक्रमराजा कोण होता व त्यानें कधीं राज्य केलें अशी साहजिक जिज्ञासा या कथा ऐकणारांचे मनांत उत्पन्न होते. विक्रम किंवा विक्रमादित्य ही एक पदवी आहे. ही पदवी पुष्कळ राजांनीं घेतली होती. यामुळें ज्याच्यासंबंधीं आपण अनेक कथा ऐकतों तो राजा कोणता हें निश्चितपणें सांगणें फार कठीण आहे.

शालिवाहन व विक्रम यांच्यासंबंधाची एक दंतकथा महाराष्ट्रांत आज शेंकडों वर्षें प्रचलित आहे. 'उज्जनी येथें विक्रम राजा राज्य करीत होता. त्याला ज्योतिषानें सांगितलें कीं, दक्षिणेंत एक कुंभाराचा मुलगा राजा होईल व तो तुझा पराभव करील. तेव्हां राजानें आपलें सैन्य नर्मदेच्या दक्षिणेकडे असा मुलगा शोधून काढण्यास लावून दिलें. पुढें राजाला कळलें कीं, शालिवाहन नांवाचा एक मुलगा कुंभाराचे एथें आहे. त्याच्या चेहऱ्यावरील खुणांवरून व तळहातावरील रेषांवरून तो सार्वभौम होईल असें दिसतें. तेव्हां हाच आपला भावी शत्रु असें ओळखून राजा विक्रम यानें आपण स्वतां सैन्य घेऊन प्रतिष्ठान नगरीवर स्वारी केली. शालिवाहनाला विक्रम राजा आपणांस धरण्यास येत आहे ही गोष्ट कळली. त्याला मातीचे शिपाई करण्याचा फार नाद असे व त्यांनीं असे पुष्कळ शिपाई केलेले होते. शालिवाहनावर भगवान् शेषाची फार कृपा असे. म्हणून संकटकाळीं त्यानें त्याचें स्मरण केलें. त्याजबरोबर शेष तेथें आला. त्यानें अमृत शिंपडून शालिवाहनाचे मातीचे शिपाई सजीव केले. हे शिपाई घेऊन शालिवाहनानें विक्रमाशीं युद्ध केलें. त्यांत विक्रमाचा पराभव झाला. विक्रम आपलें सैन्य घेऊन नर्मदेकडे चालला व शालिवाहनाचें सैन्य त्याच्यामागें लागलें. विक्रमाचें सैन्य नर्मदा नदी ओलांडून पलीकडे गेलें. शालिवाहनाचे शिपाई विक्रमाच्या सैन्याचे मागोमाग नर्मदेंत शिरले. पण त्यांचीं शरीरें मातीचीं असल्यामुळें तीं पाण्यांत विरघळून गेलीं. मग विक्रमाचे सैन्यानें मागें वळून

शालिवाहनाचा पराभव केला.' अशा प्रकारची ही दंतकथा आहे. प्रत्येक दंतकथेंत सत्याचा थोडा तरी अंश असतो. दुसऱ्या शतकांत बहुतेक अर्धा महाराष्ट्र परकीय शक राजांच्या ताब्यांत गेला होता. त्यांचा पराक्रमी राजा नहपान हा जुन्नर येथें राज्य करीत होता. त्याच्या मृत्यूनंतर शालिवाहन वंशांतील प्रख्यात व पराक्रमी राजा श्री गौतमीपुत्र शातकर्णी यानें शक राजावर स्वारी करून त्याचा उच्छेद केला व पुन्हा सर्व महाराष्ट्र आपल्या ताब्यांत आणला. गौतमीपुत्राचे मागून त्याचा मुलगा श्री वसिष्ठीपुत्र पूलमायी गादीवर बसला. यावेळेस शालिवाहन राजांची हद्द नर्मदेपर्यंत पोहोंचली होती. यावेळीं उज्जनी एथें शकांचा पराकमी राजा रुद्रदामन हा राज्य करीत होता. त्याचें व पूलमायीचें युद्ध होऊन त्यांत पूलमायीचा पराभव झाला. रुद्रदामन हा पूलमायीच्या शौर्यानें प्रसन्न झाला व त्यानें आपली मुलगी पूलमायीला दिली. ही ऐतिहासिक हकीकत वरील दंतकथेला आधार आहे. शकांचा राजा रुद्रदामन हा अत्यंत शूर असे. तो विद्वानांचा पक्षपाती असे व वैदिक धर्माचा अभिमानी असे. तो विक्रम नांवानें प्रसिद्ध असावा असें दंतकथेवरून दिसतें.

गुप्त घराण्यानें उत्तरहिंदुस्तानांत इ. स. ३०८ पासून राज्य करण्यास प्रारंभ केला. या घराण्याचे कारकीर्दींत हिंदुस्तानची फार भरभराट झाली. शास्त्रें, कला, वाङ्मय, धर्मग्रंथ या सर्वांची फार प्रगति झाली. या घराण्यांतील तीन राजांनीं आपणांस विक्रमादित्य ही पदवी घेतली होती. विक्रमादित्य ही पदवी धारण करणारा या घराण्यांतील पहिला राजा समुद्रगुप्त होय. यानें इ. स. ३३० पासून इ. स. ३७५ पर्यंत राज्य केलें. या राजानें आपल्या राज्याची हद्द हुगळीपासून चंबळा नदीपर्यंत व उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस नर्मदेपर्यंत वाढविली. त्यानें एक मोठें सैन्य घेऊन ओरिसा प्रांतांतून मद्रासपर्यंत व तेथून पूर्वेकडे वळून म्हैसूरपर्यंत स्वारी केली. नंतर तो उत्तरेकडे वळला. कर्नाटक व महाराष्ट्र येथील राजांचा पराभव करून त्यांना त्यानें आपलें स्वामित्व कबूल करण्यास भाग पाडलें. या सर्व राजांजवळून खंडणी घेऊन त्यानें एक मोठा अश्वमेध यज्ञ केला. या यज्ञाला शेंकडों मांडलिक राजे जमले होते. हा राजा युद्धकलेंत इतका हुषार व साहसी असे कीं, त्याला सध्यांच्या इतिहासकारांनीं नेपोलियनची उपमा

दिली आहे. तो जसा शूर असे तसाच विद्वान् व कलाभिज्ञ असे. त्याच्या पदरीं पुष्कळ विद्वान् पंडित होते.

समुद्रगुप्ताचा मुलगा चंद्रगुप्त हा बापापेक्षां कांकणभर सरसच होता. माळवा प्रांत सुमारें ४०० वर्षे शक राजांच्या ताब्यांत होता. चंद्रगुप्तानें शक राजाचा पराभव करून माळवा प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. गुजराथ, कच्छ, सिंध हे प्रांतही त्यानें जिंकले. अशा प्रकारें सर्व उत्तरहिंदुस्तान त्याच्या ताब्यांत आलें. या राजानें ३८ वर्षे राज्य केलें. आपल्या बापाची राजधानी पाटलीपुत्र ही सोडून हा उज्जनी एथें राहूं लागला.

आपल्या बापापेक्षां हा विद्वानांचा जास्त पक्षपाती होता. याच्या दरबारीं विद्वान ग्रंथकार, कवि, शास्त्रज्ञ, शिल्पकला जाणणारे लोक यांना नेहमीं आश्रय मिळत असे. संस्कृत कवि कालिदास या राजाचे पदरीं होता असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे. यानें शक राजाचा पराभव केला म्हणून त्याला शकारि म्हणत.

चंद्रगुप्ताचा मुलगा कुमारगुप्त व त्याचा मुलगा स्कंदगुप्त, हेही आपणांस विक्रमादित्य म्हणवीत असत. हे दोघेही पराक्रमी व विद्वानांचे पक्षपाती असत. पण यांच्याच कारकीर्दींत रानटी हूण लोकांच्या स्वाऱ्या या देशांत होऊं लागल्या. यामुळें हा देश त्रस्त झाला. कुमारगुप्ताच्या मृत्यूनंतर स्कंदगुप्ताच्या कारकीर्दींत हूण लोक देशांत शिरले. पंजाब, काश्मीर, दिल्ली, मथुरा एथपर्यंत या रानटी लोकांनीं मुलूख लुटला. हिंदु देवालयें व बुद्ध लोकांचे विहार व जैन मंदिरें त्यांनीं लुटलीं व जाळिलीं. मूर्ति फोडून टाकिल्या व ग्रंथ जाळून टाकिले. हे लोक शहरें व गांवें लुटीत व नंतर त्यांना आग लावून देत. ते स्त्रिया व मुली यांना पकडून नेत. यांची संख्या टोळधाडीप्रमाणें असल्यामुळें हिंदुस्तानांतील राजे लोकांना त्यांना प्रतिबंध करितां येईना. या हूणांचा राजा मिहिरगुल यानीं जीं अमानुष कृत्यें केलीं त्यांजवरून हिंदु, बौद्ध व जैन ग्रंथांत त्याला राक्षसाची उपमा दिली आहे. सुमारें १०० वर्षें हूण लोकांचा उत्तरहिंदुस्तानांत धुमाकूळ चालला होता. या कालांत लोकांची स्थिति फार खालावली, व्यापारधंदा बसला, जीवित व संपत्ति यांची शाश्वती राहिली नाहीं. शास्त्रें, कला, विद्या यांची

पिछेहाट झाली. परमेश्वर आपणांवर कोपला व जग बुडण्याची पाळी आली आहे असें सर्वांस वाटूं लागलें. यावेळीं हिंदुस्तानचें रक्षण करण्यास एक शूर राजा पुढें सरसावला. हा राजा यशोधर्मन् होय.

यशोधर्मन् हा माळव्याचा राजा होता. त्यानें हिंदु राजांचा एक संघ निर्माण केला व सर्वांचीं सैन्यें एकत्र करून हूणांचा पराभव केला. या पराभवानें हुणांची सत्ता पार नाहींशी झाली. देशांत पुनः स्वस्थता व शांति नांदूं लागली. ईश्वरानें आपलें गाऱ्हाणें ऐकलें असें सर्वांस वाटलें. शतकाच्या दुःखानंतर देशांत आनंद व सौख्य हीं पुन्हा नांदूं लागलीं. यशोधर्मन् राजाचें यश व पराक्रम यांचें वर्णन कृतज्ञता-बुद्धीनें सर्वजण करूं लागले. यशोधर्मन यानें उज्जनी ही आपली राजधानी केली. विद्या, कला, शास्त्रें यांना उत्तेजन दिलें. आपल्या दरबारीं कवि, शास्त्रज्ञ, शिल्पकार यांना आश्रय दिला. यशोधर्मन् यानें विक्रमादित्य ही पदवी धारण केली. तो या पदवीला सर्वस्वीं योग्य होता. शकारी (शक किंवा हूण लोकांचा शत्रू) म्हणून विक्रमाची जी स्तुति गायली आहे ती याच राजाची होय. या राजाचे हिंदुस्थानावर व हिंदु धर्मावर अगणित उपकार आहेत. व ते लोक कधींही विसरणार नाहींत. प्रेमानें अनेक वर्षें ज्या विक्रमाचे लोक गुणवर्णन करीत आहेत तो हाच विक्रम असावा.

रुद्रदामन्, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त, कुमारगुप्त, स्कंदगुप्त, यशोधर्मन हे सर्व विक्रम या नांवानें प्रसिद्ध होते व ते उज्जयनीसच राज्य करीत होते.

दक्षिणेकडील चालुक्य राजांशिवाय इतर राजांनीं विक्रम ही पदवी कधींही धारण केली नाहीं. चालुक्य राजांपैकीं ज्या तीन चार राजांनीं ही पदवी धारण केली ते राजे फारसे पराक्रमी नव्हते. उज्जनी एथील विक्रमांशीं तुलना केली असतां दक्षिणेकडील विक्रम राजे फार कमी दर्जाचे वाटतात. खरोखरी ज्यांना विक्रम ही पदवी धारण करण्याची योग्यता होती त्या दक्षिणेंतील पूलकेशी, ध्रुव, कृष्ण, गोविंद, भिल्लम वगैरे राजांनीं त्या पदवीची केव्हांच अपेक्षा केली नाहीं.

# पोंच व अभिप्राय.

**हिंदुस्तानच्या राज्यव्यवस्थेचा तक्ता:**—या तक्त्यांत राज्यव्यवस्थेची थोडक्यांत माहिती दिली आहे. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना उजळणीचे कामीं या तक्त्यांचा उपयोग होईल. शुद्धलेखनाच्या चुका पुष्कळ ठिकाणीं राहिल्या आहेत. हाऊस ऑफ कॉमन्सची जास्तींत जास्त मुदत ५ वर्षांची आहे ७ वर्षांची नाहीं. पार्लमेंटमधील युनिऑनिस्ट या प्रमुख पक्षाचा उल्लेख केलेला नाहीं. प्रांतिक सरकारची खुलासेवार माहिती दिली असतां तिचा फार उपयोग होईल.—लेखक रा. कृ. के. पतके—जळगांव ट्रेनिंग स्कूल—किंमत दीड आणा.

**मनोरंजन:**—मराठी भाषेंतील या लोकप्रिय मासिकाला या जुलैपासून ३१ वें वर्ष लागलें. या वर्षापासून रा. वसंत नारायण नाईक या प्रसिद्ध लेखकाकडे या मासिकाचें संपादकाचें काम सोंपविलें आहे. उत्तम छापखाना, चांगली व्यवस्था व विद्वान् संपादक या त्रिवेणी संगमाचे योगानें मनोरंजनाचें अंतरंग व बहिरंग अधिक आकर्षक होऊन या मासिकाच्या कीर्तींत जास्त भर पडेल अशी आम्हांस सबळ आशा आहे.

**मुलांची औद्योगिक करमणूक**—लेखक रा. नरसो गणेश वाडदेकर. या पुस्तकांत अम्ल व अल्क कसे ओळखावे, साबण कसा करावा, कल्हई कशी बसते, नवसागर कसा होतो व त्याचे कोणते धर्म असतात, गंधाचे रवे कसे करितात वगैरे गोष्टीसंबंधानें अगदीं सोप्या भाषेंत व मनोरंजक रीतीनें माहिती दिलेली आहे. अशा तऱ्हेच्या पुस्तकाची मराठींत फार वाण आहे. अशीं पुस्तकें जितकीं जास्त निघतील तितकीं पाहिजे आहेत. अशा पुस्तकांचें योगानें मुलांची करमणूक करून उद्योगधंद्याची आवड त्यांचे मनांत उत्पन्न करतां येईल. हें पुस्तक आनंदकर्त्यानें पुरवणी म्हणून आपल्या बालवाचकांस बक्षीस एप्रिल महिन्यांत दिलें.

***मेघदूतावरून कालिदासाविषयीं**—लेखक रा. मुकुंद कृष्ण मोडक, बी. ए. कवि कुलगुरु कालिदास यांनीं आपल्या मेघदूत काव्यांत स्वतांचेंच

चरित्र लिहिलें आहे, ही गोष्ट त्या काव्यावरून दाखविण्याचा लेखकानें प्रयत्न केला आहे. 'कालिदास हा काश्मीरच्या राजाच्या पदरीं होता. प्रौढ वयांत त्यानें विवाह केला; या नूतन वधूच्या सुखकर सहवासांत कालिदास गढून गेला व राजानें आपल्या कुलवर्णनाचें काव्य रचण्याची त्याजवर सोंप-विलेली कामगिरी त्याचे हातून तडीस गेली नाहीं. त्यामुळें राजानें रागावून त्याला हद्दपारीची शिक्षा दिली. कालिदास शिक्षा भोगीत असतांना आपल्या पत्नीच्या वियोगामुळें होणारी स्थिति व आपल्या पत्नीची दुःखद अवस्था हीं एका रमणीय काव्यांत वर्णन करून तें काव्य त्यानें राजाकडे धाडलें तेव्हां राजाची मर्जी कवीवर प्रसन्न होऊन त्यानें त्याला परत दरबारांत बोलाविलें.' इत्यादि अनुमानें लेखकानें मेघदूत या काव्यावरून काढिलीं आहेत. वाचकाला हीं अनुमानें न पटलीं, तरी लेखकाची विचारसरणी मनोरंजक वाटते. हा छोटा निबंध वाचनीय आहे. किं. ३ आणे. लेख-काचा पत्ता १५४ मगनबाग डिलाइल रोड, लोअर परळ, मुंबई.

X शिवकालीन ऐतिहासिक रत्नें—लेखक व प्रकाशक दत्तात्रय बळ-वंत माणकीकर नवीन मराठी शाळा पुणें. किं. १॥ आणा. या पुस्तकांत शिवछत्रपतीला राज्याभिषेक करणारा विद्वान् पंडित गागाभट्ट याचेसंबंधानें एक हास्यास्पद व पोरकट गोष्ट दिली आहे. तिच्या योगानें गागाभट्ट हा एक विचित्र वेडापीर होता अशी ठाम समजूत बालवाचकांची होईल. दुसरी गोष्ट शंभुराव काटकर यांच्यासंबंधाची आहे. या गोष्टीला शेंडा व मूळ हीं मुळींच नाहींत. अशा गोष्टींना ऐतिहासिक गोष्टी हें नांवच मुळीं शोभत नाहीं.

वरील पुस्तकें धाडणारांचे आम्ही फार आभारी आहों.

---

—मागील वर्षाप्रमाणें याही वर्षीं पुणें एथील टिळक महाविद्यालयांत स्वदेशी वस्तूंचें प्रदर्शन तारीख २१ आगस्टपासून उघडणार आहे व तें सुमारें एक महिना उघडें राहणार आहे.

---

# मुलींच्या देशभाषेंतील शेवटल्या ( व्हरनॅक्युलर फायनल ) परीक्षेकरितां गायनाचा अभ्यासक्रम.

## १९२५. ( ऐच्छिक विषय ).

७५. आठवें सदर—गायन—याचा अभ्यासक्रम पुढें लिहिल्याप्रमाणें:—

( १ ) गायनांतील स्वर:—

खालीं लिहिलेले बारा स्वर ओळखणें व कंठांतून काढून दाखविणें आणि पांच स्वरपाठ गाणें.

| स्वराचें नांव. | कंपनांची सापेक्ष संख्या. |
|---|---|
| षड्ज | २४० |
| कोमल ऋषभ | २५६ |
| तीव्र ऋषभ | २७० |
| कोमल गांधार | २८८ |
| तीव्र गांधार | ३०० |
| कोमल मध्यम | ३२० |
| तीव्र मध्यम | ३३७॥ |
| पंचम | ३६० |
| कोमल धैवत | ३८४ |
| तीव्र धैवत | ४०५ |
| कोमल निषाद | ४३२ |
| तीव्र निषाद | ४५० |
| षड्ज | ४८० |

( २ ) ताल.

१ पुढील ताल ओळखणें आणि ताल वाजवून, काल सोडून व तोंडानें मात्रा मोजून ते ताल धरून दाखविणें:—केरवा, दादरा, रूपक, विलंबित केरवा, झपताल, चौताल व त्रिताल.

२· विलंबित, मध्य व द्रुत यांतील कोणत्याही लयींत चीज गात असतां वरीलपैकीं कोणते तरी दोन ताल धरून दाखविणें.

( ३ ) राग.

१ दोन प्रकारचे जिल्हा राग धरून कोणत्याही सात रागांचीं लक्षणें सांगणें—म्हणजे त्यांचे आरोही व अवरोही स्वर आणि वादी, संवादी व अनुवादी स्वर सांगणें.

२ कोणत्याही तीन रागांचा स्वरावर्त ताल धरून गाणें.

शाळा खात्याच्या क्रमिक पुस्तकांतील कविता व राष्ट्रगीत ताल, राग वगैरेंस अनुसरून गाणें.

४ वरील कवितांतील कोणत्याही दोन कविता तालाकडे योग्य लक्ष पुरवून रा. आचरेकर, गायनशिक्षक ट्रे. कॉ. फॉर मेन पुणें, यांचे स्वरताललिपींत लिहून दाखविणें.

५ सतार, दिलरुबा, किंवा स्वयंभू स्वरांचा हिंदी हार्मोनियम यावर खालीलपैकीं वाजवून दाखविणें:—

( अ ) वरीलपैकीं एक स्वरावर्त.
( ब ) एक पद.
( क ) एक वृत्त.
( ड ) राष्ट्रगीत.

पुणें, ता. १० जुलै १९१४

वि. वि. साठये.
एज्यु. इन्स्पेक्टर, मध्यभाग,
यांकरितां.

# सरकारी जाहिरात.

## मराठींतून आणि उर्दूतून होणाऱ्या मुलींच्या देशभाषेंतील शेवटल्या ( व्हर्नाक्युलर फायनल ) परीक्षेचा कार्यक्रम.

## सन १९२५.

| तारीख. | स्टँडर्ड टाईम. पासून ता. मि. | पर्यंत. ता. मि. | विषय. | गुण. |
|---|---|---|---|---|
| मंगळवार–६–१०–२५ | १०– ० | ११– ० | परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांचीं नांवें नोंदणें. | |
| ,, ,, | ११–३० | २–३० | देशभाषा [पहिलें सदर (ब) आणि (क) ] गद्य, पद्य आणि व्याकरण | (ब) ४५, (क) ३० |
| ,, ,, | ३– ० | ५– ० | निबंध आणि अक्षर [दुसरें सदर (अ)] शुद्धलेखन [दुसरें सदर (ब)] | (अ) ६०, (ब) १५ |
| बुधवार–७–१०–२५ | ११– ० | २– ० | अंकगणित व जमाखर्च [ तिसरें सदर (अ) आणि (ब) ] ,, ,, | (अ) ८०, (ब) २० |
| ,, ,, | ३– ० | ५– ० | भूगोल [ चौथें सदर ] ,, ,, ,, ,, ,, | ७५ |
| गुरुवार–८–१०–२५ | ११– ० | १– ० | आरोग्यशास्त्र [ सहावें सदर ] ,, ,, ,, ,, | ७५ |
| ,, ,, | २– ० | ४– ० | ऐच्छिक विषय, इतिहास [ पांचवें सदर ] ,, ,, ,, | ७५ |
| शुक्रवार–९–१०–२५ | २– ० | ५ ० | शिवणकाम [ सातवें सदर (अ), (ब) व (क) ] ,, ,, | १०० |
| शनिवार–१०–१०–२५ | १०– ० | १२– ० | ऐच्छिक विषय [ आठवें सदर ] गायन ,, ,, ,, | ७५ |
| ,, ,, | १२–३० | २–३० | सदर सदर सृष्टिनिरीक्षण ,, ,, ,, | ७५ |
| ,, ,, | ३– ० | ५– ० | ,, ,, चित्रकला ,, ,, ,, | ७५ |

**सूचनाः**—वाचन व कविता म्हणणें [ पहिलें सदर (अ) ] गुण ३० व मोडी हस्तलेख वाचणें [ पहिलें सदर (ड) ] गुण २० यांची परीक्षा वरील परीक्षेच्या वेळांतच घेतली जाईल.

**वि. वि. साठये.**
एज्यु. इन्स्पेक्टर, मध्यभाग, यांकरितां.

# पुस्तकांचें नवीन दुकान.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें मिळतात. स्त्रियांना उपयुक्त अशीं गाण्यांचीं, कहाण्यांचीं व गोष्टींचीं पुस्तकें आम्ही ठेवितों. आमच्या व्यवहाराबद्दल विद्वानांनीं उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत. व्यापारी व शाळामास्तर यांस भरपूर कमिशन दिलें जातें.

ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स,
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,
बुधवार पेठ, पुणें शहर.

# कन्याशिक्षक.

वर्ष ११ वें. जुलै ते सप्टेंबर १९२५ अंक ५ ते ७

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी
सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें,
यांनी पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हां. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत ९ आणे.

१ दिसेंबर सन १९२५ १९२५.

# अनुक्रमणिका.


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ परलोकवासी डॉ. भांडारकर. ... | | ... | १०३–११४ |
| २ मुलांकरितां कविता | ... | ... | |
| टाळ्या व चुटक्या | ... | ... | ११५ |
| चेंडू ... | ... | ... | ११६ |
| कोण काय बोलतो | ... | ... | ११७–११७ |
| हरवलेली बाहुली | ... | ... | ११७–११८ |
| ३ शिशुवर्गाकरितां धडे | ... | ... | |
| बाबांचा बाजार | ... | ... | ११९–२० |
| हिरवा गार पोपट | ... | ... | १२१–१२२ |
| ४ प्रभात ( कविता ) | ... | ... | १२३–१२४ |
| ५ तीन बहिणी ( गोष्ट ) | ... | ... | १२५–१२९ |
| ६ इजिप्त व सौडन | ... | ... | १३०–१३४ |
| ७ टिल्लू ( गोष्ट ) | ... | ... | १३५–१३९ |
| ८ स्वित्सर्लंडांतील देखावे | ... | ... | १३९–१४७ |
| ९ कासवाचें शौर्य | ... | ... | १४८–१५२ |
| १० कीटकांचा विशिष्ट वर्ग* | ... | ... | १५२–१५५ |
| ११ कीटकांची शरीररचना | ... | ... | १५५–१६० |
| १२ पेट्रोलियम अगर रॉक ऑईल तेल | | ... | १६०– ६५ |
| १३ सूर्य हाच उत्तम वैद्य | ... | ... | १६६ |
| १४ पुस्तक-परीक्षा | ... | ... | १६७–१६८ |
| १५ प्रचंड विमानें | ... | ... | १६८ |
| १६ चलच्चित्रपटांचे साहाय्यानें शिक्षण | | ... | १६९–१७० |
| १७ बालजिज्ञासा ( कविता ) | ... | ... | १७१ १७२ |
| १८ वर्तमानसार ... | ... | ... | १७२–१७३ |
| १९ परीक्षांचा निकाल | ... | ... | १७४–१७६ |


*ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेनच्या कन्याशिक्षक मंडळास शेतकी कॉलेजचे शिक्षक, प्रोफेसर देशपांडे यांनीं कीटकांसंबंधीं कांहीं व्याख्यानें गेल्या आगष्ट महिन्यांत दिलीं. तीं व्याख्यानें शिक्षकांस व विद्यार्थिनींना फार सोपीं, उपयुक्त व मनोरंजक वाटलीं. पुस्तकरूपानें हीं व्याख्यानें छापल्यास तें पुस्तक फार उपयुक्त होईल असें वाटून तसें करण्याविषयीं कन्याशिक्षक मंडळानें प्रो. देशपांडे यांस विनंती केली. त्याप्रमाणें त्यांनीं हीं व्याख्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं. त्यांतील हें पहिलें व्याख्यान घेतलें आहे. सदर पुस्तक शिक्षकांनीं अवश्य वाचण्याजोगें आहे. किं. ८ आणे. पुणें नवा कितावखाना एथें तें मिळेल. संपादक.



परलोकवासी डॉक्टर भांडारकर.

ग्रंथ ... नं. 33 ८/७ 2 ... नासिक


# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा। जरि परोपकृतीच मनोहरा।
जरि असे चतुरत्व, तरी तुला। शिकविण्यासम छंद नसे भला॥

वर्ष ११ वें.] जुलै ते सप्टेंबर. १९२५ [अंक ५ ते ७


## परलोकवासी डॉक्टर भांडारकर.

संस्कृत भाषेंतील रत्नभांडाराची ओळख युरोपिअन लोकांस १९ व्या शतकाचे प्रारंभीं झाली. त्यानंतर अनेक विद्वान् युरोपियन पंडितांनीं त्या भाषेचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. गेल्या शतकाचे पूर्वार्धांत जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड एथलि पंडितांनीं या भाषेंतील धर्म, तत्त्वज्ञान, व्याकरण वगैरे विषयांवरील बरेच ग्रंथ प्रसिद्ध केले. संस्कृत, ग्रीक, ल्याटीन, झेंद, अवेस्ता वगैरे आर्यकुलोद्भव भाषांचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करून नवीन तुलनात्मक भाषाशास्त्र उदयास आणिलें व या शास्त्राच्या साहाय्यानें प्राचीन इतिहासावर पुष्कळ प्रकाश पाडला. पाश्चात्य पंडितांचे हे परिश्रम चालले असतांना संस्कृत भाषा ज्या देशांत जन्मास आली, जेथें तिचें संवर्धन होऊन ती परिणत दशेला गेली, त्या देशांतील लोक उदासीनपणें व आश्चर्यानें युरोपिअन पंडितांची कृति पाहात होते. यामुळें हिंदुस्तानांतील लोकांत चिकित्सक व संशो-

धक बुद्धि नाहीं व त्यांना दीर्घ परिश्रमाची संवय नाहीं, अशीच कल्पना साहाजिकपणें चोहोंकडे प्रचलित झाली.

सुदैवानें १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांतील ही उदासीनतेची स्थिति फार दिवस टिकली नाहीं. डॉक्टर भांडारकर यांनीं सन १८६४ सालीं प्रथमच प्रोफेसर हॉग यांनीं प्रसिद्ध केलेल्या ऐतेरीय ब्राह्मणावरील आपले निबंध प्रसिद्ध केले. त्या निबंधांतील उत्कृष्ट विचारसरणी, चिकित्सक बुद्धि, परिश्रमपूर्वक केलेली तयारी इत्यादि गोष्टी पाहून युरोपियन पंडितांनाहीं आश्चर्य वाटलें व हा तरुण लेखक लवकरच पुढें येऊन पाश्चात्य लेखकांना मागें टाकील असें भविष्य त्यांनीं केलें. कांहीं कालानें हें भविष्य खरेंही झालें. डॉक्टर भांडारकर यांनीं आपल्या लेखनकार्यास इ. स. १८६४ सालीं सुरुवात केली व सरस्वतीच्या सेवेचें हें पवित्र कार्य अव्याहतपणें त्यांनीं ५० वर्षे चालविलें. सन १९१४ सालीं आपल्या वयाच्या ७९ व्या वर्षी 'हिंदुस्तानांतील शैव व वैष्णव पंथ' नांवाचा सुप्रसिद्ध ग्रंथ इंग्लिश भाषेंत त्यांनीं लिहिला. हा त्यांचा शेवटचा ग्रंथ होय. डॉक्टर भांडारकर यांच्या लेखांचे सामान्यतः ३ भाग पडतात. १ संस्कृत वाङ्मय ( विद्यार्थ्यांना समजावून देण्याकरितां टीका देऊन प्रसिद्ध केलेले ग्रंथ ), २ संस्कृत ग्रंथकार व ग्रंथ यांचें चिकित्सक बुद्धीनें केलेलें निरीक्षण, ३ प्राचीन इतिहास-संशोधन. डॉक्टर भांडारकर यांनीं जे ग्रंथ लिहिले, त्यांजकरितां त्यांना अत्यंत श्रम करावे लागले. जुन्या इतिहासाकारितां त्यांना अनेक शिलालेख, ताम्रपट, नाणी वाचावीं लागलीं. या त्याच्या परिश्रमामुळें व वाचनामुळें त्यांची दृष्टि बिघडली व आयुष्याचीं शेवटचीं वर्षें दृष्टि गेल्यामुळें त्यांना पराधीन स्थितींत काढावीं लागलीं.

डॉक्टर साहेबांच्या विद्वत्तेला सदाचार, विनय, निर्व्यसनता, दीर्घ उद्योग, परमेश्वरनिष्ठा इत्यादि अनेक सद्गुणांची जोड मिळाल्यामुळें

त्याच्या कीर्तींत जास्तीच भर पडली. ते कर्ते समाजसुधारक होते. जें सत्य वाटेल तेंच बोलावयाचें व तेंच करावयाचें अशी त्यांची वृत्ति असल्यामुळें त्यांच्या उपदेशाचा परिणाम साहजिकपणें समाजावर होत असे. विद्येची त्यांना फार आवड असे आणि विद्याप्रसाराकारितां त्यांचे यत्न अव्याहत चालू होते. स्त्रीशिक्षणाचे ते मोठे पुरस्कर्ते होते व मुलींच्या शिक्षणाकरितां ते सतत ४० वर्षें झटले. पुण्यांतील फर्ग्युसन कॉलेज, सांगलींतील विलिंग्डन कॉलेज वगैरे संस्था चालविणाऱ्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापक मंडळीचे ते कित्येक वर्षें अध्यक्ष होते. अनेक संकटांतून त्यांनीं ती संस्था निभावून नेली. न्यू पूना कॉलेज, नूतन मराठी विद्यालय वगैरे शिक्षण संस्था चालविणाऱ्या शिक्षणप्रसारक मंडळाचे ते प्रथमपासून मरेपर्यंत अध्यक्ष होते. मुलींच्या शिक्षणाच्या प्रसाराकारितां स्थापन झालेल्या महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटीचे ते ४० वर्षें अध्यक्ष होते. हुजुरपागेंतील शाळा याच संस्थेच्या आहेत. हिंगणें एथील प्रो. कर्वे यांच्या स्त्रियांच्या विश्वविद्यालयाचे ते चॅन्सेलर होते. पुणें एथील नेटिव्ह जनरल लायब्ररी, डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी वगैरे ज्ञानप्रसारक मंडळांचेही ते अध्यक्ष होते. सारांश महाराष्ट्रांत शिक्षणप्रसाराकारितां किंवा ज्ञानप्रसाराकारितां जे कांहीं यत्न गेल्या ४०।५० वर्षांत झाले, त्यांत डॉक्टर भांडारकर यांनीं प्रमुखपणें भाग घेतला. या त्यांच्या गुणामुळें, त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या कळकळीमुळें व धर्मनिष्ठेमुळें डॉक्टर भांडारकरांचें नांव महाराष्ट्रांत आबाल वृद्धांलाही माहीत असे.

डॉक्टर भांडारकर यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण एथें तारीख ७ जुलै सन १८३७ सालीं झाला. त्यांचे वडील गोपाळराव हे मालवण एथें मामलेदार कचेरींत कारकून होते. मालवण एथें गोपाळराव

यांची वडिलोपार्जित थोडीशी जमीन व घरही होतें. एथें कांहीं दिवस खासगी मराठी शाळेंत रामकृष्णपंतांचा अभ्यास झाला. तेथून त्यांच्या वडिलांची बदली राजापूर एथें झाली. तेथील सरकारी मराठी शाळेंत त्यांनीं सन १८४७ पर्यंत अभ्यास केला. इ. स. १८४७ सालीं गोपाळराव यांची बदली रत्नागिरी येथें झाली व तेथें त्यांनीं आपल्या मुलास इंग्लिश शिकण्याकरितां हायस्कुलांत घाडलें. यावेळीं इंग्लिश शिक्षणाला नुकतीच सुरुवात झाली होती. हें शिक्षण मुलांना देणें अगदीं धर्माच्या विरुद्ध आहे अशीच समज त्यावेळीं जोरानें प्रचलित होती. तथापि गोपाळराव यांनीं आपल्या मनाचा हिय्या करून आपल्या मुलास इंग्लिश शाळेंत घाडलें. या शाळेंत रामकृष्णपंतांनीं ९ वर्षें अभ्यास केला. या वेळीं युनिव्हर्सिटी नव्हती व इंग्लिश कॉलेजही फक्त एकच होतें. तें मुंबई एथील एलफिन्स्टन कॉलेज हें होय. या संस्थेस त्या वेळीं एलफिन्स्टन इन्स्टिटयूट शाळा असें म्हणत असत व तिचे शाळा व कॉलेज असे दोन भाग असत. महर्षि दादाभाई नौरोजी हे त्या वेळीं एलफिन्स्टन् कॉलेजमध्यें शिक्षक होते. त्यांचा प्रेमळ स्वभाव विद्यार्थ्यांबद्दलची त्यांची कळकळ, त्याची विषय प्रतिपादन करण्याची शैली यांमुळें त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली होती व दूरदूरचे विद्यार्थीही त्या वेळीं दादाभाई यांच्या हाताखालीं शिकण्याकरितां एलफिन्स्टन् कॉलेजमध्यें येत. रामकृष्णपंत यांनीं मुंबई एथें शिकण्यास जाण्याचा निश्चय केला. त्यावेळीं रत्नागिरी व मुंबई यांच्यामध्यें सध्यांप्रमाणें बोटी सुरू नसत व मुंबईला जाण्यास कित्येक दिवस लागत. अशा सारख्या स्थितींत दूरच्या ठिकाणीं आपल्या मुलाला घाडण्यास साहजिकपणेंच गोपाळराव तयार नव्हते, पण मुलाच्या आग्रहामुळें अखेरीस त्यांनीं त्यास मुंबईस घाडलें. आपल्या वयाच्या १९ व्या वर्षीं रामकृष्णपंत अभ्यासाकरितां मुंबईस आले व कॉलेजांत जाण्या-

पूर्वी हायकूलच्या वर्गांत राहून त्या वर्गाची त्यांना परीक्षा द्यावी लागली. मग पुढील वर्षी म्हणजे १८५४ सालीं ते कॉलेजांत गेले व तेथें त्यांनीं ५ वर्षे अभ्यास केला. कॉलेजांत असतांना गणित हा त्यांचा फार आवडता विषय असे व या विषयावर त्यांनीं फार मेहनत घेतली. कॉलेजमध्यें त्यावेळीं संस्कृत भाषा शिकवीत नसत. रा॰कृष्णपंत आपला अभ्यास मन लावून करीत असत. सहा तासांपेक्षां जास्त झोंप ते कधींही घेत नसत. या वेळीं देखील त्यांचा निर्भीडपणा दिसून येत असे. त्यांना गणित शिकवावयास जो प्रोफेसर असे तो गृहस्थ फार आळशी असे आणि आपल्या विद्यार्थ्यांना बिलकूल शिकवीत नसे. रामकृष्णपंत यांनीं वर्गांत एकदां उभें राहून सर्व मुलांच्या समक्ष या चुकार प्रोफेसरला त्याच्या हलगर्जीपणाची ओळख दिली. पांच वर्षे या कॉलेजांत शिकून तेथील अभ्यासक्रम त्यांनीं पुरा केला. मग त्याना एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें शिक्षकाची जागा मिळाली. यानंतर सन १८६० सालीं पुण्यास डेक्कन कॉलेज स्थापन झालें व त्यांत त्यांना फेलो नेमिलें. या जागीं रामकृष्णपंत ५ वर्षे होते.

सन १८५७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना झाली व सर्व फेलोंना युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला बसलेंच पाहिजे, नाहीं तर त्यांना कमी केलें जाईल असा नियम केला. त्याप्रमाणें रामकृष्णपंत हे सन १८६२ सालीं बी. ए. च्या परीक्षेस बसले व ते पुष्कळ वर आले. सन १८६५ सालीं त्यांची एम. ए. ची परीक्षा पास झाली. सन १८६० सालापासून त्यांना संस्कृत भाषेची गोडी लागली व मंडळीच्या साहाय्यानें त्यांनीं आपला संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. सुमारें ५।६ वर्षांत त्यांनीं त्या भाषेंत पारंगतता संपादन केली व स्वतः न्याय, व्याकरण इत्यादि गहन, विषयांचाही त्यांनीं अभ्यास केला. हेग नांवाच्या पाश्चात्य पंडितानें प्रसिद्ध केलेल्या ऐतरेय ब्राह्मण या पुस्तकावर मुंबई एथील त्या वेळच्या

नेटिव्ह ओपिनियन या वर्तमानपत्रांत टीकात्मक लेख लिहीत. तो लेख वाचून पाश्चात्य विद्वानांस फार आश्चर्य वाटलें व हा तरुण लेखक लवकर कीर्तिपदाला जाईल, असें त्या वेळचे प्रसिद्ध जर्मन संस्कृतज्ञ प्रोफेसर वेबर यांनीं भविष्य केलें. याच वर्षीं त्यांनीं आपलें संस्कृत पहिलें पुस्तक प्रसिद्ध केलें व पुढील वर्षीं त्यांनीं आपलें दुसरें पुस्तक प्रसिद्ध केलें. आज साठ वर्षांत या पुस्तकाच्या साहाय्यानें हजारों विद्यार्थी संस्कृत भाषेचा अभ्यास करीत आहेत. सन १८६९ सालीं रामकृष्णपंताची सिंध प्रांतातील हैद्राबाद एथील हेडमास्तराचे जागीं नेमणूक झाली. तेथें त्यांनीं थोडेच महिने काम केलें. मग त्यांच वर्षीं त्यांची रत्नागिरी एथील हेडमास्तराचे जागीं नेमणूक झाली. रत्नागिरीस ते ४ वर्षें होते. या अवधींत त्यांनीं तें हायस्कूल चांगलेच नांवारूपाला आणिलें. आपल्या हाताखालच्या विद्यार्थ्यांच्याबद्दल त्यांना अत्यंत प्रेम वाटत असे व त्यांच्या कल्याणाकरितांच नेहमीं झटत असत. त्यांची शिस्त फार कडक असे. पण त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें त्यांची ही शिस्त विद्यार्थ्यांना त्रासदायक वाटत नसे डॉक्टर भांडारकर या शाळेंत जोंपर्यंत हेडमास्तर होते, तोंपर्यंत या हायस्कूलचे विद्यार्थी परीक्षेंत फार वर येत असत व त्यांना युनिव्हर्सिटीची स्कॉलरशिपही मिळत असे.

सन १८६८ सालीं एल्फिन्स्टन् कॉलेजांत त्यांना संस्कृत भाषेचे असिस्टंट प्रोफेसर नेमिलें. या जागीं जवळजवळ १४ वर्षें त्यांनीं काम केलें. या जागीं असतांना त्यांनीं प्राचीन इतिहाससंशोधनाचें काम सुरू केलें व आपले पुष्कळ लेख प्रसिद्ध केले. प्राचीन इतिहासाचे संशोधनाकडे त्यांचा ओढा लागण्यास एक आकस्मिक कारण झालें. इ. स. १८७० सालीं मोदी नावाच्या एका पारशी गृहस्थाला कांहीं जुनीं नाणीं सांपडलीं. त्यांजवर जुन्या लिपींत कांहीं शब्द लिहिले होते. त्या गृहस्थानें तीं नाणीं रामकृष्णपंतांकडे आणून दिलीं. यानंतर रामकृष्णपंतांनीं जुन्या

लिपींचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. जुन्या लिपी, जुन्या प्राकृत भाषा यांचा अभ्यास त्यांनीं कांहीं वर्षें मनःपूर्वक केला. यानंतर शिलालेख व नाणीं यांचा अभ्यास करून प्राचीन इतिहाससंबंधीं लेख लिहिण्याचें आपलें काम सुरू केलें. इ. स. १८७४ सालीं लंडन एथें सर्वदेशीय सर्व संस्कृत पंडितांची सभा भरली होती. या सभेला रामकृष्णपंतांना बोलाविलें होतें. कुटुंबांतील कांहीं अडचणींमुळें त्यांना या सभेस हजर राहतां आलें नाहीं. पण नाशिक एथील कोरीव लेण्यांसंबंधानें त्यांनीं आपला लेख त्या सभेस पाठविला. तो तेथें वाचला, तेव्हां सर्व विद्वान् गृहस्थांना फार पसंत पडला. या वेळेपासून रामकृष्णाची कीर्ति चोहोंकडे पसरली. सन १८७९ सालीं सरकारनें त्यांना प्राचीन इतिहास संशोधक नेमिलें. आपलें शिकविण्याचें काम संभाळून त्यांना हें संशोधनाचें काम करावें लागत असे. सन १८८२ सालीं त्यांना डेक्कन कॉलेजांत कायमची प्रोफेसरची जागा मिळाली. त्यांच्या नोकरीचीं शेवटचीं २१ वर्षें त्यांनीं एथेंच घालविलीं. या ठिकाणीं जुनीं हस्तलिखित पुस्तकें मिळवून संग्रह करण्याचा त्यांनीं उद्योग केला. अनेक दुर्मिळ असे संस्कृत ग्रंथ त्यांनीं मिळविले व त्यांची एक मोठी याद तयार केली. या यादींत प्रत्येक पुस्तकाचा कर्ता, त्याचा काल, या पुस्तकांतील मजकुराचा अगदीं थोडक्यांत सारांश असा दिला आहे. डेक्कन कॉलेजांतील प्राचीन संस्कृत पुस्तकांचा संग्रह व त्यांची यादी ही सर्वदेशीय संस्कृत पंडितांत प्रसिद्ध आहे. सन १८८६ सालीं युरोपमध्यें संस्कृत पंडितांची दुसरी सभा झाली. या सभेस हिंदुस्तानतर्फें डॉक्टर भांडारकर यांची निवड झाली होती. युरोपांतील विद्वान् मंडळीनें त्यांचा फार सन्मान केला. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका इत्यादि देशांतील विश्वविद्यालयांनीं त्यांच्यावर पदव्याचा वर्षाव केला. भांडारकर यांचा सन्मान करण्यांत आपण आपलाच सन्मान करीत आहों अशीच या विश्वविद्यालयांची भावना होती.

शिलालेख, ताम्रपट, नाणीं, जुने संस्कृत ग्रंथ या सर्वांच्या आधारें दक्षिण हिंदुस्तानचा प्राचीन इतिहास लिहिण्याचें त्यांचें काम कित्येक वर्षें चालू होतें. 'दक्षिण हिंदुस्तानचा इतिहास' व 'दक्षिण हिंदुस्तानचीं राजघराणीं' हीं त्यांचीं बहुमूल्य पुस्तकें आहेत. या पुस्तकांचे योगानें शालिवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव वगैरे राजघराण्यांविषयीं अतिशय मनोरंजक व विश्वसनीय अशी माहिती प्रसिद्ध झाली. आंध्र, चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे राजघराण्यांच्या कारकीर्दींत दक्षिण हिंदुस्तानची झालेली भरभराट, त्यावेळचें कलाकौशल्य, व्यापार, धार्मिक सुधारणा इत्यादि गोष्टी वाचून वाचकाला फार आनंद वाटतो व आपल्या पूर्वजांबद्दल अभिमान वाटतो. या वेळीं मुंबई इलाख्याचें ग्याझेटिअर सरकार प्रसिद्ध करीत होतें, त्याला त्यांनीं प्राचीन इतिहासासंबंधानें पुष्कळ माहिती पुरविली. मुंबई युनिव्हर्सिटीशीं त्यांचा अगदीं निकट संबंध होता. परीक्षक, सिंडिकेट, व्हाइसचान्सेलर या नात्यांनीं युनिव्हर्सिटीची सेवा त्यांनीं अनेक वर्षें केली. तरुण मंडळीस पुढें आणावें ही त्यांची उत्कट इच्छा असे, म्हणून त्यांनीं आपल्या युनिव्हर्सिटींतील सिंडिकेटच्या जागेचा राजिनामा दिला व पुढें ही जागा स्वीकारली नाहीं.

इ. स. १८९३ सालीं भांडारकर यानीं पेन्शन् घेतलें. यापुढील काळ त्यांनीं पुणें एथेंच घालविला. संगमाश्रम नांवाचा एक लहानसा बंगला त्यांनीं मुळा व मुठा या नद्यांचे संगमाचे पलीकडे बांधला व त्यांत ते राहात असत. पेन्शन् घेतल्यानंतरचा आपला काळ त्यांनीं इतरांप्रमाणें स्वस्थ बसून काढला नाहीं. ग्रंथलेखनाचें त्यांचें काम सुरू होतेंच. विद्याप्रसाराकरितां व समाजसुधारणेकरितां जे अनेक प्रयत्न चालले होते त्यांत ते मनापासून भाग घेत असत. त्यांचा आयुष्यक्रम घड्याळाप्रमाणें अगदीं नियमित असे, यामुळें अनेक कामें त्यांना उत्तम

प्रकारें पार पाडतां येत. पेन्शन् घेतल्यावर सुमारें २० वर्षे त्यांची प्रकृति चांगली होती. परंतु पुढें कुटुंबांतील माणसांच्या अकाली मृत्यू-मुळें त्यांची प्रकृति खालावली व सन १९१४ सालानंतर त्यांचा लेखन-व्यवसाय अजिबात बंद झाला. तरी पुष्कळ मंडळी जुन्या इतिहासा-संबंधानें किंवा संस्कृत वाङ्मयासंबंधानें त्यांचें मत घेण्याकारितां जात असत. या सर्वांशीं डॉक्टरसाहेब प्रेमानें बोलत. त्यांना जी माहिती लागत असे ती ते आनंदानें पुरवीत असत. सन १९२१ सालपर्यंत त्यांची स्मरणशक्ति पूर्वीप्रमाणेंच तीव्र होती. ज्या ज्या संस्थांशीं त्यांचा संबंध असे त्यांची चौकशी करून सल्लामसलत देण्याचें काम १९२१ साल-पर्यंत अव्याहतपणें चालू होतें.

मुलींच्या शिक्षणाबद्दल डॉक्टर भांडारकर यांना अत्यंत आस्था वाटत असे. गेल्या शतकांत समाजाचें मत स्त्रीशिक्षणाचे अगदीं विरुद्ध असे. डॉक्टर भांडारकर, कै. न्या. रानडे, कै. रा. पंडित वगैरे मंडळींनीं मुलींच्या शिक्षणप्रसाराकरितां ‘ महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटी ’ नांवाची संस्था इ. स. १८८९ सालीं स्थापन केली व मुलींकरितां एक इंग्लिश हायस्कूल सुरू केलें. या हायस्कुलाकरितां हुजुरपागेची जागा सांगली-कराकडून मिळविली व तिजवर इमारती बांधल्या. सन १८९२ सालीं ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन व प्राक्टिसिंग स्कूल या दोन्ही शाळा शिक्षण-खात्यानें या महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटीच्या स्वाधीन केल्या. या सोसायटीच्या आश्रयाखालीं या तिन्ही शाळांची फार भरभराट झाली. महाराष्ट्रांत मुलींच्या शिक्षणप्रसाराचा अग्रमान या तिन्ही संस्थांना दिला पाहिजे. डॉक्टर भांडारकर हे या सोसायटीचे सन १८८९ साला-पासून मरेतोंपर्यंत अध्यक्ष होते. या शाळांचा त्यांना फार अभिमान वाटत असे व त्यांची झपाट्यानें होत चाललेली प्रगति पाहून त्यांना फार समाधान वाटत असे. सन १९१६ सालानंतर अशक्ततेमुळें व दृष्टि-

मांद्यामुळें त्यांना हुजुरपागेंत येतां येत नसे. सन १९१६ सालच्या जानेवारी महिन्यांत हायस्कूल; ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन व प्राक्टिसिंग स्कूल या शाळांच्या विद्यार्थिनींचें वार्षिक संमेलन झालें होतें. त्यावेळीं विद्यार्थिनींचीं भाषणें ऐकून व मुलींचा जमाव पाहून त्यांना फार आनंद झाला. वार्धक्यामुळें आपणांस यापुढें आपल्या आवडत्या संस्थेच्या समारंभास हजर राहतां येणार नाहीं असें त्यास वाटत होतें व यामुळें चित्ताला जरा खिन्नता आली होती व आपल्या ३० वर्षांच्या प्रयत्नाला इतकें यश आलेलें पाहून त्यांना अत्यंत संतोषही झाला होता. यावेळीं अध्यक्ष या नात्यानें सुमारें अर्धा तास त्यांनीं अत्यंत कळकळीनें भाषण केलें. या भाषणांत मुलींच्या शिक्षणाचें ध्येय कोणतें असावें याजबद्दल त्यांनीं उत्कृष्ट विवेचन केलें. शेवटीं मुलींना त्यांनीं सांगितलें कीं, शिक्षणाच्या योगानें अंगांत विनय आला पाहिजे, सौजन्य आलें पाहिजे, कार्यक्षमता आली पाहिजे. तुम्हीं अत्यंत साधेपणानें व नम्रतेनें वागा, शीलवती व्हा व कार्यक्षम बना. शिक्षणानें तुम्हीं उत्तम गृहिणी व सन्माता झालें पाहिजे तरच तुमच्या शिक्षणाचें चीज होईल. हिंगणें एथील युनिव्हर्सिटीचा अभ्यास ठरवितांना व युनिव्हर्सिटीचें ध्येय ठरवितांना देखील त्यांनीं युनिव्हर्सिटीचे पुरस्कर्त्यांना बजाविलें होतें कीं युनिव्हर्सिटीचा जीवनक्रम व घरगुती जीवनक्रम यांची ताटातूट व फारकत होऊं नये. घरगुती जीवनक्रम हिंदु धर्तीचा असावा. विद्यार्थिनी गृहिणी झाल्यावर आपल्या मुलाबाळांचें संरक्षण व संवर्धन करण्याचें काम स्वतां करावें, तें आपल्या आयांवर किंवा दायांवर सोपवूं नये. आपल्या मुलांच्या शिक्षणाचें काम या पदवधिर स्त्रियांनीं आपल्या स्वतांच्या अंगावर घ्यावें. सारांश, शिक्षणाचे योगानें मुलींना आपलें कर्तव्य अधिक दक्षतेनें करण्याची पात्रता यावी, त्यांनीं शुगृहिणी व सुमाता व्हावें, त्यांच्या अंगीं विनय व सौजन्य यावें व त्यांनीं सुशील बनावें अशी त्यांची उत्कट इच्छा असे. इंग्लिश शिक्षण म्हणजे पाश्चात्यांच्या फयाशनचें

अनुकरण नव्हे ही गोष्ट ते नेहमीं विद्यार्थिनींना सांगत असत. फ्याशनचा त्यांना फार तिटकारा असे. त्याची स्वतःची राहाणी अगदीं साधी व हिंदु पद्धतीची असे व कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीचें वळण अगदीं साधें राहावें असा त्यांचा कटाक्ष असे. हा साधेपणा व विनय डॉक्टर साहेबांच्या मुलांत, मुलींत, नातू, नाती यांत दिसून येत आहे ही गोष्ट त्या कुटुंबास भूषणावह आहे.

भांडारकर हे समाजसुधारणेचें अग्रणी होते ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. सुधारणा म्हणजे परकीय लोकांच्या रीतीभातींचें, आचारविचारांचें अंध अनुकरण अशी मात्र त्यांची भावना कधींही नव्हती. पौर्वात्य तेवढें वाईट, पाश्चिमात्य तेवढें चांगलें, अगर जुनें तेवढें वाईट नवीन तेवढें चांगलें अशी त्यांची कल्पना कधींही नव्हती. त्यांचा पोषाक व राहाणी अगदीं साधी असे. डोक्यावरील पांढरें स्वच्छ पागोटें व अंगावर साधें पांढरें उपरणें हीं कधींहि त्यांनीं सोडलीं नाहींत. 'सामाजिक सुधारणा ही नीतीच्या, भूतदयेच्या व सत्याच्या पायावर केली पाहिजे, आपल्या विवेक वाणीला स्मरून न्याय्य वाटणारी गोष्ट व सुधारणा प्रत्येकानें धैर्यानें अमलांत आणिली पाहिजे' असें त्यांचें मत असे. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह धार्मिक विधींची सुधारणा वगैरे गोष्टी त्यांनीं धैर्यानें स्वतः करून दाखविल्या. त्यांचीं मतें पसंत नसणाऱ्या त्यांच्या प्रतिपक्षासही डॉक्टर भांडारकर यांच्या सत्याबद्दल, सद्धेतूबद्दल व धैर्याबद्दल कधींही शंका नसे.

भांडारकर हे प्रार्थनासमाजाचे पुरस्कर्ते होते. प्रार्थनासमाज हा एकेश्वरी पंथ आहे. 'परमेश्वरानें हें सर्व ब्रह्मांड निर्माण केलें आहे. तोच एक खरा देव; त्याशिवाय दुसरा देव नाहीं. तो नित्य, ज्ञानस्वरूप, अनंत, कल्याणनिधान, आनंदमय, निरवय, निराकार, एकच, अद्वितीय सर्वांचा नियंता, सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्ति, कृपानिधि, परम पवित्र व पतितपावन असा आहे. परमेश्वर सावयवरूपानें अवतार घेत नाहीं आणि

कोणताही एक ग्रंथ साक्षात् ईश्वरप्रणीत किंवा सर्वांशीं प्रमाण आहे असें नाहीं वगैरे या समाजाचीं मतें आहेत.' बंगाल्यांतील ब्राह्मो समाजाप्रमाणें या भागांत प्रार्थनासमाजाचा विशेष प्रसार झाला नाहीं, तथापि सुशिक्षित माणसांच्या मनावर या समाजाच्या मतांचा परिणाम झाला आहे ही गोष्ट नाकबूल करितां यावयाची नाहीं. हिंदू धर्मांतील सर्व उत्कृष्ट कल्पना या समाजानें घेतल्या आहेत. भागवत, भगवद्गीता, उपनिषदें यांजवर या समाजाची फार भिस्त आहे. तुकाराम, नामदेव या साधूंच्या ग्रंथांविषयीं समाजाला फार आदर आहे. तुकारामाच्या अभंगांचा उल्लेख प्रार्थनासमाजाच्या प्रार्थनांतून वारंवार येत असतो. भांडारकर व रानडे यांणीं तुकारामाचा अभ्यास मनःपूर्वक केला होता व दोघेही अत्यंत भक्तिभावानें तुकारामाचे अभंग म्हणत असत. प्रार्थनासमाजाचीं मतें पसंत नसणारांनाही भांडारकर यांची उत्कट ईश्वरभक्ति, ईश्वरप्राप्तीची तळमळ, ईश्वरावरील त्यांची निश्चल व निःसीम श्रद्धा पाहून कौतुक वाटल्याखेरीज राहणार नाहीं.

भांडारकराच्या ८० व्या वर्षीं म्हणजे १९१७ सालीं त्यांच्या शिष्यांनीं त्यांच्या स्मरणार्थ भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट नांवाची संस्था स्थापन केली. पौर्वात्य जुन्या वाङ्मयाचें व इतिहासाचें संशोधन करावें हा या संस्थेचा हेतु आहे. या संस्थेला भांडारकर यांनीं आपल्याजवळील सुमारें ४० हजार रुपये किंमतीचा अमूल्य ग्रंथसंग्रह बक्षीस दिला.

आज ९।७ वर्षें भांडारकर हे आजारीच होते. त्यांचे चिरंजीव श्रीधरपंत व प्रभाकरपंत यांच्या निधनानें त्यांना फारच शोक झाला पण ईश्वरेच्छा म्हणून तो त्यांनीं धैर्यानें आवरला. गेल्या आगस्टच्या २४ वे तारखेस ऋषिपंचमीचा दिवशीं ऋषितुल्य असणाऱ्या या विद्वान्, विनयशील, सत्यनिष्ठ, विद्याव्यसनी व धर्मपरायण पुरुषाचा अंत झाला. त्यांच्या अंत्यविधीस सर्व वयांची, सर्व धर्मांची व सर्व पक्षांची सुमारें १०-१९ हजार मंडळी जमली होती.

---

ग्रंथ संग्रह ११५ ता........ मार्मिक ग्रंथालय

# मुलांकरितां कविता.

---:०:---

## टाळ्या व चुटक्या.

( आज भेटली ताई ही या चालीवर. )

रहा उभ्या या ओळीनें
टाळ्या पिटुं या मौजेनें
घेऊं फिरुनीयां गिरक्या
वाजवुं फिरतांना चुटक्या
( चाल बदलून ) शांत राहुनी
डोळे मिटुनी
( चाल बदलून ) कर जोडुनियां ध्यान धरूं
मौज चला या अशी करूं.

[ ओळींतील अर्थाप्रमाणें मुलांनीं कृति करावी. गाणारीं मुलें असल्यास रहा उभ्या या ओळीनें या ऐवजीं 'रहा उभे या ओळीनें' असा चरण म्हणावा.

## चेंडू.

( चाल वरची ).

हातीं चेंडू घेउनियां
खेळायाला तयार व्हा,
ओळी आतां दोन करूं
चेंडू हातीं वरी धरूं

( चाल बदलून ) पहा फेकिला
पहा झेलला
पुन्हा फेकिला
पुन्हा झेलला

( चाल बदलून ) भर भर चेंडू उडे कसा
झाडावरुनी पक्षि जसा

## कोण काय बोलतो.

( चाल—वरप्रमाणेंच. )

१ लें मूलः— कोंबडा माझा आरवतो,
'कुकूच कूकू' तो करितो

२ रें मूलः— पोपट माझा पिंजऱ्यांत
'लट पट पंची' तो करित

३ रें मूलः– ‘भोभो भोभो’ मोत्या हा
भुंकत राहे कसा पहा

४ थें मूलः– ‘म्यूं म्यूं म्यूं म्यूं’ मनी करी
अंग चाटते घरावरी

५ वें मूलः– उंदिर कुर कुर करी पहा
बघुनि मनीला पळतो हा.

---

## हरवलेली बाहुली.

( एका मुलीची आवडती बाहुली हरवली. ती तिनं पुष्कळ शोधली, पण तिला ती सांपडली नाहीं. अखेर तिला ती कपड्यांचे मागें दडलेली सांपडली. तेव्हां तिला फार आनंद झाला. मुलीच्या मनाची स्थिति पुढील गाण्यांत दाखविली आहे. हें गाणें अर्थाप्रमाणें कृति करून म्हणावयाचें आहे. )

---

### पद.

( ‘अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला या चालीवर. )

मज चैन नसे आज मुळीं तें कांहीं
बाहुली रुसोनी जाई ॥ ध्रु ॥
कां छबडी ती माझी मजवर रुसली
कोठें ती दडुनी बसली

(चाल बदलून) शोधुनी तिला मीं दमलें
सांपडे न म्हणुनी रडलें
ये धांवत माझ्या बाळे
(पहिली चाल.) कां राग तुला आला न कळे बाई
मजवरती ममता नाहीं ॥ १ ॥
॥ बाहुली रुसोनी ॥ ध्रु० ॥

---

## पद.

('तेथोंचि उभी कीं आलें' या चालीवर.)

बाहुली गोड मम भारी
छबुकली मला आवडली । कितितरी ।
आनंदें मजशीं खेळे ।
माशि गोड बोल ती बोले । कितितरी ।
खेळली । कदा ना रुसली । मीच तिस जरी ।
बोललें भारी ।
प्रेमानें मिठि मज मारी कितितरी ॥ १ ॥

लागली भूक जरि तिजला
रडुनी न त्रास तो दिधला । मज कधीं ।
निजवितां झोप ती घेई
उठवितां हसत ती येई । मजकडे ।
आजवरी । सोडुनि दुरी । मजशि ना कधीं
दूर ती गेली ।
आतांचि कशी ती रुसली । मजवरी ॥ २ ॥

# पद.

' श्रीमंत पतीची राणी. ' या चालीवर.

वा ! मौज कशी ही झाली
छबुकली मला सांपडली
घेउनी तुला पोटाशीं
मारीन मिठी मी तुजशीं

( चाल बदलून ) बघ वेळ किती हा झाला
चल भूक लागली तुजला
देईन लाडु खायाला

( चाल बदलून ) घेईल झोप मम बाळी
खेळुनी किती ही दमली ॥ १ ॥

# शिशुवर्गाकरितां धडे.

## बाबांचा बाजार

बाबा बाजारांत जावयास निघाले.

बाबू, मधू, यमू, बाबांभोंवतीं जमलीं.

बाबू बापाला म्हणाला,

' बाबा बाजारातुन मला एक सुंदर बाजा आणा. '

मधू बापाला म्हणाला,

' बाबा, बाजारांतून मला एक छानदार गाडी आणा. '

यमू बापाला म्हणाली,

'बाबा, बाजारांतून मला एक मजेची बाहुली आणा.'

बाबा म्हणाले, 'बाबू मी तुला सुंदर बाजा आणीन'

मधू, मी तुला छानदार गाडी आणीन,

यमू, मी तुला मजेची बाहुली आणीन.'

बाबा बाजारांत गेले.

बाबू, मधू, यमू बाबांची वाट पहात बसलीं.

दुपारीं बाबा परत आले.

बाबू, मधू, यमू बापाभोंवतीं जमलीं.

बाबू म्हणाला 'बाबा, माझा बाजा आणलांत का?'

मधू म्हणाला 'बाबा, माझी गाडी आणलीत का?'

यमू म्हणाली 'बाबा, माझी बाहुली आणलीत का?'

बाबानें बाबूला एक सुंदर बाजा दिला.

मधूला एक छानदार गाडी दिली.

यमूला एक मजेची बाहुली दिली.

मग बाबांनीं बाबूला, मधूला, यमूला खाऊ दिला.

मधूनें यमूची बाहुली गाडींत बसविली.

बाबू बाजा वाजवूं लागला.

### गाणें*

किति सुंदर ती गाडी मधुची दिसली  
बाहुली यमूची बसली  
मधु बाबु यमू आनंदानें गातीं  
बाबाहि मौज ती बघती.

---

* 'अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला' या चालीवर.

# हिरवा गार पोपट.

झाडावर हिरवा गार पोपट बसला होता.

तो हिरवा गार पोपट यमूला फार आवडला.

यमू म्हणाली, 'पोपटा पोपटा, मजजवळ ये.
मी तुला डाळिंब देईन.
मी तुला पेरू देईन.
मी तुला भिजली डाळ देईन.'

पोपट म्हणाला, 'मला तुझें डाळिंब नको.
मला तुझा पेरू नको.
मला तुझी भिजली डाळ नको.
मी बागेतलें डाळिंब खाईन.
मी बागेंतला पेरू खाईन.
मी शेतातली डाळ खाईन.
मी तुजजवळ येणार नाहीं.'

यमू म्हणाली, 'तूं मजजवळ ये,
मी तुला पिंजरा आणीन.
मी तुला ताजें पाणी देईन.
मी तला गाणें शिकवीन.'

पोपट म्हणाला, 'मला तुझा पिंजरा नको.
मला तुझें ताजें पाणी नको.
मला तुझें गाणें नको.

मी झाडावर राहीन.

मी नदीचें ताजें पाणी पिईन.

मी माझें गाणें गाईन.

मी तुजजवळ येणार नाहीं.'

यमू म्हणाली, 'बरें तर तूं झाडावर रहा.

बागेंतलें डाळिंब खा.

नदीचें ताजें पाणी पी.

तुझें गाणें गा.

मजजवळ येऊं नको.

पण मजजवळ बोलत जा.'

पापट ह्मणाला, 'हो हो, मी तुजजवळ बोलेन'.

## गाणें.*

झाडावरती पोपट राही.
बागेंतिल तो पेरू खाई.
गोड गोड तो गाणें गाई.
झाडावर बसुनी.

* अंजनीगीत.

# प्रभात.

द्रुतविलंबित.

रवि असे उदयाप्रति येत हा
भिउनियां रजनी पळते पहा
सदय भास्कर ये उदयाचलीं
बघुनि ही धरणी अति तोषली १

सुबक सुंदर ती गगनांतली
हळु हळू गळली सुमनावली *
कुसुमपंक्ति धरेवर खालतीं
विकसती हसती बहु खेळती २

भयद व्याघ्र पळोनि वनांतरीं
दडाति भीति गमे बहु अंतरीं
कपि[1], ससे, हरिणें गृह सोडिती
त्यजाति भीति वनीं सुख सेविती ३

अशुभ हीं घुबडें वटवाघुळें
लपुनियां बसतीं रविच्यामुळें
मधुरवें शुक कोकिल वानितीं
गुणगणा रविच्या सुख मानिती[2] ४

उपवनें नगरें गिरि तीं वनें
बहुत रम्य गृहें नदिचीं जलें
रजनिनें सकलां तम फासिलें
बनवलें अति कृष्ण तयां वळें[3] ५

सदय भास्कर ये उदयाचला
पुनरपि करि सुंदर त्यांजला

* सुमनावली, सुमन+आवली=फुलांची ओळ. गगनांतील सुमनावली. आका-शांतलि फुलें म्हणजे तारे. १ वानर. २. मानताल. ३ काळे.

अरुण कांति तयांप्रति देत तो
जनहितीं बहु सज्जन रंगतो ६

उपवनीं पवनीं वनिं नाचती
रुचिर हीं किरणें रविचीं किती
बदलती बहु रंगाहि आपुले
असति चंचलचित्त जनीं मुलें ७

हळु हळू वरतीं रवि येतसे
धरणिला नव जीवन देतसे
दिनभरीं झटतो सुख द्यावया
क्षणहि विश्रम तो न मिळे तया ८

विविध रंग नभीं खुलती किती
पसरती सुमनें मधु गंध तीं
खगतती,[१] करि मंजुळ गायन
सुखवि शीतल मारुत वाहुन ९

वनिं जनीं नगरीं गिरिचे वरी
उपवनीं पवनीं तरुचे शिरीं
सुखद हें पसरे नव जीवन
बघुनि विस्मित हें बनतें मन १०

दिसतसे बहु शांत मनोहर
समय हा सुखदायक मंगल
सदय वत्सल त्या प्रभुसेवना
समय हा बहु योग्य गमे मना ११

विनत भाव धरूं प्रभुला स्मरूं
विमल चित्त समर्पण त्या करूं
सुयश गाउनि ठेवुं हृदीं तया
असुजलें चरणा भिजवोनियां

---

१ पक्ष्यांची ओळ.

# मुलांकरितां गोष्टी.

## तीन बहिणी.

फार दिवसांमागें एका रानात एक शेतकरी राहात होता. या रानांत फार दाट झाडी असे. शेतकऱ्यानें आपली झोपडी या रानाचे मध्यें बांधली होती व तेथून बऱ्याच अंतरावर त्याचें शेत होतें. तो शेतकरी सकाळींच उठे व शेतावर कामाला जाई. दुपारीं तो जेवावयास परत येई व जेवल्यावर पुन्हां शेतावर जाई व संध्याकाळीं परत येई. या शेतकऱ्याला तीन मुली होत्या.

एके दिवशीं सकाळीं शेतकरी आपल्या बायकोला म्हणाला, 'मी आज दुपारीं घरीं जेवावयास येणार नाहीं. शेतांत काम फार आहे, तर तूं एका मुलीबरोबर माझें जेवण शेतावर धाडून दे.' त्याची बायको म्हणाली, 'आपल्या झोपडीचे भोंवतीं रान फार दाट आहे. मुलीला शेताचा रस्ता सांपडणार नाहीं. ती रस्ता चुकेल व रानांत कोठेंतरी भटकत राहील.' शेतकरी म्हणाला, 'मी आतां शेतावर जातांना वाटेनें गव्हाचे दाणे टाकीत जातों म्हणजे आपल्या मुलीला शेताचा रस्ता बरोबर सांपडेल.' असें म्हणून तो शेतकरी शेतावर गेला. दुपारीं त्याच्या बायकोनें त्याचें जेवण तयार केलें व तें भाड्यांत घालून तें भांडें थोरल्या मुलीचे जवळ दिलें. ती म्हणाली, 'मुली गव्हाचे दाणे पहात जा म्हणजे तुला शेताचा रस्ता बरोबर सापडेल व तूं नेमकी शेतावर जाऊन पोहोंचशील. येतांना तूं एकटी येऊं नकोस, आपल्या बापाबरोबर परत ये.'

ती मुलगी बापाचें जेवण घेऊन निघाली. गव्हाचे दाणे पहात पहात ती रस्ता काढीत चालली. कांहीं वेळ तिला रस्ता सांपडला, पण पुढें तिला गव्हाचे दाणे दिसेनात. कारण ते पक्ष्यांनीं खाल्ले होते. पुढें ती रस्ता

चुकली व रानांत भटक भटक भटकली. तिला बापाचें शेत सांपडलें नाहीं. संध्याकाळ झाली, तरी तिला रस्ता सांपडला नाहीं. ती फार दमली. अंधार पडूं लागला. आतां कोठें जावें हें तिला कळेना. तिला रानांत जनावरांची भीति वाटूं लागली. इतक्यांत तिला एक दिवा दिसला, त्या दिव्याच्याकडे ती गेली. तो दिवा एका झोपडीच्या आंत होता. झोपडीचें दार बंद होतें. तिनें दार वाजविलें. आंतून तिला कोणी विचारिलें, कोण आहे ? ती म्हणाली, 'मी एक गरीब मुलगी आहे. माझा रस्ता चुकून मी भटकत आहें. मला फार तहान व भूक लागली आहे.' दरवाजाची कडी उघडली. त्या मुलीनें पाहिलें तों आंत एक फार म्हातारा मनुष्य विस्तवाजवळ बसला होता. त्याच्याजवळ एक पोपट, एक कबूतर व एक कुत्रा बसलेला होता. म्हाताऱ्यानें या मुलीला शेकोटीजवळ बसण्यास सांगितलें. मग तिनें झोपडीच्या रांजणांतील पाणी घेऊन हातपाय धुतले व आपल्या जवळचें फराळाचें खाल्लें व ती पाणी प्याली. मग तिला हुशारी वाटली. ती म्हाताऱ्याला म्हणाली 'मला आता झोंप येत आहे. मी कोठें निजूं ? मला अंथरण्यास व पांघरण्यास कांहींतरी द्या.' म्हातारा पोपटाकडे वळून म्हणाला, 'पोपटा ही मुलगी कोठें निजेल ? व हिला अंथरावयास काय द्यावें ?' पोपट म्हणाला,

'म्हाताऱ्याला मदत न करिते,
पशुपक्ष्यांला विसरुनि जाते,
अप्पलपोटी मुलगी दिसते,
जागा मुळिं नच तिजला एथें.'

कबूतर व कुत्रा यांनींही मान हलवून जागा देऊं नका असें सांगितलें. मग ती मुलगी झोपडीच्या बाहेर गेली. तेथें एक गाईचा गोठा होता. त्या गोठ्यांत ती जमिनीवरच निजली.

दुसऱ्या दिवशीं शेतकरी शेतावर जातांना आपल्या बायकोस म्हणाला, 'मधल्या मुलीच्या बरोबर माझें जेवण लावून दे. मला घरीं यावयाला वेळ नाहीं' बायको म्हणाली, 'मुलीला वाट सांपडणार नाहीं. काल आपली थोरली मुलगी गेली ती अद्याप आली नाहीं.' शेतकरी म्हणाला,' ती वाट चुकून भटकत असेल, पण ती आतां येईल, तिची काळजी करूं नकोस; मधल्या मुलीबरोबर मला जेवण धाडून दे. मी तांदळाचे दाणे वाटेनें टाकीत जातों म्हणजे तिला नेमका रस्ता सांपडेल.' त्या बाईनें जेवण तयार केलें व तें भांड्यांत भरून मधल्या मुलीच्याबरोबर दिलें व तिला सांगितलें, 'तुझ्या बापानें तांदळाचे दाणे रस्त्यानें टाकले आहेत ते पहात जा, म्हणजे तुला शेताचा रस्ता सांपडेल. ती मुलगी तांदूळ पहात शेताकडे चालली. काहीं रस्ता गेल्यावर पहाते तों तिला तांदूळ कोठेंच दिसेनात. ते पक्ष्यांनीं खाऊन टाकिले होते. ती रस्ता चुकली व साऱ्या रानांत भटकली. रात्र पडल्यावर तिला त्या म्हाताऱ्याच्या झोपडीचा दिवा दिसला; ती तेथें गेली. झोपडीचे दारावर तिनें थाप मारली. आंतून तिला कोणी विचारिलें, 'कोण आहे?' ती म्हणाली, ' मी एक गरीब मुलगी रस्ता चुकून भटकत व फिरत आहें. मी आंत येऊं का ? ' झोपडीचें दार उघडलें. तिनें पाहिलें कीं एक अगदीं म्हातारा गृहस्थ शेकोटीजवळ बसला आहे. त्याचे-जवळ एक पोपट, एक कुत्रा व एक कोंबडा आहे. ती मुलगी शेकोटी-जवळ बसली. मग तिनें रांजणांतील पाणी घेऊन हातपाय धुतले व बापाकरितां नेत असलेलें जेवण फस्त केलें. जेवल्यावर तिला हुशारी वाटली. ती म्हणाली, 'मी कोठें निजूं ? मला झोंप येत आहे. मला निजावयाला अंथरूण द्या.' म्हातारा पोपटाकडे वळून म्हणाला, 'पोपटा ही मुलगी कोठें निजेल ?' पोपट म्हणाला,

'म्हाताऱ्याला मदत न करिते.
पशुपक्ष्याना विसरुनि जाते.

आप्पलपेटी मुलगी दिसते.
निजावयाला स्थळ नच एथें.'

मग ती मुलगी झोपडीचे बाहेर गाईचे गोठ्यांत भुईवर निजली.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं तो शेतकरी बायकोला म्हणाला, 'आपल्या दोन पोरी रानांत कोठें तरी भटकत असतील. आज माझें पेरणीचें काम संपेल. मग मी संध्याकाळीं त्यांना शोधून घरीं आणतों. पण आज माझें जेवण धाकट्या मुलीबरोबर पाठवून दे. मी वाटेनें गाजरें टाकीत जातों म्हणजे पक्षी तीं खाणार नाहींत व मुलीला वाट सांपडेल.' बायकोनें त्याचें जेवण तयार केलें व धाकट्या मुलीबरोबर तें पाठवून दिलें व वाटेनें गाजरें पाहात जा म्हणजे तूं शेतावर पोहोंचशील असें तिला बजाविलं. मुलगी जेवण घेऊन निघाली व गाजरें पाहात चालली. कांहीं वेळ तिला वाट सांपडली, पण पुढें गाजरें हरणांनीं खाऊन टाकिलीं होतीं, यामुळें तिला वाट सांपडेना. ती वाट चुकली व सारा दिवस रानांत भटकली. रात्र पडली. तिला तो झोपडीचा दिवा दिसला. ती झोपडीजवळ गेली. तिनें झोपडीचें दार खडखडलें. आंतून तिला कोणीं विचारलें 'कोण आहे?' ती म्हणाली, 'मी गरीब मुलगी आहें. मी रस्ता चुकलें आहें. मी आंत येऊं का?' झोपडीचें दार उघडलें. एक म्हातारा व त्याचा कुत्रा, पोपट व कोंबडा शेकोटीजवळ बसले आहेत असें तिनें पाहिलें. ती आंत गेली. कांहीं वेळ शेकोटीजवळ बसली. मग तिनें आपले हातपाय धुतले. तिनें दोन थाळ्या घेतल्या. आपल्या जवळचें फराळाचें मांडें काढून तिनें दोन्ही थाळ्या भरल्या. तिनें कुत्र्याला भाकरी टाकली व भाकरीचे कांहीं तुकडे कोंबड्याचे व पोपटाचे पुढें ठेविले. मग तीं सर्वजण जेवलीं. तिनें पोपटाला, कुत्र्याला व कोंबड्याला पिण्याला पाणी दिलें. सर्वांचें जेवण झाल्यावर तिनें ती जागा झाडून साफ केली व शेकोटीजवळ म्हाताऱ्याला अंथरूण घालून दिलें. मग ती म्हाताऱ्याला म्हणाली,

'मला कांहीं अंथरावयास आहे काय ?' म्हातारा म्हणाला, 'पोपटा या मुलीची निजावयाची सोय कोठें करावी ? ' पोपट म्हणाला,

'म्हाताऱ्याला मदत करीते.
पशुपक्ष्यांची अठवण धरिते.
परोपकारी मुलगी दिसते.
निजावयाला जागा एथें. '

म्हाताऱ्यानें तिला शेकोटीजवळ निजण्यास सांगितलें व तिला एक घोंगडी दिली.

सकाळीं ती मुलगी जागी झाली आणि पाहाते तों आपण मोठ्या दिवाणखान्यांत निजलों आहों. आपणाजवळ एक सुंदर तरुण राजपुत्र व त्याचे तीन सरदार उभे आहेत. हें पाहून तिला फार आश्चर्य वाटलें व ती झटकन उठून उभी राहिली. तें पाहून तो राजपुत्र म्हणाला, 'मुली तुला आश्चर्य वाटूं देऊं नको. तुला मी आपली हकिकत सांगतों. मी राजपुत्र आहें व हे माझे तिघे सरदार आहेत. मी या अरण्यांत एक राजवाडा बांधला व तेथें राहून आम्ही दररोज शेंकडों पशूंची शिकार करीत असूं. एकदां आम्ही एका ऋषीच्या आश्रमांतील हरिणें मारलीं. तेव्हां त्या ऋषीनें मला शाप दिला कीं, तुझ्या राजवाड्याची भिकार झोंपडी होईल. तूं म्हातारा जरखड होशील. तुझे सरदार कुत्रा, कोंबडा व पोपट होतील. मग आम्ही त्या ऋषीचे पायां पडून त्याची क्षमा मागितली. तेव्हां तो म्हणाला, 'जेव्हां तुम्हांला खरी परोपकारी मुलगी भेटेल तेव्हां माझा हा शाप संपेल.' हे मुली तुझ्यामुळें आम्ही चौघेजण पुन्हा पहिल्याप्रमाणें झालों आहोंत. '

त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्या राजपुत्राचें व त्या मुलीचें मोठ्या थाटानें लग्न झालें. ती मुलगी पूर्वींप्रमाणें परोपकार करण्यांतच आपलें आयुष्य घालवीत असे.

---

# इजिप्त व सौडन.

हिंदुस्थानांत इंग्लिश राज्य स्थापन झाल्यावर सुएझचा कालवा खोदला व सर्व व्यापार या मार्गानें आगबोटीनें सुरू झाला. त्यापूर्वी सुद्धां या बाजूनें बराच व्यापार चालत असे. तेंव्हा या बाजूनें चालणाऱ्या व्यापाराचा मार्ग सुरक्षित राहाणें हें इंग्लिशांस फार आवश्यक वाटूं लागलें. तेव्हां हा कालवा व तांबडासमुद्र या लगतचे देशांत अंदाधुंदी माजूं नये म्हणून या मार्गावरील देशांत आपलें वर्चस्व असावें असें इंग्लिशांना वाटणें स्वाभाविकच होतें.

सुएझची संयोगीभूमि खणून त्या ठिकाणीं कालवा खणण्याची युक्ति फ्रेंच इंजिनियर लेसेप्स यानें योजिली व हा कालवा इजिप्त देशाला फार फायदेशीर असल्यानें तेथील खेदीवाच्या संमतीनें हा कालवा खणण्याचें काम १८५९ सालीं सुरू होऊन तें १८६९ सालीं संपलें. या फ्रेंच इंजिनियरनें हें काम हातीं घेण्यापूर्वी इजिप्त देशानें या कामासाठीं १,६०,००,००० पौंड व हजारों मनुष्यें खर्चीं घातलीं होतीं. फ्रान्सच्या इंजिनियरकडून हें काम करण्यापूर्वी फ्रान्स व इजिप्त या दोन देशांत या बाबतींत करार ठरला होता. त्या अन्वयें इजिप्त सरकारनें या कामासाठीं लागणारे सर्व मजूर पुरविण्याचें कबूल केलें होतें. पण त्या कामांत हजारों लोक मरण पावून देशांतील लोकसंख्येवर अनिष्ट परिणाम होऊं लागल्यामुळें ही अट मोडून फ्रेंच कंपनीला खर्चाची भरपाई करून द्यावी लागली.

खेदीव ( इजिप्तचा राजा ) तुर्कस्थानच्या पोर्टचा (खलिफाचा) मांडलीक होता व त्याला स्वामित्वाबद्दल तुर्कस्थानच्या खलिफास साडे सात लक्ष पौंड दरसाल भरावे लागत. ही रक्कम दरसाल चुकती केली म्हणजे

इजिप्तच्या अन्तर्गत कारभारांत तुर्की सरकार बिलकूल ढवळाढवळ करीत नसे व खेदीव हा स्वतंत्र राजाप्रमाणेंच आपल्या देशांत मुखत्यारीनें राज्यकारभार चालवीत असे.

वर सांगितल्याप्रमाणें फ्रेंचांना मोबदल्यादाखल बरीच रक्कम द्यावी लागल्यामुळें इजिप्तला कर्ज झालें व त्या कर्जाची फेड करण्यासाठीं त्या सरकारनें पुष्कळसे शेअर्स (भाग) विकावयास काढिले. १८६९ सालीं कालवा उघडला. त्यावेळीं इंग्लंडांत डिझ्राइली या नांवाचा मुख्य प्रधान होता. या शेअर्सची बातमी त्याला लागल्याबरोबर त्यानें गुप्त रीतीनें ४० लक्ष पौंडांस १,७७,००० शेअर्स विकत घेतले. पुढें १८७९ सालीं इजिप्त सरकारच्या खजिन्यांत पैशाची मोठी तूट पडून त्या सरकारचें दिवाळें वाजण्याची वेळ आली. त्यामुळें ज्यांनीं त्या सरकारास कर्ज दिलें होतें, त्यांनीं हक्कसंरक्षणासाठीं गादीवर असलेल्या उधळ्या इस्मायल पाच्छास पदच्युत केलें व त्याचा मुलगा टयूफिक यास गादीवर बसविलें. इंग्लंड व फ्रान्स या देशांनीं बरेच शेअर्स (भाग) घेतले असल्यामुळें इजिप्तच्या आर्थिक बाबतींत लक्ष घालणें त्यांस जरूर वाटलें व त्याप्रमाणें तेथील राज्यव्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठीं इजिप्तच्या दरबारीं त्यांनीं कंट्रोलर जनरल या नावाचे दोन अधिकारी ठेविले व राज्यव्यवस्थेवर चांगलाच दाब बसविला. परंतु परकीय लोकांची राज्यव्यवस्थेंतील ढवळाढवळ पुष्कळ इजिप्शियन लोकांना आवडली नाहीं व त्यांच्यांत बराच असंतोष पसरला.

१८८२ सालीं इजिप्शियन सैन्यांतील आराबीपाशा नावाच्या एका अधिकाऱ्यास पुढारी बनवून या लोकानीं अलेक्झांड्रिया शहरीं (नाइल नदीच्या मुखाजवळ) बंडाचें निशाण उभारलें. या बंडास भिऊन फ्रान्सनें आपला इजिप्तमधील कंट्रोलर जनरल परत बोलाविला व या बाबतींत इंग्लंडला मदत करण्याचें नाकारलें. पण सुएझ काल-

त्याशीं आपला निकट संबंध येणार असल्यानें आराबीपाशा वागेल तसें त्यास वागूं देणें व आपला जलमार्ग धोक्यांत ठेवणें हें इंग्लिशांस इष्ट वाटलें नाहीं. म्हणून फ्रेंच मदत करोत वा न करोत हें बंड मोडण्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेणें इंग्लिशांना आवश्यक वाटलें.

इंग्लंडनें लागलीच युद्धाची तयारी केली व सर बोचांप सीमूर याच्या हाताखालीं आरमार देऊन त्यास अलेक्झांड्रिया बंदराकडे रवाना केलें. तेथें तोफांचा मारा करून त्यानें आराबीच्या ताब्यांतील किल्ले उडवून दिले. तसेंच गॉर्नेट ऊर्फ लॉर्ड वोलसले या सेनापतीनें टेल–एल्–केबीर येथील लढाईत आराबी–पाशाचा पूर्ण पराभव करून त्यास कैद केलें. अशा रीतीनें इजिप्तमध्यें इंग्लिशांची सत्ता प्रस्थापित झाली.

इजिप्तच्या खेदिवाच्या ताब्यांत सौडन हा भाग होता. इजिप्तमध्यें धामधूम बंद होते तोंच या प्रांतांत बंड झालें. हा प्रांत उत्तरेस वाडीहाल्फा पासून ते दक्षिणेस युगांडा प्रांताच्या उत्तर सरहद्दीपर्यंत पसरला आहे. या प्रांतांतील बगारा जातीच्या एका पुढाऱ्याच्या हातांत सौडन प्रांताचा कारभार होता. त्यानें तेथील आरब लोकांना इजिप्तच्या अंमलाविरुद्ध बंड करण्यास चिथाविलें. त्यानें आपणांस ‘महादी’ म्हणजे पुढारी ही पदवी धारण केली व आपण बारावा इमाम आहों असें तो लोकांस सांगूं लागला.

इंग्लिशांनीं हिक्सपाशा या इजिप्शियन सेनापतीच्या हाताखालीं ११००० सैन्य देऊन त्यास त्या बंडाचा मोड करण्यास पाठविलें. त्यानें कार्डोफन प्रांतांतील एल् ओबीड या ठिकाणीं बंडवाल्यांस गाठलें. पण त्याचा पूर्ण पराभव करून बंडवाले थेट खार्टुम शहरापर्यंत चाल करून आले. तेव्हां इंग्लिशांनीं त्या कामावर जनरल गॉर्डन यांची नेमणूक केली. ज्या प्रांतांतून सैन्य जावयाचें होतें तो प्रांत उजाड असून सैन्याचे फार

झाले होते. बंडवाले तद्देशीय असल्यानें त्यांना त्या राहाणीचा सराव झालेला होता. यामुळें खार्टुम येथें या सेनापतीचें सैन्य आल्यावर बंडवाल्यांनीं त्यावर हल्ला केला. बंडवाल्यांच्या मानानें हें सैन्य थोडें असल्यामुळें बचावासाठीं गॉर्डन यास तेथील किल्ल्याचा आश्रय करावा लागला. त्याच्या मदतीस मागाहून जनरल वोलसले यांच्या हाताखालीं एक सैन्याची तुकडी रवाना झाली होती. पण ती तुकडी येण्यापूर्वीं बंडवाल्यांनीं जोर करून त्या किल्ल्यावर हल्ला चढविला व त्या हल्ल्यांत मदत येण्यापूर्वींच जनरल गॉर्डन हा बंडवाल्याकडून मारला गेला. ही गोष्ट १८८९ सालीं झाली. यानंतर इंग्लिशांनीं सौडनकडे कांहीं वर्षें लक्ष दिलें नाहीं.

मध्यंतरीं कित्येक वर्षें इजिप्तमधील शेतकरी वर्ग करांच्या ओझ्याखालीं वांकून गेला होता व याशिवाय बिगार अगर वेठ यामुळें त्रस्त होऊन गेला होता. सर्व देश शांततेसाठीं भुकेला होता. अशा वेळीं लोकांना संतुष्ट करण्यास दोन गोष्टींची आवश्यकता होती. ( १ ) न्याय (२) सुबत्ता. या दोन गोष्टींकडे इंग्लंडनें प्रथमतः लक्ष दिलें. यावेळीं इजिप्तवर पाठविलेला अधिकारी लॉर्ड क्रोमर यानें न्याय देण्याची उत्तम पद्धति स्थापन केली व नाइल नदीला असुअन या ठिकाणीं मोठें धरण बांधून शेतीसाठीं पाणी पुरविण्याची योजना अमलांत आणिली. अशा रीतीनें फेल्लाहीन अगर इजिप्तमधील शेतकरी वर्गाचे धन्यवाद मिळविले.

मध्यंतरीं लॉर्ड किचेनर या सेनापतीनें इजिप्तमध्यें इजिप्शियन व सुडानी शिपायांचें एक सैन्य तयार केलें व सौडनवर स्वारी करण्याची तयारी चालविली. १८९६ सालीं किचनेर साहेबांनीं सौडनवर स्वारी केली. त्यांनीं वाडीहाफा पासून अबुहमेदपर्यंत नाइल नदीच्या खोऱ्यां-

तुन रेल्वे रस्ता बांधून काढला व त्या मार्गानें आपलें सैन्य सौडन प्रांतांत उतरविलें. तेथें पोहोंचल्यावर त्यांनीं डोंगोला हें ठिकाण घेतलें. १८९८ सालीं आतबारा या ठिकाणीं तेथील खलीफाच्या ( महादीनंतर दरवेशी लोकांचा बनलेला पुढारी ) सैन्याचा मोड झाला व त्यानंतर खार्टूमजवळ ओमदूरमन या ठिकाणीं दरवेशी सैन्य पार उधळून लाविलें. या लढाईनंतर खलीफा पळाला पण त्यास पुढील सालीं पकडून ठार मारण्यांत आलें. अशा रीतीनें सौडन प्रांत काबीज करण्यांत आला.

१९१४ सालीं जर्मनीबरोबर युद्ध सुरू झालें. तेव्हां इजिप्तचा खेदीव आबास हिल्मी यानें जर्मनी व तुर्कस्थान यांचा पक्ष स्वकारल्यामुळें, इंग्लिशांनीं त्याचा चुलता हुसेन कामील यास इजिप्तच्या गादीवर सुलतान म्हणून बसविलें व इजिप्तवर इंग्लिशांचा अंमल स्थापन झाल्याचें जाहीर केलें. हुसेन कामील १९१७ सालीं मरण पावल्यावर त्याचे जागीं त्याचा भाऊ अहमद फुअद याची इंग्लिशांनीं त्या गादीवर योजना केली.

१९१८ सालानंतर इजिप्तला स्वातंत्र्य देण्यासंबंधाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. सौडन प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत राहाणार. अद्याप या दोनही देशांच्या संबंधाचे प्रश्न निश्चितपणें सुटले नाहींत. पण हिंदुस्थानापेक्षां इजिप्त देशांतील लोक राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें पुढच्या पायरीवर उभे आहेत असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

# टिल्लू.

एक आटपाट नगर होतें. त्या शहरांत एक गरीब शिंपीण राहात असे. तिला तीन मुली व एक टिल्लू नांवाचा मुलगा होता. ती बाई व त्या मुली मोठ्या उद्योगी होत्या, आळस त्यांना माहीत नव्हता. रात्रंदिवस खपून त्या शिवणकाम करीत. तरीपण त्यांना पोटाला पुरेसे पैसे मिळत नसत. त्यामुळें त्यांची उपासमार होत असे. टिल्लू कधींही कामाला हात लावीत नसे. तो स्वभावानें अतिशय गरीब, परंतु पहिल्या नंबरचा आळशी होता. हातावर पाणी पडलें कीं तो टोळासारखा गांवांत चकाट्या मारीत हिंडावयाचा मात्र जेवावयाच्या वेळेस नेमका हजर. वेळीं आईनें सांगितलें बाजारांत जा व दोन आण्यांचा दोरा घेऊन ये, तर त्यानें त्या पैशांचा चिवडाच आणावा! कधीं रेशीम आणावयास सांगितलें तर पेढेच आणावे. असें तो नेहमीं करी. त्यामुळें त्याची आई अगदीं त्रासून गेली. एकदां ती रागारागानें काठी घेऊन त्याच्या अंगावर धावली. त्या सरशीं तो धूम पळाला व या गल्लींतून त्या गल्लींत, त्या गल्लींतून दुसऱ्या पेठेंत असा पळत पळत शहराच्या बाहेर आला व तेथेंही न थांबतां शेतें, मळे, ओढे, खांच खळगे, लहान मोठ्या टेकड्या ओलांडीत एक सारखा पळतच चालला. शेवटीं पळत पळत एका डोंगराच्या शिखरावर आला; त्या वेळीं त्याला खुप दम लागला, म्हणून विसांवा घेण्याकरितां तेथें तो जमिनीवर पसरला. तितक्यांत त्याला एक गाढव दिसलें. तेव्हां या गाढवावर बसून पळून जावें असा त्यानें बेत केला. लागलीच त्या गाढवाजवळ तो गेला व त्याच्यावर बसला. त्या सरशीं गाढव चौखूर पळावयास लागलें व तें पळत असतांना त्याच्या पाठींत एका काठीचे रट्टे बसूं लागले. ती काठी होती जादूची! ती जमिनीवर पडे व गाढवाच्या पाठींत बसे, त्यामुळें गाढव सारखें भरधांव पळूं लागलें. तें पळत असतांना टिल्लू त्याच्या मानेवरील केसांला धरून, पडूं नये म्हणून त्या गाढवावर वाकून बसला होता. पुढें तें गाढव पळतां पळतां डोंगराच्या एका गुहेजवळ आलें व एकदम थबकलें, त्या सरशीं टिल्लू त्या गाढवाच्या मानेवरून घसरून गुहेंत जाऊन आदळला. तो कांहीं वेळ तसाच तेथें निचेष्ट पडला. पुढें डोळे उघडून पाहातो

तों एक मोठा अगडबंब भयंकर राक्षस त्याला दिसला. त्याचें नाक लोहाराच्या भात्याएवढें मोठें होतें. त्याच्या कपाळावर गाडीच्या चाकाएवढा एक डोळा होता. त्याला पाहतांच टिल्लू घाबरला; परंतु तो राक्षस दयाळू आहे असें त्याच्या हंसतमुख चेहऱ्यावरून त्याला वाटलें. राक्षस बोलला, 'मुला, तूं कोण व तुला कोठें जावयाचें आहे ?' टिल्लू त्याला म्हणाला, 'महाराज, मला कोठें जावयाचें आहे, हें आपण सांगाल काय ?' हें मूर्खपणाचें बोलणें ऐकून राक्षस, गाढव व ती काठी मोठमोठ्यानें खदखदा हसूं लागलीं. तसा टिल्लूही हसूं लागला. राक्षस म्हणाला, 'बाळ, घाबरूं नकोस. तूं येथें आनंदानें राहा.' तेव्हां टिल्लू कबूल झाला व तेथेंच तो राहिला. याप्रमाणें चार वर्षें गेलीं. टिल्लू आनंदांत होता. एके दिवशीं निजला असतांना त्याला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत आपली थोरली बहीण फार आजारी आहे, व आई रडत आहे, असें त्याला दिसलें. त्यासरशीं तो रडूं लागला व रडतां रडतां जागा झाला. तेव्हां राक्षस व गाढव रडूं लागलें. राक्षसानें त्याला रडण्याचें कारण विचारिलें. टिल्लू म्हणाला, 'मला स्वप्न पडलें कीं, ताई फार अजारी आहे. मला आतां घरीं गेलेंच पाहिजे, व आईला व ताईला भेटलें पाहिजे.' तेव्हां राक्षस म्हणाला, 'जा, परंतु रिकाम्या हातांनीं जाऊं नकोस. ही हंसी घेऊन जा. मात्र लक्षांत ठेव. घरीं जाईपर्यंत 'हंसी हंसी अंडें घाल' असें बोलावयाचें नाहीं.' तें त्यानें कबूल केलें व हंसीला झाकून घेऊन गाढवावर बसला. तेव्हां गाढव पळत पळत पूर्वीं ज्या ठिकाणीं टिल्लू गाढवावर बसला होता त्या ठिकाणीं येऊन तें थडकलें, व एकदम थांबलें. त्यासरशीं टिल्लू मानेवरून घसरून खालीं पडला व गाढव नाहींसें झालें.

मग टिल्लूनें ती हंसी बाहेर काढली व म्हणाला, मला घरीं पोंचेपर्यंत 'हंसी हंसी अंडें घाल' असें म्हणावयाचें नाहीं; पण ते शब्द उच्चारतांच तिनें तीन सोन्याचीं अंडीं घातलीं. मग टिल्लू ती हंसी व तीं अंडीं घेऊन तसाच पळत पळत चालला. वाटेंत त्याला गांव लागलें. संध्याकाळ झाल्यामुळें त्यानें तेथें राहण्याचा बेत केला. तो एका खाणावळींत गेला व मालकाला म्हणाला, माझी रात्रीच्या रात्र जेवण्याची व राहाण्याची व्यवस्था करा. मालकानें कबूल केलें. तेव्हां टिल्लूनें ती हंसी मालकाजवळ दिली व

म्हणाला, 'तुम्ही रात्रीं ही ठेवा व सकाळीं जातांना मला द्या. मात्र 'हंसी हंसी अंडीं घाल असें म्हणूं नका.' त्यानें तें कबूल केलें. रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर त्या खाणावळवाल्यानें तो हंसी काढली व हंसी हंसी अंडीं घाल, असें तो तिला म्हणाला. त्याबरोबर तिनें दोन तीन सोन्याचीं अंडीं घातलीं. तेव्हां खाणावळवाल्याच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यानें दुसऱ्या दिवशीं टिल्लू जातांना एक हुबेहूब दुसरी हंसी त्याला दिली व अंडीं घालणारी हंसी त्यानें लपवून ठेविली. शिवाय खाणावळवाल्यानें एका रात्रीचे टिल्लूपाशीं पांचशें रुपये मागितले. तेव्हां टिल्लूनें आपल्या जवळचीं सोन्याचीं तीन अंडीं त्याला दिलीं व ती खोटी हंसी घेऊन मोठ्या आनंदानें पळत पळत घरीं आला. त्याला पाहतांच सर्वांना आनंद झाला. तेव्हां तो म्हणाला, आतां कांहीं खाण्यापिण्याची काळजी नाहीं. मजजवळ हंसी आहे, ती सोन्याचीं अंडीं घालते. असें म्हणून त्यानें ती हंसी बाहेर काढिली व हंसी हंसी अंडी घाल असें चार पांच वेळां तो म्हणाला; तरी ती अंडीं घालीना. तेव्हां हा गाढव आपली थट्टा करतो असें म्हणून आई रागारागानें काठी घेऊन त्याच्यामागें लागली. त्या सरशीं तो पूर्वी प्रमाणें धूम पळाला व शेतें, मळे ओढे, टेकड्या ओलांडून डोंगरावर आला. तों तेथें पूर्वींचें गाढव दिसलें तेव्हां तो त्यावर बसला व पळत पळत गुहेंत येऊन राक्षसापुढें आदळला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला पूर्वींप्रमाणें आणखी स्वप्न पडलें व आपली दुसरी बहीण अजारी आहे, व आई रडते आहे असें दिसलें. तेव्हां तो रडतां रडतां जागा झाला व मी घरीं जातों म्हणून राक्षसाला म्हणाला. तेव्हां राक्षस म्हणाला, रिकाम्या हातांनीं जाऊं नकोस. हा जादूचा रुमाल घे. मात्र '—रुमाला रुमाला पसर पसर—' असें घरीं जाऊन पोहोंचेपर्यंत म्हणूं नकोस. तेव्हां बरें म्हणून तो रुमाल खिशांत घालून गाढवावर बसून निघाला व पूर्वींप्रमाणें डोंगराच्या शिखरापर्यंत आला. तेथें गाढव नाहींसें झालें, तेव्हां त्यानें रुमाल बाहेर काढला व रुमाला रुमाला पसर पसर असें घरीं जाईपर्यंत म्हणावयाचें नाहीं असें बोलला. परंतु ते शब्द उच्चारतांच पंचपक्वान्नाचें ताट उत्पन्न झालें, मग त्यानें ते गोड गोड पदार्थ खाल्ले व तो रुमाल खिशांत घातला. तो चालत चालत पूर्वींप्रमाणें त्यापूर्वींच्या

खाणावळींत संध्याकाळीं आला व मला रात्रीं येथें राहावयाचें आहे, असें त्यानें मालकास सांगितलें. तो म्हणाला सकाळपर्यंत हा रुमाल जपून ठेवा, मात्र रुमाला रुमाला पसर पसर असें म्हणूं नका. मालकानें बरें म्हणून सांगितलें. रात्रीं सामसूम झाल्यावर त्यानें तो रुमाल बाहेर काढला व रुमाला रुमाला पसर पसर असें तो म्हणाला. त्याबरोबर पंचपक्वान्नाचीं ताटें उत्पन्न झालीं ! खाणावळवाल्याच्या तोंडाला पाणी सुटलें व त्यानें दुसरे दिवशीं सकाळीं टिल्लू जातांना तो जादूचा रुमाल लपवून ठेवून दुसरा तसाच एक रुमाल त्याला दिला, व त्याला वाटेला लावलें. टिल्ल तडक घरीं आला. सर्वांना भेटला, तेव्हां मंडळींना आनंद झाला. टिल्लु म्हणाला, 'आई, खाण्यापिण्याची कांहीं पंचाईत नाहीं. आतां मी गंमत दाखवितों.' असें म्हणून त्यानें रुमाल काढला व रुमाला रुमाला पसर पसर असें पांच सहा वेळां म्हणाला तरी पक्वान्न उत्पन्न झालें नाहीं. तेव्हां हा थट्टा करतो म्हणून आई पूर्वींप्रमाणें काठी घेऊन त्याला मारायला धावली. तेव्हां तो धूम पळत पळत पूर्वींप्रमाणें डोंगराच्या शिखरावर आला, व तेथें गाढवावर बसून राक्षसाच्या गुहेंत येऊन आदळला. पुढें कांहीं दिवसांनीं आणखी त्याला एक स्वप्न पडलें व आपली तिसरी बहीण आजारी आहे व आई रडते आहे असें त्याला दिसलें. त्यासरशीं तो रडत रडत जागा झाला व घरीं जातों म्हणून राक्षसाला म्हणाला. तेव्हां बरें म्हणून राक्षसानें त्याला एक जादूची काठी दिली व घरीं पोंहोचेंपर्यंत लगाव लगाव, आतां पुरे, असें काठीला म्हणूं नकोस. असें सांगितलें, तेव्हां बरें म्हणून तो गाढवावर बसून निघाला व डोंगराच्या शिखरापर्यंत आला व गाढव नाहींसें झालें. तेव्हां त्यानें काठी बाहेर काढली व लगाव लगाव असें घरीं जाईपर्यंत बोलावयाचें नाहीं असें तो मनांत म्हणाला. परंतु ते शब्द बोलतांच त्याच्या पाठींत रट्टे बसायला लागले. मरायची वेळ आली, तरी रट्टे राहीनात. त्यासरशी आतां पुरे या शब्दाची त्याला आठवण झाली व आतां पुरे असें तो म्हणाला. त्याबरोबर रट्टे थांबले. तेव्हां त्यानें ती काठी घेतली, व तो चालत चालत त्या खाणावळवाल्याच्या येथें आला व रात्रीं मला राहावयाचें आहे असें त्यांस सांगितलें. सकाळपर्यंत ही काठी तुमच्या जवळ ठेवा. मात्र लगाव लगाव असें तिला म्हणूं नका. असें तो म्हणाला, तेव्हां तो बरें म्हणाला. पुढें सामसूम झाल्यावर खाणावळ-

वाल्यानें ती काठी बाहेर काढली, व लगाव लगाव असें तो तिला म्हणाला. त्या बरोबर त्याच्या पाठींत रट्टे बसायला लागले. त्याच्या पाठीवर हिरवे निळे वळ उठले. मरावयाची वेळ आली तरी रट्टे राहीनात. तेव्हां तो ओय ओय करीत मध्यरात्रीं टिल्लूकडे आला, व त्याच्या हातापायां पडायला लागला. तेव्हां टिल्लू म्हणाला, माझी हंसी व रुमाल आधीं आणन दे. तेव्हां त्यानें हंसी व रुमाल पटकन् आणून दिला, व मार थांबावा म्हणून तो टिल्लूच्या हातापायां पडूं लागला. तेव्हां टिल्लूनें ती सोन्याचीं अंडीं घालणारी हंसी हातांत घेतली. जादूचा रुमाल खिशांत घातला. व मग आतां पुरे, असें तोंडानें म्हणाला. त्याबरोबर छडीचा मार थांबला व ती टिल्लूच्या हातांत येऊन बसली. तेव्हां टिल्लूनें घरचा रस्ता धरला. पुढें टिल्लूच्या सर्व बहिणी दुखण्यांतून बऱ्या झाल्या. जादूच्या रुमालामुळें त्यांना दररोज गोड गोड खावयास मिळूं लागले व हंसीनें त्यांना पुष्कळ सोन्याचीं अंडीं दिलीं. तीं सर्व मायलेंकरें आनंदांत राहूं लागलीं. त्यांची गरिबी गेली व त्यांनीं आपलें आयुष्य सुखांत घालविलें. खाणावळवाल्याला मात्र सडकून मार बसला. पुढें टिल्लूला त्या काठीची गरज पडली नाहीं.

---

# स्वित्सर्लंडांतील देखावे.

कॅलेला जातांना आगगाडींत.
ता. २८-८-२४.

प्रिय विद्यार्थिनींनो,

आम्हीं आतां स्वित्सर्लंड सोडलें व इंग्लंडच्या मार्गानें चाललों आहोंत. आम्हीं नुकतेच स्वित्सर्लंडमध्यें जे देखावे पाहिले, त्या मानानें आतां भोंवतालीं दिसणारा देखावा अगदीं साधा व नेहमीं पाहण्यांत येणारा असाच दिसत आहे. स्वित्सर्लंडमधील ते उंच उंच पर्वत, तो बर्फाचा अफाट विस्तार, ते विलक्षण धबधबे, जोरानें वाहणाऱ्या त्या हिमनद्या व तीं देवदार वृक्षांचीं

अरण्यें आतां कोठेंही दिसत नाहींत. आम्हीं स्वित्सर्लंडमध्यें अद्भुत व चित्रविचित्र ‘ शालेज ’ पाहिलीं, त्यामानानें आतां भोंवतालीं दिसणारीं घरें आपण नेहमीं पाहतों त्याप्रमाणें अगदीं साध्या प्रकारचीं दिसतात.

मागें जें पत्र मीं तुम्हांस पाठविलें, त्यामध्यें दोन अत्यंत आश्चर्यकारक देखाव्यांचें वर्णन करावयाचें राहिलें. ते देखावे म्हणजे ट्रुमलबाख धबधबा व युंगफ्राव्ह यॉख शिखर हे होत. यांपैकीं ट्रुमलबाख धबधब्याला मी ‘ गुप्त धबधबा ’ म्हणतें व हें नांव मीं कां दिलें, हें तुम्हांस पुढें कळेल. आल्पस् पर्वतांतील युंग फ्राव्ह नांवाच्या उंच डोंगरावर सोमवारीं जाण्याचा आमचा बेत ठरला होता. परंतु त्या दिवशीं सकाळीं दिशा धुंद झालेल्या होत्या व पर्वतावरही खूप धुकें पसरलेलें होतें. सबब मि. हिच नांवाच्या आमच्या वाटाड्यानें आम्हांस धबधब्याकडे घेऊन जावयाचें ठरविलें. आम्हीं अगोदरच दोन धबधबे पाहिले होते, तेव्हां त्यांसारखेच हे असतील, विशेष जास्त तें काय असणार या समजुतीनें मला प्रथम कांहीं मोठीशी जाण्याची उत्सुकता नव्हती. परंतु ते देखावे खरोखरच पाहाण्यासारखे आहेत, याविषयीं आमचें मन वळविल्यावर जाण्याचा बेत ठरला. प्रत्यक्ष पाहिल्यानंतर ते देखावे खरोखरच उत्कृष्ट व अपूर्व असे होते व आपण ते पाहिले याबद्दल मनाला आज फार आनंद होत आहे.

ज्या ठिकाणीं धबधबा होता, त्या पर्वताच्या पायथ्यापर्यंत आम्ही आगगाडी व मोटार यांच्या साह्यानें गेलों. आम्ही चालत चालत धबधब्याच्या अगदीं जवळ गेलों; तरी पण उंच कड्यावरून पडत असलेलें पाणी आम्हांस कोठेंही दिसलें नाहीं. फक्त पर्वताच्या पायथ्याकडे जोरानें वाहात जाणारा लोंढा दिसला व शेवटीं इतके लांब येऊन आपली निराशा होणार असें मनाला वाटलें. नंतर आम्ही कांहींसें वर चढलों व कापऱ्याला वळसा घालून पुढें येतों तो एक लाकडी सज्जा लागला. ( पहिल्या पत्रांत वर्णन केल्याप्रमाणें कड्याच्या एका अंगाला बांधलेला ) या सज्जावरून चालत चालत आम्ही त्याच्या दुसऱ्या टोकापर्यंत गेलों. तेथें आमच्या डोक्यावरील उंच कड्यावरून पाण्याचा प्रचंड लोंढा खालच्या दरींत उडी घेत असलेला

दृष्टीस पडला. पाण्याच्या तुषारावर सूर्याचे किरण पडल्यामुळें अत्यंत रम्य असें इंद्रधनुष्य उत्पन्न झालेलें होतें. इंद्रधनुष्याचे ते मनोवेधक व चित्र विचित्र रंग व खालीं लाटांनीं उसळणारा पाण्याचा तो प्रचंड फेस हीं पाहून आमच्या चित्तवृत्ति अगदीं स्तंभित झाल्या व आम्ही तेथें बराच वेळ उभे राहिलों. पुढें पर्वताच्या उंच भागांत पाहाण्यासारखे आणखी सुंदर देखावे आहेत, तिकडे चलावें अशी आमच्या वाटाड्यानें विनंती केल्यावरून आम्ही पर्वत चढावयास लागलों व एका कोपऱ्यांत दुसरा एक लाकडी सज्जा होता तेथें आलों. तेथें आमच्या समोर पर्वताच्या एका गुहेंतून पाण्याचा प्रचंड लोंढा, धनुष्यांतून बाण सुटला असतां तो जसा जोरानें व सूं सूं करीत बाहेर पडतो, त्याप्रमाणें राक्षसी शक्तीनें बाहेर पडून खालीं दरीमध्यें खडकावर आपटत होता. तो राक्षसी लोंढा, त्याचा तो आवेश, व त्याची ती भयंकर गर्जना हीं पाहून मनुष्य घटकाभर चकितच होतें. पाणी खालीं दरींत ज्या खडकावर पडत होतें, तेथें पाण्याच्या जोरामुळें खडकाला मोठमोठे खळगे पडले होते, अथवा वाटोळ्या तोंडाच्या उखळ्या तयार झाल्या होत्या असें म्हटलें तरी चालेल.

वर वर्णन केलेल्या धबधब्यापेक्षांही अपूर्व असे चमत्कार तेथें पाहण्यासारखे होते. पर्वताच्या अगदीं पोटांत मध्यभागीं विजेचा एक पाळणा होता तेथें आम्ही आलों. मुंबईस उंच इमारतींमध्यें चढण्याउतरण्याच्या कामीं असलेल्या पाळण्यांचा उपयोग करितात, हें तुम्हांपैकीं पुष्कळांना माहीत आहे; परंतु मुलींनो, हा पाळणा आतां पर्वताच्या पोटांतून आम्हांला वर नेणार होता, हें लक्षांत ठेवा म्हणजे त्या भयंकर व अमानुष देखाव्याची तुम्हांला कांहींशी कल्पना करतां आलीच तर येईल.

त्या विजेच्या पाळण्यांत बसून आम्ही त्या पर्वताच्या पोटांतून हलके, हलके वर वर चाललों. याप्रमाणें पांच मिनिटें आमचा पाळणा वरवर चालला होता व नंतर एकदम थांबला. त्यामुळें धक्यासरशीं आम्ही पाळण्यांतील माणसें एकमेकांच्या अंगावर पडण्याची वेळ आली होती. परंतु आम्ही पाळण्यांत बसण्यापूर्वीं एकमेकाचे हात घट्ट धरून वाटोळे उभे राहण्यासंबंधीं आम्हांला आमच्या वाटाड्यानें अगाऊच सूचना दिली होती.

म्हणून बरें झालें; नाहीं तर आम्ही एकमेकांच्या अंगावर किंवा पाळण्यांत धाडकन् पडलों असतों. पाळणा थांबतांच त्याचें दार उघडलें व आम्हीं एका काळ्या कभिन्न खडकाच्या गुहेंत उतरलों. त्या गुहेंत विजेचे तांबडे व पिवळे दिवे लावलेले होते. त्या गुहेंतून आम्हीं खालीं डोकावून पाहिलें तों काय अद्भुत चमत्कार ! खोल, खोल, अगदीं खोल, ज्याच्या तळाचा पत्ता नाहीं, व ज्याच्या खोलीकडे पाहतांच अंगावर शहारे उत्पन्न होऊन मन घाबरून जाईल असें अत्यंत खोल एक भुयार आम्हांस दिसलें. त्या भुयारांत तांबडे दिवे लावलेले होते व तळाशीं पाण्याच्या प्रचंड लाटा उसळ्या घेत होत्या. असा तो एकवटलेला देखावा पाहात असतांनाच आपण यमलोक तर पाहत नाहींना व भोंवतालच्या काळ्या कभिन्न खडकाच्या भोकांतून भूत, पिशाच्च, राक्षस वगैरे आह्मांकडे कोणी डोकावून तर पहात नाहींना, अशीही मनाला शंका आली ! ! मुलींनो, अरेबियन नाइट्स मधल्या अशा प्रकारच्या भुयारांतील भुताखेतांच्या व राक्षसांच्या काल्पनिक कथा तुम्हीं पुष्कळ वाचल्या असतील; परंतु या अद्भुत, प्रत्यक्ष व लोकोत्तर देखाव्यापुढें त्या काल्पनिक कथा पार वितळून जातात ! हा देखावा पाहिल्यानंतर आम्ही दुसऱ्या एका सज्जावरून चालत चालत या विलक्षण भुयारांतून किंचित् उजेड असलेल्या गुहेच्या तोंडाशीं आलों. या ठिकाणीं अंधुक सूर्यप्रकाश होता व येथूनच खडकावरून पाणी खालीं वाहात जात असलेलें दृष्टीस पडलें. धबधब्याचें हें उगमस्थान होतें. येथून पाणी वाहात वाहात वर वर्णन केलेल्या अंधकारमय खोल व भयंकर अशा भुयारांत तें शिरतें. पुढें तें पाणी भुयारांतून वाहात वाहात खडकांच्या गुहांतून मागें वर्णन केल्याप्रमाणें धनुष्याच्या बाणाप्रमाणें तीव्र गतीनें व धाडधाड असा आवाज करीत करीत खालीं खोल दरींत उडी घेतें व तेथून पुन्हा त्याचा प्रचंड लोंढा खालच्या खडकावर आदळतो. याच ठिकाणीं अगदीं आरंभीं वर्णन केल्याप्रमाणें चित्रविचित्र रंगांचें व रमणीय असें इंद्रधनुष्य पहावयास सांपडतें. नंतर तें पाणी उतारावरून वाहात पर्वताच्या पायथ्यापर्यंत जातें व तेथून पुढें त्याची नदी बनून ती दरींतून वाहात जाते.

मी आजपावेतों इतके अतिशय आश्चर्यकारक धबधबे मुळींच पाहिले नव्हते व या धबधब्यांचा स्वित्सर्लंडमधील लोकांना मोठा अभिमान वाटतो

यांतही मोठें आश्चर्य नाहीं. सर्व जगांत हे धबधबे अप्रतिम सौंदर्याबद्दल विशेष प्रसिद्ध आहेत. युंगफ्राव्ह पर्वतांतून ज्या हिमनद्या वाहतात, त्यांचें पाणी तीव्र वेगानें भयंकर गर्जना करीत व जागोजाग उड्या घेत घेत मागें वर्णन केलेल्या प्रसिद्ध भुयारांत शिरतें व अशा रीतीनें हे प्रेक्षणीय धबधबे बनले आहेत.

या धबधब्यांच्या मालकानें पर्वताच्या मध्यभागीं असलेल्या एका सरोवराचा शोध लावला आहे व कदाचित् पुढील दहा पांच वर्षांत जमिनीच्या पोटांतून त्या सरोवरापर्यंत जाणारा रस्ताही तो तयार करील. असें झालें म्हणजे विजेच्या रंगीबेरंगी दिव्यांनीं प्रकाशित अशा त्या विलक्षण सरोवरांतून प्रवासी लोक बोटींतून अत्यंत मौजेनें सहल करूं शकतील. स्वित्सर्लंड मधील लोक स्वभावताच कुशल शिल्पकार असल्यामुळें ते काय काय अद्भूत गोष्टी करतील हें सांगतां येत नाहीं.

दुसरा आश्चर्यकारक देखावा म्हटला म्हणजे युंगफ्राव्हचें शिखर हा होय. मंगळवारीं आकाश निरभ्र व सूर्यप्रकाश चांगला पडल्यामुळें आमचा जाण्याचा बेत ठरला. आम्ही वीसजण आमच्याजवळ असलेले उबदार कपडे अंगांत घालून व बरोबर फराळाचें घेऊन निघालों. आम्ही हातांत तिकडल्या तऱ्हेच्या काठ्या घेतल्या होत्या. काठीचें जमिनीवर टेकावयाचें टोंक निमुळतें असून लोखंडी असतें. आम्ही वेंगन येथें विजेच्या आगगाडींत बसलों, व सरळ चढत सढत ६१९२ फूट उंचीवर असलेल्या ‘शायडेक’ नांवाच्या शिखराशर आलों. आम्ही जसजसे वरवर जाऊं लागलों, तसतसा भोंवतालच्या सृष्टिसौंदर्यामध्येंही फरक पडलेला पाहून मोठी मौज वाटली. पाइन व फर वृक्ष खालीं राहिले, व जिकडे तिकडे आंखुड व हिरवेंगार गवत मात्र दिसत होतें, व मधून मधून नाजूक व निळ्या रंगाचीं फुलें दिसत होतीं. त्या ठिकाणीं पिंवळीं किंवा तांबडीं फुलें मुळींच दिसलीं नाहींत. केवळ आकाशाच्या रंगासारखीं निळीं फुलें होतीं. इतक्या उंचीवर फुलांचा रंग निळाच असण्याचें कारण काय याचें उत्तर कोणीं कांहीं मला दिलें नाहीं. सबब माझीच उपपत्ति मला बरी वाटते, व ती म्हटली म्हणजे फुलें नीलवर्ण आकाशाच्या जवळ असल्यामुळें त्यांचाही नीलवर्णच असणार, दुसरा असणें शक्य नाहीं. टेकड्यांच्या

६

बाजूंनी चरत असलेल्या बऱ्याच गाई आमच्या दृष्टीस पडल्या. त्यांच्या गळ्यांत घंटा होत्या व त्या घंटांचा मधुर आवाज ऐकूं येत होता. कांहीं ठिकाणीं शेळ्या दिसल्या; परंतु मेंढ्या मुळींच दृष्टीस पडल्या नाहींत. आमच्या पैकीं कांहींजणांना दूर अंतरावर विशिष्ट प्रकारची एक रानटी शेळी दिसली. शायडेकला पोहोंचल्यावर आम्ही पहिल्या गाडींतून उतरून दुसऱ्या एका विजेनेंच चालणाऱ्या परंतु लहान आगगाडींत बसलों, व एगर-ग्लेचर या ठिकाणीं आलों. आमची गाडी बोगद्यांत शिरली त्यावेळीं जिकडे तिकडे समुद्रासारखें पसरलेलें बर्फ आम्हांस दिसलें. आमची गाडी पका एक तास बोगद्यांतून चालली होती. हा बोगदा आल्पस पर्वताच्या एका आड एक तीन रांगांतून पोखरलेला आहे. त्या तीन रांगांचीं नांवें एगर, मोंच व युंग-फ्राव्ह हीं होत. एगर जवळ आम्ही थांबलों व हिमनदी पाहण्याकरितां गाडींतून उतरलों. बोगद्यांतील भिंतींना कांचेच्या दोन तीन खिडक्या होत्या, त्यांतून पाहतां बाहेर जिकडे तिकडे बर्फच बर्फ पसरलें असल्याचें दिसलें ! परंतु त्यावेळीं गारठा इतका मनस्वी भासला कीं, आम्ही पटकन पळत पळत येऊन उबदार गाडींत बसलों. शेवटीं आम्ही युंगफ्राव्ह स्टेशनला येऊन पोहोंचलों. हें ठिकाण ११३४३ फूट उंचीवर आहे. या पर्वतांत एका अंगाला प्रवाशांच्या सोयीकरितां एक टोलेजंग हॉटेल बांधलें जात आहे. या हॉटेलांतून समोरील बर्फाच्छादित पर्वताचा देखावा चांगला दिसतो. या हॉटेलच्या तळमजल्यावर उपाहारगृह आहे व त्या ठिकाणीं चहा, काफी, फराळ, भोजन वगैरे ज्याला जें पाहिजे असेल तें मिळतें. या हॉटेलच्या पुढच्या सज्जांत बसलें असतां खालीं, वर, आसपास असा आसमंतांतील बर्फाच्छादित प्रदेशाचा एकवटलेला देखावा पाहावयास सांप-डतो. या पर्वतांत जे प्रवासी येतात, त्यांना युंगफ्राव्ह पर्वताच्या माथ्यावर जाण्यापूर्वी एकादी रात्र या ठिकाणीं विसावा घ्यावयाचा असल्यास, त्यांना राहण्याकरितां व निजण्याबसण्याकरितां सोयीस्कर अशा इमारती येथें जव-ळच हल्लीं तयार होत आहेत. हल्लीं येथें बरेच ज्योतिषशास्त्रज्ञ येऊन राहिले आहेत, व मंगळाचे वेध घेण्याकरितां त्यांनीं आपल्या दुर्बिणी वेध-शाळेंत त्या ग्रहाकडे रोखून ठेवल्या आहेत. वेधशाळा बंद करून हे शास्त्रज्ञ तूर्त खालीं शायडेगला गेल्यामुळें आम्हांला त्यांच्या त्या दुर्बिणी पाहावयास

सांपडल्या नाहींत. अद्यापपर्यंत मंगळासंबंधानें विशेष कांहीं शोध लागला नाहीं. हल्लीं हवा धुकट असल्यामुळें लागोपाठ दोन रात्रीसुद्धां आकाश निरभ्र सांपडणें मुष्किलीचें झालें आहे, व त्यामुळें ग्रहांचे वेध घेतां येत नाहींत.

युंगफ्राव्ह येथें पाळण्यांत बसून आम्ही ५०६० फूट उंचीवर गेलों. पाळ-ण्यांतून बाहेर आलों तों पायाखालीं व जिकडे तिकडे बर्फच बर्फ पसरलेलें होतें. अशा या बर्फांतून आणखी ८० फूट पहाड पायींच चढण्याला आम्हीं आरंभ केला. या वेळीं टेकण्याच्या कामीं आमच्या काठ्यांचा फार उपयोग झाला. कारण कांहीं ठिकाणीं बर्फ रेतीप्रमाणें भुसभुशित, तर कांहीं ठिकाणीं पायही न ठरण्याइतकें कठिण व घसरडें होतें. शिवाय इतक्या उंचीवर वातावरणही फार विरल होतें; व आम्हांलाही बर्फावरून चाल-ण्याची कधीं संवय नव्हती, त्यामुळें आम्ही काठी टेकीत टेकीत हळू हळू वर चढूं लागलों. याच वेळीं जर्मनी व अमेरिका येथील प्रवासी या पर्वतावर आलेले होते. त्यांपैकीं कांहींजण वर चढत जात होते, व कांहीं खालीं उतरत होते. आम्ही ज्या रस्त्यानें वर चढत होतों, तो रस्ता अत्यंत अरुंद होता. शिवाय त्या रस्त्याच्या एका बाजूला खूप खोल दरी होती व दुसऱ्या बाजूला अगदीं मऊ व घसरडें बर्फ पसरलेलें होतें. त्या बर्फावर जर एकाद्या मनुष्याचा चुकून पाय पडला असतां तर तो रुतून मनुष्य क्षणांत त्या बर्फांत गाडलें गेलें असतें. या सर्व अडचणीमुळें आम्हांला अत्यंत जपून व सावकाश चालावें लागे, व समोरून मनुष्य आल्यास त्याला रस्ता देण्याकरितां उभें राहावें लागे. अशा रीतीनें हळूहळू चढत चढत आम्ही सरते शेवटीं पर्वताच्या टोंकावर जाऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं स्वित्स-लँड देशाचें तांबडें निशाण फडकत होतें. माथ्यावर पोहोंचल्यावर आम्ही आसमंतांतील देखावा पाहण्याकरितां थांबलों.

मुलींनो, तसल्या प्रकारचा उदात्त, गंभीर व रमणीय देखावा मीं आज-पर्यंत कधींही पाहिला नाहीं. आमच्या डाव्या बाजूला डोक्यावर युंगफ्राव्ह पर्व-ताचीं बर्फाच्छादित व गगनचुंबित शिखरें झळकत होतीं. त्यांची उंची १३६६८ फूट आहे. त्यांच्याजवळच परंतु थोडे खालीं 'सिलव्हर हॉर्न'चे बर्फाच्छादित व शंकाकृति मनोरे चमकत होते. पिठी साखरेचे शंकूच्य

आकाराचे ढग उन्हांत ठेवले असतांना ते जसे लखलखीत पांढरेशुभ्र दिसतात व चमकतात, त्याप्रमाणें तीं शिखरें अत्यंत सुंदर, गुळगुळीत व रुप्याप्रमाणें पांढरींशुभ्र दिसत होतीं. त्यावेळीं ढग आम्हांला आमच्या खालीं दिसत होते. यावरून आम्ही किती उंच ठिकाणीं होतों, याची तुम्हांला कल्पना येईल. ढगांमधल्या फटींतून आम्हांस आल्प्स पर्वताच्या पायथ्याला वसलेलीं वेंगन व इतर खेडीं दिसलीं. आम्हीं मेघमंडळाच्या वर असल्याकारणानें नील-वर्ण व अमर्याद असें आकाश आणि आम्ही या दोघांमध्यें त्यावेळीं तिसरें कांहींही नव्हतें. सूर्याचें ऊन्ह चांगलें खडखडीत पडलेले होतें. सूर्याचे किरण पांढऱ्या शुभ्र व स्वच्छ बर्फावर पडून त्या किरणांचें परावर्तन झाल्यामुळें बर्फाकडे पाहतांना डोळे दिपत होते. त्यामुळें आम्हांपैकीं पुष्कळ जणांनीं त्या अद्भुत देखाव्याकडे पाहात असतांना डोळे दिपूं नयेत म्हणून काळसर रंगाचे चष्मे घातले. आल्पस् पर्वत पाहण्याकरितां आलेले प्रवासी वाटाड्याला बरो-बर घेऊन तळच्या बर्फाच्छादित व पांढऱ्याशुभ्र दरींतून युंगफ्राव्ह पर्वतावर चढत असतांना आम्हांला ते हलत्या व बारीक काळया ठिपक्याप्रमाणें दिसले. याप्रमाणें तो रमणीय देखावा अत्यंत मनोवेधक होता व तो दिव्य देखावा सोडून जाणें खरोखर आमच्या जिवावर आलें. त्याठिकाणीं आम्हांला थंडी बिलकूल भासली नाहीं. इतक्या उंच व बर्फाच्छादित प्रदेशांत असतांना अंगांत ऊब कशी वाटते याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. मात्र आमच्या पायांतील बूट थंडीचा मारा सहन करण्याइतपत जाड नव्हते, त्यामुळें बर्फावरून चालत असतांना बुटांतून पायांना गारठा भासूं लागला व पायांचे चवडे अगदीं बधिर झाले. त्यामुळें आम्ही खालीं उतरलों, व पाळण्याजवळ आलों. आम्ही खालीं उतरत असतांना वर चढत येणाऱ्या स्वित्सर्लंडमधील एका स्त्रीनें एकदम माझा हात धरला व मला थांबविलें. मी तिच्याकडे पाहिलें तों तिला खूप दम लागला होता व तेथून पुढें वर चढण्याला ती भीत होती असें दिसलें. माथ्यावर खरोखरच कांहीं सुंदर पाहण्यासारखें आहे काय असें तिनें मला विचारिलें, तेव्हां अत्यंत अत्यंत रमणीय असा देखावा पाहण्यासारखा आहे, असें मीं तिला, मला त्यावेळीं जे कांहीं उत्तम शब्द सुचले, त्या शब्दांनीं फ्रेंच भाषेंत उत्तर दिलें. तिला हात देऊन वर चढवून नेणें मला कांहीं शक्य नव्हतें. शिवाय एक वाटाड्या वर चढून येत

होता, तेव्हां तो तिला सहज हात देऊन वर घेऊन जाईल असा मीं विचार केला व त्या बाईचा निरोप घेऊन मी खालीं उतरलें.

प्रिय मुलींनो, मीं जे अवर्णनीय व रम्य देखावे पाहिले, त्यांची शब्दांच्या साह्यानें तुम्हांला कांहींतरी कल्पना आणून द्यावी, म्हणून वरचे-वर मनांत येतें, परंतु नाइलाज होतो. कारण त्यांचें वर्णन करतांना भाषा अपुरी पडते व लेखणी थांबते. कारण एकतर आसमंतात् पडलेल्या बर्फाकडे पाहात असतांना तें किती पांढरें शुभ्र, मऊ व हलकें असतें, व त्या बर्फमय प्रदेशावर सूर्याचें ऊन्ह पडलें असतां डोळे कसे दिपतात, वगैरे गोष्टींची नुसती कल्पना आणून देणें सुद्धां फार कठीण आहे. कित्येक मैलचे मैल सारखें बर्फ पसरलें आहे अशी कल्पना करा. पर्वत, टेकड्या, दऱ्या, गुहा, पर्वतांचे माथे, गिरिशिखरें, पठार वगैरे भागांवरून जिकडे तिकडे पांढऱ्या शुभ्र बर्फाचा समुद्रच पसरला आहे, अशी घटकाभर मनाशीं कल्पना करा. तसेंच डोक्यावर अमर्याद खोल व नीलवर्ण आकाश जिकडे तिकडे अफाट पसरलें आहे असें समजा. शिवाय या चकचकीत बर्फमय प्रदेशावर सूर्याचें प्रखर ऊन पडल्यामुळें सूर्यकिरणांचें परावर्तन होऊन प्रेक्षकांचे डोळे दिपत आहेत, व त्यांना अंधारी येत आहे असें समजा. या सर्व गोष्टी तुम्हीं एकदम मनांत आणल्या तर त्या देखाव्याची तुम्हांला कांहींतरी थोडीशी कल्पना आलीच तर येईल ! ! असो. आम्ही पर्वताचा माथा उतरून पाळण्याजवळ आलों, व त्या पाळण्यांत बसून खालीं जेथें जमिनीखालून रस्ता जात होता, तेथें येऊन पोहोंचलों. परंतु माथ्यावरच्या लखलखाटानें आमचे डोळे इतके कांहीं दिपले होते कीं, आम्हांला कांहीं वेळ भोंवतालचें कांहींच दिसेना. हलकें हलकें कांहीं मिनिटांनीं पूर्वीप्रमाणें दिसू लागलें.

स्वित्सर्लंड देशांत मीं जे दिवस घालविले, त्यांतला हा शेवटचा दिवस होता. या शेवटच्या दिवशीं दिव्य व अपूर्व असें सृष्टिसौंदर्य पाहून मीं तो प्रवास संपविला. त्या अलौकिक सृष्टिसौंदर्याचें चित्र माझ्या हृत्पटलावर कायमचें उठलेलें आहे व त्याची केव्हांही विस्मृति होणें शक्य नाहीं.

आर. नवलकर.

# कासवाचें शौर्य.

पूर्वीं एका काळीं जंगलांतील जनावरांमध्यें मोठी शर्यत लागली. ती शर्यत ज्यांनीं ज्यांनीं जिंकली त्यांना बक्षिसें मिळालीं. हत्तीचें सर्वांत बळ जास्त म्हणून त्याला पहिलें बक्षीस मिळालें. गेंड्याला दुसरें मिळालें व हरणाला त्याचा वेग जास्त म्हणून सर्वांत जास्त मार्क मिळाले. अशींच इतर जनावरांनाही बक्षिसें मिळालीं, व शर्यतींत प्रत्येक बाबतींत शेवटला नंबर आला म्हणून मूर्ख कासवालाही एक बक्षीस दिलें. ज्यांना बक्षिसें मिळालीं नाहींत, त्यांना वाईट वाटलें. कासव तर गर्वानें अतिशयच फुगलें! आपण, हत्ती व गेंडा हे एकाच योग्यतेचे आहोंत असें त्यास वाटावयास लागलें व हें त्यानें इतरांजवळ बोलूनही दाखविलें. तेव्हां त्या जनावरांना फारच राग आला. व काय करावें याचा त्यांनीं विचार केला. शेवटीं त्यांना एक युक्ति सुचली. आपण सिंहाकडे जाऊन त्याला कासव कसा पोकळ डौल मिरवितें हें सांगावें, व सिंहाकडुन त्याची खोड मोडावी, असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें तीं जनावरें सिंहाकडे गेलीं व त्याला ती सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून कासवाची खोड कशी मोडावी, हें कांहीं सिंहाला सुचेना. शेवटीं मोठ्या अवसानानें सिंह त्यांना म्हणाला, 'खरोखर या क्षुल्लक गोष्टींत लक्ष घालणें मजसारख्याला कमीपणाचें आहे, पण मी तुम्हांला एक युक्ति सांगतों. मूर्ख कासवाची बडबड हत्ती व गेंडा यांच्या कानावर घाला. हें काम तुम्हीं कोल्ह्याला सांगा. तो तें काम फारच छान करील. त्याप्रमाणें त्यांनीं कोल्ह्याला विनंती केली व कोल्ह्यानेंही तें कबूल केलें. कोल्हा प्रथम हत्तीची गांठ घ्यावयास निघाला. हत्ती एके ठिकाणीं वडाच्या फांद्या सोंडेनें मोडीत होता व पाला खात होता. तेथें कोल्हा आला, व दूर उभा राहून तो हत्तीला म्हणाला, 'नमस्कार दादासाहेब, आपली केवढी शक्ति! परंतु तें मूर्ख कासव आपल्या बरोबरीचें आहे, असें म्हणतें.' त्यावरोबर 'काय?' असें हत्तीनें कान टवकारून विचारलें. हत्तीचे कान जरी सुपाएवढे मोठे होते, तरी त्याला कोल्ह्याचे शब्द प्रथम ऐकूं आले नाहींत. तेव्हां कोल्हा जरा जवळ गेला व आपल्याच पदरचे शब्द घालून तिखटमीठ लावून बोलला. 'महाराज, कासव म्हणतें, मी हत्तीचा धाकटा

भाऊ आहें. मी इतका बळवान आहें कीं, हत्तीला मी आपल्या पाठीवर सहज घेऊन जाईन. हत्तीची माझ्यापुढें काय कथा !' आणखी तें तुमच्या-विषयीं किती तरी वाईट गोष्टी बोललें ! त्या मला तुमच्या पुढें बोलवत नाहींत.' त्यासरशीं हत्तीनें रागानें सोंडेंत एक फांदी धरून भिरकावली व मोठ्यानें गर्जना केली ' काय ? असें कासव म्हणतें ! यावरून तें किती मूर्ख आहे, व तूं निरोप आणणाराही किती मूर्ख आहेस हें दिसतें; ' ती हत्तीची चर्या पाहतांच कोल्हा तेथून पळाला.

जातांना कोल्हा स्वतांशीं ह्मणाला, 'कायहो हा हत्ती विचित्र प्राणी ! माझें काम कांहीं नीट साधलें नाहीं. असो. आतां गेंड्याची गांठ घेऊन पाहावी.' असें ह्मणून गेंडा एका पाणथळ रानांत चिखलांत उभा होता, तेथें कोल्हा गेला व म्हणाला, 'नमस्कार अण्णासाहेब, सिंहानें मला आपणाकडे पाठविलें आहे.' गेंडा म्हणाला, कशा करितां? तेव्हां कोल्हा म्हणाला, 'अहो, तें कासव म्हणतें, मी आणि हत्ती भाऊ भाऊ आहोंत. आमच्यासारखा या जंगलांत कोणी बळवान नाहीं. तुमची तर तो पर्वाही करीत नाहीं. तुम्ही काय कस्पटासारखे ! ' तेव्हां गेंडा म्हणाला, तें कासव कोठें आहे ? तेव्हां कोल्हा म्हणाला, 'त्या मोठ्या तळयाजवळ आहे.' पुढें गेंड्यानें स्वतांशीं विचार केला कीं, आपण स्वतां हत्तीची गांठ घ्यावी. त्याप्रमाणें तो हत्तीजवळ आला. हत्ती स्वस्थ उभा होता. त्याचें खाणें संपलें होतें व त्यानें बराचसा चिखल सोंडेनें अंगावर उडविला होता. गेंड्याला पाहतांच हत्तीनें आपल्या सोंडेनें त्याच्या अंगावर पाणी उडविलें व म्हटलें, ' मित्रा नमस्कार. इकडे कोणीकडे ?' तेव्हां गेंडा म्हणाला, 'मित्रा, तुझ्या कानावर कांहीं बातमी आली काय ? कासव तुझ्यासंबंधानें नाहीं नाहीं त्या गोष्टी बोलत आहे व तुझा अपमान करीत आहे. हें ऐकतांच हत्ती म्हणाला, 'हो हो, कोल्हा असेंच कांहीं सांगत होता. त्या मूर्ख कासवाला इकडे तर येऊं द्या, ह्मणजे सांगतों काय आहे तें.' असें म्हणून हत्तीनें आपला एक पाय खूप उंच उचलून धाडदिशीं चिखलांत आपटला. त्याबरोबर चोहोंकडे खूप चिखल उडाला. हत्ती म्हणतो 'हें पहा मित्रा, असल्या बडबड्यांना अशी शिक्षा करीन.' हें बोलतां बोलतां त्यानें आपली सोंड पिळवटली व रागारागानें डोळे लाल करून पाहिलें. गेंडा म्हणाला, 'बरें आहे मित्रा, तुझी आणि त्या कासवाची गांठ पडो. माझी जर

त्याची गांठ पडली तर पायाखालीं त्याला कसें ठेचावयाचें हें मला चांगलें समजलें, पण माझा पाय कांहीं तुझ्या एवढा मोठा नाहीं, असें म्हणून गेंड्यानें हत्तीचा निरोप घेतला व तो आपल्या तळयाच्या कांठीं गेला. तेथें लवकरच कासव आलें. तें गेंड्याला म्हणतें, "भाऊ, कसें काय आहे!" त्या सरशीं गेंडा चवताळून बोलला "मूर्खा, पुन्हा तर भाऊ म्हणून म्हण, म्हणजे तुझे राई राई एवढे तुकडे करीन." तेव्हां लुच्चें कासव म्हणतें, "नकोरे भाऊ, असें करूं नको. मी मेलों म्हणजे माझी बायको व मुलें रडून रडून आकांत करतील. हें पहा, तुला भाऊ म्हणणें मला आवडतें. तुझ्याशीं माझें नातें असावें असें मला वाटतें. कोणाचें बळ जास्त आहे, हें आतां आपण पाहूं व वाद मिटवूं. आपण दोघे दोर ओढूं. मीं तुला ओढलें तर मी तुला भाऊ म्हणेन, व तूं मला ओढलेंस तर तूं वाटेल तें मला नाव ठेव." हें ऐकतांच ठीक आहे, कांहीं हरकत नाहीं, दोर ओढावयास केव्हां तयार होतोस असें गेंडा म्हणाला. तसें कासव अमळ विचार करून म्हणालें, मला माझ्या बायकोचा व मुलाचा निरोप घेतला पाहिजे. कदाचित् पुन्हां त्यांची माझी गांठ पडणार नाहीं. तसें गेंडा म्हणतो, 'घे हो, त्यांची शेवटचीच गांठ घेऊन ये.' पुढें तें कासव हत्तीकडे गेलें व त्याला पाहून म्हणतें, 'काय भाऊ कसें काय चाललें आहे?' तसें हत्तीनें न ऐकल्यावारीच नेलें. तेव्हां कासव पुन्हा म्हणालें, 'काय बाबू, कसें काय चाललें आहे?' हें ऐकतांच हत्तीचे डोळे रागानें लालभडक झाले. त्यानें सोंड वर केली, तोंड वासलें, व मोठ्यानें गर्जना केली, व एक पाय वर उचलून दाणदिशीं जमिनीवर आपटला; पण कासव कांहीं त्याखालीं सांपडलें नाहीं. तेव्हां कासव हळूच म्हणतें, 'ओहो, काय हें तुझें बळ! मला जर असें करतां आलें असतें, तर किती नामी झालें असतें. थोडें चुकलें, नाहीं तर तुझा गरीब बिचारा मी भाऊ ठार झालों असतों. बरें तें असो. भांडण्यांत कांहीं कळा नाहीं. शहाणपणानें आपला वाद मिटवूं. माझ्यापेक्षां तूं बळवान आहेस, यांत मुळींच शंका नाहीं. परंतु या जंगलांतलीं इतर जनावरें इतकीं मूर्ख आहेत कीं, मीं त्यांना किती जरी हें सांगितलें, तरी त्यांना तें खरेंच वाटत नाहीं. करितां आपण दोर ओढून या वादाचा निकाल गोडीनें लावूं. तूं मला ओढिलेंस, तर तुझा विजय होईल, व मीं

ओढिलें—पण मी कसचा ओढतों म्हणा! आतां मी एक मोठा दोर आणतों, असें म्हणून कासव निघालें, तसें हत्ती ऐटीनें म्हणाला, 'हें पहा, आतां तुझें म्हणणेंच आहे, तर मी ओढल्यासारखें दाखवीन,' असें म्हणून हत्तीनें आपले डोळे झाकले. या कासवाचा केव्हां सूड उगवीन असें त्याला झालें. पुढें कासवानें आपल्या मित्राकडून एक लांब दोर आणला व तो घेऊन गेंड्याकडे गेलें. 'भाऊ भाऊ, या दोराचें हें टोंक तुम्ही धरा, आतां मी दुसरें टोंक जंगलाच्या दुसऱ्या टोंकाला जाऊन तेथें धरतों, व दोर हालला कीं, तुम्ही ओढायला लागा व मला ओढा.' तेव्हां गेंडा तिरस्कारानें म्हणाला, अरे तें मी चुटकीसरसें करितों. पुढें कासव दोराचें दुसरें शेवट घेऊन हत्तीकडे गेलें, व त्याला म्हणालें, 'भाऊ भाऊ, हें टोंक तुम्ही धरा, व खच्चून ओढा.' असें म्हणून कासव दूर गेलें, व दोराच्या बरोबर मधोमध उभें राहिलें व दोराला हिसका दिला. त्याबरोबर हत्ती व गेंडा दोघेही जीव खाऊन खाऊन आपल्या शक्तीनें दोर ओढावयास लागले. तें पाहून हसतां हसतां कासवाचें पोट दुखून आलें व तें आपल्याशीं म्हणालें, 'या दोन अगडबंब प्राण्यांना माझ्यासारख्या चिमुकल्या प्राण्यानें कसें फसविलें! गड्यांनो, चालूं द्या असाच खेळ. ओढा ओढा, नीट ओढा. खच्चून ओढा.' असा तो खेळ सबंध दिवसभर व मध्यान्ह रात्रीपर्यंत चालला. कधीं हत्ती थोडें ओढी, तर कधीं गेंडा थोडें ओढी, व प्रत्येक जण मनांत म्हणूं लागला, 'अरे, कासवांत बरेंच बळ आहे कीं!' हत्ती घसरायला लागला म्हणजे म्हणायचा, 'मूर्खा कासवा, मला तूं ओढतोस काय?' असें म्हणून तो दुप्पट जोरानें ओढी. शेवटीं 'आतां करमणूक पुरे झाली. आपल्यालाही भूक लागली. घरीं लौकर गेलों नाहीं तर बायको सर्व खाऊन टाकील. तर आतां खेळ पुरे करावा' असें म्हणून कासवानें आपल्या तीक्ष्ण दातांनीं दोर मधोमध करांडला. त्याबरोबर दोन डोंगर आदळावेत एवढा मोठा आवाज झाला. सर्व जंगल दणाणलें. तो आवाज ऐकून सिंहाला सुद्धां भीति वाटली; परंतु कासवाची खूपच करमणूक झाली. हत्ती व गेंडा यांचीं चांगलीं डोकीं फुटलीं असतील व तीं बरीं होण्यास किती तरी दिवस लागतील, हें मनांत येऊन कासव खदखदा हसावयास लागलें.

तें म्हणालें, 'हा सारा अभिमानाचा परिणाम! मला ओढण्याविषयीं केवढी यांची घमेंड! चांगली खोड मोडली!' घरीं गेल्यावर कासवानें आपल्य

बायकोला व मुलांना झालेली सर्व हकीकत चटकदार रीतीनें व तिखट मीठ लावून सांगितली. तेव्हां हसतां हसतां सर्वांची पुरे वाट झाली व आपणही मोठें झाल्यावर अशीच हत्तीसारख्या अगडबंब प्राण्यांची फजीती करूं असें त्या मुलांना वाटलें. दुसरे दिवशीं कासव हत्तीकडे गेलें व म्हणालें, 'भाऊ, कसें काय चाललें आहे' तसें हत्ती म्हणतो, 'माझें थोडें डोकें दुखत आहे. काल एका ठिकाणीं समारंभास गेलों होतों. परत येतांना डोक्याला वडाची फांदी लागली म्हणून डोकें दुखत आहे.' तेव्हां कासव म्हणालें, 'अस्सं काय, ठीक आहे' असें म्हणून तें तेथून गेंड्याकडे गेलें. जातांना कासव हसतां हसतां मनांत म्हणालें, 'आतां गेंडा कोणत्या समारंभास गेला होता तें पाहूं.' गेंड्याला पाहतांच कासव म्हणतें, 'भाऊ, ठीक आहेना? डोकें कां बांधलें,तसें गेंडा म्हणाला, 'नीघ येथून चालता हो. माझें डोकें फार दुखत आहे. बोलवत नाहीं.' तसें कासव म्हणतें, 'डोकें का दुखतें आहे? बरं तर जातों.' तेव्हांपासून कासवानें जंगलांतील सगळ्या प्राण्यांना आपण शर्यत जिंकली व हत्ती व गेंडा यांचा पराभव केला असें हजार वेळां सांगितलें, पण हत्तीनें व गेंड्यानें त्या शर्यतीचें अद्याप नांव सुद्धां काढलें नाहीं.


---

# कीटकांचा विशिष्ट वर्ग.*

सृष्टींतील प्राण्यांचे ढोबळ मानानें दोन वर्ग करितां येतात. एक म्हणजे ज्यांच्या शरिरांत हाडांचा सांपळा आहे असे व दुसरा म्हणजे हाडांचा सांपळा नसणारे. दुसऱ्या प्रकारच्या प्राण्यांमध्यें कीटक वर्गाचा समावेश होतो. एकंदर प्राणिवर्गांत कीटकांची संख्या फार मोठी आहे व त्यांची वाढ खरोखरीच अपरिमित होऊन ती टिकली, तर इतर जातींच्या प्राण्यांस जगणें कठीण झालें पाहिजे. परंतु अनेक कारणांमुळें तसें होत नाहीं व सर्व प्राण्यांची वाढ समसमान तऱ्हेनें होत आहे. आतां अशा बिनहाडांच्या प्राण्यांचा संबंध काय व कीटकांचा वर्ग निराळा करण्याचें विशिष्टत्व काय तें पाहूं.


हरएक प्रकारचा लहान प्राणी दिसला कीं त्याला " कीटक " या नांवानें संबोधण्याची आपली प्रवृत्ति झालेली आहे. विंचू, गोम, गोचीड, मुंगी, माशी व ढेकूण वगैरे प्राणी आपणांस दिसले कीं ते सर्व निरनिराळ्या प्रकारचे कीटक आहेत असें आपण समजतों. परंतु त्याचें कारण असें कीं, या सर्वांची उत्पत्ति व वाढ कशी होते हें आपणांस ठाऊक नसतें. हें सर्व ठाऊक असतें तर, किंवा हें सर्व दिसलें असतें तर, या प्रत्येक प्राण्याच्या उत्पत्तींत व वाढींत इतकें अंतर आहे कीं, हे सर्व प्राणी एका वर्गांत येणें कधींच शक्य नाहीं हें तात्काळ लक्ष्यांत आलें असतें.

प्राणिवर्ग फार मोठा आहे व त्यांत पुष्कळ निरनिराळ्या प्रकारच्या प्राण्यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, आपण नुसतीं जनावरेंच घेऊं. त्यांत कांहीं मांसभक्षक आहेत, तर कांहीं वनस्पतींवरच उपजीविका करणारे आहेत. कांहींना खाल्लेलें अन्न पोटांतून परत तोंडांत आणन चांगलें चावून ( त्यास रवंथ करणें असें म्हणतात. ) परत पोटांत घालवावें लागतें, तर कांहींना एकदम खाऊन पोटांतच पचवावें लागतें असे फरक आहेत. परंतु हें आपण जेव्हां त्या प्राण्यांच्या आयुष्यक्रमाकडे, त्यांच्या राहणीकडे, खाण्याकडे पाहूं तेव्हां आपल्या लक्षांत येईल. त्याचप्रमाणें या कीटक वर्गाचें आहे. खऱ्या कीटकांच्या व कीटक म्हणून गणले जाणाऱ्या बाकीच्या प्राण्यांच्या आयुष्यक्रमांत इतका मनस्वी फरक आहे कीं, त्यांचा विशिष्ट वर्ग करणें प्राप्त झालें आहे, व या वर्गाच्या अभ्यासास " कीटक शास्त्र " हें नांव दिलें आहे. या वर्गांतील प्राण्यांची सर्व साधारणपणें व्याख्या करावयाची झाल्यास असें म्हणतां येईल कीं—ज्या प्राण्यांची पूर्ण वाढ झाली असतां सहा पाय, दोन डोळे, चार किंवा दोन पंख, व दोन शिंगें किंवा मिशा असतात, त्या प्राण्यांना कीटक ही संज्ञा देतां




नं. १ पूर्ण वाढ झालेला कीटक.

येईल. यांत कांहीं कीटक असे आहेत कीं, त्यांना पंख मुळींच नसतात. परंतु कांहीं झालें तरी सहा पायांची खूण केव्हांही बदलत नाहीं.



नं. २.
गोचीड. पूर्ण वाढ झालेल्यास आठ पाय व बाल्यावस्थेंत सहा पाय असतात.

आतां गोचीड हा प्राणी असा आहे कीं, याच्या बाल्यावस्थेंत सहा पाय असतात, परंतु त्याची पूर्ण वाढ झाल्यावर याला आठ पाय येतात. त्याचप्रमाणें विंचवासही आठ पाय असतात. गोमीस तर पुष्कळच पाय असतात हें बहुतेक सर्वांना माहीत आहेच. यामुळें या प्राण्यांचा कीटक वर्गांत समावेश होऊं शकत नाहीं, हें उघड आहे. शिवाय कीटकांच्या व कीटकेतर प्राण्यांच्या शरिराकडे पाहिलें असतां त्यांच्या शरीररचनेंत काय फरक आहे हें तात्काळ दिसून येईल.



नं. ३
कीटकांच्या शरिराचे भाग १ डोकें. २ शिंगें. ३ पंख. ४ पाय. ५ पोट.

कीटकांच्या शरिराचे डोकें, छाती व पोट किंवा शीर, ऊर, व उदर, असे तीन निरनिराळे भाग दिसून येतात. पण हे शरिराचे तीन भाग विंचू, गोम किंवा गोचिड वगैरे प्राण्यांत दिसुन येत नाहींत. मात्र ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हे शरिराचे तीन भाग पूर्ण वाढ झालेल्या कीटकांतच दिसून येतात, बाल्यावस्थेंत दिसून येत नाहींत.

## प्रकरण २ रें,

# कीटकांची शरीररचना.

आतां कीटकांच्या शरिराच्या तीन भागांस निरनिराळीं कोणतीं इंद्रियें जोडलेलीं आहेत, त्यांचा व्यापार कसा चालतो व कीटकांस त्यांचा कसा उपयोग होतो तें पाहूं.

**शीर व डोकें:**—डोक्याच्या खालच्या बाजूस तोंड, वरच्या बाजूस दोन डोळे व डोळ्यांच्या जवळ दोन शिंगें असतात. तोंडाचा उपयोग सर्व-साधारण बाकीच्या प्राण्यांप्रमाणें अन्न खाण्याकडे होतो. डोळ्यांमध्यें दोन प्रकार आहेत—एक साधे व दुसरे संयुक्त. अर्थात् दोन्ही प्रकारच्या डोळ्यांचा उपयोग पाहाण्याकडेच होतो. साध्या प्रकारच्या डोळ्यांनीं उजेड किंवा अंधार ओळखतां येतो, पण संयुक्त प्रकारच्या डोळ्यांनीं सर्व वस्तु दिसतात. तरी देखील साधारणपणें (संयुक्त प्रकारचे डोळे असले तरी) सहा ते आठ फुटांपलीकडे कीटकांची दृष्टि जाऊं शकत नाहीं. शिंगांचा उपयोग मात्र इतर जनावरांच्या शिंगांप्रमाणें होत नाहीं. प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, या शिंगाची रचना इतकी मृदु व लवचिक असते कीं, कीटकांना तीं वाटेल तशीं वळवितां येतात. या शिंगांचा उपयोग स्पर्शेंद्रियासारखा असून पुष्कळ वेळां घ्राणेंद्रियासारखा होतो; कारण कीटकांना नाक नसतें. या शिंगामध्यें व इतर जनावरांच्या तोंडाच्या आसपास असणाऱ्या केसांमध्यें पुष्कळ साम्य आहे. म्हणून यांना "मिशा" म्हणणेंच योग्य दिसेल. परंतु त्या डोक्याच्या वरच्या बाजूस असल्यामुळें या अवयवांना शिंगें ही संज्ञा दिली आहे. शिंगें निरनि-राळ्या आकारांचीं असतात.

**उर किंवा छाती:**—कीटकांचें शरीर कंकणाकृति छेदांचें बनलेलें आहे असें दिसून येईल. त्यांपैकीं 'उर' हा भाग तीन छेदांचा बनलेला असतो. या प्रत्येक छेदाचे खालचे बाजूस दोन्हीकडे एकएक असे दोन पाय असतात. म्हणजे तिन्ही छेद मिळून सहा पाय असतात व वरच्या बाजूस पहिला छेद

सोडून दुसऱ्या व तिसऱ्या छेदास दोन दोन असे एकंदर चार पंख असतात. दोनच पंखांचा कीटक असल्यास दुसऱ्या छेदासच ते चिकटलेले असतात आणि तिसऱ्यास नसतात. पण पहिल्या छेदास पंख कधींही नसतात. कीटकांची सर्व हालचाल या दोन साधनांनींच म्हणजे पायांनीं धावणें व पंखांनीं उडणें हीं दोन कामें चाललेलीं असतात.

कांहीं कीटकांना बाल्यावस्थेंत पोटास पाय असतात, पण पूर्ण वाढ झाल्यावर ते नाहींसे होऊन सहा उरतात व ते छातीसच असतात. उदाहरणार्थ, पतंगाच्या आळयांना पोटाला पाय असतात. पण पतंगाच्या पोटास नसतात.

पूर्ण वाढ झालेल्या कीटकांच्या पायांचे निरनिराळे भाग असून मांड्या, पोटऱ्या, पावलें असा त्यांत भेद करतां येतो, इतकेंच नव्हे तर त्यांच्या राहणीप्रमाणें या निरनिराळ्या भागांची रचना केलेली असते. टोळांप्रमाणें उड्या मारणारे प्राणी असतात. त्यांच्या मागील पायांच्या मांड्या खूप जाड असून तंगड्या लांब असतात. कांहीं कीटक–भक्षक कीटकांचे पुढचे पाय जाड असून पोटऱ्या व मांड्या कात्रीप्रमाणें एकमेकांकडे वळलेल्या असतात व त्यांना कांटे असतात. जमिनींत खणून घर करून राहणाऱ्या कीटकांचे पाय खणण्यास योग्य असे बनलेले असतात. त्याचप्रमाणें पाण्यांत राहणाऱ्या कीटकांना पोहतां येण्याजोगी त्यांच्या पायांची रचना केलेली असते.

पंख दोन किंवा चार असतात. कांहीं जातींत ते एकमेकांवर पडलेले असतात, तर कांहींत ते पसरले असतात. कांहीं कीटकांचे पंख जाड व कांहींचे लवचीक असतात. पंखांना बळकटी येण्याकरितां आंतल्या बाजूस शिरा असतात.

**उदर किंवा पोटः**–हें देखील कंकणाकृति छेदांचें बनलेलें असतें. पोटाच्या शेवटीं दंश करणाऱ्या कीटकांत नांगी असते. त्याचप्रमाणें कांहीं कीटकांत अंडीं घालण्याकरितां नळी असते. पोटाच्या बाहेरच्या अंगास प्रत्येक छेदास दोन्ही बाजूस एक एक याप्रमाणें रंध्रें किंवा लहान लहान भोकें असतात. हीं श्वासोच्छ्वास करण्याचीं रंध्रें होत. कीटकांना नाक नसल्या-


मुळें त्यांचा श्वासोच्छ्वास त्याच रंध्रांतून चालतो. शिवाय पोटांत अन्न-पचन चालू असतेंच. सारांश, या शरिराच्या तिन्ही भागांकडे विवि-क्षित कामें वांटून दिलीं आहेत. शिरांकडे अन्नाचा वास घेणें, खाणें व पाहणें, उराकडे सर्व तऱ्हेची हालचाल करणें व उदराकडे अन्नपचन, अंडीं घालणें व श्वासोच्छ्वास करणें हीं कामें आहेत.

**कीटकांचें अन्न व तें खाण्याच्या पद्धति:**—शरिरांतील महत्त्वाचा भाग तोंड हा होय. हें मुख्यत्वेंकरून दोन प्रकारचें असतें व त्याप्रमाणें कीटकांच्या अन्नांत फरक दिसून येतो. हे दोन प्रकार म्हणजे आपलें अन्न चावून खाणारे कीटक व अन्न शोषून घेणारे कीटक. अन्न तोंडांतून पोटांत गेल्यावर त्यांतील पाचक पदार्थांचें रक्त बनतें व नको असेल तो भाग विष्ठारूपानें बाहेर टाकला जातो.

कीटक पुष्कळ प्रकारचे आहेत. त्यांपैकीं पुष्कळसे जमिनीवर राहातात, कांहीं गोड्या पाण्यांत व थोडे खाऱ्या पाण्यांत राहतात. अर्थात् पाण्यांत राहणाऱ्या व वाढणाऱ्या डास, चतुर, किंवा भुंगेरे वगैरे कीटकांना पण्यां-तील घाण व कुजलेले पदार्थ यांवरच उपजीविका करून राहावें लागतें. पण जमिनीवर राहणाऱ्यांना हरतऱ्हेच्या वनस्पति मिळतात. कांहीं पानें खातात, तर कांहीं फुलें खातात. कांहीं झाडांच्या बुंध्यांत पोखरतात, तर कांहीं झाडांच्या मुळांना उपद्रव करितात. कांहीं झाडांची वरची सालच खातात, तर कांहीं पानांच्या वरच्या पापुद्र्यावरच संतुष्ट असतात. दुसरे कांहीं कुजलेल्या पदार्थांवरच निर्वाह करितात. कांहीं कीटक असे आहेत कीं, त्यांना जन्मांत कधीं पाणी लागतच नाहीं व त्यांचा उदरनिर्वाह अगदीं कोरड्या अन्नावरच चालतो. उलटपक्षीं ढेकूण, डास वगैरेसारखे असे कांहीं कीटक आहेत कीं, त्यांना कोरडें अन्न खातांच येत नाहीं व पातळ रस किंवा द्रव पदार्थ यांशिवाय चालत नाहीं. झाडांत पोखरणाऱ्या कीटकांना, शेणांत किंवा इतर घाण पदार्थांत राह-णाऱ्या किंवा त्याचप्रमाणें कोठारांतील सांठवून ठेवलेल्या कोरड्या किंवा वाळलेल्या धान्यांत सांपडणाऱ्या कीटकांना कशा प्रकारच्या अन्नाचा पुरवठा होत असेल तें त्यांचें त्यांनाच माहीत. पण एवढें मात्र निश्चित

आहे कीं, त्यांना या अन्नाशिवाय राहातांच येत नाहीं व त्यांची वाढहि होऊं शकत नाहीं.


पुष्कळ वेळां असें आढळण्यांत येतें कीं, कांहीं कीटकांच्या बाल्या-



नं. ४

आळी व पतंग. आळीचें तोंड—चावून खाण्यासारखें.

वस्थेंत निराळ्या प्रकारचें व पूर्णावस्थेंत निराळ्या प्रकारचें अन्न लागतें. उदाहरणार्थ, आळीचें अन्न व आळीपासून होणाऱ्या पतंग किंवा फूल-पांखराचें अन्न अगदीं निराळ्या प्रकारचें असतें. आळीच्या तोंडाची रचना अन्न चावून खाण्यासारखी असल्या-मुळें तिला भराभर पानें वगैरे चावून खातां येतात, पण पतंगांना किंवा फुलपांखरांना तसें करितां येत नाहीं. कारण त्यांच्या तोंडाची रचना अन्न शोषून खातां येण्यासारखी असल्यामुळें त्यांना पानें खातां येत नाहींत; व त्यांना फुलांतील रस किंवा मध यासारख्या पातळ पदार्थां-वरच राहावें लागतें.




नं. ५ पतंगाचें तोंड
डोळ्याच्या मध्यावर लांब केलेली चोंच आहे.

आहाराप्रमाणें किंवा भक्ष्याप्रमाणें कीटकांचें वर्गीकरण करावयाचें झाल्यास पुष्कळसे कीटक " शाकाहारी " आढळतील; बरेचसे घाण, कुजलेले पदार्थ खाणारे सांपडतील; व कांहीं दुसऱ्या कीटकांवर किंवा इतर लहान प्राण्यांवर उदरनिर्वाह करणारे म्हणजे " मांसाहारी " दिसून येतील. या मांसाहारी कीटकांतहि दोन प्रकार आहेत. कांहीं कीटक दुसरा एखादा लहान कीटक दिसला कीं वाघ, सिंह ज्याप्रमाणें गाय बैलांवर हल्ला करून त्यांना फाडून खातात, त्याप्रमाणें त्याला खाऊन टाकतात; तर दुसरे कांहीं, कीटकांच्या आंगांत अंडीं घालून ठेवतात व त्या अंड्यांतून बाहेर पडणारीं " पोरें " त्या किड्यांना खाऊन वाढतात. पहिल्या प्रकारच्या कीटकांना " हिंस्र " हें नांव देतां येईल व दुसऱ्या प्रकारच्या कीटकांना " परोपजीवि " म्हणतां येईल.

जे ' शाकाहारी ' कीटक आहेत ते सर्व साधारणपणें कोणताही झाडपाला दिसेल त्यावर तुटून पडतात असें नाहीं, तर त्यांना विशिष्ट प्रकारचीं झाडें लागतात व तेंच त्यांचें अन्न होय. उदाहरणार्थ, ज्वारीचीं पानें खाण्याची एखाद्या कीटकास संवय झालेली असली, म्हणजे तो कीटक तींच पानें खाण्यासाठीं व खाण्याकरितां मिळविण्यासाठीं प्रयत्न करणार. तीं नाहींच मिळाल्यास त्याच जातीच्या दुसऱ्या पिकांची म्हणजे मका, भात, गवत यांचीं पानें खाईल. त्याचप्रमाणें हरभऱ्याच्या पिकावरचे कीटक हरभरा न मिळाल्यास तूर, वाल, वाटाणा, घेवडा वगैरेसारख्या द्विदल धान्यांच्या पिकांवरच जातील. परंतु हे कीटक सहसा ज्वारीच्या किंवा मक्याच्या पिकाकडे धाव घेणार नाहींत. कारण कडधान्यें व तृण धान्यें यांत बिलकूल सारखेपणा नाहीं. तात्पर्य हें कीं, कीटकांचें अन्न विवक्षित प्रकारचें ठरलेलें असतें. तें न मिळाल्यास सजातीय पिकावर निर्वाह करितात. अशा पिकांना " प्रकारांतर " किंवा " अन्य प्रकारचें भक्ष्य " असें म्हणतात.


तोंडाच्या रचनेप्रमाणें कीटकांच्या खाण्याच्या पद्धतींतहि फरक दिसून येतो. आपला नेहमींचा व सर्वांच्या परिचयाचा अनुभव आहे कीं, मुंगळा डसला कीं रक्त येतें, पण ढेकूण, डास, किंवा पिसवा चावल्या तर रक्त येत नाहीं. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, या दोन प्रकारच्या कीटकांच्या चावण्यांत फरक आहे. मुंगळा हा खरोखरीच चावतो, पण ढेकण

वगैरेंना चावतां येत नाहीं. मुंगळ्याला जबडा असून आंत सुळ्यासारखे दांत असतात, त्यामुळें त्याला चावा घेतां येतो. पण ढेकणाच्या तोंडाची रचना निराळी असते. त्याला जबडा किंवा दांत नसतात. पण जबड्याच्या ऐवजीं एक सुईसारखी लांब नळी असते. ती माणसाच्या अंगांत खुपसली जाऊन ढेकूण रक्त शोषून घेतो. या नळीच्या योगानें तो जें रक्त शोषुन घेतो, त्या क्रियेस आपण चावणें असें म्हणतों. यावरूनच ढेकूण चावला असतां मुंगळ्याच्या चाव्यापासून जसें रक्त येतें तसें कां येत नाहीं हें स्पष्ट होतें. तोच फरक अशा दोन्ही प्रकारच्या कीटकांनीं पिकावर हल्ला केल्यास दिसून येणार आहे. समजा कीं, चावून खाणारे व शोषून घेणारे असे दोन्ही प्रकारचे कीटक एखाद्या झाडाच्या पानांवर आहेत तर असें दिसून येईल कीं,



नं. ६.

झुरळाचें तोंड. चावून खाण्यासारखें.



नं. ७.

ढेकणाचें तोंड. शोषून घेण्यासारखें.

चावून खाणाऱ्या कीटकांच्या योगानें झाडाचीं पानें प्रत्यक्ष खाल्लेलीं दिसतील, परंतु शोषून खाणाऱ्या कीटकांळें पानांचा कोणताही भाग प्रत्यक्ष खाल्लेला न दिसतां आंतील रस शोषून घेतल्यामुळें पानें सुकलेलीं दिसतील.

# पेट्रोलियम् अगर रॉक ऑईल तेल.

—:०:—

जगाच्या संसारास ज्या अनंत उपयुक्त वस्तु लागतात, त्या सर्वांत पेट्रोलियम अथवा रॉकेल तेल यास अत्यंत महत्त्वाची जागा प्राप्त झाली आहे. या खाणी कोठें सांपडतील हें पाहाण्यासाठीं जगभर एकसारखे प्रयत्न सुरू आहेत. गेल्या युद्धानंतर मॅंडेटनें* ब्रिटिश सरकार व फ्रेंच सरकार यांस मिळालेल्या मेसापोटेमिया व सिरिया या प्रांतांत या तेलाच्या खाणी सांपडल्यामुळें त्या प्रांतांचें युरोपियन राष्ट्रांना फार महत्त्व वाटूं लागलें आहे. मोसल शहराजवळ या तेलाच्या खाणी सांपडल्यामुळें तो आपल्या राज्याचा भाग आहे अशी अंगोरा येथील तुर्की सरकारनें राष्ट्रसंघाकडे मागणी केली होती, पण त्या प्रश्नाचा तुर्कांना समाधानकारक असा निकाल लागला नाहीं.

या खाणी शोधून काढण्याचे प्रयत्न जास्त जोरानें सुरू होण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे बऱ्याच ठिकाणच्या खाणीं हल्लीं संपुष्टांत येत चालल्या आहेत हें होय. याशिवाय या तेलाचा अनेक रीतींनीं उपयोगही वाढत चालला आहे. एक वेळ फक्त दिव्यांत जाळण्यासाठींच हें तेल वापरीत असत, पण आतां आगगाड्यांचीं व आगबोटींचीं इंजनें, गिरण्यांचीं ऑईल इंजनें, स्टोव्हं, चाकांना लागणारें ऑंगण या गोष्टींकडे या तेलाचा सर्रास उपयोग होऊं लागला आहे. त्यामुळें त्या तेलाची मागणी वाढून पुरवठा कमी पडेल अशी दिवसेंदिवस जास्त धास्ती वाटूं लागली आहे. जाळण्याच्या कामीं या तेलाचा लहानशा खेड्यापर्यंत सुद्धां प्रसार झाला असून, याच्या इतकें दुसरें कोणतेंही तेल इतकें स्वस्त मिळूं शकत नाहीं.

गेल्या महायुद्धांत वाहातुकीसाठीं जहाजांचा पुरवठा कमी पडल्यानें हिंदुस्तानांत हें तेल फार कमी आलें व त्यामुळें लोकांचे किती हाल झाले याची कल्पना प्रत्येकाला असेलच.

या रॉकेल तेलापासून निरनिराळे असे सुमारें ३०० ( तीनशें ) पदार्थ उत्पन्न होतात व त्यांचा निरनिराळया गोष्टींकडे उपयोग होतो. या पदार्थां-

---

* महायुद्धांत शत्रूपासून मिळालेले प्रदेश दोस्त राष्ट्रांना राष्ट्रसंघाकडून ( League of Nations ) ज्या कायद्यानें मिळाले तो कायदा अगर अधिकार-

पैकीं ( १ ) पेट्रोल यालाच गॅसोलिन् असेंही म्हणतात ( २ ) पॅराफिन् ( ३ ) व्हॅसेलिन् ( ४ ) व नॅपथालिन हे नेहमींच्या ऐकिवांतले पदार्थ आहेत. पेट्रोलचा मोटारीस फार उपयोग करितात. पॅराफिन् हा औषधांत वापरतात व जाळण्याकडेही याचा उपयोग होतो. व्हॅसेलिनचा मलमें बनविण्यासाठीं दवाखान्यांत फार उपयोग होतो. तसेंच सायकली, हत्यारें, शस्त्रें वगैरें पदार्थांना याचा हात दिला, तर त्या वस्तु सहसा गंजत नाहींत. पाय फुटले अगर जखम झाली, तर त्यावर याचा हात चोळल्यानें मऊपणा येतो.

नॅपथालिन हा पदार्थ कृमिनाशक आहे. प्राणिज वस्तूंना कसर, कीड वगैरे लागूं नये म्हणून त्या पदार्थांजवळ याची पुडी ठेऊन दिली म्हणजे काम भागतें. पण हा थोडा विषारी असल्यानें लहान मुलांच्या हातांत न पडण्याचा खबरदारी घेतली पाहिजे. सारांश, खुद्द पेट्रोलियम अगर राकेल तेलापासून न होणारीं पुष्कळ कामें तज्जन्य पदार्थांपासून होतात, हें नवल आहे.

लढाईच्या दिवसांत मार्शल कॉकू या सेनापतीनें रॉकेल तेलाच्या एका थेंबास रक्ताच्या थेंबाची उपमा दिली होती. दुसऱ्या एका सेनापतीनें अशाच अर्थाचे उद्गार काढिले आहेत. तो म्हणतो " तैलरूपी रक्ताचा जर दोस्त राष्ट्रांना पुरवठा नसता, तर त्यांना युद्धांत मुळींच यश मिळालें नसतें." शांततेच्या काळांतही याचा कांहीं कमी उपयोग नाहीं, हें सर्वांस महशूर आहेच. एक वेळेस ज्या वस्तु चैनीच्या समजल्या जातात त्याच कालांतरानें अत्यंत जरुरीच्या कशा बनतात यांचें हें एक उदाहरणच आहे. चहा व साखर या दोन वस्तूंसंबंधानेंही हीच स्थिति आहे व ती आतां सर्वांच्या परिचयाची होऊन बसली आहे.

ज्या राष्ट्राला या पदार्थाचा भरपूर पुरवठा असेल, त्याला या जगाच्या शौर्यतींत यश येईल. ही यशाची गुरुकिल्ली ओळखून आपल्या साम्राज्यांत हें तेल कोठें सांपडेल हें पाहण्याचा उद्योग इंग्लंडनें सुरू ठेविला आहे. खुद्द इंग्लंडांत अगदीं अलीकडे डर्बी नामक परगण्यांत ३००० फूट खोलीवर एक तेलाची विहीर लागली आहे. तींतून दररोज १२ पिंपें तेल निघतें. कानडा ( उ. अमेरीका ) प्रांताच्या सास्काचेवन प्रांतांत ४ वर्षांपूर्वीं कांहीं

तेलाच्या खाणी सांपडल्या आहेत. याशिवाय इजिप्त, मेसापोटेमिया, हिंदुस्तान व ब्रम्हदेश, या भागांत या तेलाच्या खाणी लागल्या आहेत.

हिंदुस्तानांत तेलाच्या खाणी विशेषत: पूर्वेकडे व आसाम, आराकानच्या किनाऱ्याजवळील बेटें व ब्रम्हदेश या भागांत असून पश्चिमेकडे पंजाब व बलुचिस्तान या भागांत आहेत. पूर्वेकडील तेलाच्या खाणी खालीं थेट सुमात्रा जावा व बोर्नियो या बेटांपर्यंत पसरल्या असून पश्चिमेस त्या इराणच्याही पलीकडे आढळतात. ब्रम्हदेशांत इरावती नदीच्या खोऱ्यांत 'येनंगीयोग' या ठिकाणीं असलेल्या विहिरी फार जुन्या असून अलीकडे या भागांत पुष्कळच विहिरी नवीन पद्धतीनें खोदण्यास आरंभ झाला आहे. ब्रम्हदेशांत १८८७ सालापासून तेल काढण्यास सुरुवात झाली. पंजाबांत रावळपिंडी, अटक व मियानवाली येथें व आसामांत डिग्बोई व बदरपूर या गांवीं विहिरी आहेत.

१९२० व १९२१ सालीं सबंध हिंदुस्थानांत (यांत ब्रम्हदेशाचा समावेश होतो) अनुक्रमें २९ व ३० कोटी गॅलन तेल खाणींतून निघालें व त्याबद्दल सुमारें ७ व ८ कोटी रुपये हिंदुस्तान देशाला मिळाले.

या तेलाची सर्वांत जास्त पैदास अमेरिका व रशिया या दोन देशांत मुख्यत्वें करून होते. हें तेल उत्पन्न करणाऱ्या देशांची परस्परांशीं तुलना केली असतां अमेरिकेंत शेंकडा ६७, रशियांत १४, मेक्सिकोंत ११ व हिंदुस्थानांत २ असें प्रमाण बसतें. यावरून अमेरिकेची पैदास हिंदुस्तानच्या ३३ पट आहे असें दिसून येईल. त्या देशांत १९१७ सालीं ( ४२ ग्यालनचें एक पीप ) सुमारें ३३ कोटी पिपें भरतील इतकें तेल खाणींतून बाहेर काढलें; म्हणजे हिंदुस्तानच्या वर दिलेल्या आंकड्याच्या सुमारें ४६ पट मिळालें.

ह तेल जमिनीच्या पोटांत कसें तयार होतें याबद्दल अद्याप निश्चित समजलें नाहीं. तथापि जमिनीवरील पाणी भेगांतून आंत गेल्यावर तेथील निरनिराळीं अनेक द्रव्यें त्यांत मिसळून रासायनिक क्रियांनीं ( कोळशाप्रमाणें ) त्याला हल्लीचें रूप येत असावें असा समज आहे.

हें तेल पृथ्वीच्या पोटांत रेताड व छिद्रमय खडकांत सांपडतें. तेथून तें तल नालिकाकूपांतून पृष्ठभागावर आलें म्हणजे त्यास फार दुर्गंधी येत असते.

त्यानंतर तें शुद्ध करावें लागतें. कांहीं ठिकाणीं हें तेल पृष्ठभागापासून बरेंच जवळ असलेलें आढळतें, पण कांहीं ठिकाणीं ७।८ हजार फूटपर्यंत खणीत जावें लागतें. अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्याकडील व्हर्जिनिया प्रांतांत इतकें खोल खणीत जावें लागलें आहे. या विहिरी खणण्यास लागणारीं यंत्रें ( Boring Machines ) फार अवघड असल्यानें त्यांना तोलून धरण्यासाठीं जमिनीवर लांकडी मनोरेच उभारावे लागतात. हे मनोरे ६० ते ८० फूट उंच असतात.

या मनोऱ्यांच्या पायथ्याजवळ २० चौरस फूट जागा व्यापिली जात असून टोंकाकडे ते निमुळते होत गेल्यानें वर ४ चौरस फूट जागाच व्यापिली जाते. ज्या प्रदेशांत या तेलाच्या खाणी सांपडतात, त्या प्रदेशांत अशा प्रकारच्या मनोऱ्यांचें जाळेंच पसरल्यासारखें दिसतें.

खणण्याच्या यंत्रानें उकरतां उकरतां रॉकेल तेलाचा भाग लागला म्हणजे त्या नलिकाकूपांतून तें तेल जमिनीच्या पृष्ठभागाकडे जोरानें उसळी मारतें व त्याचा जोर फार विलक्षण असतो. उत्तर अमेरिकेच्या दक्षिण भागांत मेक्सिको प्रांतांत अशा रीतीनें विहीर उकरण्याचें काम चालू असतां आंतून जोरानें वर उडणाऱ्या त्या तेलाच्या फवाऱ्यानें २ टन वजनांचा खणण्याचा तो सामता (Boring machine) कोठेंच्या कोठें झुगारून दिला,एवढेंच नव्हें तर त्या मनोऱ्यासभोंवतालचा सुमारें २मैल जमिनीचा प्रदेश पावसाप्रमाणें तेलानें चिंब भिजवून सोडला. अशा प्रकारें या तेलाच्या फवाऱ्यास आवरून धरणें व तें तेल योग्य मार्गानें ठिकठिकाणीं रवाना करणें हें त्यापुढील महत्त्वाचें पण अत्यंत कठीण काम असतें. रस्त्यांतील एकादा पाण्याचा नळ फुटला असतां तो दुरुस्त करणाऱ्याची कोण धांदल उडते हें ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांना दर सेकंदास ३ पिपें रॉकेलचा झोतच्या झोत हवेंत जोरानें फेकणारा फवारा आवरून धरण्याचें काम किती कठीण असेल याची कल्पना होईल. पण कल्पक मनुष्यानें हीही गोष्ट शक्य कोटींत आणिली असून त्या तेलाचा सर्वच पुरवठा करण्याचें काम अव्याहत चालू ठेविलें आहे.

खाणींजवळून हें तेल जाड लोखंडी नळयांनीं पाण्याप्रमाणें वाटेल त्या प्रदेशांकडे रवाना केलें जातें. विशेषतः बाहेर देशीं पाठविण्यासाठीं या तेलाचा किनाऱ्याजवळ बंदरांत सांठा करावा लागत असल्यानें

तेथें हें तेल सांठविण्यासाठीं मोठाल्या टाक्या बांधलेल्या असतात. या ठिकाणीं परदेशीं नेणारीं जहाजें असतात त्यांना टँकर्स (Tankers) म्हणतात. या बोटीवर इंजनाची जागा व खलाशी राहण्याची जागा याशिवाय सर्व भाग तेलानें भरलेला असतो. जहाजें इष्ट बंदरांत येऊन दाखल झालीं म्हणजे त्यांतलि तेल बंदरांतलि टाक्यांत पंपानें काढून घेतात, व तेथून तें अंतर्भागाकडे पाठवावयाचें असल्यास जमिनींतून तळ्यांमधून दाबाच्या पंपांनीं (Force pumps) वाटेल त्या गांवीं रवाना केलें जातें. इंग्लंड व स्कॉटलंड देशांत लिव्हरपूल, लंडन, ब्रिस्टल्, हल् व ग्लासगो शहरीं असल्या टाक्यांची एक वसाहतच आहे असें म्हटलें तरी चालेल.

अमेरिकेमध्यें ( यु. स्टेटस् ) जमिनीखालून तेल नेणाऱ्या राकेलच्या नळ्यांची लांबी सुमारें ३०००० मैल भरेल. पृथ्वीच्या विषुवृत्तावर ही नळी पसरलेली आहे अशी कल्पना केली, तर तेवढा भाग व्यापून ५००० मैल लांबीची नळी शिल्लक उरेल !

बंदराजवळील या टाक्या वीज वगैरे पडून पेटल्या, तर सभोंवतालीं कित्येक मैलपर्यंत सर्व प्रदेश धुरानें भरून जातो व जमिनीवर काजळाचे थरच्या थर जमतात. कांहीं भागांत ऑइलशेल नांवाच्या खनिज पदार्थांपासूनही अलीकडे तेल काढूं लागले आहेत. यापासून शेंकडा २० असें तेल निघत असून शिवाय शेंकडा ४५ पर्यंत अमोनियम सल्फेट नामक पदार्थ निघतो. या पदार्थांचा खत म्हणून फार उपयोग होतो.

अशा प्रकारें या एका पदार्थानें जगाचा केवढा मोठा कारभार आपल्या ताब्यात ठेविला आहे व त्या पदार्थाच्या पैदाशीकडे सर्व राष्ट्रांचें लक्ष कसें लागून राहिलें आहे याची कल्पना येईल.

# सूर्य हाच सर्वांत उत्तम वैद्य.

—:०:—

सूर्याच्या किरणांत मानवी शरिरांत शिरणाऱ्या विषारी जंतूंना ठार मारून टाकण्याचें विलक्षण सामर्थ्य आहे ही गोष्ट अनेक प्रयोगांनीं सिद्ध झाली आहे. सूर्यप्रकाशांत काम करणारीं जीं माणसें असतात त्यांचें अनेक रोगांपासून सूर्य रक्षण करितो. उलटपक्षीं जे श्रीमंत लोक उन्हाला भिऊन सतत आपला काळ आपल्या वाड्यांत काढितात त्यांच्या शरिरांत रोग- जंतूंना शिरण्याला व त्यांची वाढ होण्याला यथेच्छ अवकाश मिळतो. क्षय-रोग वगैरे रोगांची झपाट्यानें वाढ शहरांत होते, पण खेडेगांवांत असल्या रोगाला फारसा अवकाश मिळत नाहीं. अमेरिकन डॉक्टरांनीं अगदीं लहान मुलांनाही सकाळच्या प्रहरीं सूर्यकिरणांत ठेवणें अत्यंत अवश्य आहे असें सप्रयोग सिद्ध केलें आहे. त्यांचे मतें मूल तीन चार आठवड्यांचें झालें कीं त्याला थोडा वेळ कोमल सूर्यप्रकाशांत ठेवावें. कांहीं दिवस त्याचे फक्त पाय उघडे ठेवून त्याजवर सारखा सूर्यप्रकाश पडूं द्यावा. यानंतर हळूहळू बाकीच्या शरिराच्या भागालाही हें किरणस्नान द्यावें. या किरणस्नानानें मुलांची प्रकृति निकोप राहाते. मोठ्या माणसांनींही आपलें अंग उन्हांत तापविणें अवश्य असतें. सूर्यप्रकाशापासून रक्षण केल्यानें नाजूक त्वचा रोग-जंतूंचें स्थान बनतें. आपल्या देशांत लहान मुलाला सकाळीं अंगणांत तुलसीवृंदावनावर कांहीं वेळ ठेवण्याची चाल अत्यंत आरोग्यदायक आहे. मुलाला निष्कारण कपड्यावर कपडे चढवून सूर्य प्रकाशाचा संपर्कही त्याच्या अंगाला होऊं न देणारी आई अज्ञानामुळें त्यांचें अत्यंत नुकसान करते हें उघडच आहे. उघड्या हवेंत व भरपूर सूर्यप्रकाशांत उघड्या अंगानें पुष्कळ वेळ खेळणारीं गरिबांचीं मुलें, कपड्यांनीं गुरफटलेल्या व सारा दिवस छायेंत घालविणाऱ्या श्रीमंतांच्या मुलांपेक्षां अधिक निरोगी असतात याचें कारणही सूर्यप्रकाश हेंच होय.

———

# पुस्तकपरीक्षा.

---:०:---

वऱ्हाड शाळापत्रकः—पन्नासाव्या वाढ दिवसाचा हा अंक बहुविध लेखांनीं भरलेला आहे. वाङ्मय, शिक्षण, चरित्रें, राजकारण, प्रवास यांजवर निरनिराळया लेखकांचे सुमारें ५५ लेख आहेत. हे सर्व लेखक वऱ्हाडांतीलच आहेत. या अंकांत चित्रेंही भरपूर आहेत. आर्यभूषण छापखान्याचे सुंदर छपाईमुळें अंकाला विशेष शोभा आली आहे. संपादकांनीं विदर्भस्थ बंधूंना शेक्सपीअर, पाणिनि, नबाब, अमीर वगैरे अनेक पदव्या बहाल केल्या आहेत. त्या ज्यांना दिलेल्या आहेत त्यांनाही रुचणार नाहींत असें वाटतें. या अंकांतील बहुतेक कविता अगदीं साधारण आहेत. 'माझे पंतोजी' हा लेख अंकाचे गंभीरतेस साजेसा नाहीं. 'ज्ञानाची महती' हा लेख रा. आगरकर यांच्या ज्ञानानंद या लेखाचा बहुतेक उतारा आहे. या लेखकानें संपादकास पूर्णपणें ठकविलें आहे. 'एकमानपद्धति' हा लेखही दुसऱ्या एका पुस्तकांतून बहुतेक घेतला आहे. शिक्षकांनीं असें करणें बरें नव्हे. ३५० पानांचा हा अंक वाचनीय आहे. अनेक नांवाजलेल्या लेखकांच्या लेखांमुळें अंकाला रमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे. हा वाढदिवसाचा अंक वाचकांचें मनोरंजन करून त्यांच्या ज्ञानांत भर टाकील यांत शंका नाहीं.

**मनोरंजन** दिवाळी अंक—रा. वसंतराव नाईक यांच्या संपादकत्वाखालीं मनोरंजनाच्या अंतर्बाह्य अंगांत पुष्कळ सुधारणा झाली आहे. दिवाळीचा अंक अनेक चित्रांमुळें व मनोरंजक व गंभीर लेखांमुळें वाचनीय झाला आहे. दिवाळीचे जे कांहीं मासिकांचे अंक निघाले आहेत त्यांत मनोरंजनाचाच अंक सरस आहे.

हिंदूसण व व्रतें:—लेखक रा. दत्तात्रय बाळकृष्ण खांबेटे. या पुस्तकांत हिंदूंच्या सणांची व व्रतांची थोडक्यांत माहिती दिलेली आहे. सणांची अगर व्रतांची पौराणिक कथा देऊन त्या दिवशीं करावयाच्या विधींचीही माहिती दिलेली आहे. पुस्तकाची भाषा सोपी असल्यामुळें मुलांना पाहिजे त्या सणाची अगर व्रताची माहिती या पुस्तकाचे साहाय्यानें मिळवितां येईल.

महात्मा गांधींचें चरित्रः—नव्या वर्षाची भेट म्हणून लोकमित्र या मासिकानें महात्मा गांधींचें चरित्र आपल्या वाचकांस भेट दिलें आहे. महात्मा

गांधींचें पूर्व चरित्र, त्यांची आफ्रिकेंतील कामगिरी, त्यांचीं धार्मिक, सामाजिक व राजकीय मतें कळण्याला या पुस्तकाचा बराच उपयोग होईल. प्रकाशक रा. दत्तात्रय गोविंद सडेकर प्रेस धनंजय खानापूर जि. बेळगांव.

शाळेंतील बाग—लेखक रा. शंकर लक्ष्मण वैद्य शिक्षक ट्रेनिंग कॉलेज फॉरमेन पुणें. या पुस्तकांत शाळेंतील विद्यार्थ्यांचे बागेसंबंधानें उपयुक्त माहिती दिली आहे. बागेची रचना कशी करावी, कोणत्या ऋतूंत कोणत्या वनस्पति लावाव्या, त्यांची जोपासना कशी करावी व त्यांचें निरिक्षण कसें करावें याविषयीं शिक्षक व विद्यार्थी यांना उपयोगीं पडेल अशी भरपूर माहिती या पुस्तकांत दिली आहे. किं. ६ आणे.

---

# प्रचंड विमानें.

अमेरिका व इंग्लंड यांजमध्यें मनुष्यांची नेआण करण्याकरितां प्रचंड विमानें बांधण्याची योजना एक यंत्रशास्त्रज्ञानें पुढें आणली आहे. दोन कोट पौंड भांडवलाची एक कंपनी हा मनुष्य स्थापन करणार आहे, इंग्लंड मधून अमेरिकेमध्यें थेट जाणारीं अशीं २०१२५ विमानें हीं कंपनी बांधणार आहे. हीं विमानें दररोज नेमलेल्या वेळीं इंग्लंडमधन अमेरिकेला व अमेरिकनमधून इंग्लंडला निघणार आहेत व त्याच दिवशीं इंग्लंड व अमेरिका एथें पोहोंचणार आहेत. या विमानांपैकीं एका विमानांत १५० माणसें नेण्याची सोय करावयाची आहे. तें तयार करण्यास तीस लक्ष रुपये लागतील. त्याच्या एंजिनची शक्ति ४५० घोड्यांच्या शक्तीएवढी होणार आहे. या सर्व विमानांतून प्रवाशांच्या सुखसोयीच्या बऱ्याच योजना करण्यांत येणार आहेत.

# चलचित्रपटाच्या साहाय्यानें शिक्षण.

सुप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ व यंत्रकार मिस्टर एडिसन यांचा मुलगा शाळेंत जाण्यास अगदीं नाखूष असे. हा मुलगा खेळाडू आहे. तथापि तो भारी सुस्वभावी आहे. ज्या शाळेंत तो जात असे तेथील शिक्षकमंडळी प्रेमळ व आपल्या कामांत दक्ष असत. असें असतांना आपला मुलगा शाळेंत कां जात नाहीं याचें कारण एडिसन साहेबांस कळेना. याच वेळीं कांहीं वर्तमानपत्रें वाचीत असतांना त्यांना असें आढळून आलें कीं, जर्मनीमध्यें शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें आहे. यामुळें तेथें प्रत्येक मुलाला शाळेंत अवश्य जावें लागतें. त्या देशांत शाळेंत जाण्याच्या त्रासामुळें कित्येक लहान मुलें आत्महत्या करितात. अमेरिकेंत देखील मुलें शाळेंत जाण्यास कंटाळा करितात व सरकार ह्या मुलांच्या पालकांवर खटला करितें, ही गोष्ट एडिसन साहेबांना माहीत होती. अशा रीतीनें हजारों पालकांना दंड होऊन त्या दंडाचें उत्पन्न दरसाल ५।६ लक्ष डॉलर होतें, हीही गोष्ट एडिसन यांना माहीत होती. त्यांच्या नेहमींच्या चौकस स्वभावाला अनुसरून त्यांनीं मुलांना शाळेचा कंटाळा कां यावा याजबद्दल चौकशी चालविली. तेव्हां त्यांना असें कळून आलें कीं, मुलांच्या अंगीं जिज्ञासा व कुतूहल या भावना फार तीव्र असतात. यामुळें मुलें एका जागीं बसून शिक्षकांचें भाषण ऐकण्यास अगर कांहीं वाचण्यास अगर लिहिण्यास कंटाळतात. नेत्रेंद्रियानें ज्ञान मिळविण्याची मुलांना फार हौस असते. एकादी गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्यानें त्यांना जितका आनंद होतो व त्या गोष्टीचें त्यांना जितकें ज्ञान होतें, तितका आनंद व तितकें ज्ञान त्या गोष्टीचें वर्णन ऐकून किंवा चित्रें पाहून होत नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यांना या वर्णनाचा व चित्रांचा कांहीं वेळानें कंटाळा येतो. यामुळें पुष्कळ मुलांना शाळेंत जावेंसें वाटत नाहीं. एडिसन साहेबांनीं एक सिनेमा मिळविला व या सिनेमाच्या साहाय्यानें त्यांनीं आपल्या मुलाला व दुसऱ्या मुलाला आफ्रिकेचा भूगोल शिकविण्यास प्रारंभ केला. आफ्रिकेंत सिंह, हत्ती पाणघोडे अरण्यांत धांवतांना व आपलें भक्ष्य मिळवितांना व खेळतांना मुलांनीं पाहिलें. नद्यांचे प्रवाह वाहतांना व त्यांचे धबधबे पडतांना मुलांनीं प्रत्यक्ष

पाहिले. काफीर झुलू वगैरे तद्देशीय लोकांचीं खेडीं व त्यांचीं घरें त्या मुलांनीं पाहिलीं व ते लोक, त्यांचीं मुलें व बायका आपले उद्योग करितांना त्यांच्या दृष्टीस पडले. आफ्रिकेंतील सोन्याच्या हिऱ्याच्या खाणींचे हलते चित्रपट मुलांच्या नजरेस पडले. यावरून ह्या खाणी कशा आहेत, यांत लोक कसें काम करितात, त्यांतील यंत्रें कशीं असतात वगैरे गोष्टींचें यथार्थ ज्ञान मुलांना झालें. अशा रीतीनें बरींच हालतीं चित्रें दाखवून आफ्रिकेच्या भूगोलाचें ज्ञान एडिसन साहेबांनीं मुलांना दिलें. या योगानें त्यांचा भूगोल थोडक्या दिवसांत झाला.

पडद्यावर चित्रें पाहाण्याचें झाल्यावर मुलांना तीच हकिकत पुस्तकांतून वाचून दाखविली जात असे. अशाच पद्धतीनें कारखान्यांचेही चित्रपट तयार करण्यांत आले. आस्ट्रेलियाच्या मैदानांत चरणारे मेंढ्यांचे कळप, त्यांची लोकर कापीत असलेले धनगर, ती लोकर स्वच्छ करून त्यांचे गठ्ठे बांधण्याचें काम करणारे लोक, ती लोकर आणणाऱ्या बोटी, अमेरिकेंत धक्क्याला बोट लागल्यावर तेथून उतरवून आगगाडींत घालणारे लोक, नंतर लोकरीचे कारखान्यांत तिचे धाग्यापासून वस्त्र होईतोंपर्यंत होणारीं सर्व कामें यांचीं हलतीं चित्रें मुलांना दाखविण्यांत आलीं. या योगानें मुलांना या कारखान्याच्या कामाची सर्व माहिती थोडक्या वेळांत मनोरंजक रीतीनें मिळाली. सिनेमाचें, शिक्षणदृष्ट्या अतिशय महत्त्व आहे हें कळल्यापासून अमेरिकेंतील शाळांतून त्याचा जोरानें उपयोग सुरू आहे.

आपल्या शाळांतून सिनेमाचा उपयोग करणें शक्य नाहीं, कारण सिनेमा हें फार खर्चानें काम असतें. तथापि प्रत्येक शाळेला मॅजिक ल्यांटर्न मिळाला व योग्य तीं चित्रें मिळालीं, तरी देखील यायोगानें शिक्षणाला पुष्कळ मदत होईल.

...ग्रंथ... ता........ नासिक शाखा

# बालजिज्ञासा.

लेखक—विठ्ठल जगन्नाथ कामत, एस्. टी. सी. तळें.

## श्लोक.

पाहूनियां ही बहु रम्य सृष्टी ॥ भांबावते चंचल बाल- दृष्टी ॥
वाटे तयांना सगळें कळावें ॥ अनंत विश्वांत दिसे स्वभावें ॥ १ ॥

गृहांतल्या सुंदर वस्तु नाना ॥ पाहूनियां कौतुक होय त्यांना ॥
"हें काय बाबा! बहु छानदार ॥ वाटे मला पाहुनि मौज फार" ॥२॥

नाना परींचे बहु गोड प्रश्न ॥ जिज्ञासु बाळें करितात छान ॥
त्रासूनियां त्यांस न रागवावें ॥ प्रेमें तयां सर्वहि तें कथावें ॥ ३ ॥

जातांच बाहेर गृहामधूनी ॥ मातेचिया तींहि कडेवरूनी ॥
मातेस तेव्हां करितात प्रश्न ॥ सांगे तयां ती बघुनी वितृष्ण ॥ ४ ॥
"हा बा दिसे सुंदर सोनचाफा ॥ याचीं फुलें वाहाति देवबापा ॥
हें मोगरीचें बहुरम्य फूल ॥ पाहोनियां हें तुज होय भूल" ॥ ५ ॥
"काऊ दिसे हा करि काव काव ॥ खालीं दिसे हा चिमणी-जमाव ॥
पक्षी असे हे उडती हवेंत ॥ गाणीं मुखानें बहुसाल गात" ॥ ६ ॥
"बाळा दिसे सुंदर ही हवेली ॥ जाई जुईच्या रुळतात वेली ॥
श्रीमंत येथें वसतात लोक ॥ मोटार गाड्या रथ हे विलोक" ॥ ७ ॥
संभाषणीं तत्पर बालमाता ॥ दे उत्तरें यापरि त्यास जातां ॥
ज्ञानार्जनीं उत्सुक बाल नित्य ॥ शोधी जगांतलि निगूढ सत्य ॥ ८ ॥
केव्हां पिता त्यास निशीथकालीं ॥ दावीत मौजा बहु अंतराळीं ॥
"हा चंद्र ही चांदणि पाहिं बाळा" ॥ दावीत त्यातें जगदीश-लीला ॥९॥
"आकाशगंगा बघ ही सुरेख ॥ मोत्यें जणों हीं पडलीं अनेक" ॥
आनंद वाटे बहु बालकांना ॥ या चांदण्यामाजिहि खेळतांना ॥ १० ॥
गृहांत सृष्टींत नभांत काय ॥ जाणावया उत्सुक बाल होय ॥
चौफेर दृष्टी फिरते मुलांची ॥ येणेंपरी बालवयांत साची ॥ ११ ॥
येतात शाळेंत जधीं मुलें तीं ॥ करीति प्रश्नावलि याच रीती ॥
असे जरा द्वाड स्वभाव त्यांचा ॥ जसा असे त्या फुलपाखरांचा ॥१२॥

खेळावयाची मनिं हौस फार ॥ ज्ञानार्जनींही असती तयार ॥
आनंदवृत्ती बहुसाल त्यांची ॥ जशी असे त्या फुलपाखरांची ॥ १३ ॥
उद्यान शालागृह त्यांस व्हावें ॥ शाळेंत त्यांचें मन हें रमावें ॥
म्हणोनि शब्दें बहु गोड त्यांतें ॥ द्यावें सदा खेळत शिक्षणातें ॥ १४ ॥
नानापरी तीं निजशिक्षकाला ॥ विचारिती सुंदर प्रश्नमाला ॥
त्यांचीं समाधानक उत्तरें द्या ॥ धाकें न त्यांना कधिंही बसूं द्या ॥१५॥
जिज्ञासावृत्ति त्यांच्या सुमनिं वसतसे वाढवावी सदा ती ॥
होते मोठेपणीं ती सतत नव नव्या ज्ञानराशीस दाती ॥
विद्येनें, सद्गुणानें, अभिनव रुचिनें, अन्य कांहीं गुणानें ॥
बाळें मोठेपणीं हीं चमकति जगतीं यापरी ज्ञान-दानें ॥ १६ ॥

---

# वर्तमानसार.

—:०:—

—दक्षिण अमेरिकेंतील बुइनॉस आयरस नांवाच्या एका प्रसिद्ध शहराचा विस्तार ७२ चौ. मैल असून त्याची लोकसंख्या १८ लक्षांवर आहे.

—चीनमध्यें आगगाडीच्या यंत्रांना एरंडेल तेलाचा उपयोग करतात.

— चीन देशांत दरसाल १० लाख टन लोखंड अशोधित स्थितींत सांपडतें.

—वाशिंग्टन ( अमेरिका ) येथें एका शास्त्रज्ञानें विषारी नांगी नसलेली मधमाशीची जात बनविली आहे. या माशांपासून वाटेल तितका मध सहज गोळा करितां येतो.

—अमेरिकेंत एक विशिष्ट प्रकारचा खडू तयार केला आहे. त्यानें फळयावर लिहितांना शिक्षकांचा हात पांढरा होत नाहीं व फळयावर लिहिलेलें पुसतांना त्याची धूळ चोहोंकडे उडत नाहीं.

—' मारिटानिया ' नांवाच्या एका नवीन बोटीनें न्यू यॉर्क (अमेरिका) ते चेरबरो ( फ्रान्सचा उत्तर किनारा ) येथपर्यंतचा ३०३० मैलांचा प्रवास अवघ्या ५ दिवस, १ तास ४९ मिनिटांत केला. दररोज तिचा ६००

मैलांच्यावर वेग पडला. या बोटीनें आजपर्यंतच्या सर्व बोटींवर वेगाच्या बाबतींत ताण केली आहे. साधारण बोटींचा सरसकट वेग ताशीं १२ ते १५ मैल असतो.

—सैबेरियांत (राशियाचें राज्य) इर्कुटस्क शहराजवळ अभ्रकाच्या खाणी सांपडल्या असून त्या खणण्याची एका अमेरिकन कंपनीस परवानगी मिळाली आहे.

—आस्ट्रेलियाच्या पूर्वेस कॅलिडोनिया बेटांत फ्रेंच सरकार जगांत मोठें असें एक बिनतारी संदेशाचें ठाणें स्थापन करणार असून थेट फ्रान्स देशाशीं त्याचा संबंध राहील.

—हिंदुस्थानांत एकंदर ३१ कोटी ९१ लक्ष वस्ती आहे. ४० वर्षांपूर्वी दर १०००० त ७३ ख्रिस्ती वस्तीचें प्रमाण असे. तें हल्लीं १४६ झालें आहे.

—कोनाक्री ते जिबुटीपर्यंत (सीरालिऑन ते सुदान) ९००० मैलांचा प्रवास कांहीं फ्रेंच प्रवासी मोटारींतून करण्यास निघाले असून मोटारीस वाटेनें लागणाऱ्या मार्गांत मिळणारें पामतेल, भुइमुगाचें तेल, व नापथा यांचा मोटार चालविण्यास उपयोग करणार आहेत.

—चीन देशांत चाललेल्या बंडाळींत पाऊस पडूं लागला म्हणजे लढाई थांबते व शिपाई छत्र्या उघडून उभे राहातात. तसेंच हवेंत उष्णतामान वाढलें व तलखी फार होऊं लागली म्हणजे बरोबरच्या पंख्यांनीं वारा घेऊं लागतात असें म्हणतात.

—युरोपच्या उत्तरेस स्पिट्स् बर्गेन येथें मोठाल्या कोळशाच्या खाणी सांपडल्या आहेत.

—काबूल सरकारनें राशियापासून स्वतःच्या देशासाठीं ५ विमानें खरेदी केलीं आहेत.

—आस्ट्रेलियांतील प्रचंड वाळवंटाच्या प्रदेशांतून एका आस्ट्रेलियन स्त्रीनें नुकताच प्रवास केला. त्यापैकीं ६५० मैल ती उंटावर बसून गेली.

—मंगोलिया प्रांतांत कांहीं ठिकाणीं उकरीत असतां लांकडी व पितळेच्या जनावरांच्या मोठाल्या आकृति सांपडल्या आहेत. बहुतेक, मृतांबरोबर त्या पुरल्या असाव्या.

# ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें.

## सर्टीफिकेट परीक्षांचा निकाल सन १९२५.

### वर्ष ३ रें.

#### ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | काशीबाई कर्वे | ७४.६ |
| २ | सौ. रमाबाई जोशी | ७२.६ |
| ३ | ताराबाई पाथरे | ६८.५ |
| ४ | वत्सलाबाई गुर्जर | ६८.१ |
| ५ | रमाबाई रावेतकर | ६३.९ |
| ६ | सावित्रीबाई साळवे | ६१.७ |
| ७ | सौ. सुशिलाबाई खेर | ६०.८ |
| ८ | अंबूबाई भागवत | ६०.२ |
| ९ | कौशल्याबाई देखणे | ५८.१ |
| १० | सौ. शांताबाई पाठक | ५७.८ |
| ११ | विठाबाई देशपांडे | ५०. |

#### सेवासदन पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई बोराडे | ५३. |
| २ | बनूबाई नातू | ४८.९ |

#### सेवासदन मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई राजाध्यक्ष | ५७.६ |
| २ | सोनूबाई पुंजाजी | ५५.२ |
| ३ | सीताबाई खेर | ४६.१ |

#### यू. एफ. सी. मिशन पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | सोनूबाई घाडगे | ५५.६ |
| २ | मेरीबाई शिंदे | ५३.५ |
| ३ | गंगूबाई जाधव | ४९.४ |
| ४ | शरदाबाई-तर्सडकर | ४३.७ |

#### एक विषयास बसणाऱ्या विद्यार्थिनी

१ सीताबाई रावेरकर

### वर्ष २रें.

#### ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | बाळाबाई वेळापुरकर | ६३.३ |
| २ | आऊबाई दामले | ६१.७ |
| ३ | हिराबाई गुहागरकर | ६१.१ |
| ४ | रूथबाई नौगांवकर | ६०.५ |
| ५ | शांताबाई परांजपे | ६०.३ |
| ६ | वत्सलाबाई कारखानीस | ६०.२ |
| ७ | लीलाबाई खेडेकर | ५७.३ |
| ८ | गोदूबाई माने | ५६.४ |
| ९ | सोशन्नाबाई रहामीम | ५५.५ |
| १० | इंदिराबाई पारनाईक | ५५.१ |
| ११ | रिबेकाबाई आवासकर | ५४.६ |
| १२ | हिराबाई तळवडेकर | ५३.९ |
| १३ | सुशिलाबाई वस्त | ५३.५ |
| १४ | इंदिराबाई बोरगांवकर | ५३. |
| १५ | धोंडूबाई ढगे | ५२.५ |
| १६ | रूथबाई जोसफ | ५२.५ |
| १७ | रिबेकाबाई हाईम | ५१.४ |
| १८ | हौशाबाई शिंदे | ५१ |
| १९ | मथुराबाई जोशी | ५०.३ |
| २० | सीताबाई कुळकर्णी | ५०२ |
| २१ | रमाबाई अग्निहोत्री | ४९.२ |
| २२ | लक्ष्मीबाई कोचरेकर | ४८.९ |
| २३ | सुप्रभाबाई कांबळे | ४८.८ |
| २४ | आनंदीबाई दीक्षित | ४८.३ |
| २५ | पार्वतीबाई मोहीते | ४७.९ |
| २६ | इंदिराबाई पेडणेकर | ४७.२ |
| २७ | गोपिकाबाई दाणी | ४६.२ |

#### सेवासदन पुणें

| | | |
|---|---|---|
| १ | वेणुबाई गायकवाड | ५०.४ |
| २ | दमयंतीबाई गायकवाड | ४९.६ |
| ३ | यमुनाबाई मलकापुरे | ४६.४ |
| ४ | गंगुबाई पितांबरे | ४४.४ |
| ५ | बहिणाबाई नाटेकर | ४०.१ |

| | |
|---|---|
| ६ सोनूबाई बारसे | ४० |

**सेवासदन मुंबई.**

| | |
|---|---|
| १ मंजुळाबाई कारखानीस | ४८.६ |
| २ मथुराबाई वैद्य | ४७.८ |
| ३ राधाबाई जोशी | ४७.४ |
| ४ यमुनाबाई पुराणीक | ४०.४ |

**यू. एफ. सी. मिशन पुणें.**

| | |
|---|---|
| १ मनोरमाबाई महाजन | ६७.८ |
| २ दयाबाई मुलुखवाड | ६५.१ |
| ३ गोपिकाबाई ओनावळे | ५६.५ |
| ४ जेसिकाबाई निर्मळ | ५४.८ |
| ५ रूपाबाई साळवे | ५४.५ |
| ६ रूथबाई भाकरे | ५४.१ |
| ७ अवंतिकाबाई निर्मळ | ५३.४ |
| ८ चुनियाबाई सुनारे | ४५.४ |

**सेंट मोनिकास्कूल नगर.**

| | |
|---|---|
| १ ताराबाई अमोलीक | ५५.४ |
| २ सखुबाई केदारी | ५२.३ |
| ३ प्रीताबाई डोंगरे | ५१.९ |
| ४ शांताबाई जाधव | ५१.४ |
| ५ मनोरमाबाई मकासरे | ४९.६ |
| ६ हरणाबाई शिरसाठ | ४९.१ |
| ७ मार्थाबाई चक्रनारायण | ४८.१ |
| ८ सेराबाई गायकवाड | ४८.१ |
| ९ सुनीतिबाई भोसले | ४७.४ |
| १० सुमतीबाई साळवे | ४५.९ |
| ११ मार्थाबाई तोरणे | ४५.७ |
| १२ आनंदीबाई घोडके | ४४.३ |

**एक विषयास बसणाऱ्या विद्यार्थिनी**

१ शेवाबाई शहापुरकर
२ ग्रेसबाई उढदे
३ सरस्वतीबाई जोशी

**वर्ष १ लें.**

**ट्रेनिंग कॉलेज फॉर वुईमेन पुणें.**

| | |
|---|---|
| १ रंगूबाई जोशी | ६३.८ |
| २ शांताबाई कदम | ६३.७ |
| ३ गोदूबाई सोनवणी | ६२.७ |
| ४ सौ. अंबूबाई पावसकर | ६०.४ |
| ५ कृष्णाबाई एकंकर | ५९.८ |
| ६ लक्ष्मीबाई पाटील | ५७.८ |
| ७ सत्यभामाबाई नाईक | ५७.१ |
| ८ सीताबाई फणसळकर | ५६.५ |
| ९ चंद्राबाई भोसले | ५६.५ |
| १० सौ. चंद्रभागाबाई देशपांडे | ५५.९ |
| ११ तानूबाई तेली | ५५.५ |
| १२ लक्ष्मीबाई देशपांडे | ५४.८ |
| १३ शांताबाई मलुष्टे | ५४ |
| १४ द्वारकाबाई अत्रे | ५३.९ |
| १५ सौ. जानकीबाई देशपांडे | ५३.९ |
| १६ सुंदराबाई चुरी | ५३.८ |
| १७ कृष्णाबाई पवार | ५३.६ |
| १८ शरणाबाई झंपले | ५१.९ |
| १९ लक्ष्मीबाई मोघे | ५१.८ |
| २० यमुबाई जगताप | ५१.८ |
| २१ रमाबाई कुलकर्णी | ५१.४ |
| २२ इंदिराबाई करमरकर | ५१.२ |
| २३ सईबाई छत्रे | ५१ |
| २४ यमुनाबाई शारंगपाणी | ५०.५ |
| २५ वत्सलाबाई मांजरेकर | ५०.२ |
| २६ सुंदराबाई उंडे | ४९.८ |
| २७ रंगूबाई रामचंद्र जोशी | ४९.७ |
| २८ बगूबाई कुलकर्णी | ४८.६ |
| २९ लक्ष्मीबाई पुराणीक | ४८.५ |
| ३० शांताबाई नेरकर | ४८.५ |
| ३१ शांताबाई लुमण | ४८.४ |
| ३२ वासंतिबाई सावंत | ४७ |
| ३३ चिंगूबाई उपाध्ये | ४५.९ |
| ३४ द्वारकाबाई ठोंबरे | ४५.३ |
| ३५ बनूबाई बर्गे | ४५.२ |
| ३६ हिराबाई वडके | ४४.४ |
| ३७ द्वारकाबाई भार्गवे | ४४.३ |
| ३८ सखुबाई खाडे | ४४.२ |
| ३९ येसूबाई खरे | ४३.२ |
| ४० द्वारकाबाई तपस्वी | ४२.८ |
| ४१ चंपाबाई मोगले | ४२.१ |
| ४२ यमुनाबाई भत्राळकर | ४१.७ |

## सेवासदन पुणें

| | |
|---|---|
| १ अंबूबाई गोडबोले | ५९·३ |
| २ गंगूबाई काडकोळ | ५८·६ |
| ३ गंगूबाई माणिक | ५७·२ |
| ४ उमाबाई सहस्रबुद्धे | ४९·४ |
| ५ राधाबाई नावलेकर | ४८·७ |
| ६ रुक्मिणीबाई करंदीकर | ४७·४ |
| ७ जानकीबाई राजे | ४७·३ |
| ८ चंपूबाई जोगळेकर | ४६·८ |
| ९ गंगूबाई भट | ४५·१ |
| १० सोनूबाई काटे | ४५ |
| ११ सरस्वतीबाई ठाकूर | ४४·९ |
| १२ गुणाबाई वाघमारे | ४४·४ |
| १३ लक्ष्मीबाई भिडे | ४४ |
| १४ पार्वतीबाई साने | ४३·८ |
| १५ लक्ष्मीबाई शिवडेकर | ४३·४ |
| १६ सुंदराबाई पालकर | ४३·२ |
| १७ लक्ष्मीबाई शहाणे | ४२·२ |

## सेवासदन सोलापूर.

| | |
|---|---|
| १ लक्ष्मीबाई गायकवाड | ४३·९ |

## सेवासदन नगर.

| | |
|---|---|
| १ काशीबाई देशपांडे | ५९·१ |
| २ चंपूबाई डावरे | ४८·९ |
| ३ त्रिवेणीबाई रेखी | ४८·८ |
| ४ सुनीतिबाई डोंगरे | ४८ |
| ५ सोनूबाई सुळाखे | ४२·७ |

## सेवासदन मुंबई

| | |
|---|---|
| १ कमळाबाई आचार्य | ६०·२ |
| २ गुलाबबाई कारेकर | ५७·४ |
| ३ रुक्मिणीबाई गोडांबे | ५७ |
| ४ चिमकाबाई केळकर | ५४·९ |
| ५ ताराबाई गांगुर्डे | ५३·७ |
| ६ सुमतीबाई त्रिलोकेकर | ५०·८ |
| ७ जयंतीबाई देऊळकर | ४९·९ |
| ८ साजूबाई कांदळगांवकर | ४९·९ |
| ९ शांताबाई पै | ४८·९ |
| १० हौसाबाई दुर्वे | ४८·६ |
| ११ बिठाबाई हर्माळकर | ४८·२ |
| १२ वेणूबाई लिमये | ४८ |
| १३ रिबेकाबाई सॅम्युएल | ४७ |
| १४ शांताबाई जयवंत | ४६·९ |
| १५ चंपूबाई सातघरे | ४५·९ |
| १६ ताराबाई शेटे | ४४·९ |
| १७ कमळाबाई देशमुख | ४३·४ |
| १८ दिनाबाई किल्लेकर | ४२·८ |
| १९ सेराबाई नौगांवकर | ४०·५ |

## यू. एफ. सी. मिशन पुणें.

| | |
|---|---|
| १ बालूबाई चोपडे | ६१·५ |
| २ हन्नाबाई नायडू | ५७·५ |
| ३ सेराबाई रणभसे | ५६·८ |
| ४ पुष्पाबाई अमोलीक | ५६·३ |
| ५ प्रियंवदाबाई चोपडे | ५५·७ |
| ६ हिराबाई रणभिसे | ५५·४ |
| ७ इंदिराबाई निर्मळ | ५३·९ |
| ८ सुंदराबाई कसबे | ५२·७ |
| ९ शांताबाई पन्हाळकर | ५१·९ |
| १० प्रेसबाई केदार | ५१·२ |
| ११ मेरीबाई भाकरे | ४९·२ |

## सेंट मोनिकास्कूल नगर.

| | |
|---|---|
| १ चंद्रिकाबाई अल्हाट | ५५·५ |
| २ ताराबाई साठे | ५२ |
| ३ फुलवंतीबाई गायकवाड | ४८·८ |
| ४ मालतीबाई ससाणे | ४७·८ |
| ५ सुमतीबाई गायकवाड | ४७·७ |
| ६ माळणबाई सूर्यवंशी | ४६·७ |
| ७ पद्मावतीबाई कांबळे | ४५·८ |
| ८ शांताबाई गुंजीकर | ४४·६ |
| ९ फुलवंतीबाई बनकर | ४३·७ |

## एक विषयास बसणाऱ्या विद्यार्थिनी

रमाबाई हेमाड

इंदिराबाई ताठरे

# कन्याशिक्षक

वर्ष ११ वें. | आक्टोबर ते फेब्रुवारी १९२५ १९२६ | अंक ८ ते १२

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें, यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हां. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत १५ आणे.

२२ एप्रिल सन १९२६ ११२६.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पानें. |
|---|---|
| १ इतिहास ... ... ... ... | १८७-१९७ |
| २ प्राथमिक शाळांच्या शिक्षणपद्धतींतील फरक ... | १९८ २०५ |
| ३ शिशुवर्गांकरितां धडे ... ... ... | २०६-२१० |
| ४ भूगोल ... ... ... ... | २११-२१६ |
| ५ एक अधाशी सुरवंट ... ... ... | २१७ २२० |
| ६ मेओरी लोक ... ... ... ... | २२०-२२३ |
| ७ मुलांकरितां कविता ... ... ... | |
| १ भूपाळी ... ... ... ... | २२३ |
| २ ईश्वराची अपार दया ... ... ... | २२४ |
| ३ चालण्याची रीत ... ... ... | २६०-२६१ |
| ४ आगगाडी ... ... ... ... | २६१-२६२ |
| ५ मनुताईची खोड मोडली ... ... ... | २६२-२६३ |
| ८ तारे व ग्रह ... ... ... ... | २२५-२२९ |
| ९ अनाथबालिकाश्रमांतील दिनचर्या ... ... | २२९-२३५ |
| १० दिव्य राजकन्या ... ... ... ... | २३५-२३८ |
| ११ सोन्याची हंसी (गोष्ट) ... ... ... | २३८-२४२ |
| १२ मुळें व त्यांचे आकार ... ... ... | २४२-२४५ |
| १३ ऱ्होडेशिया ... ... ... ... | २४६-२४९ |
| १४ टांचण (जपान) ... ... ... ... | २५०-२५३ |
| १५ शिशुवर्गांकरितां धडे ... ... ... | २५४-२६० |
| १६ राजा उदयन ... ... ... ... | २६३-२७४ |
| १७ दुःखाचा शोध (कविता) ... ... ... | २७५-२७७ |
| १८ इ. स. १७६३ तील महाराष्ट्रावरील आपत्ति ... | २७७-२८४ |
| १९ कल्याणची लूट (कविता) ... ... ... | २८५-२८७ |
| २० कोको ... ... ... ... | २८८-२९३ |
| २१ नवीन व्हाइसराय ... ... ... ... | २९४-१९७ |
| २२ पोंच व अभिप्राय ... ... ... ... | २९७-३०० |
| २३ वर्तमानसार ... ... ... ... | ३०१-३०५ |
| २४ शिक्षणविषयक प्रदर्शन ... ... ... | ३०६-३०८ |
| २५ गव्हर्नर साहेबांचा संदेश ... ... ... | ३०९-३१० |

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीच मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

वर्ष ११ वें. ] आक्टोबर १९२५ ते फेब्रुवारी १९२६ [ अंक ८ ते ११

## इतिहास.

हिंदुस्तानांत फार प्राचीन काळापासून विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत इतिहासाला महत्त्वाचें स्थळ मिळालें आहे. इतिहासाच्या शिक्षणापासून होणारे अनेक फायदे आर्य लोकांना माहीत होते, म्हणून इतिहास व पुराणें यांना फार मान असे. एका प्राचीन ग्रंथकारानें इतिहासाची व्याख्या देऊन त्याचे शिक्षणापासून होणारे फायदे पुढील श्लोकांत सांगितले आहेत. धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् । पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥ सध्यां सुधारलेल्या सर्व देशांत प्राथमिक शाळांच्या अभ्यासक्रमांत देशाचा इतिहास हा विषय अवश्य मानिला आहे. इतिहासाचे शिक्षणानें पुढील उद्देश सफल झाले पाहिजेत.

१ विद्यार्थी ज्या देशांत राहात आहे त्या देशाची भूतकाळाची हकिकत त्याला कळावी. ज्या महत्त्वाच्या गोष्टींनीं देशाला सध्यांची स्थिति प्राप्त झाली आहे. त्यांचें त्याला ज्ञान व्हावें.

२ ज्या आपल्या पूर्वजांनीं निःस्वार्थपणानें झटून विद्या व ज्ञान यांचा प्रसार केला, ज्या महात्म्यांनीं धर्माचीं उन्नत तत्त्वें समाजाला शिकवून देशाची नैतिक स्थिति सुधारली, ज्या पूर्वजांनीं देशाच्या संरक्षणार्थ, देशाच्या कीर्तीच्या रक्षणार्थ

धारातीर्थी आपला देह टाकला, त्यांचेबद्दल विद्यार्थ्यांचे मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी.

३ विद्यार्थ्यांचें सहानुभूतीचें क्षेत्र वाढावें. स्वतांच्या ज्ञातीच्या किंवा समाजाच्या क्षेत्रांत त्याची सहानुभूति मर्यादित होऊं नये. आपला देश, आपलें राष्ट्र यांजबद्दल आपलेपणा त्यांजमध्यें उत्पन्न व्हावा.

४ नागरिक म्हणून आपलें कर्तव्य काय आहे याची विद्यार्थ्याला जाणीव व्हावी व राज्यकारभारास नागरिक या नात्यानें योग्य तो मदत करणें ह आपलें कर्तव्य आहे ही गोष्ट त्याचे मनावर बिंबवावी.

५ इतिहासाचे शिक्षणानें मुलांच्या कल्पनाशक्तीला व्यवसाय मिळावा व त्यांच्या विचारशक्तीलाही भरपूर व्यायाम मिळावा.

कल्पनाशक्तीला व्यवसाय मिळण्याला इतिहास हें फार उत्कृष्ट साधन आहे भूतकाळच्या व्यक्ति, समाज यांच्या गोष्टी ऐकत असतांना विद्यार्थ्यांना आपल्या कल्पनाशक्तीनें गोष्टीबरहुकूम चित्रें दृष्टीसमोर आणावीं लागतात. इतिहासामध्यें कार्यकारणसंबंध पुष्कळ वेळां येतो, यामुळें विचारशक्तीला चांगलाच व्यवसाय मिळतो. इतिहासाच्या योगानें थोर कृत्यांबद्दल आवड उत्पन्न होते व स्वार्थप्रेरित केलेल्या दुष्कृत्यांबद्दल तिटकारा उत्पन्न होतो. अशा रीतीनें नीतिशिक्षणाचे कामीं या विषयाचा फार उपयोग होतो.

इतिहास हा विषय शिकविणें कठीण असतें. हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकाला वर्णन करण्याची उत्तम हातोटी साधली पाहिजे. त्याच्या सहानुभूतीचें क्षेत्र संकुचित असतां कामां नये. त्याचें वाचनही बरेंच असलें पाहिजे. जो भाग शिकवावयाचा त्याची भरपूर माहिती असल्याशिवाय विद्यार्थ्यांना तो चांगला शिकवितां येत नाहीं. महत्वाच्या गोष्टी कोणत्या आहेत, कमी महत्वाच्या कोणत्या आहेत , कोणता भाग गाळला असतां चालेल, हें सर्व शिक्षकाला चांगलें कळलें पाहिजे. भाराभर किरकोळ माहिती देण्याचा मोह पुष्कळ शिक्षकांला आवरत नाहीं. मुलांना काय सांगूं व काय नको सांगूं असें त्यांना होतें, यामुळें त्यांचें अस्खलित चाललेलें हें व्याख्यान मुलांना ग्रहण करितां येत नाहीं व नळी फुंकिली सोनारें, इकडुन तिकडें गेलें वारें, अशी मुलांची स्थिति होते. मुलांना कोणता भाग आवडतो, कोणता भाग त्यांना ग्रहण करितां येईल हें शिक्षकाला चांगलें कळल्याशिवाय इतिहास शिकविणें त्याला साधणरच नाहीं. परीक्षेकडे लक्ष देऊन तहाचीं कलमें, लढाईचीं कारणें, सैन्यांच्या संख्या, राजांच्या वंशावळी, महत्वाच्या गोष्टींच्या कारणांची यादी मुलांकडून पाठ

करवून घेणारे कितीतरी शिक्षक आढळतील ! या शिक्षकांच्या साहाय्यार्थ उदार ग्रंथकर्ते इतिहासपत्रकें लिहीत असतात व त्यांची विक्रीहि चांगली होते. पण या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, पाठ केलेली माहिती विद्यार्थी परीक्षा झाल्याबरोबर विसरून जातो, पण या विषयाबद्दल त्याचे मनांत उत्पन्न झालेला तिटकारा मात्र कायम राहतो.

इतिहासाला प्रारंभ दुसऱ्या इयत्तेपासून करावा. शिशुवर्ग व १ ली इयत्ता या दोन इयत्तांत गोष्टी ऐकण्याची व सांगण्याची संवय मुलांना झालेली असते. मुलांना अद्भुत कथांची फार आवड असते. या दोन इयत्तांत बऱ्याचशा अद्भुत कथा त्यांनीं ऐकलेल्या असतात. गोष्टींतील वर्णनाप्रमाणें कल्पनाशक्तीनें आपल्या दृष्टीपुढें चित्रें उभीं करण्याचीही संवय त्यांना झालेली असते. यामुळें प्राचीन इतिहासांतील गोष्टी या इयत्तांत सांगण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यायोगानें आपल्या देशांतील प्राचीन काळीं झालेल्या व्यक्तींबद्दल, त्यावेळच्या सामाजिक स्थितीबद्दल थोडीतरी कल्पना मुलांना येईल. या इयत्तेंत रामायणांतील गोष्टी सांगितल्या असतां मुलांना फार आवडतात व त्या गोष्टींच्या योगानें देशाच्या प्राचीन इतिहासशिक्षणाचेंही कार्य होतें. रामायणांतील गोष्टी ऐकत असतांना आपण एखादा नवीन विषय शिकत आहों, असें कांहीं मुलांना वाटत नाहीं. गोष्टीची निवड करण्यांत मात्र शिक्षकानें खबरदारी घेतली पाहिजे. रामायणाच्या कथेचा धागा न तुटतां किरकोळ भाग गाळिला पाहिजे. साधारणपणें पुढील २० गोष्टींत रामायणाचें कथानक मुलांना सांगतां येईल. १ रामाचें बालपण. २ विश्वामित्र रामलक्ष्मणांला घेऊन जातात. ३ सीतास्वयंवर. ४ कैकेयीचा हट्ट व रामवनवासगमन. ५ भरतभेट. ६ रामाचें पंचवटींत गमन. ७ शूर्पणखेची भेट व तिला शिक्षा. ८ सुवर्णमृग व सीताहरण. ९ रामाचा शोक व सुग्रीवाचा स्नेह. १० सीताशुद्धि व अशोकवनांत सीतेची भेट. ११ लढाईची तयारी व अंगदशिष्टाई. १२ लक्ष्मणमूर्च्छा. १३ इंद्रजितवध. १४ रावणाचा वध व सीतेची अग्निशुद्धि. १५ अयोध्येस पुनरागमन व राज्याभिषेक. १६ सीतेचा त्याग. १७ कुशलवांचें शिक्षण. १८ रामाचा अश्वमेधयज्ञ. कुशलव घोडा धरतात. १९ राम व सीता भेट. सीता अदृश्य होते. २० रामराज्य. सध्यां पुष्कळ शिक्षकांनीं रामायण काळजीपूर्वक वाचलेलें नसतें. बालरामायणाचे पलीकडे रामायणाची त्यांना जास्त माहिती नसते. अशा शिक्षकांना रामायणांतील गोष्टी चांगल्या सांगतां न आल्यास नवल नाहीं. शिक्षकानें रामायणाचें चिपळूणकर मंडळीनें प्रसिद्ध केलेलें सुरस भाषांतर अवश्य वाचावें. या वाचनाचा त्याला गद्य, पद्य, इतिहास वगैरे विषय शिकविण्याला फार उपयोग होईल. जी गोष्ट सांगावयाची तिची तयारी आधीं करून ठेवावी. कोणता भाग सांगावयाचा, कोणता भाग गाळावयाचा

हें आधीं ठरवावें. मुलांना बारीक सारीक गोष्टी कळत नाहीत व त्यांत आनंदही वाटत नाहीं. आपण रामायणांतील पहिली गोष्ट घेऊं. फार फार प्राचीन काळीं उत्तर दिशेस कोसल नांवाचा एक मोठा देश होता. त्यांतील लोक सुखी होते. त्या देशाचा दशरथ नांवाचा राजा होता. त्याचें आपल्या प्रजेवर फार प्रेम असे. तो आपल्या प्रजेला आपल्या मुलाप्रमाणें समजे व त्यांची काळजी घेई. प्रजेचेंही राजावर फार प्रेम होतें. अशा रीतीनें राजा व प्रजा हीं उभयतांही सुखांत नांदत होतीं. राजाचा वशिष्ट नांवाचा गुरु असे. हा फार विद्वान् असे व राजा त्याच्या उपदेशाप्रमाणें नेहमीं चाले. राजाच्या सुखांत एकच उणीव होती. त्याला मुलगा नव्हता. यामुळें आपल्यामागें आपल्या गादीवर कोण बसेल, आपल्या प्रजेचें कोण पालन करील अशी त्याला काळजी वाटे. त्याला तीन राण्या होत्या. त्या तिघीही फार सुस्वभावी होत्या. राजानें आपणास मुलगा व्हावा, म्हणून मोठा यज्ञ केला, तेव्हां अग्नि प्रसन्न झाले व त्यांच्या वरामुळें त्याला चार मुलगे झाले. कौसल्येला जो पुत्र झाला त्याचें नांव राम. रामाचा जन्म चैत्र शु० ९ स झाला. रामाची आठवण अजूनही आपणांस आहे. राम जन्मला त्या दिवशीं दरवर्षी आपण रामजन्माचा उत्सव करितों. सुमित्रेला मुलगा झाला त्याचें नांव लक्ष्मण. कैकेयीला दोन मुलगे झाले त्यांचीं नांवें भरत व शत्रुघ्न. हीं मुलें भारी गुणी होतीं व त्यांचें एकमेकांवर फार प्रेम असे. त्यांतल्या त्यांत लक्ष्मणाचें रामावर सर्वांत जास्त प्रेम होतें. त्यांचे नानाप्रकारचे खेळ पाहून व त्यांचे गोड बोल ऐकून आईबापांना फार आनंद होत असे. राजाचे हे चार गुणी पुत्र पाहून प्रजेलाही भारी आनंद होत असे. राजानें मुलांच्या विद्याभ्यासाकरितां चांगले शिक्षक ठेविले व तीं मुलें शिकूं लागलीं. ही सर्व हकिकत पहिल्या धड्यांत सांगतां येईल.

तिसऱ्या इयत्तेंत महाभारतांतील गोष्टी रामायणाच्याच पद्धतीनें घ्याव्यात. पुढें दिलेल्या अनुक्रमांत सुमारें २० गोष्टींत महाभारताची कथा मुलांना सांगतां येईल. १ कौरवपांडवांचें शिक्षण. २ दुर्योधनाचा मत्सर व भीमाचा नाश करण्याची युक्ति. ३ लाक्षागृह व बकासुराचा वध. ४ द्रौपदीस्वयंवर. ५ मयसभा व राजसूययज्ञ. ६ कपटद्यूत व द्रौपदीची विटंबना. ७ पांडववनवास व घोषयात्रा. ८ नळदमयंती आख्यान. ९ सत्यवानसावित्री आख्यान. १० अर्जुन अस्त्रें मिळवितो. ११ पांडवांचा अज्ञातवास व कीचकवध. १२ उत्तर गोग्रहण. १३ अभिमन्यूचें लग्न व कृष्णशिष्टाई. १४ भीष्मार्जुन युद्ध. १५ दुःशासनवध व कर्णवध. १६ गदायुद्ध. १७ अश्वत्थाम्याचा सूड. १८ पांडवांना अभिषेक. १९ अश्वमेध यज्ञ.

गोष्ट सांगत असतांना त्या गोष्टींतील नीतितत्त्व अप्रत्यक्षपणें मुलांच्या मनावर बिंबेल अशी काळजी शिक्षकानें घ्यावी. प्रत्येक गोष्टींतील तात्पर्य काढून मुलांना

उपदेश करणें चांगलें नव्हे. त्यायोगानें नीतिशिक्षणाचें कार्य होत नाहीं. 'पहा मुलांनो, रामाचें आपल्या बापावर किती प्रेम होतें; तो आपल्या बापाचें वचन पाळण्याकरितां वनासदेखील जाण्यास तयार झाला. तुम्हीही आपल्या आई-बापांवर असेंच प्रेम करा. त्यांची आज्ञा पाळण्यास तयार व्हा. तुम्ही असें कराल ना ! यांतच तुमचें कल्याण आहे. ' अशा प्रकारचा नेहमीं उपदेश केल्यानें त्याचा उपयोग होत नाहीं. नीतितत्त्वें व सद्गुणांची आवड हीं न कळत मुलांच्या अंतःकरणांत रुजलीं पाहिजेत व तेथें त्यांचीं मुळें खोलवर गेलीं पाहिजेत.

गोष्ट सांगत असतांना मधून मधून मुलांना प्रश्न विचारावे. प्रश्न फार थोडे असावे, नाहींतर गोष्टीचा धागा तुटून मुलांचें लक्ष भलतीकडे जाण्याचा संभव असतो. कित्येक वेळां शिक्षक सांगत असलेली गोष्ट कांहीं मुलांना माहीत असते व तीं माहिती सांगण्याला फार उत्सुक असतात, पण शिक्षक त्यांना गप्प बसविण्याचा प्रयत्न करितो. शिक्षकाला वाटतें कीं, मुलांनीं गोष्ट सांगितली, तर आपणांस नवीन असें कांहींच सांगावयास राहाणार नाहीं. शिक्षकाची तयारी चांगली असल्यास मुलांना गोष्ट माहीत असली, तरी त्या माहितींतच नवीन भर घालून तीं गोष्ट त्याला मनोरंजक करितां येईल. गोष्टींतील व्यक्तींचीं व प्रसंगांचीं नांवें शिक्षकानें फळ्यावर लिहावीं. गोष्टीचे भागही फळ्यावर लिहून ठेवावे, म्हणजे मुलांना थोडक्यांत ती गोष्ट सांगतां येईल. रामायण व महाभारत यांतील कांहीं प्रसंग दाखविणारीं राजा रविवर्मा, चित्रशाळा, रविवर्मा आर्टप्रेस यांनीं तयार केलेलीं चित्रें थोडक्या किंमतींत मिळतात, त्यांचा शिक्षकांनीं अवश्य उपयोग करावा. गोष्ट झाल्यावर ती मुलांकडून सांगून घ्यावी व तिच्या संबंधानें कांहीं थोडे ज्यांचें उत्तर देण्याला मुलांना विचार करावा लागेल असे प्रश्न विचारावे. झालेली गोष्ट मुलांना दुसरे दिवशीं वाचून येण्यास सांगावें. ज्या प्रसंगाचें वर्णन आपण करीत आहोंत यासंबंधानें जर एकाद्या नाटकांत प्रवेश असेल, तर तो वाचून दाखवावा.

या चित्रावरून त्या वेळच्या लोकांचे पोषाक, त्यांचीं शस्त्रें, त्यांची राहाणी यांची कल्पना होईल. खड्ग, धनुष्य, मुकुट, रथ वगैरे पदार्थ हस्तव्यवसायाचे वेळीं मातीचे अगर कागदाचे करून घ्यावे.

याच इयत्तेंत हिंदुस्तानाच्या प्राचीन इतिहासांतील कांहीं थोर पुरुषांच्या गोष्टी सांगाव्या. गौतमबुद्ध, अशोक, चंद्रगुप्त व चाणक्य, विक्रमादित्य, हर्ष, शालिवाहन वगैरे थोर पुरुषांचीं चरित्रें अद्भुत रसानें भरलेलीं आहेत. चरित्रें वर्णन करितांना आपण या पुरुषांच्या गोष्टीच सांगत आहोंत, ऐतिहासिक दृष्टीनें चरित्रें सांगत नाहीं

ही गोष्ट शिक्षकानें लक्षांत ठेवावी. गौतमबुद्धाचें चरित्र सांगतांना बौद्ध धर्माचा इतिहास किंवा त्याचीं तत्त्वें सांगण्याच्या भानगडींत पडूं नये. मुलांना थोर पुरुषांचीं थोर कृत्यें ऐकण्यांत मजा वाटते, पण त्यांना नैतिक तत्त्वांचें नुसतें विवेचन गोड वाटत नाहीं.

दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तांतील गोष्टींच्या योगानें प्राचीन इतिहासाची थोडीशी तरी कल्पना मुलांना येईल. यानंतर प्रांताच्या इतिहासाकडे वळतां येईल. चवथ्या इयत्तेंत शिकणाऱ्या मुलांचें वय साधारणपणें ९।१० वर्षांचें असतें. तेव्हां याही इयत्तेंत इतिहास हा गोष्टीच्या रूपानें शिकविला पाहिजे. जो भाग आपणाला शिकवावयाचा त्याचा विचार करून शिक्षकानें गोष्टींची निवड करावी. या गोष्टींच्या योगानें कालाच्या अनुक्रमानें प्रांताच्या इतिहासाचा सर्व भाग येईल अशी खबरदारी घ्यावी. गोष्टी सांगत असतांना मुख्य मुख्य गोष्टींचा काळ सांगण्यास विसरूं नये. मुलांना इसवी सनाची कल्पना आलेली असते. यामुळें त्यांना सांगितलेले सन समजण्यास व लक्षांत राहाण्यास अडचण पडणार नाहीं. महाराष्ट्राचा इतिहास जर मुलांना शिकवावयाचा असेल, तर पुढें दिलेल्या गोष्टींच्या योगानें हा सर्व भाग या इयत्तेंत मुलांना शिकवितां येईल. १ दंडकारण्य. २ शालिवाहन. ३ मुसलमानांची देवगिरीवर स्वारी. ४ गुलाम बादशहा होतो. ५ वेरूळचे पाटील सरदार बनतात. ६ विनोदाचे बोल खरे झाले. ७ सासऱ्याजावयाचें भांडण. ८ शिवाजीचें बालपण. ९ स्वराज्यस्थापनेची तयारी. १० आरंभींचे पराक्रम. ११ अफजुलखानाचा वध. १२ बाजीप्रभु. १३ बापलेकांची भेट. १४ शाहाजीचा मृत्यु. १५ शाइस्तेखानाची स्वारी. १६ स्वामिनिष्ठ सरदार मुरारबाजी. १७ मेवामिठाईचे पेटारे. १८ गड आला पण सिंह गेला. १९ डोंगरचे उंदीर व मैदानांतील मोंगल व पठाण. २० राज्याभिषेक. २१ दक्षिणेंतील दिग्विजय. २२ संभाजी. २३ राजारामाचें जिंजीला प्रयाण. २४ अवरंगजेब त्रस्त होतो. २५ शाहू व ताराबाई या दोघांचीं भांडणें. २६ कुळकर्णी मुख्य प्रधान होतो. २७ बाजीराव व निजाम. २८ छत्रसालला मदत. २९ मराठ्यांचे उत्तर हिंदुस्तानांतील पराक्रम. ३० त्रिंबकराव दाभाडे. ३१ वसईचा किल्ला व चिमणाजी आप्पा. ३२ बाळाजी बाजीराव व त्याचे विरुद्ध असलेली मंडळी. ३३ शाहूचा मृत्यु. पेशवे मालक बनतात. ३४ राघोबाची अटकेपर्यंत भरारी. ३५ सदाशिवरावाचा उदगीर एथील पराक्रम. ३६ पानिपतचा घनघोर संग्राम. ३७ चुलत्यापुतण्याचें भांडण. ३८ शूर, निःपक्षपाती व शहाणा माधवराव. ३९ पानिपताचा सूड. ४० माधवरावाचा अकालीं मृत्यु व नारायणरावाचा खून. ४१ बारभाईचें कारस्थान. ४२ वडगांवची लढाई. ४३ महादजी शिंदे. ४४ पेशवाईची भरभराट. ४५ खड्यांची लढाई. ४६ सवाई माधवरावाचा मृत्यु. बाजीराव गादीवर

येतो. ४७ थोर पुरुषांचा अस्त. ४८ आपसांतलि यादवी. पेशवे इंग्लिशांच्या आश्रयास जातात. ४९ बाजीराव व डेंगळे. मराठी राज्याचा शेवट. ५० सातारचे राजे.

चौथ्या इयत्तेंतील गोष्टीही साधारणपणें पूर्वीच्याच पद्धतीनें सांगाव्या. जी गोष्ट सांगावयाची तिच्यांतील महत्त्वाचा भाग कोणता याचा विचार आधीं करून त्यावर जास्त लक्ष द्यावें. ज्या व्यक्तीची गोष्ट सांगत आहोंत तिचें स्वभावचित्र रेखाटण्यास विसरूं नये. व्यक्तीचा स्वभाव वर्णन केल्यानें त्या व्यक्तीचें चरित्र व कृत्यें कळण्यास मदत होते. गोष्ट सांगत असतांना गोष्टींतील स्थळें नकाशांत दाखवावीं. गोष्टींत येणाऱ्या व्यक्तींचीं चित्रें अवश्य दाखवावीं. फळ्यावर नकाशा काढून त्यांत वर्णन करीत असलेल्या प्रसंगांचीं स्थळें भरल्यानें तीं मुलांना चांगलीं कळतात किंवा छाऊन पेपरवर आऊटलाईन नकाशा काढून त्यांत रंगित खडूनें तीं स्थळें दाखविलीं असतां मुलांच्या चांगलीं लक्षांत राहातात. नेहमींच्या नकाशांत गांवांचीं गर्दी असते व त्यांत बारीक सारीक स्थळांचीं नांवें दिलेलीं नसतात. यामुळें त्या नकाशाच्या योगानें कधींकधीं मुलांना स्थळांचा बिलकूल बोध होत नाहीं. गोष्टींतील व्यक्तींचीं नांवें फळ्यावर लिहिण्यास शिक्षकानें विसरूं नये. गोष्ट सांगत असतांनाच तिच्यांतील महत्त्वाच्या गोष्टी फळ्यावर लिहाव्या, म्हणजे गोष्टीच्या शेवटीं हें फळ्यावरील टांचणच होईल. गोष्ट सांगून झाल्यावर तिच्या संबंधानें प्रश्न शिक्षकानें भराभर विचारावे. नंतर ती गोष्ट वर्गास नेमिलेल्या पुस्तकांतून वाचून दाखवावी. ऐतिहासिक प्रसंग वर्णन करणारीं व मुलांना सहज समजतील अशीं गाणीं मराठींत फार थोडीं आहेत. त्यांपैकीं बहुतेक रजपूत वीरांच्या व वीरांगनांच्या वर्णनाचीं आहेत. मराठ्यांच्या इतिहासांत काव्याला योग्य असे अनेक अद्भुत प्रसंग झाले आहेत, पण त्यांचें वर्णन करणारीं सोपीं गाणीं नसावीं ही शोचनीय गोष्ट आहे. ऐतिहासिक कादंबऱ्या मराठींत थोड्या आहेत. त्यांतून योग्य असे उतारे वाचून दाखवावे. या इयत्तेंतील गोष्टींच्या योगानें महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधानें पुढील गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनावर चांगल्या बिंबल्या पाहिजेत.

फार फार प्राचीन काळीं सध्यां आपण ज्या प्रांतांत राहातों तेथें दाट अरण्य होतें. तेथें वसती फार विरळ होती व गांवें आणि शहरें नव्हतीं. तेथें रानटी लोक राहात असत. आर्य नांवाचे सुधारलेले, सुंदर बांध्याचे गोरे लोक विंध्याद्रि पर्वत ओलांडून दक्षिणेंत आले. त्यांनीं झाडें कापून गांव वसविले. जमिनी नांगरावयास सुरुवात केली. एथें आर्यांनीं मोठमोठीं राज्यें स्थापिलीं व अनेक राजघराण्यांनीं तेथें राज्य केलें. त्यांपैकीं शालिवाहन राजे फार प्रसिद्ध होते. त्यांची पैठण ही राजधानी होती. त्यांनीं कार्ले, भाजें, कान्हेरी एथें कोरीवलेणीं खोदलीं. शालिवाहनांच्या

कारकीर्दींत महाराष्ट्राची फार भरभराट झाली. त्यांनीं शक नांवाच्या परकी लोकांचा पराभव करून महाराष्ट्र देश पुन्हा स्वतंत्र केला. ह्यांच्या नंतर चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे राजघराणीं होऊन गेलीं. शेवटीं तेराव्या शतकांत महाराष्ट्रांत यादवांचें राज्य असतांना मुसलमान लोकांनीं यादवांची राजधानी देवगिरी हिजवर हल्ला केला. मराठ्यांच्या भोळेपणामुळें त्यांचा पराभव झाला. कांहीं दिवसांनीं यादवांचें राज्य नाहींसें झालें व मुसलमानांनीं दक्षिणेंत राज्य स्थापिलें. या बहामनी बादशहांच्या ताब्यांत सर्व महाराष्ट्र आला. दक्षिणेंतील या मुसलमान राजांला मराठी सरदारांची मदत घ्यावी लागली, कारण त्यांच्याजवळ मुसलमानांचें फारसें मोठें सैन्य नव्हतें. बहामनी राजांच्या कारकीर्दींत मराठे सरदारांच्या ताब्यांत पुष्कळ जहागिरी होत्या व देशमुख, देशपांडे हे अधिकारी मराठेच असत. पुढें या बहामनी राज्याचीं पांच राज्यें झालीं. त्यांतील तीन थोड्याच वर्षांत मोडलीं. विजापूर व नगर एथील राजांचे ताब्यांत महाराष्ट्राचा बहुतेक भाग गेला. नगरच्या राज्यांत पुष्कळ मराठे सरदार होते. त्यांत भोसले व जाधवराव हे मुख्य होते. यावेळीं महाराष्ट्राची स्थिति फार वाईट झाली होती. लढाया, दुष्काळ व मुसलमान सरदारांची अरेरावी यांनीं देश त्रस्त झाला होता. दिल्लीच्या बादशहानें नगरचें राज्य बुडविलें. नगरच्या राज्यांतील पराक्रमी मराठे सरदार शाहाजी राजे भोसले यांनीं तें वांचविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो फुकट गेला. नगरचें राज्य मोडल्यावर शाहाजी राजे विजापूरकरांकडे नोकरीस गेले. त्यांनीं कर्नाटकांत मोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. त्यांची बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी हे पुणें एथील जहागिरींत राहत असत. जिजाबाई ही यादवांच्या कुळांतील होती. तिला हिंदुधर्म व महाराष्ट्र यांचा फार अभिमान होता. महाराष्ट्रांत हिंदुराज्य स्थापन व्हावें ही तिची मोठी महत्त्वाकांक्षा होती. तिनें शिवाजीला फार चांगलें शिक्षण दिलें. भोंवतालीं हिंदु लोकांची हीन स्थिति पाहून शिवाजीला राज्य स्थापन करण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. विजापूरच्या राज्याचा बंदोबस्तही चांगला नव्हता. शिवाजीनें आपल्या शूर, धाडसी व एकनिष्ठ मित्रमंडळींच्या मदतीनें बरेच किल्ले व प्रांत काबीज केले. शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां धाडलेल्या अफजुलखानाचा त्यानें पराभव केला व दुसरा पराक्रमी सरदार शिद्दी जोहार यालाही त्याचेपुढें हात टेकावे लागले. मग विजापूरकरांनीं शिवाजीचा स्नेह संपादन केला. पुढें दिल्लीच्या बादशाहाशीं त्याच्या लढाया सुरू झाल्या. दिल्लीचा सरदार शाइस्तेखान याला शिवाजीपुढें हार खावी लागली. मग दिल्लीचा बादशहा अवरंगजेब यानें मोठें सैन्य दक्षिणेंत धाडलें. त्याजपुढें शिवाजीचा निभाव लागला नाहीं. शिवाजीनें बादशहाशीं सख्य केलें. बादशहानें शिवाजीस दिल्लीस बोलावलें व त्यास तेथें कैद केलें. शिवाजीनें युक्तीनें

आपली सुटका केली व दक्षिणेंत येऊन पुन्हा मोंगलाशा युद्ध सुरू केलें. त्यानें पुणें, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, कोंकण हा सर्व भाग काबीज केला. कर्नाटकांतही जिंजी वगैरे प्रांत त्यानें आपल्या ताब्यांत आणले. शिवाजीनें आपणास थाटानें राज्याभिषेक केला व तो सन १६८० सालीं मरण पावला.

शिवाजीचा मुलगा संभाजी हा शूर होता, पण तो हेकेखोर होता. त्यानें आपल्या सावत्र आईस व तिच्या बाजूस असलेल्या सरदारांना ठार मारलें. अवरंबजेबानें प्रचंड सेना दक्षिणेंत आणली. संभाजी नऊ वर्षे अवरंगजेबाशीं लढला. शिवाजीच्या वेळच्या शूर व विश्वासू सरदारांना संभाजीनें ठार मारलें व आपल्या स्वच्छंदी वर्तनानें त्यानें पुष्कळ मराठे लोकांनाही आपले शत्रू बनविलें. यामुळें त्याचें सैन्यही कमी होत गेलें. खजिन्यांत पैसा राहिला नाहीं व जिकडे तिकडे अंदाधुंदी माजली. अखेरीस अवरंगजेबानें संभाजीला पकडून १६८९ सालीं हालहाल करून ठार मारलें.

संभाजीच्या मृत्यूमुळें मराठे लोकांना अवरंगजेबाचा फार राग आला व ते राजारामाच्या हाताखालीं एकत्र झाले. राजाराम व नंतर त्याची पत्नी ताराबाई यांच्या कारकीर्दींत १८ वर्षे मराठे सरदारांनीं धर्माच्या प्रेमानें व देशाभिमानानें प्रेरित होऊन महाराष्ट्रावर आलेल्या अनेक संकटांना मोठ्या धैर्यानें व शौर्यानें तोंड दिलें. अखेरीस अवरंगजेब त्रस्त होऊन वयाच्या ८९ व्या वर्षी महाराष्ट्रांतच मरण पावला.

नंतर शाहू गादीवर आला. तो गादीवर आल्यावर त्याचा व ताराबाईचा असे दोन पक्ष महाराष्ट्रात झाले. मराठे सरदारांला स्वतंत्रपणें राहाण्याची व लूट करण्याची संवय लागली असल्यामुळें त्यांना आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास ताराबाईच्या भांडणामुळें चांगलीच संधी सांपडली.

या संकटकाळीं बाळाजी विश्वनाथ हा पुढें आला. त्यानें शाहूस चांगली मदत केली. जवळ सैन्य पाळून लहान लहान सरदारांचा पराभव करून त्यानें त्यांना शाहूच्या बाजूस आणिलें. आंग्रे व इतर मोठे सरदार यांच्याशीं सामोपचाराचें बोलणें करून त्यांनाही शाहूच्या बाजूस आणिलें. देशांत स्वस्थता स्थापन केली व जमिनीची लागवड करण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन दिलें. दिल्लीस जाऊन बादशहाकडून चौथाईच्या सनदा आणिल्या. शाहूनें बाळाजीस मुख्य प्रधान केलें.

त्याचा मुलगा बाजीराव हा फार महत्त्वाकांक्षी होता. जुने सरदारांचें व त्याचें पटेना. बाजीरावानें पराक्रम करून माळवा काबीज केला. निजामाचा पराभव केला.

उत्तर हिंदुस्तानांत मराठ्यांची सत्ता स्थापिली. शिंदे, होळकर, पवार, बुंदेले वगैरे सरदार त्याचे कारकीर्दीत उदयास आले. त्याचा भाऊ चिमणाजी आप्पा यानें वसई एथें पोर्तुगीज लोकांचा पराभव करून वसईचा किल्ला मोठ्या पराक्रमानें घेतला. बाजीरावाचा वडील मुलगा बाळाजी उर्फ नानासाहेब हा फार मुत्सद्दी होता. गायकवाड, भोसले, प्रतिनिधि हे जरी त्याच्या विरुद्ध होते, तरी त्यानें त्यांचें कांहीं चालू दिलें नाहीं. त्यानें कर्नाटकांत स्वाऱ्या करून तिकडे आपला अंमल बसविला. शाहू १७४९ त मेल्यावर सर्व सत्ता पेशव्यांचे हातांत आली व पुणें हें मराठ्यांच्या राजधानीचें शहर झालें. नानासाहेबाचा भाऊ रघुनाथराव यानें शिंदे व होळकराच्या मदतीनें दिल्लीच्या बादशहास आपल्या ताब्यांत आणिलें व मराठ्यांचा अंमल अटकेपर्यंत बसविला. सन १७६० सालीं पेशव्याचा चुलतभाऊ सदाशिवराव भाऊ याणें निजामाचा मोड करून त्याजकडून पुष्कळ प्रांत घेतला. यावेळीं मराठ्यांच्या सत्तेचा अगदीं उत्कर्ष झाला होता. शिंदे व होळकर यांच्या आपसांतील भांडणामुळें व नानासाहेबांनें उत्तर हिंदुस्तानांत लक्ष न दिल्यामुळें तिकडे फार घोटाळे माजले व सन १७६१ सालीं काबूलचा बादशाह अहमदशाहा अबदाली यानें दिल्लीवर स्वारी केली. सर्व मुसलमान लोक त्याचे बाजूस गेले. मराठ्यांची पहिल्यानें सरशी झाली, पण शेवटच्या लढाईंत सदाशिवराव मारला गेला व मराठ्यांचा पराभव झाला. या लढाईमुळें मराठ्यांना मोठा धक्का बसला. याच लढाईच्या बातमीनें नानासाहेबांस जें दुःख झालें त्या योगानें त्यानें अंथरूण धरलें व लवकरच तो मरण पावला.

यानंतर त्याचा मुलगा माधवराव हा पेशवा झाला. हा तरुण पेशवा शूर, मुत्सद्दी व निःपक्षपाती होता. त्यानें उत्तर हिंदुस्तानांत सैन्य पाठवून मराठ्यांचा अंमल तेथें बसविला. त्यानें निजामाचा मोड केला व कर्नाटकांत हैदरअल्लीचा पराभव केला. प्रजेच्या हिताकरतां तो फार झटत असे. हा पेशवा अकालीं क्षयरोगानें मरण पावला. या योगानें मराठ्यांचें फार नुकसान झालें.

त्याचेमागें त्याचा भाऊ नारायणराव हा गादीवर बसला. हा अविचारी व हूड असे व हलक्या लोकांत मिसळत असे. त्याचें व त्याचा चुलता रघुनाथराव याचें वांकडें आलें. पगाराची बाकी थकल्यामुळें गार्दी लोकांनीं बंड केलें व रघुनाथरावाच्या लोकांनीं त्या लोकांस फूस दिल्यावरून त्यांनीं नारायणरावास ठार मारलें. यानंतर रघुनाथराव गादीवर बसला. पण मुत्सद्दी मंडळीनें त्यास गादीवरून काढून टाकिलें व नारायणरावाचे बायकोचे नांवानें कारभार चालविला. पुढें नारायणरावाची पत्नी गंगाबाई हिला पुत्र झाला. त्याचे नांवानें नाना फडणवीस, महादजी शिंदे, तुकोजी होळकर वगैरे सरदार मंडळीनें राज्यकारभार चालविला. राज्याची व्यवस्था उत्तम

चालू लागली. महादजीनें पराक्रमानें उत्तर हिंदुस्तानांत मराठ्यांची सत्ता फार वाढविली. दक्षिणेंत हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं मराठ्यांची बाजू चांगली राखिली. सवाई माधवरावानें वेडाचे भरांत माडीवरून उडी टाकून आत्महत्या केली. यानंतर रघुनाथरावाचा मुलगा बाजीराव यास पेशवा केलें. महादजी, हरिपंत फडके, अहिल्याबाई, तुकोजी होळकर वगैरे मराठ्यांचे प्रसिद्ध सरदार व मुत्सद्दी मरण पावले. दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर वगैरे सरदार आपसांत लढूं लागले. नाना फडणवीस इ. स. १८०० सालीं मरण पावला. मग जिकडे तिकडे अस्वस्थता माजली. होळकरानें पुण्यावर स्वारी केली. बाजीराव पळून इंग्रजांचे आश्रयास गेला. इंग्रजानें त्याला पुन्हा गादीवर बसविलें. बाजीराव फार दुर्गुणी होता. त्यानें सरदारांच्या जहागिरी जप्त केल्या. शेतकरी लोकांच्या कल्याणाकडे लक्ष दिलें नाहीं. पेंढारी लोक प्रजेला लुटूं लागले. दुष्काळ पडूं लागले. प्रजा त्रस्त झाली. इंग्रजांचें व बाजीरावांचें वाकडें आलें व युद्ध सुरू झालें. त्यांत बाजीरावाचा पराभव झाला. त्याला आठ लक्ष रुपये पेन्शन देऊन ब्रह्मावर्तास पाठविलें व महाराष्ट्र इंग्रजांच्या ताब्यांत गेला.

गोष्टी सांगत असतांना एका गोष्टीचा संबंध दुसरीशीं राहावा व अशा रीतीनें मुलांना सुसंबद्ध अशी हकिकत कळावी, याजबद्दल शिक्षकानें काळजी घ्यावी. पुष्कळ वेळां असें होतें कीं, मुलें गोष्टी लक्ष देऊन ऐकतात व मागील व पुढील गोष्टींचा संबंध लक्षांत न राहिल्यामुळें त्यांना इतिहासाची सुसंबद्ध अशी माहिती कळत नाहीं. गोष्टी सांगत असतांना नकाशाचा भरपूर उपयोग करावा, हें मागें सांगितलेंच आहे. मराठ्यांच्या इतिहासांत इ. स. १६८०, १६८९, १७६१ हीं वर्षें महत्त्वाचीं आहेत. या वेळीं मराठी राज्याचा विस्तार किती होता, हें दाखविण्यास हिंदुस्तानचा आऊटलाईन नकाशा काढावा व त्यांत मराठ्यांच्या ताब्यांतील प्रदेश तांबड्या रेषेनें दाखवावा. पेशव्यांचीं अक्षरें, सरदारांचीं अक्षरें, राजांचे शिक्के जितके दाखविता येतील तितके दाखवावे. त्या वेळचा पोशाक, शस्त्रें, नाणीं, लोकांचे समज यांची माहितीहि शिक्षकानें द्यावी. जवळपास असलेलीं ऐतिहासिक स्थळें दाखविण्यास मुलांस न्यावें. अलीकडे मराठ्यांच्या काळच्या मुत्सद्यांचीं, सरदारांचीं पेशव्यांचीं व सातारच्या राजांचीं बरींच पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. आपण सांगत आहोंत त्या प्रसंगाविषयीं एखादें पत्र असल्यास तें मुलांना वाचून दाखवावें.

पांचव्या इयत्तेंत मुसलमानी अंमलही गोष्टीरूपानेंच घ्यावयाचा असतो. हा भाग मागें सांगितलेल्या पद्धतीनेंच घ्यावा. पुढें दिलेल्या २०।२५ गोष्टींत हा भाग घेतां येईल.

१ महंमद पैगंबर. २ गझनीचा सबक्तगीन. ३ गझनीचा महंमद. सोमनाथावरील स्वारी. ४ पृथ्वीराज व महंमद घोरी. ५ कुतुबमिनार. ६ सुलतान रोझिया. ७ नासिरुद्दीन. ८ अल्लाउद्दीन खिलजी. पद्मिनीची गोष्ट. ९ महंमद तघलघ. १० शूर बाबर. ११ बाबरचें मुलावरील प्रेम. १२ हुमायून व शीरशहा. ११ अकबरचे आरंभींचे दिवस. १४ अकबराचा नवरत्न दरबार. १५ जहांगीर. १६ नूरजहान. १७ शहाजहान व ताजमहाल. १८ औरंगजेब. १९ नादीरशहा. २० दुर्दैवी शहाअलम. २१ मोंगल अंमलाचें सिंहावलोकन.

मुसलमानांच्या इतिहासांतील गोष्टी सांगत असतांना पुढील गोष्टी मुलांच्या मनावर बिंबविल्या पाहिजेत. ६ व्या शतकांत अरबस्तानांतील लोक मूर्तिपूजक होते. त्यांचा नवसावर व शकुनावर फार भरंवसा होता. ते फार धर्मभोळे होते. त्यांना विद्या व कला यांचें ज्ञान नव्हतें. त्यांची नीतिही चांगली नव्हती. महंमद-साहेब यांना ही स्थिति पाहून फार वाईट वाटलें व त्यांनीं ईश्वर एक आहे, तो सर्व शक्तिमान् आहे, त्याची प्रार्थना सर्वांनीं करावी, त्याला मान द्यावा व सन्मार्गानें वागावें असा उपदेश केला. हा त्यांचा नवीन धर्म अरबस्तानांत चोहोंकडे पसरला व अरबस्तानची राजसत्ताही त्यांचे हातांत आली. त्यांच्यामागून त्यांचे ४ शिष्य एकामागून एक असे गादीवर बसले. ते धर्माचे मुख्य गुरु होते. ते साधुवृत्तीनें वागत असत. त्यांच्या कारकीर्दींत या इस्लाम धर्माचा प्रसार इजिप्त, सिरिया, पॅलेस्टाईन या प्रांतांत झाला व हे प्रांत मुसलमानांनीं जिंकले. त्यांनीं इराण देशही जिंकला. हे खलिफा मदिनाला राहात. यानंतरचे खलिफा राजवैभव भोगूं लागले. ते बगदाद एथें राहात. त्यांनीं इराण, अफगाणिस्तान, बलुचिस्तान, तार्तरी हा भाग जिंकला. यूरोपमध्यें स्पेन हा देशही त्यांचे ताब्यांत आला. यावेळीं खलीफांचें साम्राज्य फार मोठें होतें. त्यांचें वैभवही फार मोठें होतें. त्यांनीं शास्त्रें, विद्या व कला यांना उत्तेजन दिलें. पुढें खलिफाच्या राज्याला उतरती कळा लागली. खलीफाचे सरदार आपआपल्या प्रांतांत स्वतंत्र राजे झाले. यांपैकीं अलप्तगीन नांवाच्या एका सरदारानें अफगाणिस्तानांत राज्य स्थापन केलें. यावेळीं पंजाबांत पाल नांवाचे हिंदु राजे राज्य करीत होते. अलप्तगीनचा मुलगा सबक्तगीन यानें जयपाळाचा पराभव केला व पंजाबाचा कांहीं भाग आपल्या राज्यास जोडला. सबक्तगीनचा मुलगा महमंद हा फार पराक्रमी व महत्त्वाकांक्षी होता. त्यानें हिंदुस्तानची संपत्ती लुटण्याकरतां या देशावर १७ स्वाऱ्या केल्या. मुसलमान लोकांजवळ नवीन शस्त्रें होतीं. त्यांना लढण्याची कला संवयीनें चांगली माहीत झाली होती व धर्माच्या अभिमानानें ते जिवावर उदार होऊन लढत. हिंदु राजांत एकी नव्हती. लढाईच्या कलेंत बाहेर काय सुधारणा झाली आहे हें त्यांनीं पाहिलें

नाहीं, यामुळें महंमदानें त्यांचा पराभव केला. त्यानें उत्तर हिंदुस्तानांतील पुष्कळ देवळें लुटलीं. अखेरीस द्वारकेच्या किनाऱ्यावरील सोमनाथाचें देवालयही त्यानें इ. स. १०२४ त लुटलें. महंमद १०३० त मरण पावला. महंमदाच्या मरणानंतर हिंदु राजांनीं आपलीं भांडणें तशींच चालविलीं. सन ११८६ सालीं दिल्लीस पृथ्वीराज चव्हाण, कनोज एथें जयचंद राठोड व गुजराथेंत भीमदेव हे प्रबल राजे होते; पण त्यांचेंही एकमेकांशीं वैर होतें. सन ११९१ सालीं अफगाणिस्तानचा मुसलमान बादशहा शहाबुद्दीन यानें हिंदुस्तानावर स्वारी केली; पण पृथ्वीराज, भीमदेव व जयचंद हे एक होऊन लढले, यामुळें शहाबुद्दीनचा पराभव झाला. सन ११९१ सालीं जयचंदाची मुलगी संयुक्ता हिचें स्वयंवर झालें. तिनें पृथ्वीराजाला वरलें, हें जयचंदाला आवडलें नाहीं. त्यानें शहाबुद्दीनला आपल्या जावयाचा नाश करण्यास बोलावलें. शहाबुद्दीननें इ. स. ११९३ सालीं हिंदुस्तानावर स्वारी केली व पृथ्वीराजास ठार मारलें व दिल्लीचें राज्य घेतलें. शहाबुद्दीन यानें हिंदुस्तानांत मुसलमानी राज्याची स्थापना केली. शहाबुद्दीन १२०६ सालीं मरण पावला. तेव्हां त्याचा सरदार कुतुबुद्दीन हा दिल्ली एथील गादीवर बसला. हें घराणें गुलाम या नांवानें प्रसिद्ध आहे.

या गुलाम घराण्याचे मागून खिलजी घराणें आलें. त्यांतील राजा अल्लाउद्दीन हा फार पराक्रमी होता. त्यानें गुजराथ व दक्षिण प्रांत जिंकिला व रजपुतांवर स्वाऱ्या केल्या. यानंतर महमंद तघलघाच्या कारकीर्दींत दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना झाली. त्यावेळीं जवळ जवळ सर्व हिंदुस्तान देश मुसलमानांचे ताब्यांत गेला. हा राजा फार विक्षिप्त असे. याचा पुतण्या फिरोजशहा हा फार प्रजाहिततत्पर राजा होता. यानंतरचीं घराणीं फार दुर्बळ झालीं. दिल्लीच्या बादशहाच्या सरदारांनीं ठिकठिकाणीं आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं.

इ. स. १५२६ त अफगाणिस्तानांत बाबर नांवाचा मोंगल राजा होता. यानें आपल्या शूर लोकांनिशीं दिल्लीवर स्वारी केली व तेथील मुसलमान बादशहाचा पराभव करून आपण दिल्लीचा बादशहा झाला, म्हणून बाबराचें घराणें मोंगल या नांवानें प्रसिद्ध आहे व या घराण्यानें दिल्लीचें राज्य सुमारें २०० वर्षें भोगलें.

बाबर हा शूर व मुत्सद्दी होता. त्यानें आपलें राज्य बरेंच वाढविलें. तो ४ वर्षेंच राज्य करून १५३० सालीं मरण पावला. यानंतर त्याचा थोरला मुलगा हुमायून हा गादीवर बसला. त्यानें ममतेनें आपल्या भावांत आपलें राज्य वाटलें, पण या भावांनीं कृतघ्नपणानें त्याचेवरच शस्त्र उचललें. शीरशहा नांवाच्या बंगालच्या अफगाण सरदारानें हुमायूनचा पराभव करून

दिल्लीची गादी बळकाविली. ती त्याच्या वंशाकडे १५ वर्षे होती. हुमायून पळून इराणांत गेला. त्यानें पुन्हा अफगाणिस्थानची गादी आपल्या भावापासून मिळविली व दिल्लीवर स्वारी केली. तेथील राजाचा पराभव करून तो पुन्हा १५५६ सालीं गादीवर बसला; पण तो फार दिवस जगला नाहीं. तो त्याच वर्षी मरण पावला.

त्याचे मागून त्याचा मुलगा अकबर हा गादीवर बसला. हिंदुस्तानांत हा सर्वांत श्रेष्ठ मुसलमान राजा होय. तो गादीवर बसला तेव्हां त्याचें वय १५ वर्षांचें होतें, तरी त्यानें शाहाणपणानें आपल्या राज्याच्या बंदोबस्त केला व हळूहळू आपलें राज्य वाढविण्यास सुरुवात केली. धर्माचे बाबतींत हा फार उदार होता. त्यानें हिंदुलोकांशीं स्नेह संपादन केला व त्यांना राज्यांत मोठीं व महत्वाचीं कामें सांगितलीं. त्याच्या पदरीं अनेक विद्वान् मुत्सद्दी व शूर लोक होते, त्यांत पुष्कळ हिंदु होते. राजा तोडरमल, राजा भगवानदास, बिरबल वगैरे हिंदुसरदारांवर त्याचा फार विश्वास व लोभ असे. अकबरानें राज्याचा बंदोबस्त फार चांगला ठेवला. त्यानें सर्व उत्तर हिंदुस्तान व दक्षिण हिंदुस्तानचा कांहीं भाग आपल्या ताब्यांत आणला. अकबराची योग्यता फार मोठी आहे. रजपूत घराण्यांतील स्त्रियांशीं लग्नें करण्याचा परिपाठ याच राजानें घातला.

यानंतर त्याचा मुलगा जहांगीर हा गादीवर बसला. हा फार विलासी व व्यसनी होता त्याची बायको नूरजहान ही फार रूपवती व गुणवती होती. तीच राज्याची सर्व व्यवस्था पाहात असे. जहांगिरास दारूचें फार दांडगें व्यसन असे. जहांगीरची कारकीर्द, म्हणजे नूरजहानचीच कारकीर्द असें म्हणतां येईल.

त्याच मागून त्याचा मुलगा शहाजहान हा १६२७ सालीं गादीवर बसला. यानें मोतीमशीद, ताजमहाल वगैरे टोलेजंग इमारती बांधल्या. रत्नजडित मोराच्या आकाराचें मयूरासन नांवाचें बहुमूल्य सिंहासन तयार केलें. या राजानें आपल्या चारही मुलांना मोठाले अधिकार दिले. यामुळें ते बापावरच उठले व आपसांत लढूं लागले. त्याचा थोरला मुलगा दारा हा शूर व भोळा असे. दुसरा सुजा हा व्यसनी व अविचारी असे. तिसरा मुलगा अवरंगजेब हा महाधूर्त व शूर असे चवथा मुराद हा मूर्ख असे. अवरंगजेबानें सर्व बंधूंना ठार मारून बापास कैदेंत घातलें व आपण १६५८ सालीं गादीवर बसला. या बादशहानें सुमारें ५० वर्षें राज्य केलें; पण त्यांतलि २६ वर्षें त्यानें दक्षिणेंत घालविलीं. अवरंगजेब हा इस्लामी धर्माचा कट्टा अभिमानी असे व हिंदु धर्माचा द्वेष्टा असे. रजपूत व शीख लोकांस त्यानें फार छळलें, पण त्यांनीं त्याला दाद दिली नाहीं. मराठ्यांचें राज्य बुडवण्याकरतां तो दक्षिणेंत

२६ वर्षें राहिला, पण मराठ्यांचें राज्य त्याला बुडवितां आलें नाहीं. शेवटीं तो त्रस्त होऊन दक्षिणेंत १७०७ सालीं मरण पावला.

अवरंगजेबानंतर जे राजे आले ते दुबळे होते. दिल्लीचे सरदार स्वतंत्र होऊन त्यांनीं बंगाल, अयोध्या, हैद्राबाद्, कर्नाटक एथें स्वतांचीं राज्यें स्थापन केलीं. शीख लोकांनीं पंजाब आपल्या ताब्यांत घेतला रजपूत राजे स्वतंत्र झाले. मराठ्यांनीं उत्तर हिंदुस्तानांत आपलें वर्चस्व स्थापन केलें. यामुळें दिल्लीच्या बादशहाची सत्ता संपुष्टांत आली. अखेर मराठ्यांचे ताब्यांत दिल्ली देऊन त्यांचेजवळून खर्चाकरतां दरसाल १ लक्ष रुपये घेऊन दिल्लीच्या बादशहाला दिवस काढावे लागले. सन १८५७ सालच्या बंडांत दिल्लीचा नामधारी बादशहा सामील झाल्यामुळें त्याला इंग्लिश सरकारनें रंगून एथें धाडलें. अशा रीतीनें मोंगल बादशहाचा शेवट झाला.

यापुढें इतिहास गोष्टीरूपानें न सांगतां संगतवार व कालक्रमानें सांगण्यास सुरुवात करावी. याचा अर्थ बारीक सारीक गोष्टीसुद्धां मुलांना सांगाव्या किंवा शिक्षकानें आपला धडा अधिक मनोरंजक करूं नये असा नव्हे. शिक्षकानें मागील इयत्तांत झालेल्या मराठे व मुसलमान अंमलाची उजळणी घ्यावी. पूर्वीच्या इयत्तांत गोष्टीरूपानें इतिहास सांगतांना कांहीं इतिहासदृष्ट्या महत्त्वाच्या बाबी राहिल्या असल्यास त्या आतां सांगाव्यात. अशा रीतीनें मुलांना या काळाचें थोडक्यांत पण महत्त्वाच्या गोष्टींचें यथार्थ ज्ञान होईल. महत्त्वाच्या बाबींचे शक व राजघराणीं यांचीही माहिती मुलांना झाली पाहिजे. समकेंद्रपद्धतीनें आपण इतिहास शिकवीत आहों ही गोष्ट शिक्षकानें लक्षांत ठेवावी. मागील इयत्तांत आपण अगदीं महत्त्वाच्या गोष्टी घेतल्या होत्या. या इयत्तेंत याच ज्ञानांत भर घालून मागील भागांची उजळणी घ्यावी.

ब्रिटिश अंमलाची हकीकत साधारणपणें पुढील धड्यांत देतां येईल. १ ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना २ इंग्रज व फ्रेंच व्यापारी. ३ क्लाइव्ह व राज्यस्थापना. ४ वॉरन् हेस्टिंग्ज व राज्यव्यवस्था. ५ कार्नवालिस –हैदर व टिपु–कायम जमीनधारापद्धति. ६ वेलस्ली–तैनाती फौजेची पद्धति-टिपूचा शेवट. ७ लॉर्ड हेस्टिंग्ज–पेशवाईचा शेवट. ८ लॉर्ड बेंटिंक–सुधारणा. ९ शीख लोक. १० लॉर्ड डलहौसी. खालसा–पद्धति. ११ १८५७ सालचें शिपायांचें बंड-कारणें व परिणाम. १२ राणीचा जाहिरनामा. १३ दिल्ली दरबार व युवराज एडवर्ड यांचें आगमन. १४ लॉर्ड रिपन–स्थानिक स्वराज्य. १५ लॉर्ड डफ्रिन व कॉंग्रेस. १६ लॉर्ड कर्झन– दिल्ली दरबार. १७ युवराज जॉर्ज यांचें आगमन-

१८ लॉर्ड हार्डिंज–दिल्लीस राज्याभिषेक. १९ युरोपांतील महायुद्ध–कारणें व परिणाम. २० हल्लींची राज्यपद्धति या इयत्तेंत ब्रिटिश अंमलासंबंधानें पुढील दिलेल्या महत्त्वाच्या गोष्टी मुलांच्या लक्षांत आल्या पाहिजेत.

फार प्राचीन काळापासून हिंदुस्तानांतील मसाल्याचे पदार्थ, मलमल व जरीचें कापड, चंदन, नीळ वगैरे पदार्थांचा युरोपशीं व इतर देशांशीं मोठा व्यापार चालत असे. हा व्यापार ज्या राष्ट्राच्या ताब्यांत असे तें राष्ट्र फार संपन्न होई. पंधराव्या शतकांत कॉन्स्टॅन्टिनोपल हें शहर व भोंवतालचा प्रदेश हे मुसलमानांच्या ताब्यंत गेल्यामुळें हिंदुस्तान देशाशीं चालणारा व्यापार त्यांच्या हातांत गेला. मग युरोपियन राष्ट्रांनीं आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्तानांतजाण्याचा नवीन मार्ग शोधून काढला. या मार्गानें प्रथम पोर्तुगीज लोक हिंदुस्तानाशीं व्यापार करूं लागले. पण हिंदुस्तानांतील मुलुख काबीज करण्याचा व लोकांना जबरदस्तीनें आपल्या धर्मात ओढून घेण्याचा त्यांना मोह झाल्यामुळें त्यांची हिंदुस्तानांतील सत्ता व व्यापार हीं दोन्ही बसलीं. डच लोकांनीं प्रत्यक्ष हिंदुस्तानांत व्यापार न करतां सुमात्रा, जावा, बोर्निओ व सिलोन या ठिकाणीं आपला व्यापार व राजसत्ता स्थापन केली. फ्रेंच व इंग्लिश या दोन्ही राष्ट्रांनीं हिंदुस्तानच्या किनाऱ्यावर आपल्या वखारी घातल्या. हिंदु शिपायांना पगार देऊन आपल्या पदरीं ठेवावें, त्यांना नवीन तऱ्हेचीं शस्त्रें देऊन व कवाईत शिकवून त्यांचें एक प्रबळ सैन्य बनवावें व या सैन्याच्या मदतीनें हिंदुस्तानांतील राजांच्या अंतस्थ भांडणांत शिरून फ्रेंच लोकांचें साम्राज्य स्थापन करावें ही कल्पना महत्त्वाकांक्षी व मुत्सद्दी असा फ्रेंच गव्हर्नर डुप्ले याच्या लक्षांत आली. पण साहसी, शूर व त्याच्याचसारखा राजकारणकुशल असा त्याचा प्रतिस्पर्धी इंग्लिश सरदार क्लाइव्ह यानें डुप्लेचा बेत ढासळून पाडला व कर्नाटकांत इंग्लिश सत्तेचा पाया घातला.

बंगालचा तरुण व अविचारी सुभेदार सुराजउद्दौला यानें कलकत्ता एथील इंग्लिश वखारीवर हल्ला केला व तेथील इंग्लिशांचा व्यापार बुडविण्याचा प्रयत्न चालविला क्लाइव्ह यानें सुराजउद्दौला याचा पराभव करून मिरजाफर यास गादीवर बसविलें. यापुढील कांहीं वर्षे दोहाती राज्यकारभारामुळें व कंपनीच्या लोभी नोकरांच्या अन्यायी वर्तनामुळें बंगालला फार वाईट गेलीं. सन १७६५ मध्यें क्लाइव्हनें या गोष्टीचा कांहींसा बंदोबस्त केला. इ. स. १७७३ सालीं इंग्लंडच्या पार्लमेंटनें नवीन कायदा करून हिंदुस्तानची राज्यव्यवस्था ठरविली व त्या व्यवस्थेप्रमाणें वॉरन हेस्टिंग्ज हा पहिला गव्हर्नरजनरल झाला. याचवेळीं हैदर नांवाच्या साहसी सरदारानें म्हैसूरला स्वतंत्र राज्य स्थापिलें व इंग्लिशांबरोबर युद्ध सुरू केलें. हेस्टिंग्जनें सैन्य धाडून त्याचा मुलगा टिपू याचा पराभव केला

33 ता. १९३

व त्याशीं तह केला. मराठ्यांशीं कांहीं वर्षें युद्ध चाललें होतें, पण तें १७८२ सालीं थांबलें. कंपनीला कर्ज झालें होतें. त्याजकरतां अयोध्येच्या बेगमांजवळून व काशीच्या चेतसिंगाजवळून अन्यायानें पैसे काढले असा आरोप वॉरन हेस्टिंग्जवर पार्लमेंटनें ठेविला व त्याची चवकशी केली. त्या चवकशींत तो दोषमुक्त झाला.

दुसरा गव्हर्नरजनरल कॉर्नवालिस यानें बंगाल्यांतील शेतीला उत्तेजन देण्याकरतां कायम साऱ्याची पद्धति अमलांत आणिली. म्हैसूरचा राजा टिपू याजबरोबर मराठे व निजाम यांच्या मदतीनें युद्ध करून त्याचा पराभव केला. चौथा गव्हर्नर-जनरल मॉर्क्विस ऑफ वेलस्ली यानें इ. स. १८०० सालीं टिपूबरोबर युद्ध करून त्याचें राज्य खालसा केलें. शिंदे, होळकर, भोसले यांशीं लढाया करून मराठ्यांची सत्ता कमी केली. तैनाती फौजेची पद्धति अमलांत आणून इंग्लिश सरकारची सत्ता स्थापन केली.

लॉर्ड हेस्टिंग्ज या गव्हर्नरजनरलच्या कारकीर्दींत पेशव्यांचें राज्य खालसा झालें. यानें पेंढारी लोकांचा बंदोबस्त केला. भोसले व होळकर यांचा पराभव करून त्यांची सत्ता अगदीं नाहींशी केली.

वुइल्यम बेंटिंक या थोर अंतःकरणाचे गव्हर्नरजनरलनें देशाच्या राज्यकार-भाराचा उत्तम बंदोबस्त केला. त्यानें हिंदी लोकांना पाश्चिमात्य शिक्षण देण्या-करतां शाळा सुरू केल्या. राज्यकारभारांत हिंदी लोकांना जबाबदारीच्या जागा देण्याची पद्धति त्यानें सुरू केली. सतीची चाल त्यानें बंद केली. देशांतील ठग लोकांचा बंदोबस्त त्यानें केला.

लॉर्ड डलहैसी या गव्हर्नरजनरलनें सन १८४८–५६ पर्यंत राज्यकारभार केला. याच्या कारकीर्दींत पंजाब कंपनीचे ताब्यांत आला. शीख हे फार शूर लोक होते. त्यांच्या आपसांतील यादवीमुळें कंपनीच्या राज्याला त्रास झाला. त्यांच्याबरोबर इ. स. १८४६ व इ. स. १८४९ या दोन वर्षीं इंग्लिशांचीं युद्धें झालीं व इ. स. १८५३ सालीं तो प्रांत कंपनीनें आपल्या राज्यास जोडला. लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दींत रेल्वे, तारायंत्र या सुधारणा आल्या. संस्थानिकांना औरस पुत्र नस-ल्यास त्यांना दत्तक घेण्याची परवानगी द्यावयाची नाहीं असें डलहौसीनें ठरविलें व सातारा, झाशी, नागपूर हीं राज्यें खालसा केलीं. अयोध्या प्रांतही खालसा करून कंपनीचे राज्यास जोडला, यामुळें संस्थानिक लोक फार नाखूष झाले. डलहौसीचे मागून क्यानिंग हा गव्हर्नर जनरल झाला. तो फार सुस्वभावी होता. याचे कार-कीर्दींत आरंभीच शिपाई लोकांनीं बंड केलें. नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, तात्या टोपी वगैरे मंडळी त्यांची पुढारी झाली. सुमारें एक वर्षभर बंडाची धामधूम

चालली होती. इंग्लिश सैन्यानें बंडवाल्यांचा ठिकठिकाणीं मोड केला. व बंड मोडून टाकिलें. इ. स. १८५७ सालीं राणीसरकारनें राज्यव्यवस्था आपल्या ताब्यांत घेतली व ईस्ट इंडिया कंपनी नाहींशी झाली. यावेळेपासून राज्याची व्यवस्था पार्लमेंट सभा पाहूं लागली. राणीनें जाहिरनामा प्रसिद्ध करून लोकांचीं मनें शांत केलीं. १८७६ सालीं राणीनें हिंदुस्तानांत दरबार भरविला व कैसर-इ-हिंद ही पदवी धारण केली. लोकांत जास्त शिक्षण वाढल्यामुळें आपणांस जास्त राजकीय हक्क मिळावे अशी लोकांना साहजिक इच्छा उत्पन्न झाली व लोकांच्या मागण्या सरकारपुढें मागण्याकरितां कॉंग्रेस-राष्ट्रीय सभा-सन १८८५ सालीं स्थापन झाली. ही सभा दरसाल त्या वेळेपासून भरत आहे. लॉर्ड रिपननें स्थानिक स्वराज्याचे बरेच हक्क लोकांस दिले लॉर्ड मिंटो या गव्हर्नरजनरलचे कारकीर्दींत आणखी राजकीय हक्क मिळाले. सन १९१४ सालीं युरोपांत महायुद्ध सुरू झालें. तें ५ वर्षें चालू होतें. या युद्धांत हिंदुस्ताननें इंग्लंडला बरीच मदत केली. युद्धानंतर १९१९ मध्यें हिंदुस्तानला आणखी राजकीय हक्क देण्यांत आले.

याच इयत्तेंत हिंदुस्तानच्या राज्यकारभाराबद्दल अगदीं साधारण माहिती विद्यार्थ्यांना द्यावी. स्टेट सेक्रेटरीचे विशेष हक्क, प्रांतिक सरकार व मध्यवर्ती सरकार यांच्यांतील तिजोरीची वांटणी वगैरे बारीक सारीक गोष्टींची माहिती देण्याची आवश्यकता नसते. ‘ बादशाहाच्या वतीनें व्हॉइसराय हा हिंदुस्तानची राज्यव्यवस्था पाहातो. त्याला मदत करण्यास कार्यकारी मंडळ, लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व स्टेट कौन्सिल या सभा असतात. हिंदुस्तानचा राज्यकारभार व्यवस्थित रीतीनें चालण्याकरितां त्याचे १५ राजकीय विभाग केलेले आहेत. मुंबई, मद्रास, बंगाल, आसाम, संयुक्तप्रांत, पंजाब, मध्यप्रांत, बहार व ओरिसा या प्रांतांवर मुख्य अधिकारी गव्हर्नर असतो. गव्हर्नरचे मदतीस कार्यकारी मंडळ व कायदे कौन्सिल अशीं दोन मंडळें असतात. दिल्ली, अजमीर व मेरवाडा, कूर्ग, वायव्य सरहद्दीवरील प्रदेश या भागांवर चीफ कमिशनर हा अधिकारी असतो. याचे मदतीस कार्यकारी मंडळ व कायदे कौन्सिल नसतें. प्रत्येक प्रांताचे राज्यव्यवस्थेचे सोयीकरितां लहान भाग पाडलेले असतात त्यांस जिल्हे म्हणतात. जिल्ह्याचे आकारमानाप्रमाणें ८ ते १२ किंवा जास्त भाग करितात, त्यांस तालुके म्हणतात. तालुका लहानमोठ्या शेंदोनशें गांवांचा मिळून झालेला असतो.’ ही सर्व माहिती खालील इयत्तांत भूगोल शिकवतांना मुलांना मिळालेली असते. गांव कामगार, तालुका कामगार, जिल्ह्यांची व इलाख्याची राज्यव्यवस्था यांची माहितीही त्यांना खालच्या इयत्तांत झालेली असते. ही सर्व माहिती संगतवार घेऊन व त्यांत थोडीशी भर घालून सहाव्या इयत्तेंत हिंदुस्तानच्या राज्यकारभाराची साधारण कल्पना मुलांना देतां येईल.

मुलींचा अभ्यासक्रम ६ व्या इयत्ते पावेतों आहे.मुलांच्या शाळेंत आणखी १ इयत्ता जास्त आहे. या इयत्तेंत मागील सर्व भागाची उजळणी घेऊन ब्रिटिश अंमलासंबंधानें आणखी जास्त माहिती देतां येईल. ब्रिटिश अंमलाची माहिती देतांना इ. स. १७६५, इ. स. १८१८ व इ. स. १८५७ सालीं ब्रिटिश अंमलाखालील प्रदेश दाखविण्याकरितां तीन नकाशे आउट लाईन काढून त्यांत तो प्रदेश तांबड्या रेषांनीं दाखवावा. म्हणजे राज्याचा विस्तार कसा होत गेला याची कल्पना येईल.

इतिहास शिकवितांना शिक्षकानें आपले पूर्वग्रह व मतें मुलांवर न लादण्याची काळजी घ्यावी. हिंदुस्तानची पूर्व संस्कृति अभिमानास्पद आहे ही गोष्ट खरी आहे. या संस्कृतिबद्दल प्रत्येकास अवश्य अभिमान वाटला पाहिजे. हिंदुसमाजांत सध्यां ज्या चालीरीति आहेत त्यांपैकीं कांहींची कालानुरोधानें सुधारणा झाली पाहिजे ही गोष्टही अवश्य आहे. देशाची उन्नति होणें किंवा अवनति होणें हें नागरिकांच्या वर्तनावर अवलंबून असतें. भावी कालांत आपलें राष्ट्रही सुधारलेल्या राष्ट्रांत अग्रस्थान मिळवील, मात्र त्याकरितां आपण निःस्वार्थबुद्धीनें झटलें पाहिजे,या गोष्टी मुलांच्या मनावर बिंबल्या पाहिजेत.इतिहासाचे योगानें स्वदेशप्रीति हा गुण मुलांच्या मनांत उत्पन्न झाला पाहिजे, पण स्वदेशप्रीति म्हणजे इतरांचा द्वेष नव्हे ही गोष्टही मुलांच्या मनावर बिंबविली पाहिजे. मुलांना हिंदभूमीच्या स्तुतिपर कांहीं गाणींही सर्व इयत्तांतून शिकवावीं. 'हिंदभूमि ही जननी अमुची, प्रिय आम्हांला बहु गमते.' ( मुलांकरितां कविता ) 'अमुचा प्रियकर हिंदिस्तान,' ( रा. टिळक यांची कविता ) '-भारत हमारा देश-' वगैरे पदें फार सुंदर आहेत.

हिंदुस्तानच्या इतिहासांत प्राचीन इतिहासाचें महत्त्व फार आहे. सध्यांच्या हिंदुसमाजाचे आचार, विचार, धार्मिक विधि, संस्कृति या सर्वांचा पाया प्राचीन काळीं घातलेला आहे. प्राचीन काळच्या इतिहासाची माहिती नसेल, तर सध्यांच्या आपल्या संस्कृतीचें व आचारविचारांचें रहस्यच कळणार नाहीं. प्राचीन काळीं भरतभूमीची भरभराट कोणत्या कारणांमुळें झाली होती, त्यानंतरच्या अवनतीला कोणतीं कारणें झालीं व भविष्य काळच्या उन्नतीला कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत हें स्पष्टपणें कळण्याला प्राचीन इतिहासाचें थोडेंसें तरी ज्ञान अवश्य आहे. हें ज्ञान असल्याशिवाय हिंदु संस्कृतीबद्दल आपणांस योग्य व खरा अभिमान वाटणार नाहीं व तिचें यथार्थस्वरूपही कळणार नाहीं. गद्य, पद्य, वाङ्मय वगैरे गोष्टींचें यथार्थ ज्ञान होण्याला प्राचीन इतिहासाची साधारण माहिती असणें फार अवश्य आहे. हिंदुस्तानांत सध्यां आर्य, अनार्य, द्राविड, सेमिटिक व ट्युरानिअन वंशाचे लोक आहेत. फार प्राचीन काळीं या देशांत द्राविड व अनार्य लोक राहात असत. आर्य वंशांच्या सुधारलेल्या लोकांनीं खैबर घाटानें येऊन पंजाबांत वसती केली.

अनार्य आणि द्रविड लोकांशीं आर्य लोकांना फार झगडावें लागलें. या झगड्यांत आर्य लोकांचा जय झाला. अनार्य लोक मागें मागें हटत गेले. द्रविड लोक दक्षिणेंत गेले. आर्यांची पंजाबांत सुधारणा फार झपाट्यानें झाली. त्यांनीं त्या ठिकाणीं मोठमोठालीं नगरें स्थापन केलीं. यानंतर आणखी नवीन आर्य लोकांच्या टोळ्या आल्या. तेव्हां हे जुने आर्य गंगा व यमुना यांच्या दुआबच्या मार्गें वसाहती करीत करीत मगधापर्यंत गेले. जुने आर्य लोक व नवीन आर्य यांचे जोराचे झगडे झाले. कांहीं काळानें सर्व उत्तर हिंदुस्तान आर्य लोकांनीं व्यापिलें. त्यांनीं मोठमोठीं राज्यें स्थापन केलीं. विद्या, कला कौशल्य, शास्त्रें यांत त्यांची प्रगति झपाट्यानें झाली. चार वेदांची रचना या वेळीं पूर्ण झाली. उपनिषदासारख्या उच्च प्रतीच्या विचारांचे अनेक ग्रंथ आर्यांनीं रचले. चार वर्ण व चार आश्रम या दोन्ही संस्था या वेळीं प्रचारांत आल्या आहेत. यानंतर यज्ञांचें बंड फार माजलें. कर्ममार्गाच्या बाह्य खटाटोपांत लोक गुंतूं लागले. परोपकार, दया, अहिंसा वगैरे सद्धर्माच्या तत्त्वांकडे लक्ष न देतां लोक यज्ञयागांतच गुंतून राहिले. अनार्य लोक संपत्तीनें व मानानें आतां आर्यांच्या बरोबरीनें पुढें आले होते. कांहीं ठिकाणीं त्यांचीं राज्येंही होतीं, तरी त्यांना यज्ञ करण्याची मनाई होती. यज्ञमार्गाला कंटाळलेला समाज व अनार्य समाज यांना त्यावेळचा यज्ञयागाचा धर्म पसंत नव्हता. हिंदुधर्मांत नवीन सुधारणा व्हावी अशी त्यांची इच्छा होती. याच वेळीं गौतमबुद्ध जन्मास आला. त्यानें अहिंसा, सत्य, मनोनिग्रह वगैरे खऱ्या धर्माचीं तत्त्वें शिकविलीं व अहिंसेचा धर्म पुढें आणला. गौतमाला अनार्य लोक, शूद्र लोक व वैश्य लोक यांतून फार अनुयायी मिळाले. त्यानें आपल्या अहिंसेचा व नीतीच्या धर्माचा चोहोंकडे प्रसार केला. ४१ वर्षें धर्मोपदेश करून गौतम वारला. त्याचीं धर्मतत्त्वें उज्ज्वल आहेत. गौतम बुद्धानंतर त्याच्या धर्माचा अशोकानें फार प्रसार केला. अशोकाचे नंतर हिंदुस्तानच्या सरहद्दीवरील सामर्थ्यवान् राजा कनिष्क यानेंही बौद्ध धर्माचा फार प्रसार केला. मगधामध्यें चंद्रगुप्त हा फार सामर्थ्यवान् (३३१ इ. स. पूर्वीं) होऊन गेला. त्यानें हिंदुस्तानांत मोठें साम्राज्य स्थापन केलें व हिंदुस्तानवर स्वारी करणाऱ्या ग्रीक लोकांचा पराजय केला. चंद्रगुप्ताचे राज्याचा विस्तार फार मोठा होता. संपूर्ण उत्तर हिंदुस्तान, अफगाणिस्तान व बलुचिस्तान एवढा भाग त्याचे ताब्यांत होता. त्याची राज्यव्यवस्थाही उत्तम प्रकारची होती. चंद्रगुप्त हा हिंदुस्तानचा पहिला सम्राट होय. चंद्रगुप्तानंतर त्याचा नातू अशोक हा अत्यंत थोर व प्रसिद्ध राजा होऊन गेला, त्यानें बौद्धधर्माचा प्रसार करण्यास राज्याबाहेरही उपदेशक धाडले. अतुल पराक्रम, प्रजावात्सल्य, सर्व भूतांविषयीं दया, उत्कृष्ट राज्यव्यवस्था, स्वार्थत्याग या गुणांनीं या राजाची कीर्ति अजरामर झाली आहे. अशोकानंतर मगध देशाचें वैभव संपलें. यानंतर आंध्र देशाचे राजे शालिवाहन हे प्रसिद्ध झाले.

यांनीं बहुतेक दक्षिण हिंदुस्तान जिंकला. प्रतिष्ठान एथें यांनीं आपली राजधानी स्थापली. महाराष्ट्र हा प्रांत त्यांचा फार आवडता होता. त्यांच्या कारकीर्दींत महाराष्ट्राची फार भरभराट झाली. कलाकौशल्य वाढलें. त्यांनीं वैदिक धर्म व बौद्धधर्म यांना सारख्याच प्रेमानें वागविलें व महाराष्ट्रांत घुसणाऱ्या शक लोकांचा पराभव केला. चवथ्या शतकांत मगधांत गुप्तघराणें उदयास आलें. या घराण्याच्या कारकीर्दींत हिंदुस्तानची फार भरभराट झाली. विद्या, कला, शास्त्रें यांना उत्तेजन मिळालें. उत्तम संस्कृत वाङ्मय–नाटकें, काव्यें–याच राजांच्या कारकीर्दींत तयार झालें. चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, कुमारगुप्त व स्कंधगुप्त हे पांच पुरुष अत्यंत पराक्रमी झाले. या गुप्त वंशाच्या काळाला हिंदुस्तानचें ‘ सुवर्णयुग ’ म्हणतात. गुप्त वंशाच्या अखेरीस रानटी हूण लोकांनीं स्वाऱ्या करून हिंदुस्तानाला त्रस्त केलें. ५० वर्षें या रानटी लोकांनीं उत्तर हिंदुस्तानांतील भारतीयांना ‘दे माय धरणी ठाय’ असें केलें. यावेळीं देश बेचिराख होतो कीं काय अशी धास्ती पडली. माळव्याचा राजा यशोधर्मन् ( विक्रमादित्य ) यानें हूण लोकांचा नायनाट केला व भरतभूमीला संकटांतून सोडविलें व तिला सुखाचे दिवस दाखविले. त्याच्या उपकाराबद्दल हिंदुस्तानचे लोक अद्यापिहि त्याची कीर्ति गात आहेत.

प्राचीन काळांतील शेवटचा हिंदुसम्राट् हर्ष हा होय व बौद्ध धर्माचा शेवटचा पुरस्कर्ता होय. हर्षाच्या कारकीर्दींत हिंदुस्तानची फार भरभराट झाली. यानंतर बौद्धधर्माला उतरती कळा लागली. हिंदुधर्माची सुधारणा गुप्तांच्या काळापासून चालली होती. शंकराचार्यांनीं ही सुधारणा जोरांत आणली त्यामुळें बौद्धधर्म हिंदुस्तानांतून नाहींसा झाला. हर्षानंतर हिंदुस्तानांत अनेक लहानमोठीं राज्यें स्थापन झालीं. या राज्यांचे राजे रजपूत या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे रजपूत लोक शूर, धर्मनिष्ठ, पण भांडखोर असत. रजपुतांच्या आपसांतील यादवमुळें मुसलमान लोकांनीं या देशावर स्वाऱ्या केल्या व आपलें साम्राज्य स्थापन केलें या सर्व गोष्टींची प्राचीन इतिहासाच्या वाचनानें मुलांना माहिती झाली पाहिजे. श्रुति कशाला म्हणतात, स्मृतींत काय सांगितलें आहे, पुराणांचा विषय कोणता असतो याची कल्पना मुलांना आली पाहिजे.

प्राचीन इतिहासाचा भाग फार रमणीय आहे. चंद्रगुप्त, अशोक, समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, शातकर्णी, विक्रमादित्य, हर्ष इत्यादि राजांचीं चरित्रें कादंबरीप्रमाणें अद्भुतरसानें भरलेलीं आहेत. शिक्षकाला जर आपला विषय पूर्ण अवगत असेल, प्राचीन संस्कृतीबद्दल योग्य सहानुभूति व अभिमान असेल, वर्णन करण्याची शैली जर त्याला साधली असेल, तर हा भाग विद्यार्थ्यांना अतिशय गोड वाटेल यांत संशय नाहीं.

---

# प्राथमिक शाळांच्या शिक्षण पद्धतींतील फरक.

[ इंग्लंडमधील सरकारी प्राथमिक शाळांतून शिक्षण पद्धतींत जो फरक होत आहे त्याचें दिग्दर्शन पुढील लेखांत केलें आहे. हा लेख न्यू ईरा या मासिकांतील मिस् जे. एम्. म्याकिंडर लंडनमधील मार्ले-बोरो भागांतील शाळेच्या हेड मिस्ट्रेस यांच्या लेखाचे आधारें लिहिला आहे. संपादक. ]

लहान मुलांना जास्त स्वातंत्र्य द्यावें व शिक्षकाच्या देखरेखीखालीं त्यांनीं आत्मसंयमन करण्यास शिकावें ही इच्छा इंग्लंडांतील शेंकडों प्राथमिक शाळांच्या शिक्षकांच्या मनांत उद्भवली आहे, पण ही इच्छा एकदम सफल होणें शक्य नाहीं; कारण या बाबतींत पुष्कळ अडचणी आहेत. लष्करी शिस्तीप्रमाणें कडक शिस्त ज्या शाळेंत आजपर्यंत चालत आहे त्या शाळेंत एकदम पूर्वींची ही कडक शिस्त काढून टाकून, शिक्षक आणि विद्यार्थी यांना एकमेकांशीं मित्राप्रमाणें वर्तन करण्यास सांगणें व अशा प्रकारें मुलांना आत्मसंयमन करण्यास शिकविणें ही गोष्ट फार कठीण आहे.

हळूहळू जुन्या वळणावरून नव्या वळणावर शाळा कशा जात आहेत हें दाखविण्याकरितां पुढें एक उदाहरण घेतलें आहे. ही शाळा लंडन शहरांत आहे. शाळेची जागा, इमारत, शिक्षक, मुलें व साहित्य इत्यादि बाबतींत इंग्लंडांतील पुष्कळ सरकारी शाळांचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. लंडन म्युनिसिपालिटीच्या ताब्यांतील प्राथमिक शाळांपैकीं ही एक शाळा आहे. या शाळेंत अगदीं लहान मुलांचे वर्ग आहेत. लंडनच्या या भागांत अत्यंत दाट वस्ती आहे व तेथें मुलांना खेळण्याला मोकळीं जागा मुळींच नाहीं.

या शाळेंत जीं मुलें येतात त्यांपैकीं शेंकडा ८ मुलें ज्या कुटुंबांतून

येतात, त्यांना राहावयाला एकच खोली असते. या खोलींतील निजावयाची जागा सोडून बाकीच्या राहिलेल्या जागेंत स्वयंपाक, जेवण वगैरे कुटुंबाचीं सर्व कामें चाललेलीं असतात. सर्व इमारतीला एकच नळ असतो व तो तळमजल्यावर असतो. या शाळेंतील मुलांपैकीं शेंकडा ९० मुलें ज्या कुटुंबांतून येतात, तीं कुटुंबें दोन खोल्या असलेल्या बिऱ्हाडांतून राहात आहेत. एका इमारतींत राहाणाऱ्या सर्व बिऱ्हाडांना एकच नळ असतो व एकच शौचकूप असतो.

या शाळेंतील कांहीं थोडीं मुलें इतरांच्या मानानें भाग्यशाली असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. या मुलांचे आईबाप तीन अथवा चार खोल्यांच्या स्वतंत्र अशा गाळ्यांमधून राहातात. प्रत्येक गाळ्याला स्वतंत्र दरवाजा, भांडीं घासण्याची खोली, ग्यासचे दिवे व स्वतंत्र शौचकूप असतो. व हे गाळे एका चौकाभोंवती असतात. या चौकाची जमीन वाळू व लहान खडी डामरांत बसवून घट्ट केलेली असते. या चौकांत सतत दणदणाट चाललेला असतो. हा आवाज व त्याच्या भोंवतालच्या भिंतीवर होणारा प्रतिध्वनि हे फार त्रासदायक असतात व त्यांनीं डोक्याला फार त्रास होतो. या जागांत राहाणाऱ्या मुलांना व त्यांच्या आयांना डोकें--दुखीचा जो विकार नेहमीं असतो त्याचें एक कारण चौकांत सतत चालणारा त्रासदायक दणदणाट हें आहे.

सन १९१८ सालीं या शाळेंत ९२० मुलें होतीं व ११ शिक्षक होते. सर्वांत लहान असणाऱ्या शिक्षकाचें वय ३० वर्षांचें होतें व सर्वांत वडील असणाऱ्या शिक्षकाचें वय ६० वर्षांचें होतें. शिक्षकाला विचारल्याशिवाय जागा सोडण्याची किंवा एकमेकांशीं बोलण्याची विद्यार्थ्यांना बिलकूल परवानगी नसे. या वर्षाचे शेवटीं या शाळेची हेडमिस्ट्रेस याच शाळेंत ४० वर्षें नोकरी करून पेन्शनमध्यें गेली.

त्या जागीं जी नवीन हेडमिस्ट्रेस आली, तिनें मुलांना जास्त स्वातंत्र्य देण्याचा निश्चय केला.

पुष्कळ वर्षे कडक शिस्तीनें चाललेल्या व ९०० पेक्षां जास्त मुलें असणाऱ्या या शाळेंतील शिस्तींत एकदम फरक करणें हें शिक्षकाच्या व मुलांच्या दृष्टीनें इष्ट व शक्य नव्हतें. कारण त्या योगानें शाळेंत फार घोटाळा झाला असता. एक लहानसें उदाहरण घेतल्यानें ही गोष्ट जास्त स्पष्ट होईल. एका ट्रेनिंग कॉलेजमधील विद्यार्थिनी या वेळीं या शाळेंत अध्यापनासाठीं आल्या होत्या. या विद्यार्थिनींपैकीं एका विद्यार्थिनीला मुलांना अगदीं स्वातंत्र्य नसावें ही गोष्ट बरी वाटली नाहीं. तिनें आपल्या वर्गाला नेहमींचे नियम सोडून जास्त स्वतंत्रता दिली. त्याचा परिणाम फार चमत्कारिक झाला. मुलांनीं असा कांहीं दंगा केला कीं या विद्यार्थिनीला तो मुळींच थांबवितां येईना. अखेरीस वर्गाची नेहमींची शिक्षकबाई तेथें आली तेव्हां तो दंगा शांत झाला व अभ्यासाला सुरुवात झाली; व सबंध पाठ होईतोंपर्यंत वर्गाच्या शिक्षकाला तेथें बसून राहावें लागलें. पण ७ वर्षांच्या अवधींत या शाळेंतील स्थितींत किती फरक पडला आहे ! सध्यां जरी एखाद्या वर्गांत शिक्षक नसला, तरी वर्ग आपलें काम इतक्या सुव्यवस्थितपणें व शांतपणें करीत असतो कीं, जणूं काय त्या वर्गांत शिक्षक बसलेलाच आहे. वाचन, लेखन, वाक्यरचना, गणित इत्यादि विषय वर्गांत चालले असतां मुलें दुसरें पुस्तक आणण्याकरितां, शिक्षकाला आपली शंका विचारण्याकरितां, केलेलें गणित अगर लिहिलेली वाक्यरचना शिक्षकाकडून दुरुस्त करून घेण्याकरितां खुशाल वाटेल तेव्हां वर्गांत जात येत असतात. प्रत्येक मूल आपलीं उदाहरणें सोडवीत असतें. सर्वच मुलांचा एकच भाग चाललेला नसतो. त्याचप्रमाणें वाचनांच्या धड्याचीही स्थिति असते. गणित, वाक्यरचना, वाचन व लेखन या विषयांचें शिक्षण एकदम एका वर्गाला दिलें जात नाहीं. वर्गांत वाचन हा विषय चालला असतांना निरनिराळीं मुलें,

निरनिराळे धडे वाचीत असतात. एक धडा संपला कीं मग मूल दुसरा धडा वाचतें. जे शब्द लागत नाहींत किंवा ज्या शब्दांचा अर्थ कळत नाहीं ते शब्द तें मूल शिक्षकाला विचारतें. गणित हा विषय वर्गांत चालला असतांना सर्व मुलें एकच उदाहरण सोडवीत नाहींत. प्रत्येक मूल आपलें उदहरण सोडवीत असतें, तें जर समजलें नाहीं, तर शिक्षकाकडून तें समजावून घेतें. मग दुसरें उदाहरण करतें.

प्रत्येक मुलानें आपआपलें काम पृथक्पणें करावयाचें ही पद्धति १९१८ सालीं या शाळेंतील शिक्षकांना माहीतही नव्हती व ती त्यांना समजावून दिली असतां त्यांना ती बिलकूल आवडली नसती. इ. स. १९१९ सालीं या शाळेंतील एका शिक्षकानें 'माझ्या वर्गांतील मुलांचा गणितांतील अभ्यास कांहींचा फार पुढें आहे, कांहींचा फार मागें आहे अशा या घोटाळ्यामुळें मला हा विषय वर्गाला शिकविण्यास फारच त्रास होतो' अशी जोराची तक्रार केली, तेव्हां या शाळेच्या हेड-मिस्ट्रेसनें कार्डबोर्डचे एकाच आकाराचे कांहीं तुकडे कापून आणले व एक एक तुकड्यावर पांच पांच उदाहरणें लिहिलीं. प्रत्येक तुकड्यावर निरनिराळीं उदाहरणें होतीं, कांहीं तुकड्यांवरील उदाहरणें फारच सोपीं होतीं. कांहींवरील उदाहरणें यांजपेक्षां जरा कठिण होतीं. कांहींवरील साधारणपणें कठिण वाटतील अशीं होतीं व कांहींवरील बरींच कठीण होतीं. अशा प्रकारें प्रत्येक मुलाला उदाहरणें सोडविण्याजोगा कार्डबोर्डचा तुकडा सांपडेल अशी योजना केली होती.

दुसऱ्या दिवशीं त्या वर्गाच्या शिक्षकानें या तुकड्यांचा उपयोग केला. एक एक मुलानें एक एक तुकडा घेतला मग त्यावरील उदाहरणें करण्याला सुरुवात केली. लवकरच सर्व वर्ग आपल्या कामात गढून गेला व मधल्या सुटीची जेव्हां घंटा झाली, तेव्हां खेळावयास न जातां कित्येक मुलें आणखी एक तुकडा घेऊन त्याजवरील उदाहरणें

सोडवीत वर्गांतच बसली. दुसऱ्या दिवशीं याच पद्धतीनें गणिताचा पाठ चालला होता. सुटीची घंटा झाल्यावर शाळेंतील शिक्षक मंडळी या वर्गांत आली आणि पहातात तों खेळावयास जाण्याचे ऐवजीं सर्व वर्ग उदाहरणें करण्यांत दंग झाला आहे. यानंतर वरच्या सर्व वर्गांत गणित करण्याची हीच पद्धति सुरू केली. एका वर्गाचा शिक्षक मात्र ही पद्धति मुळींच स्वीकारीना. प्रत्येक मुलानें निरनिराळें करावें व तें करण्याला ज्याला जितका वेळ लागेल तितका त्यानें घालवावा, ही गोष्ट या शिक्षकाला बिलकूल पसंत नव्हती. अखेरीस दोन वर्षांनीं त्याला ही नवीन पद्धति पसंत पडली व ती त्यानें स्वीकारली.

सर्व मुलांना एकच उदाहरण घालावयाचें मग तें सर्वांनीं ठराविक वेळांत सोडवावयाचें ही पद्धति टाकून देऊन, जेव्हां प्रत्येक मुलानें आपआपल्या कार्डांतील उदाहरणें सोडविण्याची पद्धति स्वीकारली व मुलांना कार्ड बदलण्यास व शिक्षकाला उदाहरणें दाखविण्यास जाण्याकरितां वर्गांत फिरण्याची मोकळी दिली, तेव्हां वर्गाचें काम इतक्या शांतपणें चालूं लागलें कीं, शिक्षकाला आपला सर्व वेळ मुलांना मदत करण्यास व त्यांनीं केलेलीं उदाहरणें चुकलीं असल्यास त्यांतील चुका दाखविण्यास मोकळा मिळाला. मुलें आपलें काम इतकें मन लावून करूं लागलीं कीं, शिक्षकाला मुलांचीं उदाहरणें पाहातांना व त्यांच्या चुका समजावून देतांना गणिताचा तास केव्हांच निघून जाई. शिक्षकाला सर्व मुलांचीं उदाहरणें पाहाण्यास वेळ सांपडेनासा झाला आणि मुलांनीं केलेलीं उदाहरणें बरोबर आहेत कीं नाहींत, त्यांनीं तीं पद्धतशीर रीतीनें मांडलेलीं आहेत कीं नाहीं हें पाहिल्याशिवाय मुलांनीं आणखी उदाहरणें सोडविणें इष्ट नव्हतें. ज्यांचीं उदाहरणें शिक्षकाला पाहावयाचीं असत त्यांची पाळी येईतोंपर्यंत त्यांना स्वस्थ बसावें लागे ही गोष्ट शिक्षणदृष्ट्या व शिस्तीच्या दृष्टीनेंही इष्ट नव्हती. तेव्हां या मुलांनीं

आपलीं उदाहरणें शिक्षक पाहीतोंपर्यंत वाचनाच्या पुस्तकांतील धडे वाचीत बसावें असें ठरविलें व त्याप्रमाणें मुलें धडे वाचूं लागलीं.

यानंतर सर्व मुलांनीं वाचनाच्या तासाला एकच धडा न वाचतां निरनिराळे धडे वाचावे व गणिताच्याप्रमाणें शिक्षकानें मुलांना जरूर तेथें मदत करावी ही पद्धति यां शाळेंत सुरू झाली. हीही पद्धति यशस्वी झाली. मुलांना जे शब्द वाचतां येत नसत ते तीं शिक्षकाला विचारीत. एकाद्या वाक्याचा अर्थ बरोबर न लागला, तर झटकन् शिक्षकाजवळून तो समजावून घेऊन पुन्हा पुढें वाचण्यास प्रारंभ करीत. स्वतांच्या प्रयत्नानें काम करण्यास मुलाना फार आवडतें व त्यांत त्यांना फार उत्साह वाटतो, ही गोष्ट या प्रयोगानें सिद्ध झाली. अंकगणिताप्रमाणें वाचनाचें कामही वर्गांत जोरानें सुरू झालें. मुलें वेळ न घालवितां आपलें काम करीत असत. यानंतर वर्गाच्या वेळापत्रकांत बदल केला व सकाळीं ९ ते १०—४५ पर्यंतचा काळ मुलांनीं व्यक्तिशः स्वतंत्र काम करण्याकरितां ठेविला. यावेळांत मुलांनीं गणित, वाचन, लेखन हे विषय करावे असें ठरलें. ही पद्धति अमलांत आली खरी पण शिक्षकांच्या जिवाला स्वस्थता वाटेना. परीक्षेच्या वेळीं पूर्वींप्रमाणें चागला निकाल लागणार नाहीं व आपल्या शाळेला चांगला शेरा मिळणार नाहीं अशी त्याना धास्ती वाटूं लागली. व्यक्तिशः भिन्न भिन्न काम करण्याच्या पद्धतीनें मुलें नापास होतील अशी एका शिक्षकाची पक्की खात्री असल्यामुळें त्या शिक्षकानें पूर्वींची सर्व वर्गानें एकच काम करण्याची पद्धति तशीच कायम ठेविली होती. पूर्वींच्या पद्धतीनें वर्ग अगदीं शांत दिसे. मुलें जागेवर चित्रासारखीं बसलेलीं असत. तीं अगदीं हूं कां चूं करीत नसत. सर्व मुलें एकच उदाहरण किंवा एकच प्यॅरेग्राफ वाचीत असत. नवीन पद्धति अंमलांत आल्यावर मुलें वर्गांत इकडे तिकडे हिंडतांना दृष्टीस पडूं लागलीं. अभ्यासासंबंधीं तीं एकमेकांशीं व शिक्षकाशीं बोलूं लागलीं. अशा रीतीनें सर्व वर्गांत हालचाल सुरू

झाली. प्रत्येक मूल निराळेंच उदाहरण करूं लागलें व निराळाच धडा वाचूं लागलें. अभ्यासांत कोणाचा कोणाशींच मेळ नव्हता, मुलांची कोठपर्यंत प्रगति झाली आहे हे निश्चितपणें कळणें शिक्षकाला कठीण वाटूं लागलें. या नवीन पद्धतीचा परिणाम काय होतो याबद्दल साहजिकपणें शिक्षकाला धास्ती वाटूं लागली.

पुढें या पद्धतीला व्यवस्थित स्वरूप येण्याकरितां पुढील योजना करण्यात आली. गणिताचीं जीं उदाहरणें एका महिन्यांत मुलांना करावयाचीं असत त्यांचा कठीणपणाच्या मानानें अनुक्रम ठरविला जाई व या उदाहरणांचे कांहीं गट किंवा संग्रह करीत. एका पुस्तकावर वर्गांतील सर्व मुलांचीं नांवें लिहिलेलीं असत. मुलानें नवीन उदाहरण-संग्रह सोडविण्यास प्रारंभ केला कीं, ती तारीख व त्या उदाहरणसंग्रहाचा क्रमांक त्या मुलाच्या नावांपुढें शिक्षक लिहीत असे व तो उदाहरण संग्रह संपला कीं, ती तारीख नमूद करी. वाचन व लेखन या विषयां-संबंधानेंही हीच तजवीज केली होती. अशा प्रकारें प्रत्येक मुलाचा काय अभ्यास चालला आहे हें दाखविण्याचें उत्तम साधन तयार झालें. वर्गांतील मुलांच्या अभ्यासाची प्रगति दाखविणाऱ्या या पुस्तकाच्या साहाय्यानें लवकरच शिक्षकाच्या ही गोष्ट नजरेस आली कीं, या नवीन पद्धतीनें पूर्वींपेक्षां सर्व वर्गांची प्रगति गणित, लेखन व वाचन या विषयांत जास्त आहे. हे पाहिल्यानंतर शिक्षकांना समाधान वाटलें.

या नवीन पद्धतीनें शाळेच्या अभ्यासक्रमांत घोटाळा झाला आहे अशा बातम्या वातावरणांत पसरूं लागल्या, तेव्हां म्युनिसिपालिटीचे मुख्य परीक्षक व त्याचे ९ मदतनीस शाळा तपासण्याकारितां एक दिवस आले व त्यांनीं तो सबंध दिवस शाळेंत घालविला. त्यांनीं मुलांचें काम काळजीपूर्वक पाहिलें व मग या नवीन पद्धतीनें गणित, वाचन व लेखन या अभ्यासक्रमांतील मुख्य विषयांत पूर्वींपेक्षां मुलांची प्रगति

जास्त होत आहे, मुलांची वागणूक व आरोग्य हीं पूर्वींपेक्षां जास्त सुधारलीं आहेत असा रिपोर्ट केला.

जुनी पद्धति नाहींशी करून त्याऐवजीं ही नवीन पद्धति सुरू करितांना आम्हांला ज्या अडचणी आल्या, आम्ही ही नवीन पद्धति यशस्वी करण्याकरितां ज्या योजना अमलांत आणल्या त्या सर्वांचें या लहानशा लेखांत वर्णन करणें अशक्य आहे.

व्यक्तिशः काम करण्याच्या या पद्धतींतील मुख्य अडचणी म्हटल्या म्हणजे मोठमोठाले वर्ग, साहित्याची उणीव, या पद्धतीच्या संबंधानें शिक्षकवर्गांत असलेला पूर्वग्रह या होत. आम्हांलाही याच अडचणीं-तून मार्ग काढावा लागला. या बाबतींत आमची शाळा व इतर सरकारी शाळा यांची स्थिति एकच आहे आणि म्हणूनच आम्ही जी आमच्या शाळेंतील प्रयोगाची हकिकत वर दिली आहे, तिचा दुसऱ्या शाळेला ही पद्धति उपयोगांत आणण्याचे कामीं उपयोग होईल अशी आमची खात्री आहे. या नवीन पद्धतीने मुलांचा अभ्यासक्रम व शाळेंतील त्यांचें आयुष्य जास्त सुखकर झालें आहे व त्या योगानें शिक्षकाला व व पालकाला जास्त आनंद वाटत आहे. या नवीन पद्धतीनें मुलें, शिक्षक व पालक यांना एकमेकांची ओळख जास्त चांगली पटली आहे.

# शिशुवर्गाकरितां धडे.

## गाजराची भाजी.

एका रानांत एक लहान ससा राहात होता.
याच रानांत एक लहान उंदीर राहात होता.
झाडावर एक लहान पोपट राहात होता.
लहान ससा, लहान पोपट, लहान उंदीर हे सोबती होते.
एके दिवशीं लहान पोपटाला एक लहान बीं सांपडलें.
पोपटानें तें बीं सशाला व उंदराला दाखविलें.
ससा म्हणाला, 'चला हें बीं आपण पेरूं.'
उंदीर म्हणाला, 'हो हो, चला तर आपण हें बीं पेरूं.'
मग उंदरानें जमीन खणली.
मग सशानें बीं पेरलें.
मग पोपटानें पाणी घातलें.
कांहीं दिवसांनीं त्या बींचें मोठें झाड झालें.
ससा म्हणाला, 'हें झाड गाजराचें आहे.
गाजराची भाजी मला फार आवडते'
उंदीर म्हणाला, 'गाजराची भाजी मलाही फार आवडते'.
पोपट म्हणाला, 'गाजराची भाजी मलाही फार आवडते'.
ससा म्हणाला, 'मी हें झाड उपटतों.'
उंदीर म्हणाला, 'मी हें झाड उपटतों.'
पोपट म्हणाला, 'मी हें झाड उपटतों.'

मग लहान पोपट झाड उपटूं लागला,
पण तें उपटेना.
मग लहान उंदीर तें झाड उपटूं लागला,
पण तें झाड उपटेना.
मग लहान ससा तें झाड उपटूं लागला,
पण तें झाड उपटेना.
ससा म्हणाला, 'आपण सगळे मिळून हें झाड उपटूं.'
उंदीर म्हणाला, 'आपण सगळे मिळूनच हें झाड उपटूं.'
पोपट म्हणाला, 'आपण तिघे मिळून हें झाड उपटूं.'
लहान ससा, लहान उंदीर, लहान पोपट तें झाड
उपटूं लागलें.

एकदम तें झाड उपटलें.

त्याबरोबर लहान ससा धाडकन पडला.
लहान उंदीर धाडकन पडला.
लहान पोपट धाडकन पडला.
लहान सशाचे नाकाला लागलें.
लहान पोपटाचे चोंचीला लागलें.
लहान उंदराचे शेंपटीला लागलें.
लहान ससा हळूच उठला.
लहान पोपट हळूच उठला.
लहान उंदीर हळूच उठला.
ससा म्हणाला, 'नाकाला लागलें तरी हरकत नाहीं,
पण मी गाजराची भाजी खाईन.'

पोपट म्हणाला, 'चोंचीला लागलें तरी हरकत नाहीं,
पण मी गाजराची भाजी खाईन.'
उंदीर म्हणाला, 'शेपटीला लागलें तरी हरकत नाहीं,
पण मी गाजराची भाजी खाईन.'
सशानें चूल पेटविली.
पोपटानें भाजी चिरली.
उंदरानें भाजी शिजविली.
ससा म्हणाला, भाजी फार गोड झाली.
पोपट म्हणाला, भाजी फारच गोड झाली.
उंदीर म्हणाला, भाजी किती गोड झाली.
मग तिघांनीं ती भाजी पार खाऊन टाकली.

---

## गाढवाचें गाणें.

एका गांवांत एक परीट राहात होता.
याच गांवांत एक कुंभार राहात होता.
परटाजवळ एक बैल होता.
कुंभाराजवळ एक गाढव होतें.
बैल व गाढव हे सोबती होते.
एकदा पहांटेस बैल गाढवाकडे गेला.
बैल म्हणाला, 'दादा, जवळच एक मळा आहे.
या मळ्यांत गोड ऊस आहेत.

## गाढवाचें गाणें.

या मळ्यांत गोड गाजरें आहेत.
या मळ्यांत गोड राताळीं आहेत.
मला गोड ऊस भारी आवडतात.
मला गोड गाजरें भारी आवडतात.
मला गोड राताळीं भारी आवडतात.
गाढव म्हणालें, 'चल आपण मळ्यांत जाऊं.'
दादा, मलाही गोड ऊस फार आवडतात.
मला गोड गाजरें फार आवडतात.
मला गोड राताळीं फार आवडतात.
चल आपण मळ्यांत जाऊं.'
ते दोघे मळ्यांत गेले.
मळ्याचा मालक निजला होता.
मालकाचा गडी निजला होता.
मालकाचा मुलगा निजला होता.
गाढवानें गोड ऊस खाल्ले.
गाढवानें गोड राताळीं खाल्लीं.
गाढवानें गोड गाजरें खाल्लीं.
गाढवाचें पोट भरलें.
बैलानें गोड ऊस खाल्ले.
बैलानें गोड राताळीं खाल्लीं.
बैलानें गोड गाजरें खाल्लीं.
बैलाचें पोट भरलें.
गाढव म्हणालें 'दादा' माझें पोट भरलें.

२०९

मी आतां गाऊं का ?'

बैल म्हणाला 'तूं गाऊं नको.

तुझें गाणें ऐकून मालक उठेल.

तुझें गाणें ऐकून मालकाचा गडी उठेल.

तुझें गाणें ऐकून मालकाचा मुलगा उठेल.'

गाढव म्हणालें, 'माझें गाणें ऐकून मालक उठूं दे.

माझें गाणें ऐकून मालकाचा गडी उठूं दे.

माझें गाणें ऐकून मालकाचा मुलगा उठूं दे.

मी आतां गाणें गाईन.'

गाढव गाऊं लागलें.

गाढवाचें गाणें ऐकून मालक उठला.

गाढवाचें गाणें ऐकून मालकाचा गडी उठला.

गाढवाचें गाणें ऐकून मालकाचा मुलगा उठला.

मालकानें हातांत काठी घेतली.

मालकाचे गड्यानें हातांत काठी घेतली.

मालकाचे मुलानें हातांत काठी घेतली.

बैल पळून गेला.

मालकानें गाढवाला मारमार मारलें.

गड्यानें गाढवाला मार मार मारलें.

मुलानें गाढवाला मार मार मारलें.

गाढव ओरड ओरड ओरडलें.

मग तें लंगडत लंगडत घरीं गेलें.

## इयत्ता २ री.

# भूगोल.

प्रत्येक इयत्तेंत भूगोल या विषयाचे भाग कसे पाडावे व ते कोणत्या अनुक्रमानें याचें दिग्दर्शन होण्याकरितां पुढें धडे व त्यांचा अनुक्रम दिला आहे. हा अनुक्रम शिक्षकांचे उपयोगीं पडेल अशी आशा आहे.

संपादक.

१ दिशा—सूर्याचे उदयास्त व होकायंत्र यांच्या साहाय्यानें.

२ नकाशा व चित्र यांची कल्पना.

३ फूटपट्टीची माहिती व तिचा उपयोग.

४ प्रमाण व त्याची जरूरी.

५ वर्गाचा नकाशा व नमुना.

६ ( वर्गाच्या ) मजल्याचा नकाशा व नमुना.

७ शाळेच्या कार्म्पौन्डचा नकाशा व नमुना.

८ पेठेचा नकाशा व नमुना.

९ खेडेगांव व शहर—भूपृष्ठरचना, साम्य व भेद, उद्योगधंदे, उत्पन्न, खनिज व उद्भिज्ज, प्रेक्षणीय देखावे. जंगल, नदी, टेकडी यांची सहल. वाळू, माती वगैरे घेऊन नमुने करणें.

१० पर्वत व नदी: यांच्यासारख्या नमुन्यांवरून येथील हवामान, पाऊस वगैरेबद्दल निरीक्षण.

११ पृथ्वी व तिचा आकार, जमीन व पाणी: यांचे मुख्य भाग गोलावरून.

## इयत्ता ३ री.

१ तालुका:—

१ उत्पन्नें, बाजाराची जागा, धान्यें, फळफळावळ.

अ—कांदे, बटाटे, हे जिन्नस येण्याचीं ठिकाणें.

ब—तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, ऊस व कापूस यांस आवश्यक परिस्थिति, हवामान, पाऊस, जमीन, दळवळणाचीं साधनें;

क—फळफळावळ, विड्याचीं पानें—जरूर लागणारीं साधनें, पाण्याचा पुरवठा, कालवे, विहिरी वगैरे; दळणवळणाचीं साधनें;

२ धंदे—शहरांतील व खेड्यांतील. शहर व खेडें येथील लोकवस्तीची तुलना.

३ मुख्य ठिकाणें.

४ भूपृष्ठरचना, डोंगर, नद्या, कालवे, पाऊस, हवामान उठावाचे नकाशावरून.

५ लोकांची राहाणी, पोषाक चालीरीति वगैरे माहिती चित्रांवरून देणें.

६ ऐतिहासिक स्थळें, प्रसिद्ध देवस्थानें, हवाखाण्याचीं ठिकाणें.

७ जिल्हा व प्रांत—भूपृष्ठरचना ठळक मुद्दे, मुख्य ठिकाणें, मुख्य उत्पन्नें, लोक व धंदे, दळणवळणाचीं साधनें, महत्त्वाचीं इतर ठिकाणें.

२ पृथ्वीचे नकाशावरून—आशिया व युरोप यांचे संबंध, सापेक्ष स्थिति, अंतर, आकार. हिंदुस्थान व इंग्लंड यांचे संबंध, सापेक्ष स्थिति, अंतर, आकार वगैरे; युनायटेड स्टेटस्, फ्रान्स, जर्मनी जपान यांची त्रोटक माहिती.

## इयत्ता ४ थी.

मुंबई इलाखा—१ भाषा व लोक--चित्रें दाखवून.

२ प्रांतांची कल्पना व नांवें.

३ राहाणी, उद्योग धंदे, उत्पन्नें-चित्रांवरून.

४ दळणवळणाचीं साधनें, बंदरें, मुख्य शहरें.

५ भूपृष्ठरचना, हवामान, पाऊस, कालवे वगैरे.

६ आकार, समुद्रसान्निध्य, किनारा.

७ लोकवस्ती, राजकीय विभाग.

नकाशे—उठावाचा नकाशा, 'हवामान पर्जन्याचा' नकाशा, दळणवळणाचीं साधनें दाखविणारा नकाशा, लोकवस्तीचा नकाशा, राजकीय विभागांचा नकाशा.

हिंदुस्तान—१ सरहद्द, स्वाभाविक व राजकीय; पश्चिम हद्द व तेथील अरुंद घाट. किनारा पूर्व व पश्चिम व इतर स्वाभाविक विभाग; मैदानें, पठारें समुद्रकांठचा प्रदेश.

२ नद्या व त्यांचे उपयोग.

३ कालवे—दुष्काळमुक्तता, लोकवस्तीची वांटणी.

४ उत्पन्नें—जंगलांतील पदार्थ.

मैदानांतील पिकें.

पठारावरील पिकें.

किनाऱ्याजवळील पिकें.

खनिज पदार्थ, जनावरें व त्यांपासून मिळणारे पदार्थ

५ धातु, कोळसा वगैरे.

कारखाने—लहान, मोठे.

६ व्यापार—निर्गत माल-धान्यें, फळफळावळ, गवत, जंगलांतील पदार्थ, खनिज पदार्थ, कारखान्यांतील माल कापड वगैरे; आयात माल—खाद्य पदार्थ, कच्चा माल, कापड वगैरे माल—किनाऱ्याशीं व्यापार.

७ राजकीय विभाग.

मुंबई इलाखा व प्रसिद्ध मोठीं शहरें.

मद्रास इलाखा व मोठीं शहरें.

मध्यप्रांत व वऱ्हाड व शहरें.

पंजाब व शहरें.

संयुक्तप्रांत व शहरें.

बिहार व ओरिसा–शहरें.

बंगाल शहरें.

आसाम शहरें.

वायव्य हद्दीवरील प्रांत-शहरें.

## इयत्ता ५ वी.

आशिया

१ मान्सून वाऱ्याखालील देश

हिंदुस्तान, ब्रह्मदेश इ. ४ प्रमाणें

सीलोन भूपृष्ठ, हवामान, पिकें, कारखाने, शहरें; इंडोचायना

स्ट्रेट सेटलमेंटस्, सयाम, फ्रेंच इंडोचायना } वरील प्रमाणें माहिती

चीन–नद्या, शहरें, लोक, चीन व हिंदुस्तानची तुलना–मंचुरीया व कोरिआ–पिकें व शहरें

जपान–हवामान, वनस्पति व पिकें, शहरें, लोक. मलाया द्वीपसमूह व फिलिपाईन बेटें वनस्पति व पिकें.

२ आशियाचे उंचवट्याचे प्रदेश, हवामान, शहरें, उत्पन्नें.

३ पश्चिमेकडील पठाराचे प्रदेश

| | |
|---|---|
| इराण<br>अफगाणिस्तान<br>बलुचिस्तान<br>एशिया मायनर<br>अरबस्तान | जमिनीची लागवड, उत्पन्न, लोक, दळणवळणाचीं साधनें, मोठीं शहरें. |
| ४ मेसापोटेमिया<br>आर्मिनिया<br>सिरिया<br>पॅलेस्टाईन | मँडेट, लोकराज्यव्यवस्था मुख्य शहरें. |

५ कास्पिअन समुद्राजवळील प्रदेश. सेंट्रल एशिअन रेल्वे, गवताचे प्रदेश, जंगलें, तंद्रा प्रदेश.

६ ट्रान्स सायबेरिअन रेल्वे, निरनिराळ्या भागांतील हवामान, जनावरें

७ राजकीय विभाग, मुख्य शहरें.
राज्यव्यवस्थेबद्दल माहिती

ब्रिटिशसाम्राज्य

| | |
|---|---|
| इंग्लंड<br>कानडा<br>दक्षिण--आफ्रिका<br>ऑस्ट्रेलिया<br>न्यूझीलंड | राजधान्या, लोक, उत्पन्नें व राज्य-व्यवस्था. |

८ मोठीं संस्थानें—निझाम. म्हैसूर, त्रावणकोर, कोचिन, बडोदा, ग्वाल्हेर, काश्मीर, रजपुतसंस्थानें.

९ ब्रह्मदेश.

१० सरकार.
कलेक्टर, कमिशनर, गव्हर्नर व व्हाईसराय यांचे कामासंबंधीं माहिती सांगणें.

हिंदुस्थान व साम्राज्य यांतील दळणवळणाचीं साधनें.

जलमार्ग—महासागर—आगबोटी.

भूमार्ग – आगगाड्या, मोटारी वगैरे

वायुमार्ग—विमानें.

## इयत्ता ६ वी.

१ महासागर—हिंदी महासागर, अटलांटिक, पॅसिफिक, उत्तर व दक्षिण महासागर. व्यापारी मार्ग. व्यापारी महत्त्व.

२ खंडें —युरोप, अमेरिका, आशिया, आफ्रिका यांची तुलनात्मक माहिती—आकार, व्यापार, वसाहती, उद्योगधंदे वगैरे.

३ हिंदुस्थान—इयत्ता ४ प्रमाणें.

हिंदुस्थानचें आशियांतील स्थलमहत्त्व. इतर राष्ट्रांशीं दळणवळण. चीन, जपान, सीलोन, अफगाणिस्थान, इराण.

४ हिंदुस्थानचा इंग्लंडशीं राजकीयसंबंध

व्यापारीसंबंध ( पुढील राष्ट्रांशीं )

फ्रान्स, जर्मनी, रशिया, चीन, जपान, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, फिजी, मॉरिशस, वेस्ट इंडीज

५ आशियाची सामान्य माहिती, इयत्ता ५ प्रमाणें.

६ ब्रिटिश बेटें-ग्रेट ब्रिटन व आयर्लंड.

आकार, युरोपखंडापासून सुटेपणा, स्थलमहत्त्व, भूपृष्ठरचना, हवामान, पिकें खनिजपदार्थ, कारखाने, बंदरें, आयात व निर्यात पदार्थ.

# एक अधाशी लहान सुरवंट.

पावसाळ्याचे दिवस होते. आकाशांत जिकडे तिकडे काळेकुट्ट ढग पसरले होते. मेघांचा गडगडाट चालू होता, व पाऊस जोरानें पडत होता. अशा वेळीं एक परी म्हणाली, 'आतां मला छत्री कोठें मिळणार?' असें म्हणून ती एका जंगलांत छत्री पाहाण्याकरितां आपल्या चिमुकल्या पायांनीं भरभर इकडून तिकडे पळूं लागली. इतक्यांत तिला एक फुलझाड दिसलें. त्या फुलझाडाच्या शेंड्याला लहान लहान फुलें खूप आलीं होतीं, व त्याचा शेंडा छत्रीसारखा दिसत होता. ही फुलांची छत्री तिनें तेव्हांच तोडून घेतली असती; पण त्या झाडाच्या खोडावर एक भला मोठा सुरवंट चालला होता. तेव्हां तिनें तो फुलांचा घोस न तोडतां एक मोठें आळूचें पान तोडलें व धूम ठोकली. इकडे सुरवंटाच्या जवळच एक गुलाबाचें सुंदर फुल डौलानें डुलत होतें. तें त्या सुरवंटास म्हणालें 'बाबा सुरवंटा, हें तुझें खाणें संपणार तरी केव्हां?' सुरवंट हळूच सरकत सरकत एका कोंवळ्या लुसलुशीत पानाजवळ आला. त्याच्या अंगांत फिकट हिरव्या रंगाचा कोट होता, व त्या कोटावर काळे पट्टे व नारिंगी ठिपके होते. या पोशाखात तो सुरवंट फारच सुंदर दिसत होता. परंतु इतका देखणा सुरवंट सतत खा खा न करितां कांहीं कामही करीत असेल अशी त्या फुलाची समजूत होती. परंतु या गृहस्थांचें पाहावें तेव्हां आपलें तोंड हालतच आहे, कांहीं तरी आपला खात आहे, ह्याला खाण्याशिवाय दुसरा धंदाच नाहीं, असें पाहून 'तुझें खाणें संपणार तरी केव्हां?' असा फुलानें सुरवंटास प्रश्न केला. पण सुरवंट म्हणाला, 'छे छे, केव्हांच नाहीं. वा! अशीं कोवळीं लुसलुशीत पानें खाण्यांतच तर सारी मजा आहे. छे, आपण केव्हांच खाणें सोडणार नाहीं.' हें ऐकताच फुलानें मान हालवून त्याचा किती तरी धिक्कार

केला ! इतक्यांत त्या फुलाला पाहून एक मधमाशी तेथें आली व त्या फुलास म्हणाली, ' अहो राणी सरकार, आपण किती तरी नाजूक व सुंदर दिसतां ! मी आपल्या जवळचा थोडा मध गोळा करूं का, असें म्हणून त्या मधमाशीनें मधाचा घुटका घेऊन ती भुरकन् उडून गेली. इतका वेळपर्यंत सुरवंटाची स्वारी कोंवळ्या लुसलुशीत पानांत बसलेली होती, व त्याचा खाण्याचा सपाटा चालूच होता. त्याचा तो चिमुकला जबडा सारखा हालतच होता, तें पाहून त्या फुलास फारच गंमत वाटली ! सुरवंटाचें पोट म्हणून भरेनाच ! बाहेर ऊन पडलें आहे का थंडी पडली आहे, का पाऊस पडत आहे, याची त्याला मुळींच फिकीर नव्हती. त्याचा खाण्याचा धंदा चालू होता. एक दोन वेळ तर तो इतका लठ्ठ झाला कीं त्याच्या अंगावरला कोट तटतटा फाटून गळून पडला ! पण एक कोट गेला कीं, आंत आपला दुसरा सुंदर कोट असावयाचाच ! एके दिवशीं तें गुलाबाचें फूल कोमेजून त्याच्या सर्व पाकळ्या गळून पडल्या. पण इतर फुलें त्या अधाशी सुरवंटाची गमत पाहात होतीं. तीं त्याला म्हणालीं, ' अरे, तुला खाण्याचा अजून कंटाळा कसा आला नाहीं ? ' तो म्हणाला, ' छे ! कंटाळा केव्हांच येणार नाहीं. मेहेरबानी करून माझ्याशीं बोलूं नका. मला खाऊं द्या. ' हें ऐकून तीं फुलें खदखदा हसूं लागलीं ! इतक्यांत एक फुलपांखरूं तेथें आलें. त्याला पाहून फुलें सुरवंटास बोललीं, ' बाबा सुरवंटा, या फुलपांखराकडे तरी पहा. ' तसें सुरवंट म्हणाला, ' छे छे, तुम्ही मला अगदीं त्रास देऊं नका; ' परंतु तें सुंदर फुलपांखरूं त्या सुरवंटाजवळ आलें, त्यामुळें त्या फुलपांखराचे भपकेदार व सुंदर पंख सुरवंटाच्या दृष्टिआड होणें शक्यच नव्हतें. पण ते पंख पाहतांक्षणींच सुरवंटाच्या त्या चिमुकल्या व लठ्ठ शरिरांत विजेचा धक्का बसल्याप्रमाणें कांहीं तरी खळबळ उडाली एवढें मात्र खास ! पुढें तें फुलपांखरूं उडून गेलें, व सुरवंटालाही त्याची आठवण राहिली नाहीं. दिवसेंदिवस सुरवंट लठ्ठलठ्ठच

होत चालला. असें होतां होतां उन्हाळ्याच्या शेवटीं एक मोठा चमत्कार घडून आला. एकदम त्याची भूकच थांबली ! त्याला करमेनासें झालें, व झोप येऊं लागली, म्हणून त्यानें एक चिमुकलें पांघरूण तयार केलें, व दोन रेशमी धागे झाडाच्या खोडाला अडकवून त्यानें एक झोपाळा तयार केला, व त्यावर ती स्वारी निजली! कांहीं तरी आपणांला चमत्कारिक होत आहे, असें त्यास वाटलें, व तो ओरडून फुलांना म्हणाला, 'मला होतें आहे तरी काय ? मी आतां कसा दिसतों ?' त्यावर फुलें हसून म्हणालीं, "तूं सुरवंटासारखा मुळींच दिसत नाहींस. एकाद्या पानाची गुंडाळी केली ह्मणजे जसें तें दिसतें तसा तूं दिसत आहेस !" हें ऐकतांच खरोखर सुरवंट दुःखानें खूप ओरडला असता; पण त्याला खूप झोप आल्यामुळें त्यानें कशाकडेही लक्ष दिलें नाहीं. तो सुरवंट स्वतां केलेल्या झोपाळ्यावर निजला होता, व झुळझुळ वाहणारा गार वारा त्याच्या अंगास लागत होता. अशावेळीं त्याला एकदम त्या सुंदर फुलपांखराची आठवण झाली. त्या फुलपांखराचे पंख कसे रंगीबेरंगी व चकचकीत होते, व तें फुलपांखरूं या फुलावरून त्या फुलावर कसें गमतीनें उडत होतें वगैरे सर्व गोष्टी त्या सुरवंटाला आठवल्या, व तो झोपीं जात असतांना आपणाशींच म्हणाला, 'अरेरे ! किती मी मूर्ख ! मी सर्व दिवस नुसते खाण्यांत घालविले. कांहीं सुद्धां काम केलें नाहीं ! पानाफुलांना आलेला बहार व इंद्रधनुष्याच्या रंगाचे किडे यांजकडे मीं आजपर्यंत कधींही लक्ष दिलें नाहीं ! व आतां तर मी खूप, खूप वेळ निजून राहाणार असें मला वाटतें. हे चिमुकल्या सुंदर फुलांनो, हे सुंदर जगा, माझा तुम्हांला हा शेवटचा नमस्कार आहे.' असें म्हणून तो सुरवंट गाढ झोपीं गेला. पुढें तो सर्व पावसाळाभर निजून राहिला, व हिंवाळ्यांत जागा झाला. तो तुरुंगांतून म्हणजे कोशांतून हळू हळू

बाहेर येत असतांना त्याला किती तरी चमत्कारिक वाटलें! बाहेर येतांच तो झाडाच्या देठाला चिकटून बसला, त्यावेळीं सूर्याचें ऊन त्याचें अंगावर पडल्यामुळें त्याला ऊब येऊन आनंद झाला. हळू हळू त्याच्या मनाची उदासीनता जात चालली, व त्याला उत्साह वाटावयास लागला. इतक्यांत आपल्याला पंख आहेत, असें त्याला एकदम कळलें. मग काय विचारतां! फक्त पंख पसरेपर्यंत व ताठ होण्याचाच काय तो अवकाश! तें होतांच तो भुर्दिशीं उडून फुलावर जाऊन बसला. आतां तो पूर्वींचा सुरवंट नसून त्याचें सुंदर फुलपांखरूं बनलेलें होतें! त्यावेळीं तीं फुलें त्यास म्हणालीं, 'किती उत्कृष्ट फुलपांखरूं तूं आहेस!' नंतर तें फुलपांखरूं निर-निराळ्या रंगांच्या फुलांवर उडया मारूं लागलें. उडतांना त्याचे सुंदर पंख झुळझुळ वाऱ्यानें हलू लागले, व सूर्याच्या उन्हानें ते पंख चमकूं लागले. तेव्हां तें मनांत म्हणालें, 'अघाशी सुरवंट होण्यापेक्षां सुंदर फुल-पांखरूं होणें उत्तम!'

---

# न्यू झीलंडमधील मेओरी लोक.

जगांतील काळ्या लोकांच्या जातींपैकीं ज्या लोकांनीं आपल्या अंगच्या शौर्यधैर्यादि सद्गुणांबद्दल युरोपियन लोकांस सुद्धां धन्योद्गार काढावयास लाविले अशी जात म्हटली म्हणजे न्यूझीलंड बेटांतील मेआरी लोकांची होय.

न्यूझीलंड हा देश दोन बेटें मिळून झाला असून या लोकांची वस्ती मुख्यत्वेंकरून उत्तरेकडील बेटांत आहे. हा देश ऑस्ट्रेलिया यापासून १२०० मैलांवर आहे. कानडा, ऑस्ट्रेलिया या देशांप्रमाणेंच या

देशाला स्वराज्याचे हक्क मिळाले आहेत. हीं बेटें १८४० च्या सुमारास ब्रिटिशांनीं हस्तगत केलीं.

टास्मन व कॅप्टन कुक् यांनीं या बेटाच्या जमिनीवर प्रथम पाय ठेवण्याचा प्रयत्न केला, तेव्हां भयंकर उग्र लोकांनीं यांच्या बरोबरचे पुष्कळ खलाशी कापून काढले.या देशांत पूर्ण अमल बसण्यास सुमारें पावशतकपर्यंत या लोकांशीं झगडावें लागलें. मेओरी लोकांपैकीं पुष्कळ लोक मोठे श्रीमंत जमीनदार व श्रीमंत धनगर आहेत. तेथील पार्लमेंट सभेंत यांच्यांतून नियमित सभासद निवडून येतात. युरोपियन सभासदांच्या बरोबरीनें हे सभागृहांत श्रोत्यांच्या मनावर आपल्या बोलण्यानें चांगली छाप पाडूं शकतात असा यांचा लौकिक आहे.

सुमारें ४०० वर्षांपूर्वीं हे लोक पासिफिक महासागरांतील आपलीं लहान बेटें सोडून न्यूझिलंड बेटांत राहावयास आले. पासिफिक महासागरांत त्यांनीं नावा ढकलल्या, व कित्येक दिवस प्रवास केल्यावर ते या बेटांना येऊन पोहोंचले. स्वीडन नार्वेकडील पूर्वींचे नॉर्स लोक अगर व्हिकिंग लोक यांच्या तोडीच्या यांच्या या सफरी आहेत, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. यांच्या नावा लांबट आकाराच्या असत, व त्यांच्या पुढील भागावर सुंदर नक्षी काम केलेलें असे. या नावांत १०० ते १५० माणसें बसण्याची सोय असे. नावेच्या पुढील बाजूच्या उंच भागावर जलदेवतेचें चित्र कोरीत. त्याचा उद्देश हा कीं जलयुद्धांत त्या देवतेनें यश मिळवून द्यावें. हे सर्व लोक लढाऊ पेशाचे असून नावा वल्हवण्याचे कामींही फार वाकबगार आहेत. या वेळच्या सफरींत त्यांनीं केलेल्या पराक्रमावर काव्यें व गाणीं रचिलीं असून तीं ते नेहमीं म्हणतात. त्यांच्यांतील ‘ हक्का ’ नावाच्या लष्करी नाचाच्या वेळीं लष्करी पोषाक चढवून ते प्राचीन योद्ध्याप्रमाणें हातांत गदा व परशु घेऊन या गाण्यांच्या लकेरी सोडीत नाचतात. खेडेगांवांतील

नाचगृहात बायका व मुली यांना 'पोई' नांवाचा नाच नाचणें फार आवडतें. हा नाच गाण्याच्या तालावर चालतो. हीं गाणीं विशेषतः या बेटांत या लोकांनीं येऊन केलेल्या पराक्रमासंबंधीं असतात.

उद्योगीपणाचे बाबतींत या लोकांची हद्द आहे. बायका व पुरुष दोघेही आपापल्या परीनें कांहींना कांहीं उद्योग करीत असतात. पुरुषांचें मुख्य काम म्हणजे शिकार करणें व मासे मारणें. यांतून रिकामा वेळ मिळाल्यास आपाआपसांत भांडणें ! ! या बेटांत येऊन राहिल्यावर यांनीं आपापल्या खेड्या सभोंवतीं चांगले तट बांधले. यांचीं हत्यारें मुख्यत्वेंकरून धारेचे दगड व देवमाशांचीं हाडें यापासून बनविलेलीं असत. या प्रांतांत जेड नांवाचा हिरवा दगड सापडतो. याचा ते पुष्कळ रीतीनें उपयोग करीत. यांची लढण्याची गदा या दगडाचीच असून तीवर सुरेख नक्षीकाम केलेलें असे. गळ्यांतील जड दागिने अगर पुढाऱ्याची सभा दाखविणारा दंड याच दगडाचा करीत. दगड व माशांचीं हाडें यापासून बनविलेल्या हत्यारानींच जमिनीची मशागत करून लागवड करीत. यांचीं हत्यारें असल्या क्षुल्लक वस्तूंचीं बनविलेलीं असलीं तरी लढण्याच्या कामांत हे खंद्या शिपायांनाही हार गेले नाहींत.

पुरुषांप्रमाणें आपल्या परीनें बायकांचेही उद्योग ठराविक होते. आपापल्या घरांभोंवतीं बागा लावून त्या त्यांची चागली मशागत करीत-व त्यांत भाजीपाला व फळफळावळ यांची पैदास करीत. तागाची लाग, वड करून आपले कपडे व जहाजांच्या अवजारांसाठीं किंतानासारखें जाड कापड बनवीत. पक्ष्यांच्या पिसांपासून त्या सुंदर झगे व जाकिटें तयार करीत, व घरांत अंथरण्यासाठीं रंगित गवताच्या सुंदर चटया विणीत.

मेओरी लोकांच्या ठिकाणीं सौंदर्याभिरुचि होती, असें ह्यांनीं केलेल्या अनेक गोष्टींवरून स्पष्ट दिसतें. यांच्या घरांच्या पुढल्या भागाच्या खांबावर

सुंदर नक्षीकाम काढलेलें असे. व तशीच नक्षी ते आपल्या तोंडावर गोंदीत. या लोकांत चित्रविचित्र रीतीनें गोंदण्याची फार चाल होती; पण ती अलीकडे बरीच मोडत चालली आहे. या गोंदण्याच्या सुरीला देवमाशाचे दांत बसवीत, व तिनें मासांत बरीच खोल जखम होत असे. अशा या जखमेंत दिव्याचें काजळ तेलांत मिसळून लावीत, व ते रंगाप्रमाणें काळें, तांबडें अगर निळें दिसे.

मेओरी लोकांचा युरोपियन लोकांशीं बराच संबंध येतो. तरी ते अद्यापही आपल्या जमीनजुमल्यावर राहातात. युरोपियन लोकांच्या चाली त्यांनीं उचलल्या असल्या तरी त्यांच्यांत हे लोक फारसे मिसळत नाहींत.

---

## मुलांकरितां कविता.

### भूपाळी.

विश्रांतीचा काळ सुखाचा रात्र सरुनि गेली
सूर्य उगवला प्रभात झाली पूर्व दिशा खुलली
मंद वायु हा सुगंध पसरुनि आनंदित करितो
प्रभातकाळीं ईशस्तुती हा मधुर रवें गातो
पक्षी वृक्षावरतीं बसुनी आनंदें गाती
ईशस्तुती ती ऐकुनि वेली वृक्ष सुखें डुलती
गाइवांसरें हंबरताती रानाला निघती
जातांना तीं प्रेमभरानें ईशस्तुती गाती
विश्रांतीतें घेउनि सृष्टी पुनरपि ही उठुनी
आनंदानें गात असे ही देवाचीं गाणीं
फुलांमुलांना वृक्षलतांना सकलां सांभाळी
त्या जगदीशा वंदूं गाऊं मंगल या कालीं
परमेशाचें स्मरण करोनी लागूं कामाला
कृपा असूं द्या बालांवरतीं प्रार्थूं या त्याला

---

# ईश्वराची अपार दया.

## श्लोक.

द्याया विसांवा थकल्या जिवाला
हरावयाला सकला श्रमाला
केली तुवां सौख्यद रात्र फार
देवा तुझी ही ममता अपार १

प्रभातकालीं अति गार वारा
उत्साह दे वाहुनियां जिवाला
सुगंध देई बहु सौख्यदायी
देवा कृपेला तव पार नाहीं २

प्रभात कालीं उदया रवी ये
अंधार सारा हरुनी क्षणी ने
प्रकाश उत्साह जनांस देई
सीमा प्रभूच्या ममतेस नाहीं ३

वसंत येऊनि फलांसि देई
वर्षांनी वर्षा बहु धान्य देई
शरद् करी सुंदर तो धरेला
देवा नसे अंत तुझ्या कृपेला ४

सृष्टी तुवां ही बहु रम्य केली
कौशल्यसीमा अति दाखवीली
देखावया सुंदर नेत्र देई
कृपा प्रभूची अति थोर पाहीं ५

आकाशमार्गें धरणी पळे ही
न-शांत केव्हां क्षणमात्र राही
अपाय जीवा न घडे तरीही
अगाध ऐशी ममता तुझी ही ६

प्रभो तुझ्या चित्त पदीं जडावें
तुझ्या गुणा नित्य सुखें स्मरावें
कीर्ती तुझी नित्य मुखें वदावी
सेवा पदाची मजला घडावी ७

१२५
३३
ता.
मराठी ... शाळा

# तारे व ग्रह.

तारे:—एकाद्या रात्रीं निरभ्र व नील आकाशांत सहज दृष्टि टाकली, तर लक्षावधि चांदण्या दिसतात, व तो देखावा पाहून फार मौज वाटते. ह्या ज्या चांदण्या दिसतात, त्यांचे तारे व ग्रह असे दोन प्रकार आहेत. आतां ताऱ्यांसंबंधीं अगदीं साध्या व सोप्या गोष्टी समजून घेण्यापूर्वीं प्रथम आपण सूर्यासंबंधीं थोडा विचार करूं. आपल्या डोळ्यांना दिसणारे जे चिमुकले तारे त्यांच्याशीं तुलना केल्यास हा आपला सूर्य केवळ प्रचंडच नव्हे तर त्या ताऱ्यांच्या मानानें आपला अगदीं जवळचा शेजारी आहे, असें दिसून येतें. आणि याच कारणामुळें अंतरालांत अत्यंत दूर असणाऱ्या ताऱ्यांपेक्षां सूर्याचा आकार, त्याची रचना व त्याच्यामध्यें होणारे बदल यासंबंधीं आपणांस पुष्कळशी माहिती उपलब्ध होते; व केव्हांही झालें तरी सूर्यापेक्षां या दूरच्या ताऱ्यांची माहिती आपणांस कमीच असणार व तसें होणें अंतरामुळें स्वाभाविक आहे. आपला सूर्य म्हणजे आकाशांत पेटलेली एक प्रचंड राक्षसी भट्टीच असून तिच्या ज्वाला आसपास पसरत आहेत. ही भट्टी आपल्या पृथ्वीच्या कमींत कमी दहा लक्ष पट मोठी आहे. उदाहरणार्थ—पृथ्वी मोहरीच्या दाण्याएवढी आहे असें आपण धरल्यास,त्याच मानानें सूर्य एका मोठ्या नारिंगाएवढा होईल. अशा या प्रचंड भट्टींतून बाहेर पडणाऱ्या ज्वालांसंबंधीं विचार करणें आपल्या कल्पनाशक्तीच्या बाहेर आहे. अलीकडे ज्योतिःशास्त्रज्ञांनीं यांपैकीं कांहीं ज्वालांची लांबी शोधून काढली आहे. ती लांबी विचारांत घेतां पृथ्वीपासून अशा प्रकारच्या ज्वाला जर अंतरालांत पसरल्या, तर त्या चंद्रापेक्षांही किती तरी पलीकडे लांब आकाशांत पसरतील असें म्हणतां येतें. हें झालें सूर्याच्या ज्वालांचें. तसेंच पृथ्वीपासून

त्याच्या अंतराची कल्पना करणेंही आपल्या आवांक्याबाहेर आहे. सूर्य आपणांपासून ९२०००००० मैल लांब आहे, असें सामान्यतः आपण म्हणतों. आतां याच अंतराचा आपण दुसऱ्या रीतीनें विचार करूं. तासीं १०० मैल जाणाऱ्या मोटारगाडींत बसून आपण निघालों, व केव्हांही एक क्षणभर सुद्धां मोटार गाडी थांबविली नाहीं, अशी आपण कल्पना केली—अर्थात् नुसती कल्पनाच—तर केवळ १०००००० मैलच जावयाला एक वर्षापेक्षां जास्त वेळ लागेल व किंचितही न थांबतां असाच वेग ठेवून जर आपण चाललों, तर ९० वर्षें सतत प्रवास करूनही सूर्य व पृथ्वी यांमधील अंतर तुटलें जाणार नाहीं ! या रीतीनें विचार केला असतां जवळ दिसणारा हा आपला सूर्यच खरोखरी कितीतरी लांब आहे, हें दिसून येतें.

आतां ज्यांना आम्ही चिमुकले तारे म्हणतों, ते सुद्धां खरें पाहूं गेलें असतां पेटलेल्या प्रचंड व राक्षसी भट्ट्याच आहेत. इतकेंच नव्हे तर या भट्ट्या आपल्या सूर्यापेक्षां शेंकडों किंवा हजारों पटीनें मोठ्या आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत आपल्या दिव्य व प्रखर तेजानें चमकणारा आणि प्राणी व वनस्पति यांना आतां भाजून काढतो कीं काय इतकी त्यांची लाही लाही करणारा आमचा हा दिव्य, प्रचंड व पराक्रमी सूर्य अंतराळात चमकणाऱ्या कोट्यवधि ताऱ्यांपैकीं एक ताराच होय व त्यांतही इतर ताऱ्यांच्या मानानें तो लहानच आहे. याप्रमाणें विश्वांतील अनंत गोलांचा विचार करतांना आमचे भगवान् सहस्त्ररश्मि सूर्यनारायण हे वाळवंटांतील वाळूचा कण, समुद्रांतील जलबिंदु किंवा 'दर्यामे खसखस' या न्यायाप्रमाणें केवळ एक चिमुकला तारा ठरतात. सर्व विश्वाचा विचार करतांना आपल्या सूर्याचें यापेक्षां जास्त महत्त्व नाहीं.

हल्लीं दररोज रात्रीं आकाशांत आपल्या डोक्यावर मृगनक्षत्र दिसत असतें. हा तारकापुंज दिसण्यांत विशेष सुंदर आहे, आणि त्यांतील

वायव्य व आग्नेय या दिशांना व साधारण समोरासमोर असणारे दोन तारे फारच प्रकाशमान दिसतात. त्यांतले त्यांत आग्नेय दिशेला चमकणारा तारा खगोलांतील प्रचंड ताऱ्यांपैकीं एक आहे; परंतु हा तारा पृथ्वीपासून अत्यंत दूर अंतरावर असल्यामुळें त्याचें अंतर मोजणें आजपर्यंत कोणालाच शक्य झालें नाहीं. मात्र आपला तेजस्वी सूर्य आपणांपासून आकाशांत या ताऱ्याइतकाच जर अत्यंत दूर अंतरावर असता, तर अमावास्येच्या ऐन काळोख्या रात्रींसुद्धां तो आपणांस मोठ्या दुर्बिणीच्या मदतीवाचून हुडकून काढतां आला नसता एवढें खात्रीनें सांगतां येतें. जगांत अत्यंत वेगवान् म्हणजे प्रकाशकिरण होत. ते दर सेकंदास १८६००० मैल अंतर चालून जातात हें आपणांस माहीत आहे. अशा तीव्र वेगानें प्रवास करणाऱ्या प्रकाशकिरणांनासुद्धां वर सांगितलेल्या ताऱ्यांपासून निघून आपणांपर्यंत येण्यास शंभरापेक्षां जास्त वर्षें लागतात, हेंही आपणांस कळलेलें आहे. अर्थातच उलट रीतीनें असें म्हणतां येईल कीं, ही प्रचंड भट्टी जर एकदम विझली, म्हणजे हा तारा एकदम आकाशांतून नाहींसाच झाला तर तो नाहींसा झाला, ही गोष्ट सुद्धां पृथ्वीवरील लोकांना शंभरापेक्षां जास्त वर्षें कळणार नाहीं. ह्यावरून मृगनक्षत्रांतील आग्नेय दिशेकडील हा तारा आपणांपासून किती तरी दूर अंतरावर आहे, याची वाचकांस कल्पना येईल.

ग्रहः—— दररोज रात्रीं आकाशांत आपण ज्या चांदण्या पाहतों, त्या सर्वच कांहीं वर सांगितलेल्या ताऱ्यांप्रमाणें पेटलेल्या भट्ट्या नव्हत. आपण ज्यांना ग्रह म्हणतों, असे कांहीं गोल त्यांमध्यें आहेत. ग्रह हे स्वयंप्रकाश मुळींच नाहींत. ते आपल्या पृथ्वीप्रमाणें थंडगार खडकांचे बनलेले गोल आहेत. या ग्रहांपैकीं कांहीं——विशेषतः शुक्र——विशेष तेजस्वी व सुंदर दिसतात. परंतु वर सांगितल्याप्रमाणें ग्रह स्वयंप्रकाश

नसून त्यांचा सर्व प्रकाश सूर्यापासून उसना घेतलेला असतो. सूर्याचे किरण आरशावर पडले असतां ते जसे परावर्तन पावतात, त्याचप्रमाणें सूर्याचे किरण या ग्रहांवर पडून परावर्तन पावतात, व पृथ्वीपर्यंत येतात. यामुळें ग्रह स्वयंप्रकाश नसूनही प्रकाशित दिसतात. चंद्रालाही सूर्यापासूनच प्रकाश मिळतो.ग्रह हे ताऱ्यांप्रमाणें स्वयंप्रकाश तर नाहीं-तच, पण आकारानेंही त्यांच्यापेक्षा अत्यंत लहान आहेत. तथापि ते कधींकधीं ताऱ्यांपेक्षांही मोठे व जास्त प्रकाशमान दिसतात. याचें कारण ताऱ्यांपेक्षां ते पृथ्वीच्या किती तरी जवळ आहेत. सर्व ग्रहांमध्यें शुक्र अतिशय तेजस्वी दिसतो, व आकाशांत सूर्यचंद्राच्या खालोखाल हा ग्रह विशेष दैदिप्यमान दिसतो. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांत चंद्र कलाकलांनीं वाढत जातो, व दुसऱ्या पंध-रवड्यांत तो कलाकालांनीं कमी होत जातो. यासच आपण अनुक्रमें वृद्धि व क्षय असें म्हणतों. चागल्या दुर्बिणींतून शुक्राचें निरीक्षण करीत राहिलें तर चंद्राप्रमाणें शुक्रालाही क्षयवृद्धि आहे, म्हणजे तो कांहीं दिवस कलाकलांनीं वाढत जातो, व कांहीं दिवस कलाकलांनीं कमी होत जातो, व कधींकधींतर त्याची अगदीं बारीक कोर दिसते वगैरे गोष्टी स्पष्ट दिसतात. शुक्र हा जर स्वयंप्रकाशित असता तर त्याच्या स्वरूपांत दिसून येणारे फरक किंवा ज्याला आपण क्षयवृद्धि अगर कला म्हणतों, त्या गोष्टी केव्हांच घडल्या नसत्या.

रात्रीं आकाशाचें निरीक्षण करून त्यांत ठळक व अत्यंत दैदिप्यमान असे जे तारकापुंज दिसतात, त्यांचा एक साधा आराखडा किंवा नकाशा एका मोठ्या कागदावर अगर आपल्या 'नोटबुकांत' तयार करावा. अशीं ठळक व तेजस्वी नक्षत्रें म्हटलीं म्हणजे मृग, सप्तऋषि, ध्रुव, व्याध, अगस्ति, रोहिणी,पुनर्वसु, स्वाती व हस्त हीं होत. निरनिराळ्या ताऱ्यां-मधील सापेक्ष अंतर नेहमीं तेंच राहातें, कधीं बदलत नाहीं. परंतु ग्रह हे

एकएकटे निरनिराळ्या नक्षत्रांतून प्रवास करीत असतात. या गोष्टी आपणास निरक्षिण करीत असतांना दिसून येतील. उदाहरणार्थ—हल्लीं शुक्राच्या गतीचें व त्याच्या कलांचें निरीक्षण करावें. याप्रमाणें हिंवाळ्याचे अगर उन्हाळ्याचे चार महिने रात्रीं आकाशाचें निरीक्षण करून एक साधा नकाशा तयार करावा, व त्यामध्यें मुख्य ठळक ठळक नक्षत्रें व त्या नक्षत्रपुंजांतील मुख्य तारे यांचीं नांवें लिहावीं. अशाप्रकारें निरीक्षण करीत असतांना व निरक्षिण केलेल्या गोष्टींचे नकाशे तयार करतांना मनाला मोठी करमणूक होते व या करमणुकीबरोबरच अनायासें ज्ञान होतें.

---

# सेंट अँड्र्यूज् अनाथबालिकाश्रमांतील दिनचर्या.

आक्टोबर महिन्यांतील ती सकाळची वेळ! थंडी कडक पडली आहे. हवेंत किंचित् धुकें पसरलें आहे, व गारठा अंगाला झोंबण्यासारखा आहे. समुद्र शांत व गंभीर दिसत आहे, व समुद्रापासून जवळच एक करड्या रंगाची मोठी व सुंदर इमारत झळकत आहे. तिच्य सर्व खिडक्या उघड्या आहेत. ही इमारत कसली व तेथें काय चाललें आहे, हें आपण पाहूं या.

घण, घण, घण, अशी मोठ्यानें एक घंटा वाजत आहे. ही घंटा तळमजल्याला व्हरांड्याच्या समोरच टांगलेली आहे, व एक बाई ती जोराजोरानें वाजवीत आहे. घंटेचा आवाज ऐकतांच झोंपेंतून जागें होऊन मुलींनीं डोळे उघडले, व त्यांच्यांत चळवळ सुरू झाली. प्रथम उठल्याबरोबर त्यांनीं आपलीं पांघरुणें व्यवस्थित ठेविलीं. मुली पांघरुणें ठेवीत असतांना एका बाईचें त्यांच्याकडे लक्ष आहे. मुली आपापल्या

खोल्यांतून बाहेर येऊन जिन्याजवळ एका रांगेंत उभ्या राहिल्या आहेत. त्यावेळीं सर्व मुली जाग्या झाल्या आहेत, व मागें बिछान्यांत कोणी रेंगाळत राहिलें नाहीं, हें पाहाण्याकरितां 'सिस्टरनें' त्यांच्याकडे दृष्टि टाकली. त्या सर्व मुली एकंदर ४२ आहेत. कामाला सुरुवात करण्यापूर्वी त्या मुली क्षणभर थांबल्या. त्यावेळीं त्यांच्या चेहेऱ्यावर तारुण्यांतील प्रफुल्लितपणा व चलाखी मूर्तिमंत दिसत होती. त्यांमध्यें १३।१४ वर्षे वयाच्या दोन मुली आहेत. वास्तविक या वयांत आनंदी आनंद असावयाचा ! परंतु आजपर्यंत जगांत खडतर स्थितींत आयुष्य घालविल्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा व आत्मविश्वास यांपैकीं कांहींही दिसत नाहीं. शिवाय आणखी एक मुलगी अगदीं लहान असूनही म्हाताऱ्या माणसासारखी दिसत आहे. याचें कारण ती नुकती-च शाळेंत आली आहे, व ज्या भयंकर आपत्तींतून तिला सोडवून आण-लें आहे, त्या पूर्वींच्या स्थितीचे दुःखदायक विचार तिच्या मनांतून अ-द्याप कायमचे गेले नाहींत. परंतु सहा महिन्यांनीं जर कोणीं या मुली-ला पुन्हा येऊन पाहिलें, तर ही ती पूर्वींचीच दुःखीकष्टी मुलगी आहे, असें ओळखतां येणार नाहीं. पूर्वींची ती म्हातारपणाची छटा जाऊन त्या जागीं ती तरुण दिसेल, व आपण सुखी आहोंत, व आपली योग्य काळजी घेतली जात आहे, व आपणांत आतां जास्त सुधारणा झाली पाहिजे, वगैरे विचारांमुळें तिची चर्या आनंदी दिसेल. तिच्याच शेजारीं १८।१९ वर्षांची एक दुर्मुखलेली मुलगी उभी आहे. ती नुकतीच शाळेंत आली आहे. तिला फार बोलायला नको; पण आंगच्या उपजत बुद्धीमुळें ती इतरांच्या मागोमाग जाऊन काम करते. परंतु आपण कांहीं फार वेळ काम करणार नाहीं, असें तोंडानें कांहीं पुटपुटत आहे. 'परंतु तुझ्या-वर कोणाची सक्ति नाहीं, तुला वाटेल तितकेंच काम कर' असें सिस्टरनें तिला आरंभींच ती शाळेंत आली तेव्हां सांगितलें आहे. तिच्या मनां-

तील विचार तिच्या चर्येवरून सिस्टरला तेव्हांच कळतात, व तिच्याकडे ती हसतमुख दृष्टीनें पाहाते, त्यामुळें त्या मुलीला उत्साह वाटतो. सिस्टर प्रेमानें तिच्या पाठीवर थाप मारून तिला म्हणते " मुली, कपडे धुण्याच्या कामांत तुझी आम्हांला फार मदत होईल. निराश होऊं नकोस. " हें ऐकतांच त्या मुलीच्या अंतःकरणांतील दुःखदायक विचार नाहींसे होतात, चेहऱ्यावर किंचित् हसूं झळकूं लागतें, आणि आपली काळजी कोणीतरी घेत आहे, तर आपणही आपल्याला काय काय येतें तें दाखवूं असा आत्मविश्वास त्या मुलीला वाटतो.

इतकें झाल्यावर आठ मुली धुण्याची खोली स्वच्छ करण्याकरितां जातात; तर कोणी स्वयंपाकघर, कोणी बैठकीच्या खोल्या, तर कोणी निजावयाच्या खोल्या झाडून स्वच्छ करण्याकरितां जातात. या प्रमाणें सर्व मुली आपापल्या कामाला निघून जातात. याप्रमाणें ७ वाजून १० मिनिटें होईपर्यंत जें तें आपापल्या कामांत गुंग असतें. नंतर सकाळची ईशप्रार्थना सुरू होते. पर ठिकाणीं असलेली आपली मित्र मंडळी, आजरी माणसें व ज्यांना मदतीची विशेष जरुरी आहे, अशीं आपलीं घरचीं माणसें या सर्वांकरितां त्या मुली परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना करितात. प्रार्थना आटोपल्यावर त्या न्याहारी करितात. त्यावेळीं चहाचे भरलेले कप व खाण्याचे इतर पदार्थ पाहून त्यांना आनंद वाटतो. न्याहारी आटोपल्यावर सर्व मुली आपापले बिछाने झाडून झटकून ठेवितात, व ज्या त्या आपापल्या कामास लागतात. पुष्कळशा मुली कपडे धुण्याकरितां जातात. ज्यांची शरीरप्रकृति नाजूक असते, व ज्यांचें शिक्षण दोन वर्षांपेक्षां जास्त झालें असतें, अशा मुली स्वयंपाक घरांतील बारीकसारीक कामें करितात. या सर्व कामांपैकीं कपडे धुण्याचें काम फार महत्त्वाचें असतें, व पुष्कळ मुलींना तेंच विशेष आवडतें असें दिसून येतें. हें वाचून कोणालाही विशेष आश्चर्य वाटेल. कपडे

धुण्याच्या कामाचा मुलींना तिटकारा असतो, व तें काम त्यांच्याकडून सक्तीनें करून घेतात असें लोकांना सांगण्यांत येतें. परंतु वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट असते, याबद्दल येथें येऊन व सर्व स्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून खात्री होते. इस्तरी करण्याचें दालन चांगलें प्रशस्त, हवाशीर व थंडीच्या दिवसांतही चांगली ऊब येईल असें आहे. त्या ठिकाणीं सर्व सामानाची योग्य तरतूद केलेली आहे. मुली तेथें आपापलें काम करीत असतांना परस्परांशीं आनंदानें हळूहळू गप्पागोष्टी करीत असतात. कांहीं मुली सिस्टरभोंवतीं गोळा होतात, आणि 'आज हवा कशी काय पडली आहे? येत्या शनिवारीं दुपारीं कोठें तरी लांब सहल करावयास गेल्यास पाऊस वगैरे येईल कीं नाहीं?' वगैरे प्रश्न करतात. कांहीं मुली हातांतील कामासंबंधींच बोलत असतात, तर कांहीं मुली सिस्टरच्या सूचना ऐकत असतात. सारांश जिकडे तिकडे उत्साह, तरतरीतपणा व आनंद दिसून येतो. याप्रमाणें १० वाजेपर्यंत काम चालू असतें, व पुढें फराळाकरिता २० मिनिटांची सुटी होते. फराळ झाल्यावर कामास पुन्हा सुरवात होते, जेवणाची वेळ होईपावेतों म्हणजे १२ वाजून २० मिनिटांपर्यंत चालतें. जेवण १ वाजतां आटोपतें, व नंतर सामान्यतः एक तास करमणुकीकरितां मोकळा वेळ मुलींना मिळतो. या वेळांत मुली बाहेर फिरावयास जातात किंवा बागेंत अगर आपल्या वर्गाच्या खोलींत काम करितात. ४ वाजतां चहाची घंटा होते. त्यावेळीं उपाहाराकरितां सर्व मुली आनंदानें जमतात. यावेळीं मुली मोठ्यानें खो खो हसतांना व त्यांची कुंगल पाहून कित्येकांना आश्चर्य वाटेल. परंतु ४० मुली एकदम बोलूं लागल्या म्हणजे असें होणें साहजिक आहे. थोड्या वेळानें सिस्टर एक लहान घंटा वाजवून सर्वांना थोडें हळू बोलण्याविषयीं विनंती करिते. यावेळीं नवीन मुली सुद्धां थोडें थोडें बोलूं लागतात, व नुकत्याच होऊन

गेलेल्या नाताळच्या सणांत कशी मौज झाली वगैरे चटकदार वर्णन कान देऊन ऐकत असतात. कधींकधीं याच वेळीं पुढें कांहीं दिवसांनीं जो समारंभ व्हावयाचा त्यावेळीं जें नाटक करावयाचें त्यासंबंधीं आपापसांत हळूहळू गप्पागोष्टी चालतात. चहा घेतल्यावर मुली थोडा वेळ कामाला जातात, व सहा वाजतां अगर फार झालें तर साडे सहा वाजतां काम आटोपून बैठकीच्या खोलींत येतात.

साधारणपणें दररोज संध्याकाळीं कांहींना कांहींतरी नवीन शिकण्यासारखें असतें, व मुली त्याकरितां आतुर असतात. आठवड्यांतून तीन दिवस गायन, आरोग्यशास्त्र, अंकगणित, इंग्लिश, कवाइत व खेळ हे विषय घेतात. बहुधा प्रत्येक शनिवारीं आश्रमांतील काम दुपारपर्यंतच चालतें; व जेवणानंतरचा दुपारचा सर्व वेळ शाळेबाहेरील अन्य व्यवसायांत खर्च होतो. उदाहरणार्थ, उन्हाळ्यांत वनभोजन तर हिंवाळ्यांत दुपारीं दौड व कवाइत आणि संध्याकाळीं खेळ, वगैरे गोष्टी ऋतुपरत्वें घेतल्या जातात. फावल्या वेळांत सिस्टरबरोबर गप्पा गोष्टी करण्याकरितां मुली विशेष आतुर असतात. मधून मधून सिस्टरशीं हितगुज करण्याची संधि मिळाल्यामुळें त्यांच्या कोंवळ्या व अशिक्षित मनाचा विकास होतो, व आपल्या अडचणी कमी कशा कराव्या अथवा त्यांना तोंड कसें द्यावें यांचें त्यांना शिक्षण मिळतें व अशा रीतीनें उपयुक्त व सुखकर आयुष्य कसें घालवितां येईल, याची कल्पना त्यांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभी राहते.

शेवटीं रात्रीं ९ चे सुमारास ईशप्रार्थना होते, व मुली निजावयास जातात, अशा रीतीनें आश्रमांतील नमुनेदार दिनचर्या संपते.

( वर दिलेलें वर्णन अनाथ व पोरक्या मुलींच्या एका आश्रमाचें आहे. ज्या मुली आपलें घर सोडून पळून गेल्या, ज्यांचे आईबाप कोण

यांचा पत्ताच लागत नाहीं, घरांदारांवांचून रस्त्यांत इकडे तिकडे भटकत असलेल्या अथवा अनीतिमान् आईबापांच्या कचाटयांतून सोडविलेल्या अशा मुलींचे या ठिकाणीं रक्षण, पोषण व शिक्षण होतें. आम्हीं या आश्रमांत एक दिवस घालविला. त्यावेळीं ज्यांना घरदार व प्रेमळ आईबाप आहेत, अशा इतर मुलींप्रमाणेंच त्या आश्रमांतील मुलींच्या सुखी व आनंदी मुद्रा पाहून आम्हांला खरोखर आश्चर्य वाटलें. आम्ही अशाच तऱ्हेचा दुसरा एक अनाथबालिकाश्रम इंग्लंडमध्यें पाहिला; परंतु दोहोंमध्यें मोठा फरक दिसून आला. त्या आश्रमांत असतांना आपण घरींच आहोंत, आपणांस कांहीं कमी नाहीं, असें कांहीं त्या दुसऱ्या आश्रमांतील मुलींना वाटत नव्हतें. आपण कोणी तरी विशेष प्रतिष्ठित आहोंत, व आश्रमांतील मुली आपणापेक्षां खालच्या प्रतीच्या आहेत, अशी त्या आश्रमाच्या चालकबाईची समजूत होती. त्यामुळें ती बाई मुलींकडे तिरस्कारयुक्त नजरेनें पाही, व त्यांच्याशीं तुसडचा रीतीनें वागे. यामुळें तेथील मुली दुर्मुखलेल्या व गबाळी दिसल्या. आम्ही त्यांच्याशीं बोलत असतांना उत्तरादाखल त्यांनीं एकही शब्द उच्चारला नाहीं. त्या मुक्यासारख्या गप्प होत्या! परंतु वर ज्या आश्रमाचें वर्णन केलें, तेथील चालक स्त्रिया चांगल्या सुसंस्कृत मनाच्या व धार्मिक वृत्तीच्या असल्यामुळें एकाद्या संभावित व कुलीन घराण्यांतील मुलींना जसें प्रेमानें वागवावें तसें त्या स्त्रिया आश्रमांतील त्या पोरक्या मुलींना प्रेमानें वागवितात व ही गोष्ट मुलींकडे पाहतांच स्पष्ट दिसून येते. पुष्कळशा मुली चांगल्या देखण्या होत्या व अव्यवस्थितपणा किंवा गबाळीपणा कोणत्याच मुलींमध्यें दिसला नाहीं. एक सुद्धां दुर्मुखलेली मुलगी आम्हांला दिसली नाहीं. आम्ही त्यांच्याशीं बोलत असतां हसत हसत, मोकळ्या मनानें व न लाजतां त्यांनीं आमच्या प्रश्नांचीं उत्तरें

दिली. आम्हीं त्यांच्याबरोबर भोजन केलें व त्यांचे दुपारचे खेळ पाहिले. अशा प्रकारचा अनाथ बालिकाश्रम चालविणाऱ्या स्त्रिया चांगल्या सुसंस्कृत, सुशील व सुशिक्षित असल्या पाहिजेत, आणि त्यांनीं पैशावर दृष्टि न ठेवतां केवळ मुलींच्या प्रेमाखातर कष्ट सोसले पाहिजेत. असें जर नसलें तर अपयश हें खास ठेवलेलें, असे विचार आश्रम पाहून तेथून निघतांना आमच्या मनात आले.

समाजानें ज्यांना टाकून दिलें होतें, व ज्यांचा धिःकार केला होता त्याच या मुली इतक्या सदाचरणी, निर्कोप प्रकृतीच्या व विश्वासास पात्र कशानें बरें झाल्या ? अनाथ व पोरक्या मुलींच्या आयुष्यांत ही उत्कृष्ट क्रांति कोणीं घडवून आणली ? या अनाथ मुलींना माणसांत कोणीं आणून बसविलें ? या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच म्हणजे पवित्र व सुस्वभावी स्त्रियांच्या निकट सहवासांत राहाण्याचेंच तें उत्कृष्ट फळ होय. ( आर नवलकर. )

---

# दिव्य राजकन्या.

## परलोकवासी महाराणी अलेकजँड्रा यांची गोष्ट.

डेन्मार्क या नांवाचा एक देश आहे. तेथें कांहीं वर्षांपूर्वी एक सुंदर चिमुकली राजकन्या राजवाड्यांत राहात असे. तिचे आईबाप त्या देशाचे राजाराणी होते. त्या राजकन्येचा स्वभाव फार गोड होता. त्यामुळें तिच्या आईबापांचें तिच्यावर अतिशय प्रेम असे. तिचे डोळे निळे व पाणीदार होते, व पापण्यांचे केस काळेभोर होते. तिच्या मनोहर डोळ्यांकडे पाहतांक्षणींच तिच्या गोड स्वभावाची कल्पना होत

असे. तिच्यावर आईबापांचें अतिशय प्रेम होतें, तरी त्यांनीं तिचे फाजील लाड कधींच केले नाहींत. जगांतील इतर मुलींप्रमाणें लहानपणापासून तिला साध्या प्रकारचें शिक्षण दिलें होतें. त्यामुळें जगांतील साध्या गोष्टीही तिला फार आवडत असत, व मोठेपणीं संसारांत स्त्रीला ज्या गोष्टी आल्या पाहिजेत, त्याही ती मोठ्या प्रेमानें शिकत असे. स्वयंपाक करणें व घरांतील सामान नीटनेटकें ठेवणें या गोष्टी तिला चांगल्या येत असत. मोठी झाल्यावर स्वतांचे कपडे शिवण्यासही ती शिकली होती. अशा आनंदांत तिचे बाळपणचे दिवस चालले होते, व तिचा स्वभाव दिवसेंदिवस जास्त गोड बनत चालला. ती दयाळू व विचारी होती. ती गरिबांवर व आजारी माणसांवर विशेष प्रेम करीत असे. त्यातलेत्यांत मुक्या प्राण्यांवर तर तिचें लक्ष फारच असे.

जगांतील सर्व मुलांना गोड गोड गोष्टी ऐकण्याचा फारच नाद असतो. ही राजकन्या राजवाड्यांत जरी अगदीं साध्या रीतीनें राहात होती, तरी तिला जगांतील लहान मुलांप्रमाणें गोड गोष्टी ऐकण्याचा मोठा नाद होता. हॅन्स अंडरसन यानें लहान मुलांकरितां वनदेवतांच्या मनोरंजक चटकदार अशा पुष्कळ गोष्टी लिहिलेल्या आहेत. या गोष्टींचीं पुष्कळ भाषात भाषांतरें झालीं आहेत. त्या गोष्टी तिला फार आवडत असत. त्या गोष्टी पुस्तकावरून वाचण्याची तिला जरूर नसे, तर त्या गोष्टी सांगण्याकरितां स्वतां हॅन्स अंडरसन राजवाड्यांत येत असे. तो दररोज एक एक नवी व चटकदार गोष्ट सांगे. त्याचे तोंडून गोष्टी ऐकत असतांना तिला अतिशय आनंद होत असे. गोष्टींतील राजकन्या फारच देखण्या व गोड स्वभावाच्या असत. अशा त्या दिव्य राजकन्यांच्या गोष्टी ऐकून ऐकून त्यांचेवर या राजकन्येचें फार प्रेम जडलें.

मोठे झाल्यावर आपणही गोष्टींतील सुंदर व दिव्य राजकन्यांप्रमाणें व्हावें असें सर्व मुलींना वाटतें, तसेंच त्या राजकन्येसही वाटत असे. व आपण स्वतां राजकन्या असल्यामुळें गोष्टींतील राजकन्येप्रमाणें होण्याची जबाबदारी तर आपणावर विशेष आहे, असेही विचार तिच्या मनांत वरचेवर येत असत. जेव्हां आपला सुंदर चेहरा ती आरशांत पाहात असे, तेव्हां वनदेवतांच्या महाराणीसारख्या आपण आहोंत असें वाटून तिला आनंद होई. वनदेवतांच्या प्रदेशांतील राण्यांना आपल्या रूपाबद्दल गर्व नसतो, तसा या राजकन्येलाही आपल्या रूपाबद्दल गर्व नव्हता. गोष्टींतील राजकन्या जशा लोकांवर प्रेम करितात, त्यांशीं नम्रतेनें वागतात, व त्यांना न कळत त्यांचेवर मोठा उपकार करतात, तसें आपणही करावें, असें या राजकन्येला वाटत असे.

आपण राणी झालों तर काय काय करूं या विषयीं गोड गोड कल्पना ती नेहमीं करीत असे. 'माझ्याशीं लग्न कर व राज्याची वांटेकरीण हो' असें एकादा सुंदर राजपुत्र पुढें आपणांस विचारील काय? ही कल्पना तिचे मनांत वरचेवर येई. लहान मुलांच्या स्वभावाप्रमाणें अशा गोड गोड कल्पना ती करीत असे. आतां त्या जरी कल्पनाच होत्या तरी ती मात्र गोष्टींतील राजकन्येप्रमाणें शहाणपणानें व प्रेमळपणानें वागे. जणूं काय तिच्या त्या गोड कल्पना पुढें केव्हां तरी खऱ्याच होणार आहेत! आणि खरोखरच त्या कल्पना पुढें खऱ्याही ठरल्या!

ती १८ वर्षांची असतांना जगांत प्रसिद्ध असा इंग्लंडचा राजपुत्र डेन्मार्क देशाला आला व तिच्याबद्दल तिच्या आईबापांजवळ त्यानें मागणी घातली. आतां मात्र राणी होण्याची व गोष्टींतील राणीप्रमाणें वागण्याची वेळ आली! महाराणी अलेक्झँड्रा या नात्यानें जेव्हां ती

इंग्लंडमध्यें आली, तेव्हां तिचें अतिशय सुंदर रूप पाहून लोक कसे चकित झाले व पुढें आपल्या आयुष्यांत त्या राणीनें लोकांवर उपकार करून व त्यांच्याशीं गोड स्वभावानें वागून तिनें त्यांचीं मनें कशीं आपलींशीं करून घेतलीं वगैरे गोष्टी सर्वांना माहीत आहेत. लहानपणीं ती ज्या गोड गोड कल्पना करीत असे, त्या तिनें पुढें कशा खऱ्या करून दाखविल्या याबद्दल एकच उदाहरण दिलें म्हणजे पुरे.

महाराणी अलेक्झँड्रा यांना बकिंगहॅम राजवाड्यांत गरीब वस्तींत राहाणांऱ्या अनाथ मुलांचीं वरचेवर पत्रें येत असत. पत्र मिळतांच ह्या फुलांचा एक सुंदर गुच्छ तयार करीत, आणि तो गुच्छ व आपल्या सहीचें एक पत्र सोन्याचा मुलामा दिलेल्या एका परडींत ठेवीत. नंतर चार घोड्यांच्या गाडींत बसून व भरजरी पोषाक केलेले घोडेस्वार मागें पुढें चालत आहेत अशा थाटामाटानें, परंतु आपण येणार आहोंत हें अगोदर कांहीं सुद्धां न कळवितां अनाथ व आजारी मुलांच्या दाराजवळ येऊन त्या उभ्या रहात असत. त्या वेळीं वनदेवतांच्या गोष्टींतील एखाद्या दिव्य महाराणीप्रमाणेंच ही महाराणी आहे, असें त्या मुलांना वाटे आणि त्या स्वतां खरोखर तशा होत्याच.

---

## सोन्याची हंसी.

एक होता लाकूडतोड्या. तो दररोज रानांतून सरपणाची मोळी आणीत असे, व ती विकून जे पैसे येतील त्यांवर आपलें व आपल्या बायकापोरांचें पोट भरीत असे. त्याला दगडू, कोंडू व गणू असे तीन मुलगे होते. त्यांपैकीं गणू सर्वांत धाकटा होता. गणू आतां मोठा झाला

होता, परंतु त्याला नुसतें खायाला पाहिजे, काम करायला नको, व काम करायची फारशी अक्कलही नाहीं, अशीच घरांतील सगळ्या माणसाची गणूबद्दल कल्पना होती. एके दिवशीं त्या लाकूडतोड्याचा थोरला मुलगा बापाला म्हणाला, ' बाबा, बाबा, मी आज रानांत लाकडें तोडायला जातों.' तेव्हां त्याच्या आईनें त्याला न्याहारीकरितां एका फडक्यांत एक भाकर, दोन कांदे व थोडी चटणी बांधून दिली. तो मुलगा ती भाकर, एक कुऱ्हाड व दोरी घेऊन निघाला. जातां जातां त्याला एक मोठें जंगल लागलें. तेथें एक म्हातारा मनुष्य वाकत वाकत व काठी टेकीत टेकीत येत होता. दगडूला पाहातांच तो म्हातारा ह्मणाला, 'राम,राम, बाबारे, तूं कोठें चाललास ?' तेव्हां दगडू म्हणाला, 'मी रानांत लाकडें तोडण्याकरितां चाललों आहें.' ह्मातारा ह्मणाला, 'बाबारे, मला फार भूक लागली आहे. तुझ्याजवळ असली, तर मला थोडी भाकर खायाला दे.' तसें दगडू ह्मणाला 'म्हातारेबाबा, मजवळ भाकरी आहे, पण आपणां दोघांना ती पुरणार नाहीं.' असें म्हणून दगडू पुढें चालता झाला. कांहीं वेळानें तो लाकडें तोडावयास लागला, पण एक दोन लाकडें तोडलीं नाहींत तोंच कुऱ्हाडीचा घाव त्याच्या पायाला लागला, व भळभळा रक्त वाहावयास लागलें, तेव्हां लाकडें तोडावयाचें टाकून तो कसाबसा लंगडत लंगडत घरीं आला. तेव्हां दुसरा मुलगा कोंडू लाकडें तोडावयास निघाला. त्यालाही आईनें एका फडक्यांत कांदा, भाकरी व चटणी बांधून दिली. कोंडू ती भाकर, कुऱ्हाड व दोरी घेऊन रानात आला. तेथें त्याला तो पूर्वींचाच म्हातारा भेटला. कोंडूला पाहातांच तो म्हातारा म्हणाला, ' राम, राम, बाबारे, तूं कोठें चाललास ! ' तेव्हां कोंडू म्हणाला, 'मी रानांत लाकडें तोडण्याकरितां चाललों आहें. ' म्हातारा म्हणाला, ' बाबारे मला फार भूक लागली आहे. तुझ्याजवळ असली, तर मला थोडी भाकर खायाला दे ' तसें कोंडू म्हणाला,

'म्हातारे बाबा, मज वळ भाकर आहे पण आपणां दोघांना ती पुरणार नाहीं !' असें म्हणून कोंडू पुढें चालता झाला. कांहीं वेळानें तो लाकडें तोडावयास लागला. पण एक दोन लाकडें तोडलीं नाहीं तोंच कुऱ्हाडीचा घाव त्याच्या पायाला लागला, व भळभळा रक्त वाहावयास लागलें, तेव्हां लाकडें तोडावयाचें टाकून कोंडू दगडूप्रमाणेंच कसाबसा लंगडत लंगडत घरीं आला. तेव्हां धाकटा मुलगा गणू लाकडें तोडावयास निघाला. तेव्हां आई म्हणाली, 'बाळा, तूं लहान आहेस. तुला लाकडें कशीं बरें तोडतां येतील !' परंतु गणू कांहीं ऐकेना, तेव्हां त्यालाही आईनें एका फडक्यांत कांदा, भाकर व चटणी बांधून दिली. गणू ती भाकर, कुऱ्हाड व दोरी घेऊन रानांत आला. तेथें त्याला तो पूर्वींचा म्हातारा भेटला. गणूला पाहातांच तो म्हातारा म्हणाला, 'राम राम बाबारे, तूं कोठें चाललास ?' तेव्हां गणू म्हणाला, 'मी रानांत लाकडें तोडण्याकरितां चाललों आहें.' म्हातारा म्हणाला, 'बाबारे, मला फार भूक लागली आहे. तुझ्याजवळ असली तर मला थोडी भाकर खायला दे,' हें ऐकतांच गणू म्हणाला, 'म्हातारे बाबा, मजजवळ भाकर आहे बरें ! या बसा, आपण दोघे न्याहारी करूं या ' पुढें दोघांनीं ती चटणी भाकर जवळच असलेल्या एका ओढ्याजवळ बसून खाल्ली. म्हाताऱ्याचें पोट भरलें, व तो संतुष्ट झाला. न्याहारी आटोपल्यावर म्हातारा गणूला म्हणाला, 'बाळा, तूं कितीतरी दयाळू आहेस ! तूं माझेवर फार मोठा उपकार केलास. आतां मी तुला एक गुप्त गोष्ट सांगतों. हें बघ, तें पलीकडे जें एक जुनें वठलेलें झाड दिसत आहे, तें तोड व तेथें तुला जें कांहीं सांपडेल तें घे. तुझें कल्याण होवो ' हें बोलून म्हतारा निघून गेला. व गणू तें झाड जोराजोरानें तोडावयास लागला. थोडक्याच वेळांत तें झाड धाडकन मोठ्यानें जमिनीवर पडलें. तें झाड पडतांच गणूला काय पण आनंद झाला ! त्या झाडाचा बुंधा पोकळ होता व

त्यात एक हंसी होती. तिचीं पिसें सोन्याचीं होतीं ! त्यानें ती हंसी घेतली व तो तेथून निघाला. आतां संध्याकाळ झाली होती म्हणून तो जवळच्या गांवांतच एका जातवाल्याच्या घरीं उतरला. त्या घरच्या मालकाला तीन मुली होत्या. त्यांनीं ती हंसी पाहिला, व तिचीं तीं सोन्याचीं पिसे पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें व एक तरी पीस मला मिळावें असें प्रत्येकीला वाटूं लागलें. पुढें गणू जेवून निजला. त्याला गाढ झोंप लागली असें पाहून मध्यरात्रीं सर्वांत थोरली मुलगी त्या हंसीजवळ आली, व तिनें त्या हंसीच्या पंखाला हात लावला तों काय चमत्कार ! तिचा हातच तेथून हालेना ! तिला तेथें कोणीं बांधून ठेवल्यासारख झालें ! तिला इकडे तिकडे हालतांच येईना ! इतक्यांत दुसरी मुलगी तेथें आली. तिनें थोरल्या बहिणीला सोडविण्याकरितां तिचा हात धरला तों तीहि चिकटली ! तिजसुद्धां हालतां येईना । शेवटीं धाकटी बहीण आली, पण तिचीही तीच अवस्था झाली ! त्या मुलींना रात्रभर तसेंच ताटकळत बसावें लागलें. दुसरे दिवशीं सकाळीं गणू उठला, व आपली हंसी घेऊन चालूं लागला. त्यानें त्या मुलींकडे मुळींच पाहिलें नाहीं; परंतु तो जाऊं लागला तशा त्या सर्व मुलीं एकमेकींना एकमेक चिकटल्यामुळें त्या हंसीच्या मागोमाग जाऊं लागल्या. असा हा घोळका एका शेताजवळून जातांना एका शेतकऱ्यानें पाहिला, व त्या मुलींना सोडविण्याकरितां तो धांवत धांवत जवळ आला; पण त्यानें त्या घोळक्यांतील मागल्या मुलीचा हात धरतांच तोही त्यांत अडकला ! त्याचा हात निघेना ! मालकाची ही स्थिति पाहातांच त्याच्या शेतावर काम करीत असलेले गडी त्याला सोडविण्याकरितां धांवले, परंतु तेही एकामागून एक सर्व त्यांत अडकले ! कोणालाच बाजूला होतां येईना ! एकाला एक सगळेच आंधळ्यांच्या माळकेप्रमाणें चिकटले ! असें हें

१०।१२ माणसांचें लटांबर चालतांना एकमेकांचे पाय एकमेकांच्या पायांत अडखळत होते! असें चालतां चालतां ही मंडळी एका शहरांत आली. त्या शहराच्या राजाला एकुलती एक मुलगी होती. ती राजकन्या कधींही हंसत नसे. नेहमीं दुःखी व दुर्मुखलेली दिसे! राजानें तिला हंसविण्याकरितां पुष्कळ उपाय केले; परंतु ती कांहीं केल्या हंसेना. शेवटीं 'जो कोणी या माझ्या मुलीला हंसवील, त्याला मी आपली मुलगी व राज्य देईन,' अशी त्या राजानें दवंडी पिटविली होती. इतक्यांत आपला गणू, ती हंसी, व तें दहा बारा माणसांचें लटांबर शहरांत आलें! तीं माणसें एकमेकांना चिकटलेलीं होतीं, व चालतांना पायांत पाय अडखळत असल्यामुळें धडपडत चाललेलीं होतीं! असें हें लटांबर राजवाड्यापुढें आलें, तेव्हां तें राजकन्येनें पाहिलें. तो विचित्र देखावा पाहून ती एकदम खदखदां हसूं लागली! राजकन्या हसतांक्षणींच त्या तीन मुली, शेतकरी व त्याचे गडी त्या गुंतागुंतींतून मोकळे झाले, व ते आपापल्या घरीं गेले. गणूनें राजकन्येला हंसविलें, म्हणून राजाच्या पूर्वीच्या वचनाप्रमाणें गणूचें राजकन्येशीं मोठ्या थाटानें लग्न झालें; व पुढें कांहीं दिवसांनीं तो त्या देशाचा राजा झाला.

---

## मुळें व त्यांचे आकार.

कोणत्याही सजीव रोपाचें निरीक्षण करण्याचे परस्परांहून अगदीं भिन्न असे दोन स्वतंत्र मार्ग आहेत. एकादी खुर्ची, टेबल अगर दुसरा एकादा निर्जीव पदार्थ ह्याचें ज्या प्रमाणें आपण निरक्षिण करितों, त्याप्रमाणें वनस्पतीचा आकार, तिची रचना व तिच्या अवयवांची वाढ

याच नुसत्या बाह्य गोष्टींचें निरीक्षण करणें, हा एक मार्ग. या वेळीं त्या वनस्पतीच्या निरनिराळ्या अवयवांचीं भिन्न भिन्न कार्यें कोणतीं व तीं कशीं होतात, वगैरे गोष्टींचा यत्किंचितही विचार करावयाचा नाहीं. व वनस्पति सजीव आहे असें समजून त्या वनस्पतीच्या भिन्न भिन्न भागांचीं व इंद्रियांचीं निरनिराळीं कार्यें कोणतीं व तीं कशीं होतात, याच गोष्टींचें केवळ सूक्ष्म निरिक्षण करणें हा निरीक्षण करण्याचा दुसरा मार्ग होय.

वर सांगितलेल्या या दोन भिन्न मार्गांनीं मुळें, खोड, पानें अगर वनस्पतींचे दुसरे कोणतेही भाग यांपैकीं प्रत्येक वेळीं एकेक गोष्ट घेऊन तिचें आपणांस निरक्षिण करतां येईल. कोणत्याही अवयवाचें निरीक्षण करतांना त्याच्या कार्याचा विचार न करतां फक्त त्या अवयवाचा आकार, रचना, वाढ, यांचें निरक्षिण करितां येईल. उलटपक्षीं त्या अवयवाचा आकार, रचना वगैरे बाह्य गोष्टी मुळींच लक्षांत न घेतां फक्त त्याच्या कार्यासंबंधीं आपणांस माहिती मिळवितां येईल.

आतां या दोन्ही मार्गांनीं आपण वनस्पतींच्या मुळाचें निरिक्षण करूं. पैकीं आज मुळांचा आकार, त्यांची रचना वगैरे बाह्य गोष्टींचाच फक्त विचार करूं. मुळांच्या कार्यासंबंधानें दुसऱ्या खेपेस पाहूं; तथापि मुळांचा विशिष्ट आकार व रचना हीं सहजासहजींच कांहीं एक कारण नसतांच तशीं झालीं आहेत, असें मुळींच नाहीं, हें आपण प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. मुळें जीं कार्यें करितात, त्यांशीं त्यांचा आकार, रचना वगैरे गोष्टींचा अगदीं निकट संबंध आहे, व ज्यावेळीं दोन मुळाच्या आकारांत मोठा फरक दिसतो, त्यावेळीं त्यांच्या कार्यांमध्येंही तसाच मोठा फरक आहे असें आपण धरून चालावें.

दोन मुख्य वर्गः— आपण दहा बारा रोपें अगदीं मुळासकट उपटलीं, व त्यांच्या मुळाकडे पाहूं लागलों तर त्यांच्या परस्परांच्या आकारांत

आपणांस मनस्वी फरक दिसून येईल. आतां सर्व मुळांचे आकार लक्षांत घेऊन त्यांचे कांहीं वर्ग करितां येतात कीं नाहीं, हें आपण पाहूं.

तंतुमय मुळें व मांसल मुळें असे मुळांचे दोन भिन्न वर्ग सहज व सोप्या रीतीनें करतां येतात. गवताचीं मुळें तंतुमय होत, व गाजराचें मूळ मांसल आहे. अशीं हीं दोन भिन्न वर्गांचीं दोन उदाहरणें झालीं. आतां हें खरें कीं, तंतुमय मुळें पुष्कळ प्रकारचीं असतात, व मांसल मुळेंही पुष्कळ प्रकारचीं असतात; परंतु सामान्यतः बोलावयाचें म्हणजे जमिनीच्या आंत येणारीं मुळें वर सांगितलेल्या दोन वर्गांपैकीं या नाहीं त्या कोणत्या तरी एका वर्गांत पडतात.

मांसल मुळांचें जर आपण जास्त बारकाईनें निरीक्षण केलें तर कांहीं विशिष्ट आकार आपणांस भिन्न भिन्न मुळांत पाहावयास सांपडतात. व या भिन्न भिन्न विशिष्ट आकारांना विशिष्ट नांवें दिलीं आहेत, ही गोष्ट दिसून येईल.— उदाहरणार्थ गाजर शेंड्याकडे मोठें व जाड असून तें मुळाकडे बारीक होत गेलेलें असतें, व तें उलट्या शंकूप्रमाणें दिसतें, म्हणून या प्रकारच्या सर्व मुळांना आपण शंकूच्या आकाराचीं मुळें म्हणतों. मुळा गाजराहून भिन्न असतो. मुळ्याचा मधला भाग जाड असून दोन्हीं बाजूंना वर व खालीं तो बारीक झालेला असतो. असल्या आकारांच्या मुळांना चातीच्या आकाराचीं मुळें म्हणतात. सलगम हें गोलाकार मुळांचें उदाहरण होय. आपण बागेंत नेहमीं जें डेलियाचें रोप पाहातों, त्याचें मूळ वर सांगितलेल्या प्रकाराहून अगदीं विशिष्ट आकाराचें असतें. डेलियाच्या खोडाच्या तळाशीं जीं बारीक तंतुमय मुळें असतात, तींच फुगून पुढें केळ्यासारखीं बनतात, व त्यांत अन्नाचा सांठा असतो; परंतु कधीं कधीं जमिनींत केळ्याच्या आकाराचे जे भाग दिसतात, तीं मुळें नव्हत; ते जमिनींत फुगलेले खोडाचे भाग आहेत.

उदाहरणार्थ बटाटा. बटाटे जरी जमिनींत होतात, तरी ते मुळें नव्हत. ते खोडाचे भाग आहेत. यावरून वनस्पतींमध्यें केळ्याच्या आकाराचे कांहीं खोडाचे भाग असतात, व कांहीं मुळें असतात, हें दिसून येईल. खरें मूळ दुसऱ्या मुळाच्या वरच्या भागांतून फुटत नाहीं. खरीं मुळें—बारीक अगर जाड—आंत उत्पन्न होतात, व तीं आपला मार्ग काढीत काढीत बाहेर येतात. ही गोष्ट गाजर उभें चिरलें असतां स्पष्ट दिसून येईल.

मुलांकडून करून घ्यावयाच्या गोष्टीः—

शेतांतील व बागेंतील नेहमीं दिसून येणारीं १०।१२ रोपें मुळांसकट उपटा, व प्रत्येक मूळ कोणत्या प्रकारचें आहे, व त्याचा आकार कोणता आहे, याचें वर्णन करा.

बागेंतील भाज्यांच्या मुळांच्या निरनिराळ्या आकारांचें वर्णन करा व त्यांचीं चित्रें काढा.

शंकूच्या आकाराचीं, चातीच्या आकाराचीं, तंतुमय व केळ्याच्या आकाराच्या मुळांचीं कमींत कमी दोन दोन उदाहरणें शोधून काढण्याचा प्रयत्न करा.

गाजर उभें चिरून त्याचीं बारीक मुळें आंतून मार्ग काढीत बाहेर आलीं आहेत, केवळ बाहेर त्वचेवर फुटलेलीं नाहींत हें दाखवा.

केळ्याच्या आकाराचीं मुळें शोधून काढा. त्यांची डेलियाच्या मुळाशीं तुलना करा व त्यांचीं चित्रें काढा.

# ऱ्होडेशिया, नियासालँड व बेचुआनालँड.

दक्षिण आफ्रिकन संघाशिवाय ब्रिटिश साम्राज्यांत ऱ्होडेशिया, नियासालँड व बेचुआनालँड हे तीन दक्षिणआफ्रिकेंतील प्रांत आहेत. हे प्रांत केपकॉलनी, ऑरेंजफ्रीस्टेट व ट्रान्सव्हाल या भागांच्या उत्तरेस कांगोप्रांत, टँगानिका सरोवर व नियासासरोवर येथपर्यंत पसरले आहेत.

सन १८३४ नंतर केपकॉलनी सोडून बोअर लोक ऑरेंजफ्रीस्टेट व ट्रॅन्सव्हाल या भागांत जाऊन राहिले, तेव्हां त्या भागांत राहणाऱ्या माताबेली लोकांना त्यांनीं लिंपोपो नदीच्या पलीकडे हांकून दिलें.

या प्रदेशांत शांत वृत्तीचे व शेतीकरून राहणारे मशोना जातीचे लोक राहात होते. माताबेली लोक लढाऊ पेशाचे असल्यानें, ट्रॉन्सव्हालमधून त्यांची हाकालपट्टी झाल्यावर त्यांनीं मशोना लोकांवर हल्ला करून त्यांना आपले गुलाम बनविलें, व त्यांच्या शेतवाड्या बळकाविल्या. या प्रांतांत कोठें कोठें नद्यांच्या वाळूंत सोन्याचे कण सांपडत; पण ते वेंचून न घेतां, व घेतले असल्यास ते परत 'नद्यैस्तृप्यंतु' करण्याचें, त्यांनीं हुकूम सोडले, कारण या प्रांतांत सोनें सांपडतें असें बोअर अगर इतर युरोपियन लोकांस कळल्यास या प्रांतावर त्यांचे हल्ले झाल्याशिवाय राहाणार नाहींत, ही गोष्ट ते पक्की ओळखून होते. अशा स्थितींत मशोना लोकांना सुमारें ५० वर्षें कंठावीं लागलीं.

सन १८८५ सालीं ब्रिटिश–सरकारनें बेचुआनालँड या प्रांताचा ताबा घेतला. व त्यामुळें त्यांची सरहद्द माताबेली लोकांच्या या प्रदेशाला येऊन भिडली. वास्तविक सन १८६५ सालापासून ब्रिटिश सरकारचें धोरण आपल्या बाहेरील वसाहती वाढविण्याच्या पूर्ण विरुद्ध होतें. कारण वसाहतींपासून खर्च वाढतो, व त्या खर्चाबरोबर इंग्लंडच्या लोकांवर करांचा बोजा येतो, असें त्यांचें मत होत; पण सन १८८४ ते १८८६ च्या दरम्यान फ्रान्स व जर्मनी या देशांनीं आफ्रिकेंतील एकेक भाग वशांत टाकण्यास सुरवात केली फान्सनें नायगेरियाच्या उत्तरेकडील प्रांत बळकाविला. जर्मनीनें टोगोलँड, दक्षिण-आफ्रिका (कलहारी वाळवंटाजवळचा भाग) व पूर्व आफ्रिका हे भाग जबरदस्तीनें आपल्या ताब्यांत घेतले. हें पाहिल्याबरोबर

इंग्लिश सरकारास स्फुरण चढलें, व त्यांनीं बेचुआनालँडचा ताबा घेतला. सन १८७७ पासून मिळत असलेला पूर्व आफ्रिकेचा भाग घेण्यास सन १८८७ सालीं परवानगी दिली, व त्या त्या भागांत व्यापार करण्यास इच्छिणाऱ्या कंपन्यांना परवानगी दिली. त्या दोन कंपन्या म्हटल्या म्हणजे दक्षिण आफ्रिकन (१८८९) व पूर्व आफ्रिकन (१८८८) कंपनी या होत.

सन १८८० ते १८८४च्या दरम्यान ब्रिटिश-सरकार युद्धांत गुंतलें होतें त्याचा फायदा घेऊन फ्रान्स व जर्मनी यांनीं प्रदेश घेतले; पण यापुढें तरी आतां सावध झालें पाहिजे, असें इंग्लंडला वाटूं लागून त्यानें वर सांगितल्याप्रमाणें मार्ग स्वीकारला.

त्यांनीं परवानगी दिलेल्या कंपन्यांपैकीं दक्षिण–आफ्रिकन कंपनींत सेसिल ऱ्होडस् या नांवाचा एक हुशार व महाधोरणी असा एक डायरेक्टर होता. बेचुआनालँड पलीकडील विस्तीर्ण व संपन्न प्रदेशाचें महत्त्व त्याच्या ताबडतोब लक्षांत आलें. या सुमारास बोअर लोकांची हा प्रदेश ट्रॅन्सव्हाल प्रांतास जोडण्याची तयारी चालू असल्याचें त्यास समजलें, तेव्हां क्षणाचाही विलंब न लावतां या कंपनींतलि सेलस नांवाच्या हुशार व धाडशी माणसाची हा प्रदेश हस्तगत करण्याचे कामीं त्यानें योजना केली. याबरोबर ५०० हत्यारबंद घोडेस्वार व इतर ५०० लोक मदत म्हणून दिले. एवढ्या तयारीनिशीं सेलस यानें वाटेंतील अडचणींना न जुमानतां कंपनीच्याहद्दी–पासून, ५०० मैल दूर असलेलें हॅमडन् नांवाचें पठार गांठलें, व तेथें एका शहराची स्थापना करून त्यास सॉलिसबरी हें नांव दिलें. हल्लीं या शहरापासून पोर्तुगीज हद्दींतील बीरा नामक बंदराशीं रेल्वेरस्ता जोडल्यानें याला फार महत्त्व आलें आहे. अशा रीतीनें या माणसाच्या धूर्ततेनें बोअर लोकांचा डाव हुकला, व दक्षिण–आफ्रिकन कंपनीस त्या सर्व प्रदेशाचा ताबा मिळाला.

या कंपनीच्या उद्योगधंद्यांत पुष्कळ मशोना जातीचे लोकांना काम मिळालें व त्यांना शांततेनें दिवस काढतां येऊं लागले; पण त्यांच्यावर माताबेली लोकांचे मधून मधून हल्ले होतच असत. या लोकांचा लोबेंगुला नांवाचा पुढारी होता. त्या बरोबर तहाच्या वाटाघाटी झाल्या. त्याप्रमाणें वागण्याचें त्यानें कबूलही केलें; पण वागणुकींत मात्र फरक दिसेना! शेवटीं असेच हल्ले येत

राहिल्यानें सन१८९३सालीं कंपनीला त्याच्या बुलेवेयो नामक मुख्य ठिकाणावर सैन्य पाठवावें लागलें. तेथें त्याचा पराभव होऊन तो पळाला. पुढें लवकरच सन१८९४सालीं तो मरण पावला, व त्याचे अनुयायी शरण आले. सन १८९५सालीं मशोना व मातावेली लोकांच्या या प्रदेशास सरकारी रीतीनें 'ऱ्होडेशिया' हें नांव देण्यांत आलें.

झबीझी नदीच्या योगानें या प्रांताचे दोन विभाग झाले आहेत. उत्तर-ऱ्होडेशिया व दक्षिण ऱ्होडेशिया. या कंपनीला या प्रांताची २५ वर्षांची सनद देण्यांत आली होती, ती सन १९१४ सालीं संपली. त्यानंतर उत्तर व दक्षिण ऱ्होडेशिया हे प्रांत निराळे न ठेवतां एकत्र करावे अशी कंपनीची शिफारस होती; पण दक्षिण-ऱ्होडेशियाच्या लोकसभेस हें म्हणणें पसंत पडलें नाहीं. त्यामुळें हल्लीं या दोन प्रांतांची राज्यव्यवस्था अगदीं अलग अलग आहे. सन १९१४ सालीं राजानें पूर्वींच्या व्यवस्थेंत वाटेल तो फेरफार करावा, असें ठरलें होतें; पण त्यानें असें जाहीर केलें कीं, पुढील दहा वर्षांत दक्षिण ऱ्होडेशियाची* सांपत्तिक स्थिति सुधारली व तेथील लोकसभेनें आपली व्यवस्था आपल्या हातांत घेण्याचें ठरविलें तर त्याचा विचार करण्यांत येईल. येथील सरकारपुढें मुख्य तीन अटी होत्या.

( १ ) जबाबदार–राज्यव्यवस्था मागणें.

( २ ) राजशासित वसाहतींप्रमाणें राहाणें अगर

( ३ ) दक्षिण–आफ्रिकन–संघाच्या सरकारचा ताबा मान्य करणें.

या तीन अटींपैकीं सन १९१९ सालीं भरलेल्या लोकसभेनें 'जबाबदार राज्यपद्धति' मागितली. त्या मागणीचा विचार करण्यासाठीं इंग्लिश पार्लमेंटनें सन१९२१ सालीं 'बक्स्टन कमिटी' नेमिली. सरते शेवटीं सन १९२२ सालीं दक्षिण ऱ्होडेशिया प्रांताला जबाबदार राज्यपद्धति देण्यांत आली. त्यामुळें आतां जबाबदार राज्यव्यवस्था मिळालेल्या ब्रिटिश–वसाहतींचें हें सर्वांत लहान भावंड आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

उत्तर ऱ्होडेशियाचे वायव्य प्रांत व ईशान्यप्रांत एक करण्यांत आले. या प्रांतावर कंपनीचाच ताबा आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ २९६००० चौ. मल

*दक्षिण ऱ्होडेशिया क्षेत्रफळ १४८५७५ चौरस मैल आहे.

असून लिव्हिंगजटन हें मुख्य शहर आहे. या प्रांतांत पार्लमेंटच्या संमतीनें कंपनी एक कारभारी नेमून त्याच्यामार्फत तेथील व्यवस्था चालविते. मात्र या प्रांतासाठीं पास झालेल्या कायद्यांना दक्षिण आफ्रिकन संघाच्या गव्हर्नर जनरलची संमति मिळावी लागते.

उत्तर ऱ्होडेशियाला लागून पूर्वेस नियासा सरोवरालगत उत्तर दक्षिण पसरलेल्या पट्टीला 'नियासालँड' म्हणतात. याचें क्षेत्रफळ ३९९५६ चौ. मैल आहे. राजधानीचें शहर झोंबा. या प्रांतांत राजशासित वसाहतींप्रमाणें राज्यव्यवस्था आहे. मुख्य अधिकारी गव्हर्नर हा इंग्लंडहून येतो, व तेथील कार्यकारी व कायदे–मंडळांतील सभासद सरकारकडून नेमिले जातात.

बेचुआनालँड, हा प्रदेश दक्षिण ऱ्होडेशियाला लागूनच दक्षिण केपकॉलनी-पर्यंत पसरला आहे. ( २७५००० क्षेत्रफळ ) या प्रांताचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग आहेत. दक्षिणेकडील भाग दक्षिण आफ्रिकासंघ–सरकारच्या ताब्यांत आहे. उत्तरेकडील भागांत लहान लहान राज्यें असून त्यांवर तेथील मूळचे राजे आहेत. या राजांवर देखरेख ठेवून त्यांच्यामार्फतच या प्रांताची व्यवस्था चालते. म्हणजे येथील व्यवस्था संरक्षित वसाहतींप्रमाणें आहे, असें म्हणतां येईल. या प्रांतांत नेमिलेले रेसिडेंट हे वसाहतमंत्र्याच्या ताब्यांत असतात.

अशा रीतीनें मध्य आफ्रिकेंत मुख्य तीन भाग ब्रिटिश साम्राज्यांत येत असून त्यांपैकीं ऱ्होडेशिया हा महत्त्वाचा भाग आहे. हा ब्रिटिश साम्राज्यास मिळवून देणाऱ्या सेसिल ऱ्होडस् या मुत्सद्याचें इंग्लिश इतिहासकार अत्यंत आदरपूर्वक स्मरण करितात. सेसिल ऱ्होडस हा सन १९०२ सालीं केपटाउनजवळ मरण पावल्यावर त्याचें प्रेत ऱ्होडेशिया प्रांतांत 'माटोप्पो' टेंकडीवर पुरण्यांत आलें. दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासांतील थोर पुरुषांच्या स्मारकाचीच ही जागा बनली आहे, असें म्हटलें तरी चालेल. कारण मागें दक्षिण–आफ्रिकेसंबंधाच्या प्रकरणांत ट्रान्सव्हालवर हल्ला करणाऱ्या जेम्सन् यास याच भागांत पुरण्यांत आलें आहे.

राष्ट्रसंघाच्या आज्ञापत्रानें इंग्लंडला याच्या उत्तरेकडील टँगानिकाप्रांत मिळाला. आतां केप ते केरोपर्यंतचा सरळ सर्व प्रदेश इंग्लिशांच्या ताब्यांत आल्यानें इंग्लंडचें वैभव फारच वाढलें आहे, असें दिसून येईल.



---

**इयत्ता ५ वी.** वेळ १ तास.

**विषय**—भूगोल. जपान.

**सामान्य उद्देश**—विचारशक्तीची वाढ करणें, सृष्टिसौंदर्याची आवड उत्पन्न करणें, निरनिराळ्या समाजांची माहिती देणें.

**विशेष उद्देश**—जपानची माहिती देणें.

**साहित्य**—नकाशा, चित्रें, जपानी पदार्थ—आगपेट्या, चाकू वगैरे.

| मुद्दे. | विषय. | पद्धति. | फळ्यावरील टांचण. |
|---|---|---|---|
| १ प्रवेश | | नकाशांत जपान देश दाखविणें | जपान देश सर्व बाजूंनीं पाण्यानें वेढलेला आहे |
| २ स्वाभाविक परिस्थिति | जपान सर्व बाजूंनीं समुद्रानें वेढलेला आहे. हा देश चार बेटें मिळून झालेला आहे. | नकाशांत जपान देश मुलांना पहावयास सांगून हा देश बेट आहे, तो चारही बाजूंनीं समुद्रानें वेढलेला आहे, हिंदुस्तानाप्रमाणें तो द्वीपकल्प नाहीं, हें प्रश्नद्वारां काढून घेणें. जपानचीं चार बेटें मुलांना दाखविण्यास सांगणें. | चार बेटें मिळून हा देश झाला आहे. |
| ३ सीमा | पश्चिमेकडे जपानचा समुद्र, पलकिडे रशिया, बाकीच्या तीन बाजूंस पासिफिक महासागर. | नकाशाचे साहाय्यानें मुलांकडून सीमा काढून घेणें. | सीमा.<br>उत्तरेस, पूर्वेस, दक्षिणेस } पासिफिक महासागर<br>पश्चिमेस—जपानचा समुद्र |

| | | | रचना. |
|---|---|---|---|
| ४ स्वाभाविक रचना | जपानच्या मध्यावर दाक्षिणोत्तर पर्वत पसरला आहे. किनाऱ्याजवळचा प्रदेश सखल आहे. किनारा ठिकठिकाणीं तुटलेला आहे. | नकाशाचे साहाय्यानें स्वाभाविक रचना काढून घेणें. | मध्यभाग—डोंगराळ उंच<br>किनाऱ्याचा प्रदेश—सखल<br>किनारा—तुटलेला |
| ५ हवामान | देश समुद्रवेष्टित असल्यामुळें व समशीतोष्ण कटिबंधांत असल्यामुळें हवा दमट आहे. जसजसें उत्तरेकडे जावें, तसतशी थंडी जास्त असते. | जपान समुद्रानें वेढल्यामुळें हवेवर काय परिणाम होत असेल ? जपान कोणत्या कटिबंधांत आहे ? या कटिबंधांतील हवामान कसें असतें ? इत्यादि प्रश्न विचारणें. | हवा—दमट<br>उत्तरेस—जास्त थंड |
| ६ पाऊस | मान्सून वारे या बेटांवरून वाहातात. मध्यभागीं असलेल्या पर्वतानें ते अडविले जातात. यामुळें या देशांत बराच पाऊस पडतो. | मान्सून वारे कोणत्या दिशेनें वाहतात ? जपानवरून ते जात असतील काय ? मध्यभागीं असलेल्या पर्वतांचा या वाऱ्यावर काय परिणाम होत असेल ? जपानांत पाऊस कसा पडत असेल इत्यादि प्रश्न विचारणें. | पाऊस—बराच पडतो. |
| ७ पिकें | जपानांत मुख्य पीक भाताचें आहे. उत्तरेकडील प्रदेशांत गहूं होतो. चहा, बांबू, तुतीचीं झाडें यांची पुष्कळ लागवड होते. | भाताचे पिकाला पाऊस, हवा कशी लागते हें विचारून भाताचे पिकाला जपानांत अनुकूल स्थिति आहे हें काढून घेणें. याप्रमाणें जपानचें हवामान व उंचवट्याचे प्रदेश चहाचे वाढीला अनुकूल आहेत हें दाखविणें, इतर कोणतीं पिकें होतात हें सांगणें. | पिकें—तांदूळ, गहूं, चहा.<br>इतर वनस्पति—बांबू व तुतीचीं झाडें. |

| मुद्दे. | विषय. | पद्धति. | फळ्यावरील टांचण. |
|---|---|---|---|
| ८ खनिज संपत्ति<br>९ उद्योगधंदे | जपानांत लोखंड, सोनें, तांबें व कोळसा यांच्या खाणी आहेत.<br>जपानांत चोहोंकडे समुद्र जवळ असल्यामुळें लोक उत्तम खलाशी आहेत. बांबू विपुल होत असल्यामुळें कागद व इतर वस्तु पुष्कळ होतात. लोखंडाचीं यंत्रें, चाकू, कात्री इत्यादि पोलादी पदार्थ पुष्कळ होतात. पुष्कळ कारखाने विजेनें चालतात. देशांत रेशमाच्या व कापसाच्या गिरण्या पुष्कळ आहेत. | खनिज पदार्थ सांगणें.<br>समुद्र जवळ असल्यामुळें लोक खलाशी उत्तम होतात हें प्रश्नद्वारां काढून घेणें. बांबूचा उत्तम कागद होतो हें सांगून जपानांत कागद पुष्कळ होत असेल हें काढून घेणें. दगडी कोळसा व लोखंड देशांत विपुल असल्यानें यंत्रें व पोलादी सामान पुष्कळ होत असेल हें काढून घेणें. जपानी चाकू, कात्री, सुरी वगैरे पदार्थ दाखविणें. हिंदुस्तानांतून व अमेरिकेंतून कापूस जपानी लोक नेतात, त्यांनीं आपल्या देशांत रेशमाच्या व काप- [illegible] आहेत व आतां हिंदुस्तानांत व इतर देशांत जपानी कापड खपतें हें सांगणें. डोंगरावरून नद्या जोरानें खालीं येत | खनिज पदार्थ—सोनें, तांबें, लोखंड, कोळसा.<br>उद्योगधंदः—दर्यावर्दीपणा, कागद, रेशमी व कापसाचें कापड, यंत्रें व पोलादी सामान यांचे कारखाने. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० आवृत्ति | | असल्यामुळें वीज सहज उत्पन्न ारितां येते व तिनें कारखाने चालवितां ेतात हें सांगणें.<br>झालेल्या भागावर प्रश्न विचारणें. | |

# शिशुवर्गाकरितां धडे.

शिशुवर्गाच्या पुस्तकांत आकार, इकार वगैरे अक्षराचे धडे दिलेले आहेत. हे धडे कांहीं दिवसांनीं मुलांचे पाठ होतात. मग मुलें लक्ष न देतां हे धडे भराभर पाठ म्हणतात. पुढील धडे शिशुवर्गाच्या पुस्तकाचे धर्तीवर लिहिलेले आहेत. शिक्षकानें एक एक धडा फळ्यावर लिहून नंतर मुलांकडून वाचून घ्यावा. नवीन धडे वाचावयास मिळाल्यानें मुलानाही आनंद वाटेल. प्रत्येक धड्यात नवीन शब्द यावे व तेच तेच शब्द व तीच तीच कल्पना पुन्हा पुन्हा यावी अशी योजना केली आहे.

संपादक.

धडा १ ला. (आ)

## आमचा बाळ.

नाना, बाळाला पाट आण.
ताई, बाळाला ताट आण.
माई, बाळाला भात वाढ.
माई, बाळाला वरण वाढ.
ताई, बाळाचा वरणभात कालव.
ताई, बाळाला वरणभात भरव.
बाळाला एक एक घास भरव.
आमचा बाळ वरण भात खाईल.

धडा २ रा. (इ)

## विमलचा वाढदिवस.

आज विमलचा वाढदिवस.
बाबा, विमलला हिरवा परकर शिवा.
बाबा, विमलला पिवळा परकर शिवा.
ताई, विमलला पाट आण.
विमल, आतां पाटावर बस.
माई, विमलला दिवा ओवाळ.
विमल, बाबांला नमन कर.
विमल, आईला नमन कर.

---

धडा २ रा. (ई)

## सकाळ.

सकाळ झाली.
सकाळींच चिमणी उठली.
ती चिव चिव करीत झाडावर बसली.
सकाळींच कावळा उठला.
तो काव काव करीत विहिरीवर बसला.
सकाळींच गाय उठली.
ती पळत पळत रानाला चालली.
सकाळींच मनी उठली.
ती मिआव मिआव करीत घरावर बसली.

---

धडा ४ था. ( उ )

## कुसुमची फजिती.

शाळा सुटली.
कुसुम पळत पळत घरीं चालली.
पळतां पळतां कुसुम पडली.
तिची पिशवी तुटली.
तिची पाटी फुटली.
बुकाला माती लागली.
मग कुसुम उठली.
ती मुसमुसत घरीं गेली.

धडा ५ वा. ( ऊ )

दिवस उजाडला.
विठू गवळी धार काढूं लागला.
गणू माळी हार करूं लागला.
भिकू सुतार लाकूड कापूं लागला.
जनू वाणी गूळ विकूं लागला.
जगू हलवाई जिलबी तळूं लागला.
बनू दूध तापवूं लागली.
बाळू आपला धडा करूं लागला.
लहान विनू दूध भाकर खाऊं लागला.

धडा ६ वा. ( ए )

बाबा बागेंत गेले.
केशव बागेंत गेला.

[library stamp]

वेणूही बागेंत गेली.
केशवानें फुलें वेचिलीं.
वेणूनें फुलें वेचिलीं.
गेनू माळी पेरू घेऊन आला.
गेनूनें ते पेरू मुलांना दिले.
मुलांना ते पिकलेले पेरू फार आवडले.
पेरू व फुलें घेऊन मुलें घरीं गेलीं.

---

धडा ७ वा. ( ऐ )

## बाजार.

भाऊ, हैबतीला घेऊन बाजारांत जा.
बैलाला वैरण नाहीं.
बैलाला सहा पैशांची वैरण आण.
मैनेला एक पैशाचा पेरू आण.
मैनेला कैरी आवडत नाहीं.
मैनेला पेरू फार आवडतो.

---

धडा ८ वा. ( औ )

## दसरा.

बाळ, आज दसरा आहे.
मी बाजारांत जातों.
तुला एक नवा कोट आणतों.
तुला एक नवी टोपी आणतों.

दादाला एक नवें धोतर आणतों.
दुपारीं तूं नवा कोट घाल.
दुपारीं तूं नवी टोपी घाल.
दादा नवें धोतर नेसेल.
दुपारीं लोक विठोबाचे देवळांत जातील.
दुपारीं आपण विठोबाचे देवळांत जाऊं.
देवाला सोनें वाहूं.

---

धडा ९ वा. ( औ )

## फौजदाराचें घर.

हें फौजदाराचें नवीन घर.
याजवर नवीन कौलें घातलीं आहेत.
घरांत एक मोठा चौक आहे.
चौकांत एक चौकोनी हौद आहे.
हौद फार डौलदार आहे.
हौदांत लाल मासे सोडले आहेत.
हौदांत मासे मौजेनें खेळतात.

---

धडा १० वा. अनुस्वार.

## फळांचें दुकान.

बंडू, चल आतां दुकान मांडूं.
पांडू व तूं मला मदत कर.

हें झालें माझें दुकान तयार.
दुकानांत सुंदर आंबे आहेत.
दुकानांत गोड अंजीर आहेत.
दुकानांत तांबडीं डाळिंबें आहेत.
गंगू, तुला डाळिंब पाहिजे का?
हें घे चार पैशांचें गोड डाळिंब
शांताराम तुला अंजीर पाहिजेत का?
हे घे चार पैशांचे गोड अंजीर.
चला खेळ संपला.
दुकान बंद झालें.

---

धडा ११.

## राग घालविला.

शांताराम शाळेंतून घरीं आला.
शांतारामाला आई बोलली,
शांताराम, दुधाचें पातेलें आण.
'शांतारामानें दुधाचें पातेलें उचललें.'
तें नीट उचललें नाहीं.
यामुळें तें खालीं पडलें.
आंतील दूध सांडलें.
आई शांतारामाला रागें भरली.
मग तो रडूं लागला.
शांतारामाची बहीण जवळ होती.

ती भावाजवळ गेली
तिनें भावाचे डोळे पुसले.
तिनें भावाला खडीसाखर दिली.
ती बोलली, ' दादा, रडूं नको.
खाऊ खा बरं.
माझा दादा फार शहाणा आहे.'
तें ऐकून शांताराम हसूं लागला.
आईचाही राग गेला.
आईही हसूं लागली.

---

## मुलांकरितां कविता.

### चालण्याची रीत.

### पद.

( समुद्रामधें कित्येक बिंदु पाण्याचे राहत होते, ) या चालीवर,
किंवा ( "आनंदाचा कंद" ) या चालीवर

आम्ही होतों बाळें तेव्हां हळु हळु पाउल टाकितसूं,
जपुनी जपुनी चालत असतां कितितरि वेळां पडत असूं,
आतां आम्ही चपळ जहालों पळतों वेगें हरण जसें
एकामागें एक धावतों रानीं पळती ससे तसे
खोखोचा आम्हि डाव मांडितों टाळी देतां सूं पळतों
धरावयाला गडीहि येतां निसटुनि बाणापरि जातों.
प्रौढपणीं तें आम्ही चालूं मंद मंद गंभीरपणें.

हत्ति चालतो डौलामध्यें तसें चालणें प्रौढजनें
वृद्धपणीं तें शक्ति चपलता जाइऊ अमुची ती सारी
काठी टेकित वांकत वांकत जाइऊ अमुची ती स्वारी ॥ १ ॥
( या पद्यांतील अर्थाप्रमाणें मुलांनीं कृति करावी व ओळी म्हणाव्या. )

---

## आगगाडी.

( भज गोविंदं भज गोपालं या चालीवर. )

आगगाडि ही तयार झाली
सुटण्याची ती वेळ जहाली
सों सों सों सों वाफ वाजते
रों रों रों रों इंजिन करितें ॥ १ ॥

घण घण घण घण घंटा होई
गार्ड आपुल्या डब्यांत जाई
झरझर अपुलें निशाण हलवी
जोरानें ती शिट्टि वाजवी ॥ २ ॥

ड्रायव्हर अपुलें चाक हलवितो
एंजिनवरुनि धूर सोडतो
स्टेशन सारें भरुनी जाई
झाली सारी एकचि घाई ॥ ३ ॥

जोराची ती शिट्टी होते
एंजिन भप् भप् भप् भप् करितें
गाडि पहा ही चालुं लागली
स्टेशन सोडुनि दूरहि गेली ॥ ४ ॥

---

## मनुताईची खोड मोडली !

( भज गोविंदं भज गोपालं या चालीवर )

उडत उडत ती चिमणी आली
विहिरीवरती मजेत बसली
मनी पाहुनी तिजला लपली
चटकन तिजवर झेप घातली ॥ १ ॥

चिमणी वरती उडुनी गेली
झाडावरतीं जाउनि बसली
उडी मनीची चुकली चुकली
मनुताई ती विहिरिंत पडली ॥ २ ॥

मिआव मिआव ती कशी ओरडे
पाण्यामध्यें फार धडपडे
नाकामध्यें पाणी जाई
बहु घाबरे ती मनुताई ॥ ३ ॥

चला चलारे शिंकें आणा
शिंक्यामध्यें पाटी घाला

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे

दोरी बांधुनियां शिक्याला
सोडा सोडा खालीं त्याला ॥ ४ ॥

झर झर झर झर शिंकें गेलें
पाण्यावरतीं पहा पोंचलें
पाटीमध्यें उडी मारली
मनुताई ती आंत बैसली ॥ ५ ॥

ओढा शिंकें वरतीं ओढा
मनुताईला वरतीं ओढा
पाटी आली पहा कशी ही
उडी मारती या मनुताई ॥ ६ ॥

तेथें मुळिं ना उभी राहिली
झटकन् तेथुनि पळुनी गेली
मनुताईचा खोड मोडली
पुन्हा कधीं ना तेथें आली. ॥ ७ ॥

---

# राजा उदयन किंवा वत्सराज.

लोके हारिच वत्सराजचरितम्.

रत्नावली.

ज्याप्रमाणें अर्वाचीन कालीं आज शेंकडों वर्षें राजा विक्रम ह्याची कीर्ति भरतखंडांत दुमदुमत आहे, त्याचप्रमाणें प्राचीन कालीं भारतवर्षांत वत्सदेशाचा राजा उदयन ह्याची कीर्ति गाजत होती. उदयन

ह्या वत्सराज या नांवानें प्रसिद्ध आहे. शेंकडों वर्षे वत्सराजाच्या अनेक कथा वृद्ध मंडळी मोठ्या प्रेमानें बालजनांस सांगत असत. अनेक कवींनीं वत्सराजाच्या चरित्रावर मनोरम नाटकें रचिलीं, व ह्या नाटकांनीं शेंकडों वर्षे भारतवर्षांतील लोकांचें मनोरंजन केलें. अनेक कादंबरीकारांनीं वत्सराजाच्या चरित्रावर मनोवेधक कादंबऱ्या लिहून वाचकांचीं मनें वेधून टाकिलीं. भरतखंडांच्या या आवडत्या प्राचीन राजाची कथा ह्या अंकांत देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

वत्सराज हा पांडवांचा वंशज होता. पांडव निजधामास गेल्यावर हस्तिनापूर येथील गादीवर अर्जुनाचा नातू व अभिमन्यूचा मुलगा परिक्षिति हा बसला. ह्यानंतर ५ राजांनीं हस्तिनापुरास राज्य केलें. ६ वा राजा निचक्षु ह्याच्या कारकिर्दींत यमुना नदीला महापूर येऊन हस्तिनापुराचा नाश झाला, तेव्हां त्यानें तें शहर सोडून देऊन खालीं यमुनेच्या कांठीं बऱ्याच अंतरावर असलेलें कौशांबी नांवाचें शहर आपली राजधानी केली. उदयन हा निचक्षुनंतर कौशांबीच्या गादीवर बसलेला ११ वा पुरुष होय. पांडवांच्या नंतर सुमारें चारशें वर्षांनीं उदयन राजा गादीवर आला असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रजावात्सल्य, सहृदयता, औदार्य, अनुजनांविषयीं प्रेम, सरल व निष्कपट वृत्ति, विद्यासक्ति व कलाभिरुचि इत्यादि गुणांमुळें वत्सराज तत्कालीन भारतवर्षीय लोकांचा अत्यंत आवडता होऊन बसला, व त्याची कीर्ति शेंकडों वर्षे मागें राहिली. उदयन हा शतानीक राजाचा एकुलताएक पुत्र होता. लहानपणापासून त्याला गायनवादनाचा फार नाद असे, व शिकारीची फार आसक्ति असे. रानटी हत्तीला पकडून त्याला माणसाळविण्यांत त्या कालीं त्याच्यासारखा, कुशल दुसरा कोणीही नव्हता. राजा शतानीक हा अकालींच मृत्यु पावल्यामुळें, बापाच्या हाताखालीं युवराज म्हणून काम करून जो अनुभव राजपुत्रास मिळावयास पाहिजे तो त्याला मिळाला

नाहीं. सुदैवानें वत्सराजाला राजकारणपटु व अत्यंत स्वामिभक्त असा यौगंधारायण हा प्रधान मिळाला होता, व त्याचा सेनापति रुमण्वान् हाही अत्यंत शूर, युद्धकलानिपुण व स्वामिकार्यतत्पर असा होता. राजाचा वासंतक नांवाचा विनोदी, चतुर व त्याजवर निस्सीम प्रेम करणारा मित्र होता. स्वामिभक्त व चतुर प्रधान, शूर व राजनिष्ठ सेनापति, विनोदी व प्रेमळ मित्र ह्या त्रयींचा लाभ झाल्यामुळें वत्सराजाचे दिवस आनंदांत जाऊं लागले. वत्सराजाला मृगयेचा फार नाद असे. स्वारी शिकारीस गुंतली कीं इतर कोणत्याही गोष्टींचें त्याला भान राहात नसे.

ह्यावेळीं भरतखंडांत उज्जनीचा राजा चंडमहासेन व मगधाचा राजा प्रद्योत हे फार प्रबळ राजे होते. पांडवांच्या काळापासून भरतखंडाची सार्वभौम सत्ता त्यांच्या वंशजांकडे अबाधित चालली होती. आपल्या राजानें त्याच्या पूर्वजांप्रमाणें दिग्विजय करून आपली सार्वभौम सत्ता स्थापन करावी अशी यौगंधरायण व रुमण्वान् ह्यांची उत्कट इच्छा होती; पण वत्सराजाचे दोन्हेही प्रतिस्पर्धी शूर व प्रबळ असल्यामुळें केवळ शस्त्राच्या जोरावर इष्ट हेतु साध्य होणें अशक्य होतें. राजा चंडमहासेन ह्याला वासवदत्ता नांवाची एक सुंदर, सुशील व विनयवती कन्या होती. ही आतां उपवर झाली होती व ती वत्सराजाला द्यावी, असा राजाचा हेतु होता. वत्सराजाला आपल्या ताब्यांत आणून नंतर त्याला आपली मुलगी द्यावी व अशा रितीनें आपलें वर्चस्व स्थापावें, अशी चंडमहासेनाची इच्छा होती.

वत्सराज हा शिकारीचा फार नादी आहे, हें त्याला माहीत होतें, म्हणून त्यानें एक युक्ति योजिली. त्याच्या राज्याची हद्द वत्सराजाच्या हद्दीला भिडली होती. ह्या हद्दीवर मोठें अरण्य होतें. या अरण्यांत चंडमहासेनानें मोठ्या चातुर्यानें केलेला एक लांकडी हत्ती सोडून दिला. जेव्हां वत्सराजाच्या शिकारी लोकांनीं ह्या रानटी व सुंदर हत्तीची

बातमी वत्सराजाला दिली, तेव्हां तो राजा कोणालाही न विचारतां एक दोन सेवक घेऊन तो हत्ती धरण्याकरितां रानांत गेला, व आपली सतार वाजवून त्या हत्तीला जवळ आणून धरण्याचा प्रयत्न त्यानें केला. ह्या हत्तींत लष्करी शिपाई लपवून बसविले होते, व त्याला वाटेल तिकडे चालविण्याची आंत योजना केलेली होती. वत्सराज जवळ येतांच तो हत्ती मागें मागें हटूं लागला. अशा रीतीनें बराच दूरवर एकट्या वत्सराजाला नेल्यानंतर आंत बसलेले सशस्त्र लोक बाहेर पडले, व त्यांनीं वत्सराजाला कैद करून उज्जनीला नेलें.

राजाला कैद केल्याची बातमी यौगंधरायण व रुमण्वान् यांना कळताच त्यांना फारच दुःख झालें, चंडमहासेन वत्सराजाच्या जिवास कांहीं अपाय करणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती. उज्जनीच्या राजाला बुद्धिसामर्थ्यानें जिंकून वासवदत्तेचें लग्न वत्सराजाशीं लावावें, व त्याची मदत मिळून वत्सराजानें दिग्विजय करावा अशी त्यांची इच्छा होती.

वत्सराजाला चंडमहासेनानें आपल्या वाड्याच्या जवळील एका वाड्यांत कैदेंत ठेविलें. वत्सराज हा गायन आणि वादन या दोन कलांत अत्यंत निपुण होता. वासवदत्तेनें वत्सराजाजवळून या दोन कला साध्य कराव्या अशी चंडमहासेनाची फार इच्छा होती. त्यानें वत्सराजाला हें शिकविण्याचें काम सांगितलें. पडद्याचे एका बाजूस वत्सराज बसत असे व दुसऱ्या बाजूस वासवदत्ता बसत असे व अध्यापनाचें काम चाले. गुरुशिष्यांना एकमेकांचे चेहरे व नांवें माहीत नव्हतीं. वासवदत्तेला तिच्या बापानें सांगितलें कीं, एक कुरूप व काळा गवयी तुला गायनवादन शिकवीत आहे. राजाला चंडमहासेनानें सांगितलें कीं, एक कुब्जा मुलगी गायन शिकत आहे. पण ही फसवणूक फार दिवस चालली नाहीं. एक दिवस गुरुशिष्यांच्या मधील पडदा एकदम तुट

त्यामुळें वासवदत्ता व वत्सराज यांना आपली फसवणूक कळून आली. लवकरच वत्सराजावर त्या राजकन्येचें प्रेम जडलें.

यौगंधरायण व राजाचा मित्र वासंतक हे वेश पालटून उज्जयिनी नगरींत आले व त्यांनीं आपला प्रवेश राजवाड्यांत करून घेतला. चंडमहासेनाची एक चपल अशी हत्तीण वाड्यांत बांधलेली असे. ती इतकी चपल असे कीं तिचा पाठलाग करणें शक्य नसे. वत्सराजानें वासवदत्तेचें मन वळविलें. एके दिवशीं यौगंधरायण व वासंतक यांनीं अमल येणारे पदार्थ मिश्र केलेली अशी मिठाई पहारेकऱ्यांस चारली. या हत्तिणीच्या माहुतालाही त्यांनीं बरीच मिठाई चारली. मध्यरात्रीच्या सुमारास वासवदत्तेनें महातास हत्तीण तयार करण्यास सांगितलें. महात अर्धवट शुद्धींत होता. त्यानें ती हत्तीण तयार केली. वत्सराज व वासवदत्ता हीं तिजवर बसून शहराच्या वेशींत आलीं. तेथें त्यांना पहारेकऱ्यानें आडविलें, तेव्हां वत्सराजानें खालीं उतरून आपल्या शस्त्रानें त्या पहारेकऱ्यास जखमीं केलें व दरवाजा उघडून हत्तीण बाहेर काढली. हत्तिणीचा माहुत आतां सावध झाला व त्यानें पुढें जाण्याचें नाकारलें; पण वत्सराजाच्या धमकीमुळें व वासवदत्तेच्या प्रेमामुळें त्यानें ती हत्तीण वत्सदेशाकडे नेली व ते सकाळीं वत्सदेशाच्या हद्दीवर येऊन पोहोंचले. तेथें सेनापति रुमण्वान् सैन्यासह ह्यांची वाट पाहात होता. वत्सराज गेल्याची बातमी चंडमहासेनाला लवकरच लागली. त्यानें त्याच्या पाठलागाकरितां घोडेस्वार धाडले, पण त्यांना वत्सराजाला गांठतां आलें नाहीं. आपला डाव फसला असें पाहून चंडमहासेनानें आपल्या पुत्राला कौशांबीस पाठविलें व आपण कन्येचया विवाहाकरितां निघत आहों असा निरोप धाडला. लवकरच वासवदत्ता व वत्सराज यांचें मोठ्या थाटानें लग्न झालें. कौशांबी नगरींत हा आनंदोत्सव फार दिवस चालला होता.

वासवदत्तेच्या प्रेमळ सहवासांत वत्सराजाचे दिवस आनंदांत जाऊं लागले. सरळ व निष्कपटवृत्ति, सौजन्य, प्रजावात्सल्य इत्यादि गुणांमुळें देवी वासवदत्ता ही प्रजाजनांला अत्यंत प्रिय झाली. आपलें राजकारण यशस्वी होऊन चंडमहासेन आपल्या पक्षाला आला हें पाहून यौगंधरायण व रुमण्वान् या उभयतां राजनिष्ठ मुत्सद्यांना फार समाधान वाटलें. आपल्या जांवयाला दिग्विजय करण्याचे कामीं आपल्या सैन्यासह चंडमहासेन मदत करील याविषयीं उभयतांची खात्री होती. आतां मगधाचा राजा प्रद्योत हा अत्यंत प्रबळ असा एकच प्रतिस्पर्धी होता. प्रद्योताला पद्मावती नांवाची एक कन्या होती. ती उपवर झाली होती. प्रद्योतानें वत्सराजाला ती मुलगी आनंदानें दिली असती, पण वासवदत्तेच्या लग्नामुळें ती गोष्ट आतां शक्य नव्हती. प्रद्योतासारखा मानी राजा आपली मुलगी सवतीवर देण्यास कधींही कबूल झाला नसता. प्रद्योताला आपल्या पक्षाला आणल्याशिवाय आपलें राजकारण साधावयाचें नाहीं अशी यौगंधरायणाची खात्री होती, म्हणूनच तें साधण्याकरितां त्यानें एक धाडसाची युक्ति योजिली. या कामीं वासवदत्तेचें साहाय्य पाहिजे होतें. पतीच्या प्रेमामुळें व आपल्या कुळाच्या अभिमानामुळें ती राजकन्या या योजनेंत सामील झाली व पतीकरितां दुःख व संकटें भोगण्यास तयार झाली.

वत्सदेश व मगध यांचे हद्दीवर लावाणक नांवाचें एक सुंदर वन होतें. या वनांत वत्सराज मधून मधून शिकारीस जात असे. यौगंधरायणानें वत्सराजाला शिकारीस या वनांत जाण्याची विनंती केली. प्रद्योतानें या बाजूला सैन्य गोळा करण्याची तयारी चालविली होती. शिकारीच्या निमित्तानें तिकडे जाऊन सरहद्दीची पहाणी करण्याचा राजानें व यौगंधरायणानें बेत केला. देवी वासवदत्ताही पतीबरोबर निघाली. लावाणकांत एक सुंदर वाडा होता, त्यांत वत्सराज जाऊन

राहिला. सेनापति व प्रधान हेही त्याजबरोबर गेले. सकाळीं शिकारीस जावें व संध्याकाळीं राजवाड्यांत परत यावें असा वत्सराजाचा क्रम सुरू झाला. एके दिवशीं दुपारीं एकाएकीं या राजवाड्याला आग लागली. वाडा लांकडी असल्यामुळें व वारा जोराचा वाहात असल्यामुळें ती आग राजसेवकांना विझवतां आली नाहीं. एका घटकेंत राजवाडा जळून खाक झाला. या सर्व गडबडींत वासवदत्ता कोठेंच दिसली नाहीं. वासवदत्ता अग्नींत दग्ध झाली ही गोष्ट राजसेवकांच्या लक्षांत येतांच जिकडे तिकडे हाहाःकार झाला. हताश होऊन सर्व लोक अश्रु गाळीत बसले. संध्याकाळीं वत्सराज परत आल्यावर ती गोष्ट त्याला कळली व त्याचा शोक अनिवार झाला. एक आठवडा तो कोणाशींच न बोलतां आपल्या शोकांत मग्न झाला. यावेळीं यौगंधरायण तेथें नव्हता. तो कांहीं महत्त्वाच्या कामाकरितां दूर गेला होता, तोही थोड्या दिवसांनीं परत आला. कांहीं दिवसांनीं वत्सराज राज्य-कारभारांत भाग घेऊं लागला, पण त्याची आनंदी वृत्ति पार मावळली. वाड्याला अग्निसात् करण्याची व वासवदत्तेला तेथून काढून नेण्याची युक्ति योगंधरायणाचीच होती. वासवदत्तेला त्यानें ब्राह्मणाच्या मुलीचा पोशाक दिला व वासंतकाला ब्राह्मणपुत्राचा वेश दिला व आपणही गरीब ब्राह्मणाचा पोशाक घेऊन यौगंधरायणाची स्वारी वाड्याला अग्नि लागला असतांना तेथून निघाली. यावेळीं मगधाचा राजा प्रद्योत हाही लावणकापासून जवळ असलेल्या एका नगरांत आपल्या कुटुंबासह राहिला होता. यौगंधरायण हा वासवदत्तेसह या नगरास गेला. त्यानें पद्मावतीची गांठ घेतली. आपण वृद्ध ब्राह्मण आहों, आपला थोरला मुलगा आपणाला एकाएकीं सोडून गेला. त्याचा शोध करण्याकरितां आपण सुनेसह निघालों आहों असें त्यानें सांगितलें. तो म्हणाला, ‘ राजकन्ये, तरुण मुलीला बरोबर घेऊन

फिरणें हें फार कष्टप्रद व धाडसाचें आहे. तुझ्या सहवासांत मी आपली सून व धाकटा वेडसर मुलगा ठेवणार आहें. मी एक महिन्याचे आंत त्यांना घेऊन जाईन. तूं हिला आपल्या बहिणीप्रमाणें वागव म्हणजे मी तुला आपला आशीर्वाद देईन. वासवदत्तेची तेजस्वी मुद्रा पाहतांच, तिची ती खिन्न व गंभीर चर्या दृष्टीस पडताच पद्मावतीचें मन मोहून गेलें व 'भगिनी, तूं खुशाल माझ्या संगतींत रहा; कांहीं काळजी करूं नको; ईश्वरकृपेनें तुझी व तुझ्या पतीची भेट लौकरच होईल' असें ती तिला म्हणाली. यौगंधरायण मोठ्या कष्टानें अश्रु गाळीत तेथून निघाला. आपण केलेल्या साहसाचा काय परिणाम होतो याची त्याला फार धास्ती वाटत होती.

वासवदत्ता अग्नींत जळाल्याची बातमी प्रद्योतास तेव्हांच कळली. आतां पद्मावतीला वत्सराजाला देण्यास कांहींच हरकत नव्हती. थोड्याच दिवसांत त्यानें आपला वकील यौगंधरायणाकडे धाडला. यौगंधरायणानें या गोष्टीला तेव्हांच कबुली दिली. वत्सराजाचें मन अत्यंत खिन्न झालें होतें. त्यानें कांहीं दिवसांनंतर यौगंधरायणाला तुम्हांला वाटेल तें करा, मला आयुष्यांत कांहींच सुख वाटेनासें झालें आहे, असें सांगितलें. लवकरच पद्मावतीच्या विवाहाच्या तयारीस प्रारंभ झाला. वत्सराज लावाणकांतून प्रद्योताचे नगरीस गेला.कोणत्याही तऱ्हेचा थाटमाट न करितां थोडक्यांत हा विवाहविधि पार पडावा अशी वत्सराजाची इच्छा होती, त्याप्रमाणें हा विधि झाला. वासवदत्तेच्या स्मरणानें वत्सराजाचे नयनांतून अश्रूंची सारखी धार लागली होती. पद्मावतीचा विवाहविधि संपल्यावर वत्सराज पद्मावतीसह परत लावणकास निघाला. पद्मावतीनें, वेश पालटून असलेल्या वासवदत्तेला व वासंतकाला बरोबर घेतलें. वासवदत्तेचा भाऊ गोपाल लावाणकांत आला होता. यौगंधरायणानें त्याला आपल्या कटांत घेतलें होतें. लावाणकांत आल्यावर संध्याकाळीं वासव-

दत्ता गोपलकाचे घरीं गेली. भावाला पाहतांच तिला दुःखाचा उमाळा आला व तीं बहिणभावंडें अश्रु गाळीत एकमेकाशीं न बोलतां स्तब्ध बसलीं; इतक्यांत यौगंधरायणही तेथें आला. त्यालाही तो देखावा पाहून अत्यंत वाईट वाटलें. त्यानें दोघांचें कसेंबसें शांतवन केलें. आपल्या बरोबरची ब्राह्मणकन्या वाड्यांतून निघून गोपालकाकडे गेली हें पद्मावतीला कळतांच तिला फार आश्चर्य वाटलें व घाबरून ती परिजनांसह गोपालकाचे वाड्यांत गेली. तेथील तो देखावा पाहून ती अगदीं आश्चर्यचकित झाली. यौगंधरायणानें तिला सर्व हकिगत सांगितली व आपणांस क्षमा करण्याविषयीं तिची विनंती केली. यौगंधरायणाची स्वामिनिष्ठा, वासवदत्तेनें आपल्या पतीकरितां केलेला स्वार्थत्याग, वासवदत्तेची निष्कपट व प्रेमळवृत्ति हीं पाहून पद्मावतीला फार आश्चर्य वाटलें. वासवदत्तेवर तिचें प्रेम जडलें होतें तिला ती अगदीं जीव कीं प्राण वाटत असे. ती म्हणाली, 'आर्य यौगंधरायण, आपण कांहीं काळजी करूं नका. देवी वासवदत्ता माझी वडील बहीण आहे. आम्ही दोघी अत्यंत प्रेमानें वागूं !' वासवदत्तेनें प्रेमानें पद्मावतीला आपल्या पोटाशीं धरिलें. गोपालक व प्रधान या दोघांनीं त्यांना आशीर्वाद दिले.

गोपालकाच्या वाड्यांत कांहीं गडबड आहे व पद्मावती तिकडे गेली आहे हें कळतांच वत्सराजही तिकडे गेला. वासवदत्ता व पद्मावती एकत्र उभ्या राहिलेल्या पाहून आपण स्वप्नांत आहों कीं जागे आहों अशी त्यास भ्रांति पडली. वासवदत्ता, यौगंधरायण, गोपालक यांची चमत्कारिक स्थिति झाली. काय बोलावें हें कोणासच कळेना. प्रत्येकाच्या डोळ्यांतून अश्रु गळत होते. अखेरीस यौगंधरायणानें आपलें मन स्थिर केलें व वत्सराजाला सर्व हकिकत कथन केली. देवी वासवदत्ता जळाली अशी खोटीच बातमी आपण उठविली, वासवदत्तेला

अज्ञातवासांत पद्मावतीच्या संगतींत ठेविलें वगैरे सर्व गोष्टी त्यानें वर्णन केल्या. या मार्गाशिवाय प्रद्योताचा स्नेह जुळणें शक्य नव्हतें ही गोष्ट राजास स्पष्ट करून त्यानें सांगितली. सर्वांना फसविण्यास आपण कारण झालों, पण यांत महाराजांच्या कल्याणाशिवाय आपला हेतु नव्हता. नंतर त्यानें शुचिर्भूत होऊन पूर्वदिशेकडे तोंड करून देवतांची प्रार्थना केली व तो देवतांना उद्देशून म्हणाला " हा सर्व खटाटोप करण्यांत माझा हेतु अत्यंत शुद्ध होता व अज्ञातवासांत देवी वासवदत्ता ही अत्यंत शुद्ध व पवित्र होती ह्याजबद्दल तुम्ही साक्षी आहां. ही गोष्ट तुम्ही एथें जमलेल्या या सर्व जनांस विदित करा. नाहींतर मी प्रायोपवेशन करून देहत्याग करीन.' असें बोलून तो स्तब्ध बसला. तेव्हां आकाशांत देववाणी झाली. ' हे वत्सराजा, तुला पूर्वपुण्येंकरून यौगंधरायणासारखा प्रधान व वासवदत्तेसारखी पत्नी मिळाली आहे. हीं दोघेंहि अत्यंत पवित्र व शुद्ध आहेत अशी आम्ही तुझी खात्री करतों.' ही स्वर्गवाणी ऐकतांच सर्वांनाच फार आनंद झाला.

वासवदत्ता व पद्मावती या दोघी भगिनीप्रमाणें वागूं लागल्या. वासवदत्ता जिवंत आहे व यौगंधरायणानें आपणांत फसविलें हें पद्मावतीच्या बापास कळतांच त्याला फार राग आला, व त्यानें पद्मावतीस निरोप धाडला, 'बाळे, तुला आम्हीं सवतीवर दिलें, याबद्दल आम्हांस फार वाईट वाटतें; पण आतां गतगोष्टीचा आम्हांला फार पश्चात्ताप झाला आहे.' यावर पद्मावतीनें बापास निरोप धाडला कीं, 'बाबा, मी अत्यंत सुखांत आहें. देवी वासवदत्ता मजवर धाकट्या भगिनीप्रमाणें प्रेम करिते. तेव्हां आपण मजसंबंधानें कांहीं काळजी करूं नका. आर्यपुत्रावर व वासवदत्तेवरही आपलें मजवर जसें प्रेम आहे तसेंच असावें,' हा निरोप ऐकून प्रद्योताचा राग नाहींसा झाला.

यानंतर यौगंधरायण व रुमण्वान् यांनीं सैन्याची तयारी केली. प्रद्योत व चंडमहासेन यांच्या मदतीनें वत्सराजानें उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम या दिशाना दिग्विजय केला. उत्तर–हिंदुस्थानांतील सर्व राजेलोकांनीं त्याचें सार्वभौमत्व कबूल केलें. नंतर वत्सराजानें मोठ्या थाटानें राजसूय यज्ञ केला.

यानंतर राजानें आपला काळ प्रजेच्या कल्याणार्थ सुखसोयींचीं साधनें करण्यांत घालविला. तो आपल्या प्रजाजनापैकीं कोणालाही भेटण्यास व त्याचें म्हणणें ऐकून घेण्यास नेहमीं तयार असे. त्याच्या दरबारीं विद्वान् लोकांस व कलाभिज्ञ लोकांस फार मान असे. तो विद्वानांचा पक्षपाती व पोशिंदा असे. त्यानें बागबगीचे, मोठमोठ्या इमारती बांधून नगरीस शोभा आणली. त्याच्या कारकीर्दींत कौशंबी नगर हे विद्येचें आगर, कलांचें माहेरघर व शास्त्रांचें विलासमंदिर झालें.

वत्सराजाचे दिवस देवी वासवदत्ता व पद्मावती यांच्या सहवासांत आनंदांत गेले. राजनिष्ठ व राजकार्यधुरंधर असा प्रधान, शूर, साहसी व स्वामिनिष्ठ असा सेनापति, राजावर अनुरक्त असलेलें मंत्रिमंडळ, निरतिशय प्रेम करणारे प्रजाजन इतक्यां सगळ्यांची अनुकूलता असल्यावर सुखांत कमी तें काय असणार ? जसजसा काल जाऊं लागला तसतशी पुत्र नसल्यामुळें आपल्या राज्याची काय अवस्था होईल याची काळजी वत्सराजाला वाटूं लागली. शेवटीं त्यानें पुत्रप्राप्त्यर्थ शंकराची आराधना केली व परमेश्वरकृपेनें त्याला वासवदत्तेच्या पोटीं पुत्ररत्न झालें. त्याचें नांव नरवाहनदत्त असें ठेविलें. मुलगा ७।८ वर्षांचा झाल्यावर राजानें त्याच्या शिक्षणाकरिता एका विद्वान् गुरूची योजना केली. त्याच्याच वयाचे असणारे सरदारांचे पुत्र त्याचेबरोबर शिक्षणाकरितां ठेविले. या मुलांकरितां एक सुंदर गृह गांवाबाहेरील बागेंत

बांधिलें. तेथें या मुलांना ठेविलें व मुख्य गुरूच्या हाताखालीं आपल्या विषयांत निष्णात असलेल्या उपगुरूंचीही मुलांना शिकविण्याकरितां योजना केली. या स्थलीं १२ वर्षें अध्ययन केल्यावर राजपुत्र अनेक कलांत व शास्त्रांत निपुण झाला. नंतर राजपुत्राला युवराजांचा राज्याभिषेक केला. त्यानें हळूहळू राजकारणाचा अभ्यास केला व तो आपल्या बापाला राज्यकारभारांत मदत करूं लागला. नंतर त्यानें आपल्या सैन्याच्या मदतीनें उत्तरेकडील देश जिंकण्यास आरंभ केला. बापानें न जिंकलेला हिमालयाच्या आसपासचा प्रदेश त्यानें जिंकला व तिकडील बराच मुलुख आपल्या राज्यांत सामील केला. अशा रीतीनें तो विद्याधरांचा चक्रवर्ती राजा झाला. आपला मुलगा राज्यकारभार करण्यास समर्थ झाला आहे असें पाहून वत्सराज, देवी वासवदत्ता, यौगंधरायण, रुमण्वान्, वासवदत्तेचा भाऊ गोपालक हे कालिंजर पर्वतावर वानप्रस्थाश्रम स्वीकारण्यास निघून गेले व तेथें त्यांनीं देहाचें सार्थक्य केलें. वडील मंडळी वनांत गेल्याचें नरवाहनदत्ताला हिमालय पर्वताजवळ असतांना समजलें. पहिल्यानें त्याला या वार्तेनें अत्यंत शोक झाला, जग उदासीन भासूं लागलें, व राज्यकारभारांतही चित्त लागेना. पण कांहीं दिवसांनीं त्यानें आपल्या मनाचें समाधान केलें व अफाट राज्याचा कारभार व्यवस्थितपणें व शहाणपणानें चालविला.

# दुःखाचा शोध.

लेखकः—नरसिंह महादेव मातखंडे, शिक्षक गोरेगांव ( कुलाबा. )

इंद्रवज्रा वृत्तः—

वंदूनि भावें गुरुच्या पदांतें ॥
जें वारितें सर्वहि आपदांतें ॥
जिज्ञासु बोले सुखलक्षणातें ॥
सांगा निवारा मम संशयातें ॥ १ ॥

संसारिं या कोण सुखी म्हणावा ॥
दुःखी तसा कोण जगीं गणावा ॥
हे गूढ मातें समजे न कांहीं ॥
झालों पदीं लीन म्हणोनि पाहीं ॥ २ ॥

बोले गुरू शिष्यवरा कुणीही ॥
जाणे सुखी या जगतांत नाहीं ॥
चित्तीं समाधान तयास सौख्य ॥
यावीण तें सर्वहि जाण दुःख ॥ ३ ॥

पूर्णत्व नाहींच कुठेंहि लोकीं ॥
दुःखी सुखी वास्तव भेद लोकीं ॥
ती खाण जाणे सगळ्या सुखाची ॥
जाणीव जेथें न सुखासुखांची ॥ ४ ॥

एकाहूनी एक सुखी जगांत ॥
दुःखी तसे, हें वदती समस्त ॥
या भाषणें सूचविती तुला ते ॥
जें न्यून तें दुःखद कीं जनातें ॥ ५ ॥

लक्ष्मी कृपा ज्यावरि पूर्ण झाली ॥
दैवें सुरूपा ललना मिळाली ॥
जाली अपुत्रत्व परी तयातें ॥
जें न्यून तें दुःख गमे नरातें ॥ ६ ॥

" आणा " जनीं, कीं असतील बाळ ॥
संसारिं ते फेडिति दुष्ट काळ ॥
त्यांतें जरी अन्न न खावयातें ॥
जें न्यून तें दुःखद कीं जनातें ॥ ७ ॥

लाधे जरी संतति संपदा ही ॥
आरोग्य तैसोंचि असोनि देहीं ॥
लोकीं जरी मान मिळे न त्यातें ॥
जें न्यून तें दुःख० ॥ ८ ॥

कोणी वदे सर्व मनासमान ॥
आहे परी एक उणीव जाण ॥
शक्ती नसे कार्य करावयातें ॥
जें न्यून तें दुःख० ॥ ९ ॥

कोणी बली पुष्टही चारुगात्र ॥
भीमासवेंही लढण्यास पात्र ॥
मूर्खत्व वाटे शलतुल्य त्यातें ॥
जें न्यून तें दुःख० ॥ १० ॥

निःसार संसार विवाहितातें ॥
वाटे सुखाचा अविवाहितातें ॥
मृत्यू बरा वाटत रोगियातें ॥
जें न्यून तें दुःखद कीं जनातें ॥ ११ ॥

तो रोकडा दाम मिळे तुम्हांतें ॥
स्वप्नींहि जो ठाउक ना अम्हांतें ॥
शेती वदे यापरि नोकरातें ॥
जें न्यून तें दुःख० ॥ १२ ॥

स्वातंत्र्य कोठें तव भाग्यवंता ! ॥
विक्रीत देहा न मिळेचि ताता ॥
बोले असे नोकरही तयातें ॥
जें न्यून तें दुःख० ॥ १३ ॥

एकें वदावें तुम्हि वा सुखांत ॥
दूजा वदे कीं तुम्हि वा सुखांत ॥
दोघे परी अंतरले सुखातें ॥
जें न्यून तें दुःख० ॥ १४ ॥

दावी कुणी लेखनपाटवातें ॥
कोणी प्रसंगोचित भाषणातें ॥
बोले तिजा कां नच येत मातें ॥
जें न्यून तें दुःखद० ॥ १५ ॥

न्यूनत्व सर्वत्र असे जगांत ॥
दुःखी म्हणोनीच समग्र त्यांत ॥
जेथें नसे दुःख कदापि ठावें ॥
त्या ईशतत्त्वा हृदयीं स्मरावें ॥ १६ ॥

घेईल जो प्रत्यय, दुःखमुक्त ॥
होईल तो ईशपदानुरक्त ॥
सामर्थ्य ये उद्धरण्या जनातें ॥
वंदी कवी हा नरसिंह त्यातें ॥ १७ ॥

---

# इ. स. १७६३ सालांतील महाराष्ट्रावरील आपत्ति.

इ. स. १७६१ सालीं पानिपतची लढाई झाली व त्यानंतर थोड्याच दिवसांनीं नानासाहेब पेशवा या लढाईच्या धक्क्यानें मरण पावला. पानिपतची लढाई ही राष्ट्रीय आपत्ति होती. राष्ट्रीय आपत्तीच्या व राष्ट्रीय संकटाचे वेळीं राष्ट्रांतील लोक आपले सर्व भेदभाव विसरून एक अंतःकरणानें राष्ट्राच्या बचावाकरितां तनमनधन अर्पण करितात ही गोष्ट अनेक देशांच्या इतिहासांत दिसून येईल. पण

महाराष्ट्रांत मात्र याच्या अगदीं उलट स्थिति झाली. यावेळीं महाराष्ट्रांतील लोकांच्या आंगचे दोन दुर्गुण--स्वदेशाभिमानाचा अभाव व स्वार्थवृत्ति–हे विशेषेंकरून दृष्टोत्पत्तीस आले. स्वार्थाकरितां अनेक प्रकारच्या खटपटी यावेळच्या मुत्सद्द्यांनीं व सरदारानीं केल्या व राष्ट्राला अधिक संकटांत ढकललें. यावेळच्या भानगडींचा इतिहास फार बोधप्रद आहे. थोरल्या माधवरावासारख्या उदार अंतःकरणाच्या थोर पुरुषाला मुत्सद्यांच्या व सरदारांच्या बालिश लीलामुळें अत्यंत मानसिक व शारीरिक ताप झाला व त्याचा उत्कृष्ट असलेली शरीरसंपत्ति ढासळली व अखेरीस त्यास अकालींच मृत्यूनें गांठिलें. प्रख्यात इतिहासकार रा. सरदेसाई यांनीं नुक्त्याच प्रसिद्ध केलेल्या मराठी रियासतीच्या मध्यविभागाच्या ४ थ्या पुस्तकांत यावेळच्या स्थितीचें सुंदर वर्णन केलें आहे. त्याचेच आधारानें हा लेख लिहिला आहे.

माधवराव व रघुनाथराव यांची लढाई सन १७६३ सालीं झाली. यादवी करण्यांत अर्थ नाहीं असा विचार करून माधवराव दादासाहेबाचे स्वाधीन झाला व दादासाहेब कारभार करूं लागले. दादा व माधवराव एक झाल्यावर राज्यव्यवस्था उत्तम प्रकारें चालावयास पाहिजे होती. पण सरदारमंडळींत कर्तव्यनिष्ठा बिलकूल नव्हती, सत्याची मातबरी नव्हती, व स्वदेशाची व स्वधर्माची विशेषशी पर्वा नव्हती.

यावेळीं माधवराव स्वस्थ होता. दादासाहेब सर्व कारभार चालवीत होते. दादांचे हातून राज्यकारभार चांगला चालणार नाहीं असें कांहीं जणांस वाटत होतें. माधवरावास ज्यांनीं मदत केली व ज्यांचा ओढा माधवरावाकडे होता, त्यांची खोड मोडण्याचा दादासाहेबानीं निश्चय केला. त्रिंबकराव पेठे व पटवर्धन मंडळी यांजवर दादासाहेबांचा विशेष रोष होता. प्रतिनिधिही दादांचे विरुद्ध होते. या सर्वांची खोड मोड-

ण्याकरिता दादानें निजामाची मदत मागितली. स्वजनाची खोड मोडण्याकरितां व त्यांचा नाश करण्याकरितां निजामासारख्या परक्या शत्रूची मदत मागावी यांतच त्या वेळच्या स्वदेशाभिमान-शून्यतेचें उत्कृष्ट उदाहरण दिसून येतें. उदगीरच्या लढाईंत झालेल्या अपमानाची फेड निजामास करावयाची होती. दादाच्या विनंतीस तो आनंदानें कबूल झाला, दादाच्या विरुद्ध बाजूसही त्यानें तुमच्या मदतीस येतों म्हणून सांगितलें. याचवेळीं भोंसल्यानें निजामाशीं स्नेह केला व आपण दोघे मिळून सातारा काबीज करूं. असें त्यानें त्यास सांगितलें. मराठ्यांचें राज्य बुडवूं व खालसा केलेल्या मुलखापैकीं शेंकडा ६० मुलूख निजामानें घ्यावा व शेंकडा ४० भोंसल्यानें घ्यावा असें दोघांच्या मतें ठरलें. या कटांत प्रतिनिधिही सामील झाला. मिरजेचे गोपाळराव पटवर्धन निजामास जाऊन मिळाले. सखाराम बापु मुख्य कारभारी होते, पण बापूंची सर्व बुद्धिमत्ता स्वार्थाकरितां डावपेच खेळण्यांत होती. जेणेंकरून आपलें महत्त्व वाढेल ती गोष्ट त्याना पाहिजे होती, मग त्या गोष्टीच्या योगानें देशाची हानि झाली, तरी त्यांना त्याची पर्वा नव्हती. निजाम पुणें व सातारा यांजवर रोख धरून आला. निजामाची फौज भारी होती. रघुनाथराव व माधवराव एक झाले होते, तरी रघुनाथरावांचें चित्त स्थिर नव्हतें. होळकर याच वेळीं रुसून वाफगांव मुक्कामीं बसले होते. कोणता सरदार निजामास फितुर झाला आहे व कोणता झाला नाहीं हें सांगणें कठीण होतें. अशा संकटाच्या प्रसंगीं तरुण पेशवा मात्र डगमगला नाहीं. निजामाचे जवळ तोफखाना जबर होता व त्याचें सैन्यही पेशव्याचे सैन्यापेक्षां जास्त होतें. यावेळीं साडेतीन शहाण्यांतील एक शहाणा विठ्ठल सुंदर हा त्याचा दिवाण होता. त्यानेंच आपल्या मसलतीनें मराठेसरदारात फूट माजविली होती. समोरासमोर लढून निजामाचा पराभव करणें शक्य नव्हतें

म्हणून माधवरावानें गनिमी काव्यानें लढण्याचा निश्चय केला. त्यानें आपलें सैन्य त्वरेनें दक्षिणेकडे नेलें व निजामाचे औरंगाबाद परगण्यावर हल्ला केला. त्यानें मल्हारराव व त्याचा दिवाण यांची समजूत केली; व मग मल्हारराव आपल्या सैन्यासह माधवरावास मिळाला. इकडे निजामानें आपलें सैन्य अहमदनगरनजीक आणिलें व पुण्यावर स्वारी करूं, नाहींतर भरपूर खंडणी द्या अशी त्यानें गोपिकाबाईस धमकी दिली.

पुण्यास गोपिकाबाई यावेळीं मोठ्या दक्षतेनें राज्यकारभार पाहात होती. सखाराम बापू व त्यांच्यासारखी इतर मुत्सद्दी मंडळी याची कुटिलनीति ती पूर्णपणें ओळखून होती. बापूवर तिचा यत्किंचितही विश्वास नव्हता. या आणीबाणीच्या वेळीं ती मोठ्या धैर्यानें व सावधगिरीनें वागली. ' तुमचे वैरी तिकडेच गेले आहेत त्यांकडे काय असेल तें पाहून घेणें. आम्हांस खंडणी द्यावयास गांठ पडत नाहीं. पुण्याचे काय करणार तें सुखरूप करणें. ' याच वेळेस नारायणरावाचें लग्न पुण्यास करावयाचें ठरलें होतें. गोपिकाबाईनीं पेशव्यांचे जे सरदार निजामाकडे गेले होते, त्यांची पुणें शहराची नासधूस न करण्याबद्दल अत्यंत दीनतेनें प्राथना केली. नारायणरावाचें लग्न होईतोंपर्यंत तरी निदान पुणें शहराला धक्का लावूं नका अशी अखेरची तिनें प्रार्थना केली. परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जानोजी भोंसले पुण्यावर चालून आला व विनायकदास नावाचा निजामाचा सरदार नाशिक त्र्यंबक लुटून चिंचवडला आला व चिंचवडचे देवांपासून देऊळ शाबूत राखण्याकरतां पंधरा हजार रुपये खंडणी त्यानें घेतली. त्यावेळच्या हिंदू मुत्सद्यांचा व सरदारांचा धर्माभिमान फार उत्कट होता! जानोजी भोंसल्यानें नगरहून पुण्यावर चालून येताना शेंकडों गांवांची नासधूस व जाळपोळ केली. भोंसल्याचें लष्कर व निजामाचें

लष्कर पुण्यावर चालून येताच शहराची अत्यंत दैना उडाली. या लष्करात पेशव्याचें अन्न खाऊन वाढलेले व त्याच्याशीं कृतघ्न झालेले असे अनेक सरदार होते. गोपिकाबाई आपल्या घरांतील पोरीबाळींसह व नारायणरावासह सिंहगडास गेली. लग्नमुहूर्त न चुकावा म्हणून सिंहगडावर नारायणरावाचें लग्न घाईघाईनें उरकण्यांत आलें. जानोजी भोसल्यानें पुण्यास जाऊन अनर्थ केला, त्याचें वर्णन तत्कालीन पुढील पत्रांत चांगलें वर्णन केलें आहे.

'पुण्याअलीकडलि दहा पांच गांवचीं घरें वांचलीं होतीं तीं काल जळालीं. आज पुण्यांत उपद्रव झाला. तोफखान्यांत माणसें जाऊन खणून सापडेल ते घेऊन गेले. रुपये कबूल करून शेवटीं गांवची अब्रू राहिली नाहीं. पर्वतीच्या सर्व मूर्ति फोडल्या. जुन्नर, पुणें, लोहगड, सिंहगड, पुरंदर, राजमाची इतक्यांवर सेनासमुद्र लोटला. महिना अव्यग्र लुटतात, जाळतात. आतां तरी उठोन जाण्याविषयीं लिहावें. सिंहगडचा, माची सरकारचा जामदारखाना भोसल्यानें, रघूजी करांडच्यानें लुटून नेला. माणस बेजाब मारिलें. चार हजारांचा लोट एकदांच आला. पुण्यात लूट होतच आहे. एक देव लहान मोठा राहिला नाहीं. सरकारचा वाडा मात्र बचावला. धर्मशाळा सर्व जाळल्या. भोंवत्या फौजा उतरून लुटून फस्त केलें. जाळणें, पोळणें तों सीमाच नाहीं. आपण गोपाळरावाचा भरंवसा मानून लिहिलें असून आम्ही दिलाईनें राहिलों. सर्वनाश झाला. तुमचा तरी उपाय काय ? लोहगडचे माचीस पुण्याचे लोक वित्तविषय घेऊन राहिले होते त्यांस देखील लुटोन फस्त केलें. नानाफडणसि वगैरे एक वस्त्रानिशीं गडावर गेले. विठ्ठल सुंदर तोफासहित सासवडच्या रोंखा येऊन राहिले आहेत. पुरंदरपासून शिरवळपर्यंत गमांजींनीं लुटून सतत्रुषीस गेले. गोरगरिबें फार बुडालीं. गोपाळरावानें आपली शिकस्त केली, पण उपयोग झाला नाहीं. औशाकडे विठ्ठल सुंदराचें गांव होतें

तें पेशव्यानीं जाळिलें, म्हणून सखारामबापूचें गांव सासवडनजीकचें विठ्ठल सुंदरानें जाळिलें. हिवरें येथील वाडे व घरें जाळून अग्नि संतुष्ट केला. मोंगलाचे मनांत नीरथडी व भिवरेच्यामध्यें आठ पंधरा दिवस करमावें असें आहे. गमाजीबाबांनीं शिरवळ रोहिआपावेतों मुलुख लुटला. पुण्यांत श्रीमंतांच्या हवेलीखेरीज बाकी कांहीं राहिलें नाहीं. देशांत घोर अनर्थ झाला. कित्येक स्त्रियांच्या इज्जती घेतल्या. अतिशय गलबल झाली आहे '।

या सर्व अनर्थाचें मूळ स्वार्थी मुत्सद्यांच्या शहाणपणांत आहे ही गोष्ट माधवराव जाणून होता. या अनर्थास सखारामबापूचे उद्योग बरेच कारणीभूत झाले होते. निजाम महाराष्ट्रांत येऊन बेचिराख करील अशी कल्पना बापूस नव्हती. दोन पक्षांची झुंज लावून आपलें महत्त्व वाढवावें हीच त्याची इच्छा होती. निजामानें बापूचेंही गांव जाळलें हें पाहून बापू सावध झाला व केलेल्या चुकीचें परिमार्जन करण्याचा उपाय त्यानें आरंभिला. माधवरावाचें प्रेम संपादण्यास याशिवाय दुसरा उपाय नव्हता. बापूनें जानोजीराव भोंसल्यास निजामापासून फोडण्याचा व्यूह रचला व हळूहळू त्यांत त्याला यशही आलें. माधवरावानें महादजी शिंद्याला दक्षिणेंत बोलाविलें व वऱ्हाडवर स्वारी करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें महादजीनें तयारीही केली. महाराष्ट्रांतलि जाळपोळ, लूट, लोकांची दैना पाहून मल्हारराव होळकर, गायकवाड, विठ्ठल शिवदेव वगैरे मंडळी एकजुटीनें निजामाचा मोड करण्याच्या प्रयत्नास लागली. या सर्व भिन्न स्वभावांना एकत्र करण्याचें सामर्थ्य माधवरावांत होतें. निजामाशीं उघड उघड युद्ध करणें कठीण होतें; म्हणून मराठ्यांनीं झपाट्यानें निजामाचे राज्यांत शिरून खंडणी वसूल करण्यास प्रारंभ केला. लवकरच मराठे हैदराबादेला जाणार म्हणून बातमी पसरली.

त्यामुळें निजामाच्या मनाची चलबिचल झाली. आपल्या ताब्यांत महाराष्ट्र येईल व जानोजी आणि आपण महाराष्ट्राची वांटणी करूं असें त्याला वाटत होतें, पण तसें होण्याचा संभव दिवसानुदिवस कमी होऊं लागला. जानोजी भोंसल्यालाही लढाईचा कंटाळा आला. महादजी शिंदे वऱ्हाडवर स्वारी करील अशी त्यास धास्ती वाटूं लागली. माधवरावाचें सैन्य दिवसानुदिवस जास्त वाढूं लागलें. पर्जन्यकाळ समीप येऊन ठेपला. लवकरच पर्जन्यास सुरुवात झाली. नद्या, नाले दुथडी भरून वाहूं लागले. निजाम व भोंसले यांचीं अंतःकरणें परस्परांविषयीं शुद्ध राहिलीं नाहींत. प्रतिनिधि वगैरे जे सरदार देशद्रोह व धर्मद्रोह करून आले ते आपला विश्वासघात करण्यास मागें पुढें पाहाणार नाहींत अशी भीति निजामाला वाटूं लागली. मराठ्यांचें सैन्यही त्याच्या सैन्याशीं लगट करूं लागलें. तेव्हां निजामानें गोदावरी नदी उतरून परत हैदराबादेस जाण्याचा निश्चय केला. त्याबरोबर प्रतिनिधि व भोंसले यांनीं त्यास सोडलें व त्याजपासून बारा कोस अंतरावर तळ दिला. यावेळीं निजामाचा तळ राक्षसभुवन येथें होता. आषाढाचे अमावास्येला गोदावरी उतरून पलीकडे जाण्याचा त्यानें बेत केला. मराठ्यांचा मुक्काम त्याजपासून बारा कोसांवर होता. रात्रीं निजामाचें अर्धें सैन्य व जनानखाना नावांतून नदी उतरून पार गेलीं. स्वतां नबाबही पलीकडे गेला. माधवरावाला ही बातमी कळतांच त्यानें ह्या संधीचा फायदा घेण्याचा निश्चय केला. मराठ्यांचें सैन्य लांब मजल मारून नुकतेंच विश्रांति घेत होतें. पण तें त्वरेनें निघालें व नबाबाचे सैन्यास सकाळींच गाठलें. या ठिकाणीं चार पांच तास हातघाईची लढाई झाली. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर हा सैन्याचा मुख्य होता. निजामाचें सैन्यही फार शौर्यानें लढलें. विठ्ठल सुंदर, त्याचा भाऊ व पुतणे या लढाईत ठार झाले. निजामाचे पांच सहा मोठमोठे सरदार मारले गेले. यामुळें सैन्याचा धीर

सुटला व तें सैरावैरा पळूं लागलें. मराठ्यांनीं विठ्ठल सुंदरचें शार भाल्याला अडकावून तें सैन्यांत फिरविलें. नदीला पूर असल्यामुळें व निजामानें नावा बुडविल्यामुळें मराठ्यांना निजामाचा पाठलाग करतां आला नाहीं. लवकरच निजामानें माधवरावाशीं तह केला. राक्षस-भुवनाच्या लढाईची बातमी ऐकतांच महाराष्ट्रांत जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. महाराष्ट्राची साडेसाती संपून सुखाचे दिवस आले असें प्रत्येकास वाटूं लागलें. देशद्रोही, धर्मद्रोही, स्वार्थी मुत्सद्दी मंडळी पुन्हा माधवरावाला येऊन मिळाली. पण या तरुण व तेजस्वी पेशव्यापुढें आपल्या लीला चालणार नाहींत ही त्यांची खात्री झाली.

पानिपतनंतरचा दोन वर्षांचा महाराष्ट्राचा इतिहास वाचला कीं मराठेशाही कां बुडाली याचीं कारणें वाचकांस स्पष्टपणें दिसतात. सखाराम बापू, दादा, यांनीं निजामास बोलवावें, रामचंद्रपंत जाधव, विनायकदास यासारख्या मराठे व ब्राम्हणांनीं देवळें लुटावीं व क्षेत्रास उपद्रव द्यावा, होळकरांनीं संकटकाळीं रुसून बसावें, गोपिकाबाईला स्वतांच्या बचावाकरितां देशद्रोही व स्वामिद्रोही सरदारांचीं आर्जवें करावयास लागावीं, मराठ्यांच्या लष्करानेंही आपलेंच गांव लुटावें इत्यादि गोष्टी वाचल्या असतां मन उद्विग्न होतें व महाराष्ट्रांत देशाभिमानाचा किती अभाव होता याची जाणीव होते.

---

# कल्याणची लूट

( लेखकः—काशीनाथ परशुराम साने, शिक्षक घोडें नं. १ )

( इ. स. १६४८ मध्यें शिवाजीचा सरदार अबाजी सोनदेव यानें कल्याण प्रांत तेथचा सुभेदार मुल्ला अहमद नटिया याजपासून काबीज करून घेतला. त्यावेळीं त्या सुभेदाराची रूपवती सून आबाजीपंत यांच्या हातीं सांपडली. ती त्यांनीं शिवाजी महाराजांस नजर म्हणून त्यांजकडे दरबारांत पाठविली, त्यावेळीं महाराजांनीं या कृत्याबद्दल आबाजीपंत यांस दोष देऊन त्या यवन-स्नुषेची तिच्या व आपल्या ऐश्वर्यास साजेशी पाठवणी केली. या प्रसंगावरून महाराजाची असामान्य नीतिमत्ता दिसून येते. ]

( चाल–अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला ).

हीं काय तुम्ही लूट आबाजी आणिली
दर्शनें सभा ही दिपली ॥ ध्रु० ॥
नवभांडारें जरि कुबेर–संपत्ति
परि खास तुच्छ हिजपुढती ॥
तो कुबेर ब्रम्हा यांची ।
चालली काय दोघांची ।
जणु तुलना संपत्तीची ।
नवभांडारें ठरलि अल्प मोलानें
ह्या एक युवतिरत्नानें ॥ १ ॥

कां लक्ष्मी ही अवतरली कल्याणा ?
जी यवनराष्ट्र[3] कल्याणा ॥
ही सौंदर्यें बहु नटली ।
कृति[4] यवनकुलीं या झाली ।
कल्याणपुरासी आली ।

१ तरुणी रत्न. २ कल्याण शहरास. ३ मुसलमानी राज्याच्या कल्याणासाठीं. ४ धन्य.

ह्या यवनकुलीं रूपवती ही असली ।
चमकते जणू कीं विजली[1] ॥ २ ॥

किति सुंदर हें रत्न जननिच्या पोटीं
निर्मियलें विधिनें[2] जगतीं ॥
कन्यका जनक-जननींची ।
ही स्नुषा असे यवनाची ।
वा भार्या निजभर्त्याची ।
परि लूट नसे, नसेचि ! ही जेत्याची[3]
ही गोष्ट धर्मनीतीची ॥ ३ ॥

जित[4] राष्ट्रांचे वृद्ध, बाल वा अबला
रक्षिणें योग्य जेत्याला ॥
धर्मनीति साधी असली ।
कां आपणांला नच दिसली ?
निजबुद्धि कशी बावरली ! ।
नयनीतीनें[5] राज्यधुरा राष्ट्राची
चिर टिकेल स्वातंत्र्याची ॥ ४ ॥

चिर वास असे जेथ न्यायनीतीचा
रक्षक तो ईश तयांचा ॥
ही महाराष्ट्रभू आमुची ।
माउली[6] न्यायनीतीची ।
जननी ही पावित्र्याची ।
हिज डाग असा, हिच्याच कां पुत्रांनीं
लावावा दुष्कृत्यांनीं ? ॥ ५ ॥

निजब्रीदाची स्मृति द्यावी हृदयाला
योग्य मार्ग वागायाला ॥
किति कठिण समय जरि आला
कां डोंगर तो कोसळला ।
प्रत्यक्ष काळही वळला ।

---

१ वीज. २ ब्रह्मदेवानें. ३ जिंकणाऱ्याची. ४ जिंकलेलें. ५ न्याय व नीति ह्यांनीं
६ आई.

ता.........

आम्ही पालन तें करूं नीतिनियमांचें
सुत महाराष्ट्र[1]भूमीचे ॥ ६ ॥

अभिलाष जयें परदारेचा[2] केला
तो सत्यचि नरका[3] गेला ॥
नृप बलाढ्य रावण झाला ।
अभिलाष सितेचा केला ।
परि नाश तयाचा झाला ।
मग काय कथा ! इतर जनाची जगतीं
तो असो रंक[4] वा नृपति ॥ ७ ॥

निजकर्तव्या नित जागृत असण्याचा
बाणा[5] हा योग्यचि तुमचा
कल्याणपुरी ती लुटिली ।
खुबसुरत[6] यवनि ही असली ।
देणगी आम्हांला आणिली ।
परि जैशी कां मम भगिनी ती मजला
तैशीच पूज्य ही अबला ॥ ८ ॥

हिज पाहुनिया विचार मन्मनीं येतो
बोलूनि तुम्हा दाखवितों ॥
मम माता ऐशी असती ।
मत्तनु[7] तरि सुंदर दिसती ।
रूपवान असतों जगतीं ।
परि करणी हो ! नसेचि हा मनुजाची
देणगी असे देवाची ॥ ९ ॥

मज प्रेमाची भगिनि आज ही येथें
भेटविली आपण मातें ॥

---

१ महाराष्ट्रवासी. २ परस्त्रीचा. ३ नरकाला. ४ गरीब. ५ ब्रीद. ६ सुंदर. ७ माझें शरीर.

हिज वसनें द्यावीं जरिचीं ।
भूषणें कनक मोत्यांचीं
भेट हीच या प्रेमाची ।
हिज निरोप हा द्यावा ह्या शिवबाचा
प्रेमाच्या पाठवणीचा ॥ १० ॥

---

# कोको.

चहा व कॉफी याजप्रमाणें रुचकर पण जास्त खर्चाचें पेय कोको हें होय. हें पेय ज्या पदार्थापासून तयार करितात ती पूड कोको नांवाच्या फळापासून तयार करितात.

हीं झाडें उष्ण प्रदेशांत होतात. या झाडांच्या फळांना 'कोको' असें नांव आहे, व त्यांपासून तयार केलेल्या पुडीलाही कोको असें म्हणतात. उष्ण प्रदेशांत उष्णता व पाऊस विपुल असल्यामुळें चहा-प्रमाणेंच हीं झाडें या प्रदेशांत येतात. हीं झाडें लहान असतांना यांना उन्हाचा ताप सहन होत नाहीं म्हणून यांच्याजवळ लवकरच वाढणारीं व उत्पन्नाच्या दृष्टीनें फायदेशीर अशीं झाडें लावतात, म्हणजे यांना सावली मिळते. या झाडांना जास्त ओलावा व खोलपर्यंत बरीशी जमीन लागते, म्हणून यांची लागवड सखल प्रदेशांत करितात. कोकोचीं झाडें पुरेशीं मोठीं होईपर्यंत वर सांगितलेल्या इतर झाडांपासून २।३ पिकें सहज निघतात, व शेतकऱ्याचा हात सारखा चालू राहातो. आपल्या देशांत पानमळे लावतात, त्यांचे वेल चढविण्यासाठीं अशीच व्यवस्था करावी लागते. पानमळा लावल्यापासून ४।५ वर्षांनीं त्यापासून मळेवाल्यास खरा फायदा मिळूं लागतो. मध्यंतरीं या मळ्यांत लावलेल्या केळींचें

उत्पन्न शेतकऱ्यास मिळतें. तद्वतच कोकोची लागवड केल्यापासून या झाडांची उत्पन्न मिळण्याइतकी वाढ होईपर्यंत सहज ४।५ वर्षें जावीं लागतात. या झाडांचीं १२ वर्षांनीं पूर्ण वाढ होऊन या झाडांपासून ३० वर्षेंपर्यंत फळें मिळत राहातात. हीं झाडें मोठीं झाल्यावर सुद्धां कांहीं ठिकाणीं यांचे बाजूनें सावलीचीं झाडें लावावीं लागतात. नाहींतर सूर्याची प्रखर उष्णता यांना सहन होत नाहीं. या झाडांचें उन्हापासून रक्षण करणाऱ्या झाडांना ' आईची ' उपमा देतात.

कोकोच्या झाडांची लागवड सेंटथामस, त्रिनिदाद, दक्षिण–अमेरिकेंत इक्वेडॉर, ब्राझील, पश्चिम आफ्रिकेंत गोल्ड कोस्ट व नायगेरिया या भागांत व आशियाच्या दक्षिणेकडील मसाल्याच्या बेटांपैकीं जावा, सेलिबीज बेटांत पुष्कळ होते. हिंदुस्थानांत निलगिरी पर्वताच्या दक्षिणेकडील भागांत व मद्रास इलाख्यांतही कोकोची लागवड करितात.

या झाडाला जीं फळें येतात, त्या फळाच्या आंतील बियांपासून पूड बनवितात. हीं फळें झाडाच्या खोडालाच चिकटून येतात. अशा प्रकारचीं फळें आपल्याकडे फणसाच्या झाडाला येतात. हीं फळें झाडावर पाहिलीं तर एकाद्या ठिकाणीं ३।४ फळांचा घोसच्या घोस आल्यासारखें दिसतें, व नारळीच्या झाडावर लोंबणाऱ्या पेंदीप्रमाणें हे घोस आलेले दिसतात, व यांचा आकारही लहानशा नारळासारखाच दिसतो.

झाडावर आलेलीं हीं फळें पक्क झालीं आहेत, हें त्या फळाच्या वर आलेल्या भागांच्या मधील शिरा पिवळसर रंगाच्या झाल्या म्हणजे समजतें. हीं फळें दोन धारी अगर तीन धारी रुद्राक्षाप्रमाणें अगर लहान पोपईप्रमाणें दिसतात; पण या फळांना ५।६ उंच शिरा असतात.

हीं फळें झाडाला खालपासून तों थेट शेंड्यापर्यंत लगटतात. खालचीं फळें सहज उतरतां येतात; पण शेंड्याजवळचीं उतरण्यासाठीं लांब बांबूला एक आकडी लावतात. आफ्रिकेंत व अमेरिकेंत नीग्रो माणूस हीं कामें करतात. मसाल्याच्या बेटांत हीं कामें मलायी मजुरांच्याकडून करवितात. बांबूनें फळें उतरवितांना झाडाखालीं या फळांचा अगदीं खच होतो. पुरुषही फळें पाडण्याचें काम करतात, तर स्त्रिया तीं वेचण्याचें काम करतात. हीं सर्व फळें वेचून एका ठिकाणीं नेऊन सांठवितात, व त्या ठिकाणीं सुऱ्यांनी हीं फळें फोडतात. हीं फोडण्याची त्या लोकांना इतकी संवय झालेली असते कीं, काम अगदीं भराभर चालू असतांना देखील एकाद्याचे बोटाला इजा होत नाहीं, कीं आंतील बिया फुटून तुकडे उडत नाहींत. असोले नारळ सोलणाऱ्या व्यापाऱ्यांच्या हस्तकौशल्याप्रमाणेंच ही गोष्टही फार सफाईनें चालू असते.

या फळांतून काढलेल्या बिया अनेक रंगाच्या दिसतात. कांहीं पूर्ण पिकलेल्या, कांहीं अर्धवट पिकलेल्या, कांहीं बऱ्याच अपक्व अशा असल्यामुळें त्यांचे हिरवा, पिवळा, तांबडा, करडा, जांभूळसर असे अनेकविध रंग त्या राशींत दिसतात, व डोळ्यांना ती एक प्रकारची मेजवानीच वाटते. याप्रमाणें हें फोडण्याचें काम संपल्यावर त्या बियांची निवड करण्याचें काम स्त्रिया व मुलीच करितात. विशेषतः त्यांतील पांढऱ्या रंगाच्या बिया निराळ्या काढतात.

या बिया चटयांवर अगर मोठाल्या पात्रांत घालून उन्हांत वाळत ठेवितात. उन्हानें त्यांच्यामधील चरबीसारखा भाग कमी होतो, व त्यांचा रंग काळसर अगर करडा बनतो. अशाच रीतीनें उन्हांत ठेवून त्या अगदीं खडखडीत वाळल्या म्हणजे जरा साफ करून पोत्यांत भरतात, व बाहेर देशीं त्यांची पूड अगर वड्या बनण्यासाठीं

रवाना होतात. आशियांतील मुलांपेक्षां युरोपांतील मुलांना या वड्या फारच प्रिय असतात. अशा प्रकारच्या वड्या बनविणारे व कोकोचे कारखानदार 'चाकोलेट काकार्कॅडबरी' हे पुष्कळांना माहीत आहेतच. याशिवाय बाजारांत व्यापाऱ्यांच्या दुकानांतून 'व्हॅन हुटेन' लिप्टन वगैरे कंपन्यांनीं बनविलेले कोकोचे डबे आपल्याला आढळतात. बिया वाळवून तयार करण्यांत जी काळजी घेतली जाईल त्यावर पुढें तयार होणाऱ्या मालाची किंमत अवलंबून राहाते.

आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यालगतच्या भागांत 'सी सी' माशी चावल्यानें घोडे व बैल ( जनावरें ) जगूं शकत नाहींत म्हणून मालाची ने आण मजुरांना स्वतांच्या आंग मेहनतीनें करावी लागते. आंतील भागांतून किनाऱ्याकडे हा माल सुलभ रीतीनें आणतां यावा म्हणून तो मोठाल्या पिपांत भरतात, व या कामाकरितां मुद्दाम बनविलेल्या रस्त्यावरून हीं पिपें रेल्वे स्टेशनवर ढकलीत आणतात, व तेथून गाडींत चढवून बंदराकडे रवाना होतात. ब्रिटिश साम्राज्यांत त्रिनिदाद, गोल्डकोस्ट व नायगेरिया हे तीन प्रांत येतात. व तेथील बहुतेक बिया इंग्लंडच्या कारखानदारांकडे रवाना होतात. सगळ्यांत गोल्डकोस्ट येथील माल चांगला असतो. या प्रदेशाचें मुख्य बंदर 'आक्रा' हें आहे; पण हें बंदर चांगलें नसल्यानें बोटी किनाऱ्यापासून बऱ्याच दूर उभ्या राहातात. किनाऱ्याजवळ विशेष मोठ्या लाटा येत असतात, त्यामुळें मोठाल्या बोटींपर्यंत बळकट मचव्यांतून माल पोहोंचवावा लागतो. या मचव्यांना 'सर्फबोटी' म्हणतात.

इंग्लंडच्या मध्यभागांत कोकोचे कारखाने आहेत. त्या कारखान्यांत हा माल आला म्हणजे त्याच्या पोत्यांच्या राशींच्या राशी गोदामांत सांठवून ठेवितात. इंग्लंड शिवाय या बियांना फ्रान्स, हॉलंड, जर्मनी व अमेरिका या देशांकडूनही मागणी होते.

कारखान्यांत आल्यावर या बिया पुन्हा साफ करतात, व चांगल्या परततात, आणि मोठाल्या रुळाखालीं त्यां भरडतात. या बियांमध्यें चरबीचा भाग पुष्कळ असतो. हा काढला तर कोकोला कमीपणा न येता त्यांतील पोषक भाग कायम राहूं शकतो. या बियांतील हा चरबीचा भाग निम्यानें असतो. हा भाग काढण्याचे जर्मनींत फार कारखाने आहेत. ह्या काढलेल्या भागाला कॅकॅओ–बटर उर्फ कोकोंतील लोणी असें नांव आहे. या बींतील हा भाग पचण्यास फार कठीण असतो, म्हणून तो काढून टाकल्यानें कोकोचा पाचकपणा उलट वाढतो, असें म्हणतां येईल. कारखान्यांत एकदां रूळ फिरवून लागलींच डब्यांत भरीत नाहींत, तर ही पूड निरनिराळ्या रुळाखालून जावी लागते. पुढें पुढें जात असतां निरनिराळ्या रुळांमधील अंतर अतिशय कमी करण्यांत येतें, म्हणजे कोकोची पूड अतिशय बारीक होते. ती इतकी कीं, त्याच्या मध्यें कण आहेत, हें फार बारकाईनें पाहिल्याशिवाय समजत नाहीं. मग ही पूड डब्यांत भरून बाहेर देशीं रवाना करितात.

कोकोचें लोणी व पूड याशिवाय यापासून तिसरा एक पदार्थ तयार करितात. त्यास चॉकोलेट म्हणतात. बाजारांत या पदार्थाच्या वड्या विकत मिळतात व त्यांत निरनिराळ्या प्रकारचीं सुंदर वासाचीं द्रव्यें मिसळलेलीं असतात. शिवाय जास्त आकर्षक व्हाव्या म्हणून त्यांजवर पांढरी बेगड चिकटवितात. कोकोची पूड होत असतांना त्यात साखर मिसळावी लागते. साखर मिसळण्याचें काम रुळांखालींच चालतें. अशा रीतीनें साखर मिसळली म्हणजे ती कोकोच्या पुडीशीं एकजीव होऊन जाते, व शेवटीं ही पूड व ही साखर असें ओळखितां येत नाहीं. पण चॉकलेट बनविण्यासाठीं ‘ कोकोंतील लोणी ’ हा पदार्थ काढून टाकीत नाहींत. कारण त्या पदार्थामुळें पूड व साखर यांचा चांगला मिलाफ होऊन त्यास चिकटपणा राहातो. हें मिश्रण कढत ठेवावें लागतें, नाहींतर आंतलि लोणी घट्ट बनतें.

नंतर या पदार्थांत वासासाठीं व्हॅनिला या पदार्थाचा उपयोग करतात. व ह्याच पदार्थाचा वास लोकाना व मुलांना फार आवडतो. पण याशिवाय अलीकडे दुसरेही पदार्थ या कामीं वापरूं लागले आहेत. उ०—दालचिनी, वेलदोडा, लिंबू, जायपत्री वगैरे.

असें मिश्रण तयार झालें म्हणजे वड्यांच्या आकाराचे सांचे बनविलेले असतात. त्यांत हें मिश्रण भरतात व तें ठासून बसावें म्हणून यंत्रानें ते सांचे चांगले गदगदा हालविले जातात. नंतर त्या वड्या निवल्या म्हणजे काढून घेऊन बाजारांत विक्रीसाठीं रवाना होतात. याच चॉकोलेटच्या वड्या यांतील लोण्याच्या भागामुळें पुडीपेक्षां पचनास जड असतात.

अशा रीतीनें कोको व चॉकोलेट हे पदार्थ बनतात. आपल्याकडे आतांपर्यंत या पदार्थांचा फारसा प्रसार नव्हता; म्हणून आपल्याकडील मुलांच्या आवडीनिवडीचा प्रश्न करणेंच व्यर्थ आहे. शिवाय या वड्या महागही असतात. त्यामुळें आज जरी त्या बाजारांत विकत मिळाल्या, तरी श्रीमंतांच्या मुलांशिवाय इतरांना त्यांचा आस्वाद घेण्याची पाळी क्वचितच येणार !!

---

# चार शब्द.

अकराव्या वर्षाच्या शेवटच्या ५ अंकांचा हा जोड अंक वाचकांकडे जात आहे. मार्च ते जूनचा एक जोड अंक सुटींत छापून जून महिन्यांत धाडण्याचा विचार केला आहे म्हणजे पुढील अंक नियमितपणें धाडतां येतील. गेल्या सालीं पास होऊन ज्या विद्यार्थिनी शाळांत शिक्षकाचें काम करीत आहेत, त्यांनीं आपला नवीन पत्ता कळविण्याची कृपा करावी.

व्यवस्थापक.

# नवे व्हाइसरॉय.

जुने व्हाइसरॉय लॉर्ड रेडिंग व त्यांच्या पत्नी लेडी रेडिंग हीं उभयतां इंग्लंडला जाऊन त्यांचे जागीं नवे व्हाइसरॉय लॉर्ड इरविन् हे आपल्या पत्नी लेडी इरविन् यांसह नुकतेच हिंदुस्थानांत दाखल झाले. मागील व्हाइसरॉय साहेबांनीं देशांत शांतता प्रस्थापित करून त्यांचें काम बरेंच सुलभ करून ठेविलें आहे.

नवीन व्हाइसरॉय यांची नेमणूक जाहीर झाली म्हणजे त्यांस इंग्लंडांत असतांना अनेक ठिकाणीं मेजवान्या होतात, व या मेजवान्यांचे प्रसंगीं हिंदुस्थानांत गेल्यावर आपण आपल्या कारकीर्दींत कोणतें राजकीय धोरण ठेवणार या संबंधानें चार शब्द सांगावे लागतात. त्यास अनुसरून यांचीं इंग्लंडांत बऱ्याच ठिकाणीं भाषणें झालीं. त्यावेळीं हिंदुस्थानांत गेल्यावर शेतकीची सुधारणा करणार असल्याबद्दल त्यांनीं आपलें धोरण जाहीर केलें. येथील परिस्थिति पाहून कार्यक्रम ठरवावा लागणार असल्यानें त्यांनीं बारीक तपशील दिला नाहीं.

यांचा जन्म यार्कशायरमधील गॅरोबी या गांवीं सरदार घराण्यांत झाला. यांच्या वडिलांना लॉर्ड हॅलिफॅक्स म्हणत. त्यांनीं चांगला नांव लौकिक संपादन केला होता. याच्या घराण्याचें नांव वुड् असें आहे. सन १८५४ सालीं शिक्षण विषयक ज्या सुधारणा झाल्या त्यासंबंधीं 'वुड्स् डिस्पॅच' या नांवानें प्रसिद्ध असलेला सरकारी खलिता यांच्या आजोबांनीं लिहिला. लॉर्ड हार्डिंजप्रमाणेंच ही ऐतिहासिक पुनरावृत्ति आहे. यांची घरची स्थिति चांगली असल्यानें घरीं कोणत्याही प्रकारची ददात नव्हती. ईटन येथील प्रसिद्ध शाळेंतील शिक्षणक्रम आटोपल्यावर ते वरिष्ठ शिक्षण मिळविण्यासाठीं ऑक्सफर्ड

येथें क्राइस्टचर्च कॉलेजांत दाखल झाले. कॉलेजांत असतांना त्यांचें अभ्यासाकडे लक्ष असे. पण त्याबरोबर मोकळ्या हवेंत खेळण्याचाही त्यांना फार नाद असे, त्यामुळें त्यांची शरीरप्रकृति निकोप राहिली. कॉलेजांतील शेवटच्या परीक्षेंत 'अर्वाचीन इतिहास' हा विषय घेऊन हे पहिल्या वर्गांत पास झाले. यावरून त्यांची बुद्धिमत्ता चांगली श्रेष्ठ दर्जाची आहे, असें दिसून येईल. हल्लीं यांना एक मुलगी व ३ मुलगे आहेत. त्यांचीं नावें अनुक्रमें ऑनरेबल् ॲनवुड्, चार्लसवुड्, पीटरवुड् व रिचर्डवुड् अशीं आहेत.

वरिष्ठ शिक्षण संपविल्यावर ते पार्लमेंटाच्या निवडणुकींत उमेदवार म्हणून उभे राहिले व १९१० सालीं त्यांचा प्रथम पार्लमेंटांत शिरकाव झाला. त्यावेळीं यांना पाहिलेल्या लोकांना हे सभागृहांतील मागील बाजूच्या कोचावर बसत असत, ही गोष्ट अद्याप चांगली आठवते. प्रथमतः आपल्या वडिलांच्या नांवावर हे ओळखले जात असत, पण लवकरच त्यांच्या स्वतांच्या कर्तबगारीची ओळख लोकांना पटूं लागली. महायुद्धाच्या सुरुवातीस यांना फ्रान्समध्यें सैन्यांत कांहीं दिवस काम करावें लागलें; पण तेथून लवकरच ते नॅशनलसर्व्हिस खात्याच्या मुख्य प्रधानाच्या हाताखालीं काम करूं लागले. १९२१ सालीं ते वसाहत मंत्र्याचे अंडर सेक्रेटरी झाले, व १९२२ ते २४ पर्यंत त्यांनीं शिक्षणमंत्र्याचें काम केलें. हल्लींचा हुजुरपक्ष अधिकारारूढ झाल्यावर मुख्य प्रधान लॉर्ड बाल्डविन् साहेब यांनीं त्यांस शेतकीखात्याचे मुख्य मंत्री नेमिलें. हिंदुस्तानच्या व्हाइसरॉयच्या जागेसाठीं नेमणूक झाली तेव्हां ते याच जागेवर होते.

वसाहतमंत्र्याच्या हाताखालीं काम करीत असतां ते स्वतां वेस्ट-इंडीज-वसाहतींची पाहाणी करून आले, व तेथील राज्यव्यवस्थेंत

काय फेरफार करतां येतील, याबद्दल त्यांनीं आपला रिपोर्ट सादर केला. नवीन प्रधानमंडळाच्या राजवटींत शेतकीखात्याची व्यवस्था त्यांजकडे आल्यावर देशांतील शेतीची स्थिति काय आहे ही त्यांनीं स्वतां फिरून डोळ्यांनीं पाहिली, व त्या धंद्यांत सुधारणा करण्यासाठीं शेती व दूधदुभत या धंद्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या डेन्मार्क–देशांत ते सफर करून आले. तेथील सर्व गोष्टी पाहून ते आपल्या देशांत कोणत्या सुधारणा मानवतील हें ठरविणार होते. पण त्या जागेवरून त्यांस हलविल्यामुळें वरील गोष्टींसंबंधीं विचार करण्यास त्यांस तूर्त सवड होणार नाहीं. तथापि पुढेंमागें सवड होईल तेव्हां ते या बाबतींत स्वतांच्या देशाचा फायदा केल्याशिवाय राहाणार नाहींत. वरील दोन गोष्टी देण्याचा उद्देश हा कीं, हातीं घेतलेल्या कोणत्याही कामांत पूर्ण लक्ष घालावयाचें व त्या बाबतींत पूर्ण विचाराअंतीं आपलें मत बनवून ते विचार मूर्तस्वरूपांत आणण्याचा प्रयत्न करावयाचा हा या व्हाइसरॉयांचा स्वभावच बनला असून तो सर्वांनीं अनुकरण करण्यासारखा आहे. हिंदुस्तानांतील शेतीस त्यांच्या उपरिनिर्दिष्ट अनुभवाचा फायदा मिळो, अशा आशा प्रदर्शित करूं या. सन १९१० सालीं आपल्या वयाच्या ३० वे वर्षीं ते पार्लमेंटांत शिरले. आज ते ४४ वर्षांचे आहेत. गेल्या २९ वर्षांत येथें आलेल्या व्हाइसरॉयांपैकीं लॉर्ड कर्झनशिवाय यांच्या इतक्या अल्पवयाचा व्हाइसरॉय आलेला नाहीं.

यांचा स्वभाव गंभीर असून ते फारच मोजके शब्द बोलतात. पण यामुळें ते एकलकोंडया स्वभावाचे आहेत असें नाहीं. फॉक्स, बर्क, शेरिडन यांसारखें यांचे आंगीं वक्तृत्व नाहीं, तरी दूरदृष्टि, कोणत्याही प्रश्नाचा शांतपणें विचार करून निश्चित मत ठरविण्याची संवय व तें ठरल्यावर अमलांत आणण्याचा निश्चय हे ब्रिटिश लोकांच्या आंगचे गुण यांच्या ठिकाणीं चांगल्या रीतीनें वास करितात. हे फारसे बोलत

नाहींत तरी प्रसंगीं थोडा फार विनोद करितात. पार्लमेंटांत आज जवळ जवळ १९ वर्षें काम करीत असल्यानें यांचा पुष्कळांशीं पुष्कळ प्रश्नाचा संबंध आला व त्यामुळें एकाद्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करण्याची व दुसऱ्यांच्या विचारांना योग्य तें महत्त्व देण्याची यांना संवय झालेली आहे. तसेंच यांच्या आंगचा एककल्लीपणा नाहींसा होऊन त्यांना मनुष्यस्वभावाची चांगली ओळख झाली आहे.

यांनीं लॉर्ड केबल यांचें चरित्र व ' प्रेझेंट आपर्चूनिटीज् ' ( हल्लींची संधि ) या नांवाचें पुस्तक, अशीं दोन पुस्तकें लिहिलीं आहेत. यांपैकीं दुसरें पुस्तक ते व मुंबईचे माजी गव्हर्नर जॉर्ज लॉईड या दोघांनीं मिळून लिहिलें आहे. दुसऱ्या पुस्तकांत त्यांनीं मजुरांची स्थिति सुधारण्यासंबंधानें चाललेल्या प्रयत्नाची स्तुति केली आहे, त्यावरून हिंदुस्तानांत आल्यावर येथील मजुरांच्या प्रश्नाकडे ते लक्ष देतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

मागील व्हाइसरॉय न्यायदेवतेचे उपासक होते. नवीन व्हाइसरॉय सृष्टिदेवतेचे चाहाते आहेत. फलनिष्पत्ति काय होईल हें आज काय सांगतां येणार !

---

# पोंच व अभिप्राय.

महाराष्ट्र डायरीः—पुणें येथील अनाथ विद्यार्थिगृहानें दरवर्षाप्रमाणें ही १९२६ सालची डायरी प्रसिद्ध केली आहे. ही स्वदेशी कागदावर छापली आहे. डायरीची छपाई व बांधणी चांगली आहे. जुन्या व नव्या पंचांगाप्रमाणें तिथि व नक्षत्रें दिलीं आहेत. रेल्वे, पोस्ट वगैरेसंबंधानें नेहमीं

लागणारी माहितीही भरपूर दिली आहे. खर्च जाऊन जें उत्पन्न राहील तें अनाथविद्यार्थीगृहाकडे जावयाचें असल्यामुळें ग्राहकास उत्तम डायरी मिळून एका पवित्र संस्थेस मदत केल्याचें श्रेय मिळतें. किंमत आठ आणे. मिळण्याचें ठिकाण अनाथविद्यार्थीगृह कसबा पेठ, पुणें.

**सुबोध मराठी व्याकरणः**--लेखक रा. गंगाधर खंडेराव जोशी, मिरज. हें व्याकरण लेखकानें चौथ्या इयत्तेकरितां लिहिलें आहे. तें उद्गामी पद्धतीनें लिहिण्याचा प्रयत्न लेखकानें केला आहे, पण तो चांगलासा साधला नाहीं. या पुस्तकांतील दोष पुढें दिले आहेत.

१. मुलांना उद्देशून लांब लांब भाषणें आहेत.
२. एक दोन उदाहरणें देऊन लागलींच व्याख्या दिली आहे.
३. व्याख्याही मुलांचे मानानें कठीण आहेत.
४. पुस्तकाची मांडणी व्यवस्थित नाहीं.
५. अभ्यासाकरितां प्रश्न फार थोडे आहेत.

पुढील आवृत्तींत हे दोष टाळल्यास सदरहू पुस्तक उपयुक्त होईल असें आम्हांस वाटतें. किंमत ५ आणे.

चित्रपाठ भाग १--२--३ चित्रकार. रा. म. स. भडकमकर ड्रॉइंग मास्तर सेवासदन ट्रेनिंग कॉलेज, पुणें. या चित्रपाठांत मुलांच्या घरच्या व शाळेंतील आयुष्यक्रमांतील चित्रें दिलेलीं आहेत. याशिवाय त्यांच्या सभोंवतीं असलेले व त्यांच्या दररोजच्या पाहण्यांतील व्यवहारांचींही चित्रें दिलीं आहेत. सोप्यापासून अवघड भागाकडे हें तत्त्व चित्रकारानें लक्षांत ठेविलें आहे. चित्रें अगदीं साधीं व एकाच रंगांत असल्यामुळें मुलांना सहज समजण्याजोगीं आहेत. या पुस्तकांचा उपयोग वाक्यरचनेच्या कामीं चांगला होईल. चित्रें पाहून वर्णन करणें हा मुलांना भाषेच्या दृष्टीनें उत्तम व्यवसाय होईल. अशा पुस्तकांची प्राथमिक शाळांतील खालच्या इयत्तांना फार जरूर आहे. चित्रवाचनाचा पाठ कसा घ्यावा याची सामान्य पद्धति प्रारंभीं रा. कारखनीस यांनीं दिली आहे. प्रकाशकः-- विश्वनाथ गणेश आणि मंडळी, १२ बुधवार पेठ, पुणें. किंमत प्रत्येकीं ४ आणे.

**स्मरणशक्ति व ती कशी वाढवावी.:**--लेखक रा. स. जोशी, बी. ए. शिक्षक ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें. या पुस्तकांत स्मरणशक्तीचें स्वरूप, तिचें कार्य व तें व्यवस्थितपणें घडण्याकरितां साहचर्य वगैरे लागणारीं साधनें यांचे विवेचन केलें आहे. स्मरणशक्तीसंबंधानें असणारे कांहीं चुकीचे समज या पुस्तकानें दूर होतील. शिक्षकांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. किं. ४ आणे.

**सुबोध अंकगणितः**—लेखक रा. स. जोशी बी. ए. हें पुस्तक प्राथमिक शाळेच्या दुसऱ्या इयत्तेकरितां लिहिलेलें आहे. यांत विषय कसा शिकवावा यांचे प्रथम विवेचन आहे. नंतर उदाहरणसंग्रह आहे. विषयाची विभागणी चांगली केलेली आहे. उदाहरणांची निवडही चांगली आहे. पालकाच्या किंवा शिक्षकाचे दृष्टीनें ही विवेचनपद्धति ठीक आहे, पण दुसऱ्या इयत्तेंतील मुलांना शिक्षकाच्या साहाय्यावांचून हा मजकूर समजेल किंवा तीं दोन दोन पानें मजकूर वाचतील ही गोष्ट शक्य नाहीं. पुस्तकांतील $\frac{3}{4}$ पानें विवेचन आहे व $\frac{1}{4}$ पानें उदाहरणांला दिलेलीं आहेत. रा. जोशी यांनीं आपल्या पुस्तकाचे दोन भाग करावे, विवेचनाचा भाग शिक्षकाचे उपयोगाकरितां असावा व उदाहरणांचा भाग मुलांकरितां असावा. दोन्ही भाग एकत्र असल्यानें मुलांना आपणांकरितां नसलेला असा $\frac{3}{4}$ मजकूर विकत घ्यावा लागतो. किंमत ५ आणे.

**सुलभ शुद्धलेखनः**--लेखक रा. बा. रा. काटे व वि. ट. क्षीरसागर, या पुस्तकांतील मराठी शुद्धलेखनाचे सामान्य नियम दिले आहेत. प्रत्येक इयत्तेंत शुद्धलेखनाचे कोणते नियम साधारणपणें शिकवितां येतील हें सांगितल्यानें हें पुस्तक शिक्षकाचे उपयोगी पडेल. मुलांना शुद्धलेखनाच्या पुस्तकाचा उपयोग होणें शक्य नाहीं. कारण शुद्धलेखन हा भाग संवयीचा आहे. नुसत्या नियमांच्या ज्ञानानें शुद्धलेखन चांगलें येणें शक्य नाहीं. कित्येक वेळां नियम दिसतांना फार सोपा दिसतो, पण तो मुलांना कळणेंच शक्य नसतें. संस्कृत इकारांत व उकारांत नामें ऱ्हस्व लिहावीं हा नियम सोपा दिसतो पण कोणते शब्द संस्कृत आहेत हें तिसऱ्या इयत्तेच्या मुलांना कळावें कसें? शिक्षकांना या पुस्तकाचा उपयोग होईल. किंमत ३ आणे.

**सोलापूर तालुक्याचें पाठात्मक भूवर्णन:**--लेखक रा. अग्निहोत्री व पाटील. सध्यां पाठात्मक पुस्तकें लिहिण्याची एक लाट उसळली आहे. या पुस्तकाच्या पहिल्या १० पानांत भरपूर व्याख्या दिल्या आहेत. लांबी, रुंदी, प्रमाण, आराखडा, नकाशा, पात्र, धरण, पाट, पूल, दवाखाना, पोस्ट ऑफिस, इन्कम ट्याक्स, सारा अशा ४५ व्याख्या आहेत. मग तालुक्याच्या अधिकाऱ्यांची व त्यांच्या कामाची यादी आहे. शेवटीं सोलापूर तालुक्याची बारीक सारीक तपशीलवार माहिती आहे. लहानें मुलांना अशा रीतीनें भूगोल शिकविल्यास यांना त्या विषयाचा वीट यावा यांत आश्चर्य कोणतें? अशीं पुस्तकें मुलांकडून विकत घेऊन तीं त्यांच्याकडून पाठ करून घेणारे शिक्षक कांहीं कमी नाहींत. किंमत दीड आणा.

**इनामदाराचा बाळू:**--लेखक रा. बाळकृष्ण भाऊ जोशी. स्यांडफर्ड ॲन्ड मर्टन या पुस्तकाचे आधारें हें पुस्तक रा. जोशी यानीं लिहिलें आहे. या पुस्तकाचे पहिलें मराठी रूपांतर कै. रा. बापटशास्त्री यांनीं केलें होतें व तें सरस उठलें होतें. तें सध्यां उपलब्ध नाहीं. रा. जोशी यांनीं मूळच्या इंग्रजी पुस्तकाला सुंदर मराठी पोषाक दिला आहे. संदर्भाला अनुसरून पुराणांतील व हिंदुस्थानच्या इतिहासांतील गोष्टी दिल्या आहेत. नैतिकशिक्षणाला अशा पुस्तकांची फार आवश्यकता असते. पुस्तकाची छपाई व बांधणी सुरेख आहे. पुस्तकाला जर चित्रांची जोड मिळाली असती तर पुस्तक अधिकच आकर्षक झालें असतें. भाषा सरळ व सोपी आहे. मुलांना बक्षीस देण्याला हें पुस्तक फार चांगलें आहे. किं. रु. १॥

**महत्त्वमापनाचे समग्र नियम:**—लेखक रा. वामन सदाशिव क्षीरसागर. या छोट्या पुस्तकांत महत्त्वमापनाचे बारीकसारीक, क्लिष्ट व नेहमीं उपयोगांत येणारे असे सर्व नियम संग्रहित केले आहेत. विद्यार्थ्यांना अशा नियमांचा संग्रह उपयोगी पडणें शक्य नसतें. थोडेसे सामान्य नियम देऊन त्यांच्या आकृति व त्यांवरील उदाहरणें दिलीं असतां तें पुस्तक विद्यार्थ्यांचे जास्त उपयोगी होईल. पुस्तकाच्या आकाराचे मानानें पुस्तकाची किंमत ४ आणे ही जास्त आहे.

शिक्षणशास्त्र व अध्यापनकला—लेखक रा. मोडक एम्. ए.

लहान मुलांचें अंकगणित भाग १ व २, लेखक रा. मोडक व गोखले.

अभिप्राय पुढील अंकीं. हीं पुस्तकें धाडणारांचे आम्ही फार आभारी आहों.

---

# वर्तमानसार.

——आपले नवे व्हाइसरॉय लॉर्ड अरविन हे ता. १ एप्रिल रोजीं हिंदुस्थानात येऊन दाखल झाले. हे प्रधानमंडळांतील एक सभासद असताना त्याच्याकडे शेतकीखातें सोंपविलेलें होतें. हिंदुस्था-स्थानांत त्यांनीं या खात्यांतच सुधारणा करण्याचें ठरविलें आहे. याचें वय ४४ वर्षांचें आहे.

——साम्राज्य परिषद सन १९१९ नंतर दर दोन वर्षांनीं भरते. ती १९२१ व १९२३ सालीं भरली होती. ह्या वर्षाचे अखेर ती पुन्हा भरणार आहे.

——मुंबई इलाख्याचे मागील गव्हर्नर जॉर्ज लॉईड हे हल्लीं इजिप्तचे हाय कमिशनर आहेत. त्यांनीं येथें आपल्या कारकीर्दींत सक्करचें धरण बांधण्यास सुरुवात केली. त्या कामास एकंदर २० कोटी खर्च येणार असून तें काम जोरांत चाललें आहे. इजिप्तमध्यें गेल्यावर त्यांच्या हस्तें सुदान प्रांतांत मॅकवारा ( खार्टुमपासून १०० मैल दक्षिणेस ) येथील धरण उघडण्याचा समारंभ झाला. त्यांनीं स्वतां पाणीपुरवठा जास्त व्हावा म्हणून त्याच नदीस सेन्नार या ठिकाणीं दुसरें धरण बांधण्याचें काम सुरू केलें आहे.

——गेल्या वर्षाचे अखेरीस लोकार्नो या ठिकाणीं राष्टसंघाची परिषद यशस्वी रीतीनें पार पडली. या परिषदेनें मोसल प्रांताचा ताबा पुढील २५ वर्षें इंग्लंडला दिला आहे. यांशिवाय जर्मनीच्या सरहद्दीवर असलेल्या कोलोन शहरीं गेले ७ वर्षेपर्यंत ठेविलेलें लष्कर इंग्लंडनें काढून घ्यावें असें ठरलें, त्यास अनुसरून इंग्लंडनें आपलें लष्कर तेथून हलविलें.

——ॲलन कोबहॅम ह्या वैमानिकानें नुकताच इंग्लंड ते केप (द. आफ्रिका) पर्यंत ८०२० मैलांचा प्रवास पुरा केला. ह्या प्रवासांत त्याजबरोबर यंत्रें वगैरे दुरुस्त करणारा फक्त एक माणूस होता. पुन्हा इतकेंच अंतर ओलांडून तो इंग्लंडला परत जाणार आहे. येतांना तो इजिप्त, सुदान, केनिया, टँगानिका, ऱ्होडेशिया वगैरे मार्गानें आला. येत असतांना या मार्गानें खालील प्रदेशांचे त्यानें फोटो घेतले म्हणून ८०२० मैलांचा प्रवास करण्यास त्यास एकंदर ३ महिने लागले. पण या काळांत एकंदर हवेंतून उडण्याचा ९४ तासच काय तो वेळ खर्च झाला!

—हल्लीं विमानमार्गानें युरोपांत टपालाची नेआण सर्व देशांत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सुरु झाली आहे. गेल्या वर्षीं ( १९२५ ) या मार्गानें एकंदर २५००० शेर वजनाचें टपाल निरनिराळ्या देशांनीं रवाना केलें.

—बोर्निओ बेटांत डोंगरांतील एका गुहेंत डच प्रवाशांना हिंदु देवतांच्या पुष्कळ मूर्ति सांपडल्या आहेत. त्या सुमारें ११०० वर्षापूर्वींच्या असाव्यात असा अंदाज आहे. त्यांत शिव, गंगा व कार्तिकेय या देवता स्पष्ट ओळखूं येतात. यावरून ईस्ट बेटापर्यंत हिंदुसंस्कृति पसरली होती हें स्पष्ट होतें.

—मोटारच्या रबरी धावांत हल्लीं कॅरबॉनिक ॲसिड भरण्याची नवीन पद्धति सुरू झाली आहे, यामुळें त्या रबरी नळयाचें आयुष्यही बरेंच लांबतें असें आढळून आलें आहे.

—ब्रिटिश साम्राज्याच्या मुख्य देशांत बिनतारी संदेशाचीं ठाणीं बांधण्याचें ठरुन त्याप्रमाणें कामास सुरुवातही झाली आहे. कानडा व दक्षिण आफ्रिकेंतील ठाणीं येत्या एप्रिलमध्यें पुरीं होणार असून हिंदुस्तान व ऑस्ट्रेलिया या प्रांतांतील आगष्टमध्यें पुरीं होतील.

—ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया व दक्षिण ऑस्ट्रेलिया या प्रातांत गवताळ प्रदेशाला आग लागून हजारों रुपयांचें नुकसान झालें, इतकेंच नव्हे तर माणसें व दोन तीन हजार मेंढ्या भाजून मेल्या.

—युरोपियन राष्ट्रांमध्यें गेल्यावर्षापासून विमानांचे सामने सुरू झाले आहेत. या सामन्यांत विजय मिळविणाऱ्या राष्ट्राला एक 'पेला' बक्षीस देतात. गेल्यावर्षी या सामन्यांत अमेरिका विजयी झाली. यंदा हे सामने आक्टोबर महिन्यांत होणार आहेत. या सामन्यास 'स्नेडर कप रेस' असें नांव दिलें आहे.

—फ्रान्स देशात 'पाश्चर' नांवाच्या एका शास्त्रज्ञानें शास्त्रीय शोध लावण्याकरिता एक संस्था स्थापन केली. त्या संस्थेनें विशेषतः रोगांच्या बाबतींत बरेच शोध लाविले. अलीकडे त्याच संस्थेंतलि एक विद्वान संशोधक 'बेसरेडका' यांनीं सांसर्गिक रोगांचा प्रतिबंध करण्यासाठीं इंजेक्शन करण्याची जरूरी नाहीं, असें ठरविलें असून त्याऐवजीं त्यांनीं पोटांत घेतां येतील अशा गोळ्या बनविल्या आहेत. या गोळया तयार करण्याचा कारखाना निघाला असून त्या विशेषतः टायफाइड ( विषम ), अमांश ( आव ) व पटकी हे रोग गांवांत सुरू झाले असतां उपयोगी पडतात, असें म्हणतात.

—फेब्रुवारी महिन्यांत इंग्लंडांतील पार्लमेंट सभेच्या बैठकीस सुरुवात झाली. त्या सभेंत आरमारी खात्याचे मुख्य प्रधान ब्रिजमन साहेब यांनीं हिंदुस्थानच्या रक्षणासाठीं एक स्वतंत्र आरमार ठेवावें, अशी सूचना मांडली. त्यावर वादविवाद होऊन २९७ विरुद्ध ११२ मतांनीं तो ठराव मंजूर झाला, व राजे साहेबांचें त्यावर शिक्का मोर्तबही झालें. त्यानंतर हिंदुस्थानांत कौन्सिल ऑफ स्टेट ही सभा उघडल्यावर हींत गव्हर्नर जनरल साहेबांनीं हिंदुस्थानास आरमार मिळाल्याचा उल्लेख केला. मुख्य आरमार सिंगापूर बंदरांत असून त्याच्या तंत्रानें हें आरमार कामें करणार. त्या आरमारावरील मुख्य अधिकाऱ्यांपैकीं एक इसम हिंदी घेण्याचें ठरलें आहे. याशिवाय इतर पुष्कळ कामें हिंदी लोकच करणार. किनाऱ्याच्या टेहेळणीचीं कामें करणारीं हल्लीं थोडीं जहाजें आहेत, व त्यांसाठीं ६०।७० लक्ष रुपये दरसाल खर्च येतो. नवीन आरमार बनवितांना यांतच १०।१५ लक्ष रुपये जास्त मंजूर करावे लागतील असा अंदाज आहे. या आरमाराचें मुख्य निशाण पांढऱ्या रंगाचें पाहणार. हीं जहाजें पूर्वकिनाऱ्यावर विजगापट्टण व पश्चिम किनाऱ्यावर मुंबई बंदरांत राहणार. याशिवाय 'सीलोनच्या किनाऱ्याजवळील जुनें ठाणें कायम आहेच.' लष्करी व आरमारी उच्च शिक्षणासाठीं डेहराडून व इंग्लंड या ठिकाणीं शिक्षणासाठीं हुशार हिंदी लोक निवडून पाठविण्यांत येतील, व शिकून आल्यावर त्याची आरमारावर महत्त्वाचे जागीं नेमणूक होईल. इतर किरकोळ कामाच्या शिक्षणासाठीं मुंबईस शाळा निघणार आहे.

—गेल्या युरोपियन महायुद्धांत एकंदर २ कोटी ६० लक्ष शिपाई मेले, असा अंदाज केला आहे. बकासुराला दररोज १ माणूस बळी देत असत. त्याप्रमाणें दररोज एक माणूस गेला अशी कल्पना

केल्यास इतकीं माणसें ७०००० वर्षांपेक्षां जास्त दिवस पुरली असतीं.

——सिंध प्रांतांत उकरीत असतां कांहीं भागांत प्राचीन इमारती व मेलेल्या लोकांचे सांगाडे सांपडले आहेत. त्या सांगाड्यांपैकीं कांहींच्या हातांत बांगड्या आढळल्या आहेत. तसेंच मूल्यवान रत्नांच्या माळा व निरनिराळ्या प्रकारचीं भांडीं सांपडलीं आहेत. या गोष्टींवरून या प्रांताच्या प्राचीन इतिहासावर काय प्रकाश पडतो, तें पहावें. या सर्व पुराणवस्तु हिंदुस्थानांतून बाहेर पाठवूं नयेत, असें येथील लोकांचें म्हणणें आहे.

——हिंदुस्थानच्या वायव्येस असणाऱ्या खैबर खिंडातून अफगाणिस्थानच्या काबूल शहरापर्यंत नवीन रेल्वे रस्ता झाला. तो रस्ता सर चार्लस इनेस यांचे हस्तें नुकताच खुला करण्यांत आला.

——लेफ्टनंट आलिव्हर व वैमानिक ब्रुक्स हे दोघेजण आकाशमार्गानें लंडनला ( इंग्लंड ) जाण्यास निघाले आहेत. हा प्रवास ते ९ दिवसांत पुरा करणार आहेत. पुढें मार्गे लवकरच हिंदुस्थान ते इंग्लंड पर्यंत टपालाची ने आण करण्यासाठीं विमानाची सोय करण्यांत येणार आहे.

---

## शिक्षणविषयक प्रदर्शनाची योजना.

मुंबई-इलाख्यांतील मुलींच्या प्राथमिक, दुय्यम व औद्योगिक सर्व शाळा, तसेंच उत्तर, मध्य, दक्षिण व मुंबई या भागांतील स्त्रियांची

ट्रेनिंग कॉलेजें यांतील शिक्षणविषयक सर्व कामांचें प्रदर्शन पुणें येथें सन १९२६ चे आक्टोबरमध्यें भरविण्याचें ठरविलें आहे.

ज्या शाळा किंवा कॉलेजें आपल्या येथें शिकवीत असलेल्या विषयांपैकीं एकाद्या विषयाची शिकविण्याची उत्कृष्ट क्रमवार योजना व तो विषय शिकवितांना केलेले नमुने पाठवितील त्यांना सर्टिफिकिटें दिलीं जातील.

विद्यार्थिनींना खालीं दिलेल्या विषयांतील कामाकरितां बक्षिसें दिलीं जातील.

१ शिवणकाम.

१० वर्षांच्या आंतील मुलानें तयार केलेली पिशवी.

१२ वर्षांच्या आंतील मुलानें शिवलेलें झबलें.

कोणत्याही वयाच्या मुलीनें शिवलेलें पोलकें.

१० वर्षांच्या आंतील मुलानें केलेलें पिनिफोर.

१२ वर्षांच्या आंतील मुलानें केलेलें ट्युनिक.

कोणत्याही वयाच्या मुलानें शिवलेला फ्रॉक.

२ कशीदा.

हिंदी कलेचा कोणताही नमुना.

युरोपियन कलेचा कोणताही नमुना.

३ विणकाम.

जाकीट किंवा कोट, मोजे व टोपी यांचा ल्हान मुलाकरिता एक संच.

४ एका सुईचें विणकाम.

५ पोतीचें काम.

६ टोपल्या विणणें.

राफिया, गवत, ( केळीं, ताग, आंबाडी, घायपात, लव्हाळा वगैरेंचे ) तंतु व वेत यांपैकीं कशाचीही टोपली अथवा पिशवी.

७ खेळणीं.

कापड, लाकूड, कार्डबोर्ड वगैरेंचें केलेलें खेळणें.

८ ( लांबी, माती, मेण, कागदाचा रांधा वगैरेंची ) केलेली एकादी वस्तु.

९ ट्रेनिंग--कॉलेजांत शिकत असलेल्या विद्यार्थिनींना म्हणजे भावी स्त्रीशिक्षकांना पुढें आपल्या शाळांत उपयोगीं पडणारा हस्त-व्यवसाय.

खालीं दिलेल्या वस्तूंच्या कामाची क्रमवार उत्कृष्ट योजना व नमुने.

( १ ) कागद अथवा कार्डबोर्ड.

( २ ) लांबी, माती, मेण, कागदाचा रांधा वगैरेचें काम.

( ३ ) संख्या शिकविण्याकरितां लागणारीं साधनें.

( ४ ) भाषा शिकविण्याकरितां लागणारीं साधनें.

( ज्या मुलांकरितां वस्तु तयार करावयाची त्याचें वय दाखल करावें )

१० भूगोल

( १ ) कोणत्याही देशाचे नकाशे.

( २ ) उठावाचा नकाशा.

( ३ ) कोणत्याही देशांतील लोकाची रहाणी दर्शविणारा नमुना ( देखावा ) अगर चित्र.

११ इतिहास.

हिंदुस्तानच्या अगर इंग्लंडच्या इतिहासांतील एकादा काल दर्शविणारे नकाशे, तक्ते, नमुने ( देखावे )

१२ सृष्टिनिरीक्षण—

प्राणी, वनस्पति व सृष्टींतील स्वाभाविक देखावे स्वतां पाहून त्याची ज्यांत वेळोवेळीं नोंद करून ठेविली आहे असें एकादें उत्कृष्ट नोटबुक ( टांचणवही )

१३ हस्ताक्षराचे नमुने.

( १ ) बालबोध.

( २ ) मोडी.

( ३ ) इंग्लिश.

( १० वर्षांच्या आंतील मुलांकरितां )

( १५ वर्षांच्या आंतील मुलांकरितां )

१४ चित्रकला—

( १ ) डिझाइन्

( २ ) सृष्टिविषयक

( ३ ) वस्तु

( १२ वर्षांच्या आंतील मुलांकरितां )

( १५ वर्षांच्या आंतील मुलांकरितां )

( १८ वर्षांच्या आंतील मुलांकरितां )

१५ विणकाम

२२ वर्षांच्या आंतील मुलांनीं १५ अथवा जास्त वार लांबीची नवार एकत्र तयार करणें.

शर्टकरितां २४ अथवा जास्त वार ट्विल एकत्र विणणें.

शर्टकरितां कोणतेंही कापड ( ट्विल नाहीं ) २४ अथवा जास्त

वार एकत्र विणणें.

२१ वार खादी एकत्र विणणें.

एका मुलीनें विणलेली साडी.

के. जी. जोशी.
एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग, पुणें.

---

## चीफ स्काऊट नेक नामदार गव्हर्नरसाहेब यांचा नूतन वर्षाचा स्काऊटना संदेश.

१. मुंबई इलाख्यांतील स्काऊट चळवळींत भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस नवें वर्ष आनंदप्रद व भरभराटीचें जावो अशी मी मनापासून इच्छा प्रगट करितों. तुमच्यापैकीं प्रत्येक कमिशनर, स्काऊट मास्तर, पेट्रोल लीडर, व रोव्हर स्काऊट आणि कब आपआपल्या शक्त्यनुसार आपलीं कामें कळकळीनें करून दुसऱ्याला मदत केल्यापासून होणाऱ्या आनंदाचे आणि भरभराटीचे वांटेकरी होतील अशी मला आशा आहे.

२. नूतन वर्षारंभाचे दिवशीं केलेल्या कामाचा आढावा काढून पुढील कार्याची दिशा ठरवायची असते. अशा दिवशीं आपला मुख्य स्काऊट या नात्यानें मी आपणांस असें सुचवितों कीं, आपण सर्व हिंदुस्थानभर व त्याबाहेरील इतर देशांतील स्काऊट लोकांना आपली बंधुत्वाची व एकमेकांच्या उपयोगीं पडून एकमेकांच्या सेवा करण्याची भावना व्यक्त करावी व त्यांना नवें वर्ष सुखाचें जावो अशी आशा प्रदर्शित करावी.

३. या इलाख्यांतील तरुण पिढीच्या कल्याणाकरितां अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक झटत असणाऱ्या कमिशनर व स्काऊट मास्तरांचे मनःपूर्वक आभार मानतों व बिनमोल उपयुक्ततेच्या या त्यांच्या कार्याकरितां आजपर्यंत त्यांनीं जे प्रयत्न केले त्याप्रमाणेंच किंबहुना अधिकच प्रयत्न ते यापुढें करतील अशी मला आशा आहे.

४. इतक्या लहानपणींच पुढारीपणाची कला शिकण्याची संधि मिळालेले पेट्रोल लीडर्सहो ! आपण आपलें काम पुढें चालवून आपल्या उदाहरणानें दुसऱ्यांनाही आपलाच मार्ग आक्रमण करण्यास उत्तेजन द्याल अशी मला खात्री आहे. दूरदर्शी व स्वार्थत्यागी पुढाऱ्यांची इतर देशांप्रमाणेंच तुमच्या या देशाला अत्यंत जरूर आहे. स्काउटिंगची उदात्त ध्येयें मनामध्यें ठसून गेलेल्या आपणांहून श्रेष्ठ पुढारी मिळणार नाहींत असें माझें मत आहे.

५. स्काऊटस लोकहो, तुम्ही लहान आहांत तोंवर शिकतां येईल तितकें शिकून घ्या, असा माझा तुम्हांला आग्रहपूर्वक उपदेश आहे. शरीर व मन शुद्ध ठेवा. तुमच्या वयाच्या मुलांना ज्या विशिष्ट रीतीनें शिकविलें पाहिजे, त्याचा व तसेंच शिकविल्या जाणाऱ्या सेवा करून शिस्त पाळण्याच्या त्या घड्यांत शक्य तितका फायदा घ्या.

६. जगाची सुधारणा व भरभराट होण्याचे कामीं स्काऊटिंगच्या चळवळीइतका दुसऱ्या कशाचाही उपयोग होणार नाहीं. तेव्हां ह्या मोठ्या कनिष्ठ संघाच्या चळवळींत लक्ष घालणाऱ्या प्रत्येकाला माझें हेंच सांगणें आहे कीं, त्यानें हल्लींप्रमाणेंच अथवा त्याहूनहि जास्त काळजीनें या कार्यासाठीं झटावें.

७. आपणा सर्वांना सन १९२६ सालांत सुख आणि आनंद लाभो व आपलें कँपिंग चांगलें होवो, हीच माझी इच्छा आहे.

ता. १ जानेवारी १९२६

(सही) लेस्ली विल्सन,
चीफ स्काऊट, मुंबई इलाखा.

लक्ष्मीबाई प्रधानकृत.

# विणकला भाग १ ला.

अलीकडे स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यापासून त्याचेबरोबरच प्रत्येक सुशिक्षित कुटुंबांत विणकलेचा जारीनें प्रघात सुरू झाला आहे. त्या कलेवर आजपावेतों दोन तीन पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं, परंतु या कलेचें पूर्ण ज्ञान होण्यास या पुस्तकासारखें पुस्तक झालें नव्हतें. यांत कर्त्रीनें इंग्रजी पुस्तकावरून उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करून एकंदर नमुने स्वतः विणून त्यांचे फोटो घेऊन त्या फोटोचे ब्लॉक नेरॉय कंपनीकडून तयार करवून आर्टपेपरवर छापून पुस्तकांत घातले आहेत. व त्या त्या आकृतीचे वर्णन छापिलें आहे. यांत पुढीलप्रमाणें तीस प्रकारच्या विणी, गळपटे ( दुरंगी साधे, टॉय ३ प्रकारचे ) पायमोजे चार प्रकारचे, टोप्या ( गंधर्व, साधी, गलोतें, रुमी, गांधी, साहेबी, कमळाची, प्रवासी, बॉनेट, थंडीची, प्रवासी चार सुयांची ), झबलीं ८ प्रकारचीं, गंजीफ्राक्स, साधे कोट, ओव्हरकोट, झुली, शाली वगैरे विणण्याची माहिती यांत असल्यामुळें ही कला अवगत करून घेण्यास फारच उपयुक्त असें हें पुस्तक झालें आहे. पुस्तकाचे खर्चाचे मानानें किंमतही अल्प म्हणजे फक्त रु. १। ठेविली आहे. ट. ख. व्ही. पी. सह रु. १८१०.

**मिळण्याचें ठिकाणः—लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर लक्ष्मीरोड, पुणें सिटी.**

# मुलांकरितां कविता.

आवृत्ति दुसरी (सचित्र)

पृष्ठसंख्या ११२.

किंमत ८ आणे.

पुस्तकें मिळण्याचा पत्ताः—

म. का. कारखानीस, बी. ए.,
शिक्षक ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें,
अगर नवीन किताबखाना, बुधवार पेठ, पुणें.

# आमचीं मुलांमुलींकरितां व इतर पुस्तकें.

## प्रत्येक घरांत अवश्य संग्रहीं ठेवावीं.

× अशी खूण असलेलीं पुस्तकें मुंबई शाळाखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* अशी खूण असलेलीं पुस्तकें वऱ्हाड व मध्यप्रांत शाळाखात्यानें मंजूर केलीं आहेत.

| | रु. आ. |
|---|---|
| ×* चिमुकली इसापनीति | ०–२ |
| ×* मुलांकरितां मुलांच्या गोष्टी | ०–३ |
| ×* बालबोध गोष्टी भाग १ ला | ०–३ |
| ×* बालबोध गोष्टी भाग २ रा. | ०–३ |
| ×* बालसुभाषित | ०–३ |
| ×* पाठात्मक अंकगणित भाग १ ला | ०–५ |
| ×* पाठात्मक अंकगणित भाग २ | ०–६ |
| ×* सोपे धडे | ०–३ |
| ×* बालरंजनमाला भाग १ ला | ०–५ |
| ×* बालबोध संत | ०–४ |
| ×* सुभे कल्याण | ०–५ |
| ×* दशकपद्धति व मे. सिस्टीम | ०–४ |
| ×* नारायणरावांचा खून व सवाई माधवरावांचें लग्न | ०–४ |
| ×* भूस्तरशास्त्र | ०–४ |
| ×* मराठी गद्याचा इंग्रजी अवतार | २–० |
| ×* स्वामी विवेकानंद | ०–४ |
| ×* कै. नामदार गोखले | ०–४ |
| ×* बंकिम चंद्र | ०–४ |
| ×* बालादर्श मुलींकरितां गोष्टी | ०–३ |
| ×* कै. आपटे–आठवणी व कादंबऱ्या | १–० |
| × आमचें पुणें | ०–१ |
| × महाराष्ट्राचा संक्षिप्त इतिहास | ०–४ |

| | रु. आ. |
|---|---|
| × नागरिकत्वावरील प्राथमिक पाठ | ०–८ |
| × पुणें जिल्ह्याचें पाठात्मक वर्णन | ०–४ |
| × एक नमुनेदार विद्यार्थी | ०–८ |
| × थोरांचा थोरपणा | ०–२ |
| × प्रगती | ०–८ |
| × शिक्षण व मानसशास्त्र | ०–१४ |
| × वानरांचा देव | ०–६ |
| × जार्ज वाशिंग्टनचें चरित्र | ०–८ |
| × आरोग्यशास्त्र | ०–१२ |
| निर्मला | १–८ |
| न पटणारी गोष्ट | १–८ |
| गणपतराव चरित्र | १–८ |
| General English | २–० |
| कमला ( काव्य ) | ०–४ |
| विनायकराव सावरकर | ०–३ |
| दिशाभूल ( नाटक ) | १–४ |
| गांधी टोपी ( नाटक ) | १–० |
| डाव जिंकला ( नाटक ) | ०–१४ |
| तारका ( काव्य ) | ०–२ |
| व्यवहारांतील शास्त्रीय गोष्टी | ०–५ |
| स्वयंपाकघरांतील " | ० ५ |
| श्रम तसें फळ | ०–५ |
| पांच कविता | ०–२ |
| मूकनायक | ० २ |

याशिवाय सर्व प्रकारचीं इंग्रजी व मराठी पुस्तकें आमचेकडे मिळतात.

ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स, बुकसेलर्स, बुधवार पेठ, पुणें.

**Registered No. B 1195.**

मुंबई इलाखा व मध्यप्रांत यथील शिक्षणखात्यानें
शाळांच्या लायब्ररींकरितां मंजूर केलेलें.

# अंकगणित कसें शिकवावें.

## पृष्ठसंख्या ३००.

उत्तम छपाई, मजबूत बांधणी, किं. रु. १॥.

आवृत्ति दुसरी.

या पुस्तकासंबंधानें मराठी शिक्षकानें पुढील अभिप्राय दिला आहेः—

'शिक्षकाच्या उपयोगासाठींच या विषयावर लिहिलेलें इतकें चांगलें पुस्तक अद्यापि आमचे पहाण्यांत आलेलें नाहीं. 'कसें शिकवावें' या मथळ्याचीं शिक्षकाकरितां मुद्दाम लिहिलेलीं जीं कांहीं पुष्कळ पुस्तकें अजून निघावयाचीं आहेत–आणि अशा पुस्तकांची फार जरूरी आहे–त्यांत सदर पुस्तकास उच्चस्थान द्यावें लागेल असें आम्हांस वाटतें. या विषयासंबंधीं ग्रंथकर्त्यास दहाबारा वर्षें प्रत्यक्ष वर्गामध्यें मिळालेल्या अनुभवानें या विषयाचीं निरनिराळीं प्रकरणें शिकविण्याच्या पद्धतीस निश्चित स्वरूप प्राप्त झालें आहे व्यवहारी अपूर्णांक, व्यस्त त्रैराशिक इत्यादि प्रकरणें उत्तम साधलीं आहेत. आकृतींमुळें पुष्कळ प्रकरणांत सुबोधता आली आहे. .........'

---

# पुस्तकांचें नवीन दुकान.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें मिळतात. स्त्रियांना उपयुक्त अशीं गाण्यांचीं, कहाण्यांचीं व गोष्टींचीं पुस्तकें आम्ही ठेवितों. आमच्या व्यवहाराबद्दल विद्वानांनीं उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत. व्यापारी व शाळामास्तर यांस भरपूर कमिशन दिलें जातें.

**ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स,**

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

बुधवार पेठ, पुणें शहर.

ता...........